# प्रमेयांची उधाते

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध.
सं. क्र. 2024.

REFBK-0012310

…ादक - डॉ. अ. ना. देशपांडे

सुविचार प्रकाशन मंडळ
सत्यम् शिवम् सुन्दरम्

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रमांक ........ दि: ........
वर्ग क्रमांक 2025 ........ नों: दि: ........

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०

# प्रमेयांची उद्याने

विचारप्रेरक मराठी निबंधसंग्रह

संपादक :
डॉ. अच्युत नारायण देशपांडे,
एम्. ए., पीएच्. डी.
मराठीचे प्राध्यापक
हिस्लॉप महाविद्यालय, नागपूर.
'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास'
या ग्रंथांचे कर्ते.

REFBK-0012310

REFBK-0012310

92390

सुविचार प्रकाशन मंडळ
नागपूर आणि पुणें

प्रकाशक :
श्यामकान्त बनहट्टी, बी. ए.
सुविचार प्रकाशन मंडळ,
धनतोली, नागपूर १.
४६१/१०, सदाशिव, पुणें २.

प्रथमावृत्ति, मे १९६२
किंमत तीन रुपये

या पुस्तकाचे मुद्रण नागपूर विद्यापीठाने आणि किंचित फरकाने मराठी साहित्य महामंडळाने मान्य केलेल्या मराठीच्या लेखन-नियमांप्रमाणे केले आहे.

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगांव
मुंबई ४.

प्रस्तावना

# विद्यार्थ्यांनो, अस्वस्थ व्हा आणि कृतज्ञ राहा.

‘पोळलेया सुनेयाचे परी असावे’

माणसे तीन प्रकारची असतात. बहिर्मुख दृष्टीची. अंतर्मुख दृष्टीची. मुळीच दृष्टी नसलेली. आपल्या भोवतालच्या सामाजिक जीवनामध्ये, तसेच निसर्गामध्ये, नाना प्रकारच्या अनंत घडामोडी सतत अव्याहत सुरू असतात. या घडामोडींचा अर्थ काय आहे ? त्यात काही कार्यकारणभाव आहे काय ? या घडामोडींचा आपल्या जीवनाशी संबंध कोणता ? त्यांच्यासंबंधी आपली प्रतिक्रिया कोणती असावी—कर्तव्याची, विरोधाची की उदासीनतेची ? का ?—असले किती तरी प्रश्न, समाज आणि सृष्टि यांसंबंधी जाग्रत माणसाच्या मनांत, नेहमीच उपस्थित होत असतात. मन असे अखंड जाग्रत असणे, त्यात उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या धडपडीत सदैव मग्न असणे, अखेरची उत्तरे न सापडल्यामुळे होणाऱ्या अस्वस्थतेमुळे सारखे जळत राहाणे—हे सुशिक्षितपणाचे खरे लक्षण आहे. ‘जळत हृदय माझे जन्म कोट्यानुकोटी’ ही ज्ञानसाधकाची स्वाभाविक अवस्था आहे. महानुभाव पंथाचे प्रभावी प्रवर्तक श्री चक्रधर यांनी या अवस्थेचे, पोळलेल्या कुत्र्याच्या दृष्टान्ताच्या आधारे, फारच बहारीचे वर्णन केलेले आहे :

“पोळलेल्या सुनेयाचे परी असावे ॥ पोळले सुने असे : तयासि कव्हणी ठाईं सुखासि न ए । वळणीखाली रिगे : परि : सुखासि न ए । कलवडा आतु रीगे: परि सुखासि न ए । ऐसे अखंड जळतचि असे ॥”

अंतरंगांत अशी ज्ञानलालसेची ज्योत अखंड पेटलेली राहाणे, का व कसे ? च्या अनावर लहरींनी मानससरोवर सारखे उचंबळलेले असणे, यातच जीवनाची सार्थकता आहे. म्हणून तर मानवी जीविताच्या यशस्वितेचे गमक निश्चित करताना वाल्टर पेटरने लिहिले आहे की To burn always with this hard gun-like flame, to maintain this ecstasy is success in life.

ज्ञानलालसा नसलेले जीवन म्हणजे मूर्ति नसलेले मंदिर किंवा प्राण नसलेले शरीर. श्रीज्ञानदेवांच्या ओवींत थोडासा बदल करून हाच आशय अशा रीतीने सांगता येईल की—

**ऐके जया प्राणियाच्या ठायी। ज्ञानप्राप्तीची आवडी नाही।**
**तयाचे जियाले म्हणो काई। वरी मरण चांग ॥**

मोरोपंतांनी 'केकावली'त दिलेला एक दाखला, प्रस्तुत विषयाच्या महत्त्व-निवेदनाच्या संदर्भात, फारच समर्पक वाटण्यासारखा आहे.

**'अलंकृतिमती सती मनि झुरे न जो संगती' ॥**

कुणी एक पतिव्रता स्त्री परोपरीच्या मौल्यवान अलंकारांनी नटलेली आहे; असे म्हणा ना की ती जणु ऐश्वर्याच्या राशीवर बसलेली आहे; पण पतिसहवास नसेल तर तिचे हे सगळे ऐश्वर्य व्यर्थ आहे; तिचे सौभाग्य, हे ऐश्वर्य असो वा नसो, पतिसहवासात आहे, पतीच्या प्रसन्नतेत आहे. त्याचप्रमाणे कुणा एकाच्या जीवनात ऐहिक वैभवाची, सुखसमाधानाची, मानमान्यतेची रेलचेल आहे. सुखलोलुप सधनाच्या घरी दुधातुपाची, मेवामिठाईची रेलचेल असावी तशी! पण जीवनाचा अर्थ समजून घेण्याच्या आत्यंतिक तळमळीमुळे उत्पन्न होणारी बेचैनी जर त्याच्या ठिकाणी नसेल तर स्थूल दृष्टीने संपन्न आणि सफल वाटणारे ते जीवन निरर्थक आहे; ते शुद्ध पशुजीवन आहे.

ज्ञानलालसा ही ईश्वररूप आहे. मानवाच्या अंतःकरणातील श्रद्धा हे ईश्वराचे आसन आजच्या ज्ञानी माणसाच्या अंतःकरणांतील हे आसन डळमळीत झालेले आहे. या अमर्याद विश्वात, निमिषार्धाचीहि उसंत न घेता जे जननमरण अपरिमित प्रमाणावर सुरू आहे त्याचा अर्थ काय? त्या मागचा प्रेरक हेतु कोणता? या प्रश्नाविषयीच्या तीव्र तळमळीमुळे त्याचे अंतःकरण अस्वस्थ झाले आहे. ही तळमळच आधुनिक काळातली मुक्ति आहे, हीच आजची ईश्वरी शक्ति आहे. अमेरिकेतील प्रॉटेस्टंट पंथातील एक थोर धर्म-विवेचक पॉल टिलिच (Paul Tillich) यांनी आजच्या आस्तिक्यबुद्धीची व्याख्याच मुळी अशी केली आहे. ते म्हणतात की "The God who is absent as an object of faith is present as the source of restlessness which asks the question of the meaning of existence." तात्पर्यार्थ हा की उत्तरोत्तर अधिकाधिक सखोल, व्यापक आणि

उत्कट होत जाणाऱ्या जिज्ञासेची पहाट ज्याच्या जीवनात उगवली नसेल त्याला आपल्या आयुष्यात सार्थकतेचा दिवस कधीच पाहावयाला मिळणार नाही हे उघड आहे. रहस्यशोध घेण्यासाठी आतुर झालेली दृष्टि ज्याच्याजवळ नाही त्याचे जिणे हे सृष्टीला केवळ एक ओझे आहे.

**जीवन दृष्टिसंपन्न असावे**

ही दृष्टि जेव्हा बहिर्मुख होते, भोवतालच्या समाजाच्या आणि सृष्टीच्या हालचालींचा अभ्यास करू लागते तेव्हा त्या अभ्यासातून, तदनुषंगिक विचारमंथनातून इतिहास, समाजशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायनविज्ञान, भूगर्भशास्त्र, वनस्पतिशास्त्र अशी समाजविषयक आणि सृष्टि-विषयक अनेक शास्त्ररत्ने उदयाला येतात. ही दृष्टि जेव्हा अंतर्मुख होते, आंतरविश्वासंबंधी चिंतनशील बनते तेव्हा या अंतर्मुखतेच्या वेलीला काव्य, कला आणि तत्त्वज्ञान ही नित्यरुचिर स्वरूपाची फळे लागतात. ही दृष्टि कधीच स्थिर नसते. ती सदैव विकासशील असते. नवी नवी दिव्य स्फुरणे तिच्या ठिकाणी नेहमीच प्रकट होत असतात. जुन्या चालत आलेल्या आचारविचारांबद्दल ती पुरेशी आस्था बाळगते; त्याचबरोबर नवे विचार, नव्या कल्पना, नव्या आकांक्षा, नवे संकेत यांना ती भरपूर उत्तेजन देते. परंपरा आणि प्रगति या तिच्या दोन सुकन्या. या दोघींचाहि ती यथान्याय गौरव करते. परंपरा आणि प्रगति यात सकृत्‌दर्शनी द्वैत दिसते; पण पाहणारा-जवळ योग्य दृष्टि असली म्हणजे ते द्वैत मावळते व त्या दोघीतील अद्वैताची प्रतीति येऊ लागते. आजची सून जशी उद्या सासू बनते त्याचप्रमाणे आजची प्रगति उद्या परंपरा होते. जीवनदृष्टि असलेला माणूस हा भूतकाळाचा मागोवा घेऊन, भविष्यकाळातील आपल्या जीवनदृष्टीशी सुसंगत असलेल्या ध्येय-सिद्धीच्या बिंदूवर दृष्टि केंद्रित करून वर्तमानकाळातील आपल्या आचारविचारांना इष्ट ते वळण लावीत असतो. अशा दृष्टीमुळे जीवनाला कलात्मक एकजिनसीपणा येतो. महाविद्यालयातून विद्यार्थ्यांनी जे उच्च शिक्षण घ्यावयाचे असते ते शास्त्र, कला, काव्य व तत्त्वज्ञान यांच्या अध्ययनातून अशी दृष्टि संपादन करण्याकरिता; जीवनाचा अर्थ कळण्याविषयी अधीर होण्याकरिता. स्वतंत्र जीवनदृष्टि संपादन करणे, जीवनाचा अर्थ जाणून घेण्याविषयी अधीर होणे, हेच महाविद्यालयातून उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अध्ययन-

व्यापाराचे प्रमुख उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांना या उद्दिष्टाची जाणीव नसेल तर उच्चशिक्षणसंपादनाचा त्यांचा सगळा खर्चिक खटाटोप निर्विवाद व्यर्थ आहे. उच्च विद्या संपादन करणे, ज्ञानदृष्टि अंगी बाणविणे, जीवनरहस्याचे संशोधन करणे ही एक तपस्या आहे. केशवसुतांनी एके ठिकाणी असे मार्मिक विधान केले आहे की कविता लिहिणे हे आकाशाची वीज हाती धरण्यासारखे आहे. विद्यार्थी होणे – विशेषतः महाविद्यालयीन विद्यार्थी होणे – जीवनदृष्टिसंपन्न विद्यार्थी होणे, हेहि असेच एक दिव्य कर्म आहे.

जीवनदृष्टि ही आपली स्वतःची, स्वतंत्र असावी लागते. ती उसनी घेता येत नाही. तसेच, दुसऱ्याच्या जीवनदृष्टीचे अनुकरण करूनहि चालत नाही. अनुकरण करणे हितावहहि नाही. कारण अनुकरणात मरण आहे. अनुकरण हे आपल्या व्यक्तित्वाच्या मौलिकतेचे सरण रचणे आहे. आपण कोण आहोत, आपल्या अंगच्या मूळच्या वृत्ति आणि शक्ति कोणत्या आहेत यांचा नीट शोध आणि बोध करून घेणे, आणि त्या वृत्तींच्या व शक्तींच्या विकासाला पोषक अशा अध्ययनात आणि व्यवसायात रमून जाणे, यातच जीवनाची सफलता आहे, यातच मोक्ष आहे. आपणाला अशी कैक माणसे आढळतात की त्यांची वृत्ति आणि व्यवसाय यात विसंवाद आहे. हा विसंवाद त्या व्यक्तीला मारक आहे आणि ती व्यक्ति ज्या समाजात राहाते त्या समाजालाहि मारक आहे. हा विसंवाद म्हणजे एक प्रकारचे पारतंत्र्यच आहे. "तैसी निजवृत्ति जेथ सांडे । तेथ स्वतंत्रते वस्ती न घडे ।" हे श्रीज्ञानदेवांचे वचन या दृष्टीने अतिशय अर्थगर्भ वाटण्यासारखे आहे.

आपले स्वातंत्र्य कशात आहे याचा शोध घेण्याची व आपल्या जीवन-हेतूची पृथगात्मता निश्चित करण्याची प्रेरणा होणे हे, ज्याच्याजवळ सुसंस्कृत-पणाची पुण्याई भरपूर आहे त्याच्याच बाबतीत शक्य आहे. 'बहुता सुकृताची जोडी । तरीच विठ्ठली आवडी ।' हे जसे खरे आहे तितकेच, 'बहुता सुकृताची प्राप्ति । तरीच लाभे जीवनदृष्टि ।' हेहि खरे आहे. आपली स्वतंत्र जीवनदृष्टि असण्यासंबंधी बहुसंख्य माणसे अभागी असतात, उदासीन असतात – प्रतिकूल परिस्थितीमुळे किंवा संस्कारहीनतेमुळे. जीवनाच्या रहस्याचा शोध घेण्याचा विचार त्यांच्या अंतरंगात कधीच डोकावत नाही. ही दृष्टि नसलेली माणसे; मानव्याच्या जागृत अवस्थेला न पोचलेली माणसे; शुद्ध देहात्मबुद्धीत कायमची बुडालेली माणसे; तामसी माणसे. काही थोडी माणसे बहिर्मुख दृष्टीची असतात.

त्यांच्या ठिकाणी शास्त्रांच्या आणि समाजजीवनाच्या अध्ययनाची प्रवृत्ति उदंड असते. ही राजस प्रकृतीची माणसे. अंतर्मुखतेच्या मंद, स्निग्ध, शीतल प्रकाशाने ज्यांचे व्यक्तिमत्व सुस्नात झाले आहे अशी माणसे त्याहूनहि थोडी. ही माणसे कविहृदयाची असतात. तत्त्वदर्शी असतात. ही सात्विक प्रकृतीची माणसे. जीवनदृष्टीच्या विकसनाच्या या तीन ठळक अवस्था. कोणत्याहि माणसाचे जीवन हे एक संपूर्णपणे एकाच अवस्थेचे निदर्शक नसते. या दृष्टीने विचार करता सर्वसामान्य माणसाचे जीवन हे इंद्रधनुष्यासारखे दिसू लागते. त्यात उपरोक्त तीन अवस्था आणि त्यांच्या अनेक स्थूल-सूक्ष्म छटा यांचे विविध रंग उमटलेले असतात. यांपैकी कोणत्या रंगाला, कोणत्या अवस्थेला किती उठाव मिळालेला आहे यावर माणसाच्या सुसंस्कृतपणाची इयत्ता अवलंबून असते.

**आपल्या आयुष्याचे थडगे करू नये.**

माणसाचा आणखी एक चौथा प्रकार सांगावयाचाच राहिला. ही तुष्टिपुष्ट माणसे. शांत, स्वच्छ जलाशयाचा तळ जसा स्पष्ट दिसतो त्याप्रमाणे अथांग जीवनसागराचा तळ आम्हाला स्पष्ट दिसलेला आहे असे म्हणणारी ही माणसे. जीवनरहस्याच्या जामदारखान्याच्या किल्ल्या आम्हाला सापडल्या आहेत अशी शेखी मिरविणारी ही माणसे. अमुक पुस्तकात किंवा अमुक प्रेषिताच्या, अमुक आचार्यांच्या अमुक उद्गारात जीवनाचे अखेरचे उत्तर दिलेले आहे असा निर्बुद्ध विश्वास बाळगणारी ही माणसे. त्यातहि पुन्हा, आमचाच प्रेषित खरा, दुसरे प्रेषित खोटे अशा दुराग्रहाची मस्ती चढलेली ही माणसे. ही बंद मनाची माणसे. ही माणसे कसली ?—ही चालतीबोलती थडगीच. आपल्या देशातील महाविद्यालयातून उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या आयुष्याचे असे थडगे करू नये. चार पुस्तके वाचली, आता मला सगळे काही समजले, असे वायफळ बोलून व्यर्थ डौल दाखवू नये. मला सगळे समजले आहे, मी शेवटचा निष्कर्ष काढलेला आहे अशा भ्रमात राहाणे ही मृतावस्था आहे. बायबलच्या एका आधुनिक भाष्यकाराने असे लिहिले आहे की When you reach a conclusion, you are dead. या वाक्याचे लाख वेळा मनन करणे आवश्यक आहे. हे मनन केले असता लक्षात येईल की सगळे समजल्याचा तोरा हा सर्वस्वी त्याज्य आहे, पूर्णपणे असमर्थनीय आहे. ज्ञानप्राप्तीचा हव्यास, जीवनरहस्याच्या शोधाचा हव्यास हा, एका

पाठीमागे एक अशा पर्वतांच्या अनंत रांगा असलेल्या विशाल नगाधिराजाला ओलांडून पलीकडे जाण्याच्या हव्यासासारखा हव्यास आहे. शेवटचे शिखर ओलांडू न शकल्यामुळे येणारी अस्वस्थता ही या ज्ञानमार्गात अपरिहार्य आहे. अस्वस्थता ही ज्ञानसाधकाची स्वाभाविक अवस्था आहे. ही अस्वस्थता जीवन-दृष्टीच्या विकासप्रवणतेची खूण आहे. मला अजून सगळे समजले नाही, मला अद्यापि अंतिम सत्याचे दर्शन झाले नाही ही अस्वस्थता, ही तगमग – हाच खरा जिवंतपणा आहे. आमच्या देशातल्या तरुण विद्यासेवकांनी असे अस्वस्थ राहावे, असे जिवंत राहावे.

**कृतज्ञ व नम्र असावे.**

अस्वस्थ असावे, पण त्याचबरोबर कृतज्ञहि असावे. ज्ञानमार्गावरचा आपला प्रवास आपल्याला काही ॲडमच्या प्राथमिक अवस्थेपासून सुरू करावयाचा नाही. आपल्या आधी कैक शतसहस्र वर्षे असंख्य दुर्लंघ्य अडचणींवर मात करून, कष्टांचे डोंगर उपसून, परोपरीच्या हालअपेष्टा सहन करून, प्रसंगी प्राणाचेहि बलिदान करून हा मार्ग आक्रमीत आक्रमीत मानव आजच्या टप्प्या-पर्यंत येऊन पोहोचलेला आहे. आपल्याला येथून पुढे जावयाचे आहे; पण पुढे जाताना सदा नम्र राहावयाचे आहे. ज्ञानसाधनेतल्या आजच्या टप्प्या-पर्यंतचे प्रचंड अंतर ज्यांनी आपल्या कर्तृत्वाने व करामतीने कापले, इतके सगळे अंतर चालत येण्याचे आमचे प्रयास ज्यांनी वाचविले त्या सर्वांबद्दलच्या कृतज्ञतेची वेल आपल्या अंतःकरणात आपणास सदैव प्रफुल्ल व टवटवीत ठेवा-वयाची आहे. कृतज्ञतेचा भाव हा जीवनपुष्पांतला सुगंध आहे. ज्याच्या जीवनात हा सुगंध नाही त्याचे जीवन बकाल आहे, आसुरी प्रकृतीचे आहे. कृतज्ञ असणे हे माणूस असण्याचे पहिले लक्षण आहे. माणसाला कृतज्ञ न राहून कसे चालेल? माणसाचे सगळे जीवनच ऋणमय आहे. ऋण फेडण्या-करिताच माणसाला जगावयाचे आहे.

ऋणे तीन. पितृऋण, ऋषिऋण आणि देवऋण. या ऋणांचे स्मरण सदैव जागृत ठेवणारा आणि आपल्या व्यक्तित्वाशी व जीवनदृष्टीशी सुसंगत अशा रीतीने या ऋणांची फेड करणारा माणूस हा खरा सुसंस्कृत माणूस आहे. या ऋण-कल्पनेची दुसऱ्याहि एका दृष्टीने मांडणी करणे शक्य आहे. ती मांडणी अशी की हे समग्र विश्वजीवन म्हणजे 'चिद्विलास' आहे, ईश्वराची लीला आहे,

परमेश्वराची कृपा आहे. आल्डस हक्स्लेने आपल्या एका ग्रंथांत या कृपेचे त्रिविध वर्गीकरण केले आहे : Animal Grace, Human Grace आणि Spiritual Grace. पितृऋण, ऋषिऋण व देवऋण ही तीन ऋणे आणि ही त्रिविध कृपा यातील सादृश्य मार्मिक वाचकाच्या चटकन लक्षात येण्यासारखे आहे. ईश्वरी कृपेचे हे सर्वसमावेशक स्वरूप लक्षात न घेता जो कोणी आपल्या कर्तृत्वाच्या अहंकाराचा फणा उगारीत राहील तो ईश्वरद्रोही ठरेल, त्याची कृतघ्नात गणना होईल. सुविद्यतेला जर कृतज्ञतेची साथ नसेल तर त्या विद्येला वारांगनेचे स्वरूप प्राप्त होईल, पण सुविद्यता आणि कृतज्ञता या जर सदैव एकत्र नांदतील, पराक्रमाला जर निरहंकारी प्रेमाची जोड मिळेल तर जीवन ही एक सफल स्वरूपाची सुमंगल साधना होईल. नुसतेच सुविद्य बनून, नुसताच पराक्रम गाजवून जीवन कृतार्थ होत नाही. त्यात कृतज्ञतेचे, ऋणस्मरणाचे केशर मिसळावे लागते, ते त्यात एकजीव व्हावे लागते. तसे झाले म्हणजेच जीवनात माधुर्य येते, जीवनाला खरी सार्थकता लाभते.

सुविद्यता आणि कृतज्ञता. ज्ञानप्राप्तीची अखंड, जिवंत तळमळ आणि ज्ञानप्राप्तीची साधने उपलब्ध करून देणारांचे कृतज्ञतापूर्वक, आदरपूर्वक स्मरण. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून मुख्यतः या दोन गुणांची अपेक्षा आहे. महाविद्यालयातून अनेक विषय शिकविण्यात येतात. ती सगळी ज्ञानप्राप्तीची साधने. 'प्रमेयांची उद्याने' या नामकरणाने सादर करण्यात येत असलेला प्रस्तुत निबंधसंग्रह म्हणजे त्यातलेच एक साधन. प्रस्तुत संग्रह तयार करताना दृष्टि मुख्यतः प्रमेयप्रधान निबंध निवडण्याची ठेवलेली आहे. समाज, सृष्टि आणि या दोघांशी येणारा आपला संबंध यातून उत्पन्न होणाऱ्या काही महत्त्वाच्या व मूलगामी प्रश्नांची ज्यात चिकित्सा केलेली आहे असेच निबंध या संग्रहात समाविष्ट केलेले आहेत. हे निबंध अभ्यासीत असताना विद्यार्थी विचारप्रवण व्हावा, वैचारिक दृष्ट्या अस्वस्थ व्हावा अशी अपेक्षा आहे. आपल्या जीवनदृष्टीची मूर्ति घडविण्याला उपकारक होईल असे साहित्यहि त्याला या निबंधातून उपलब्ध होण्याची भरपूर शक्यता आहे. जातिवंत जिज्ञासेच्या वृत्तीने हे निबंध अभ्यासिल्यानंतर विद्यार्थ्यांची ज्ञानलालसा वाढेल, खऱ्या ज्ञानसाधकांचा दर्जा त्यांना प्राप्त होईल, समाज, सृष्टि व आपण स्वतः यांसंबंधीच्या अनेक मौलिक प्रश्नांचे त्यांच्या ठिकाणी स्फुरण होईल, त्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या धडपडीने ते बेचैन होतील आणि त्याचबरोबर ज्या विचारवंतांच्या लिखाणामुळे त्यांना

प्रमेयदृष्टि प्राप्त व्हावयाची आहे त्यांच्याबद्दल, तसेच त्यांचे ज्ञानधन वाढविण्याला साहाय्य करणाऱ्या सर्व घटकांबद्दल ते सदैव कृतज्ञ राहतील. या सर्वांच्या ऋणाचे स्मरण त्यांना नेहमी नम्र आणि विनयशील ठेवील अशी उमेद आहे.

—अच्युत नारायण देशपांडे

## ऋणनिर्देश

'प्रमेयांची उद्याने' हा निबंधसंग्रह महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिताच मुद्दाम तयार केलेला आहे. याच्या निर्मितीचे श्रेय अनेकांना आहे. महाराष्ट्रातील काही ख्यातनाम विचारवंतांच्या निवडक विचारप्रेरक निबंधांनी या संग्रहाचे अंतरंग सजविलेले आहे. या निबंधांच्या लेखकांनी अथवा त्यांच्या हक्कदारांनी हे उतारे या संग्रहात घेण्याची परवानगी दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत. या संग्रहावर मुद्रणाचा सुबक संस्कार श्री. वि. पु. भागवतांच्या मौज प्रिंटिंग ब्यूरोने चढविलेला आहे. त्याला प्रकाशात आणण्यात सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर-पुणे या प्रकाशन संस्थेचे तरुण, सुविद्य व उत्साही संचालक श्री. श्यामकांत बनहट्टी यांनी उदंड परिश्रम घेतलेले आहेत.

प्रस्तुत संग्रह हा या सर्वांच्या सहकार्याचे मधुर फळ आहे. या सर्वांचा मी अतिशय ऋणी आहे.

—संपादक

संवादफलनिधाने।
प्रमेयाची उद्याने।
लावी म्हणे गहने।
निरंतर ॥

—ज्ञानेश्वरी अ. १२-१३.

## अ नु क्र म णि का


विद्यार्थ्यांनो, अस्वस्थ व्हा आणि कृतज्ञ राहा ! (प्रस्तावना) (३) ते (१०)

| | | |
|---|---|---|
| १. प्रवृत्तिधर्माची रग ... | पु. ग. सहस्रबुद्धे | १ |
| २. सुखसाधनांचे समायोजन ... | श्री. ना. बनहट्टी | १३ |
| ३. साहित्य आणि सेवा ... | प्र. के. अत्रे | २४ |
| ४. भौतिक शास्त्रांचे सामर्थ्य ... | द. के. केळकर | ३७ |
| ५. मूलोद्योगी शिक्षणयोजना ... | वि. द. घाटे | ४९ |
| ६. समाजसत्ता आणि आत्मसत्ता ... | शं. द. जावडेकर | ६२ |
| ७. विश्व मोठे, पण माणूस त्याहूनहि मोठा ! ... | श्री. म. माटे | ७३ |
| ८. जीवनकला ... | द. बा. कालेलकर | ८४ |
| ९. माझ्या अनुभवाचे सार ... | वा. म. जोशी | ९३ |
| १०. भविष्यकथन ... | न. चिं. केळकर | १०६ |
| ११. सृष्ट्यवलोकन ... | गो. ग. आगरकर | १२२ |
| १२. कर्तव्याकर्तव्याचा विचार ... | बा. गं. टिळक | १३३ |
| १३. विद्वत्त्व आणि कवित्व ... | वि. कृ. चिपळूणकर | १४५ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक
अनुक्रम ...४०७२५... वि: ...
ओळ ...२०८८५... नों: दि: ...
१२३९९

# १. प्रवृत्तिधर्माची रग

**पुरुषोत्तम गणेश सहस्रबुद्धे**

स्वतंत्र भारताच्या सर्वांगीण अभ्युदयासाठी समग्र भारतीयांनी प्रवृत्तिधर्माची प्रखर उपासना केली पाहिजे हे एक निर्विवाद प्रमेय आहे. संतांच्या निवृत्तिवादाच्या जळजळीत निषेधाच्या पार्श्वभूमीवर डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी प्रस्तुत लेखात या प्रमेयाचा आवेशपूर्ण पुरस्कार केलेला आहे. प्रवृत्तिधर्माच्या प्रचाराचे राष्ट्रीय कार्य एक व्रत म्हणून निष्ठापूर्वक अंगिकारणारे जे मोजके व्यासंगशील लेखक मराठीत आहेत त्यांत डॉ. सहस्रबुद्धे (जन्म इ. स. १९०४) यांचे स्थान फार मानाचे व महत्त्वाचे आहे. आगरकरांच्या विज्ञाननिष्ठ बुद्धिवादी विचारसरणीचा पुढला टप्पा, असा त्यांच्या विचारांचा गौरव करणे आवश्यक आहे. 'स्वभावलेखन' (१९३८) हा प्रबंध लिहून त्यांनी पीएच्. डी. ची पदवी मिळविली; पण त्यानंतर मात्र त्यांच्या लेखनाचा स्वभाव बदलून गेला. विज्ञान आणि लोकसत्ता यांवरील डोळस श्रद्धेचा आधार कायम ठेवून भारताचे ऐहिक जीवन बलसंपन्न व सुखसमृद्ध कसे करता येईल याचे विवेचन करण्याच्या कामी त्यांनी आपली युयुत्सु लेखनशक्ति राबविली आहे. 'विज्ञानप्रणीत समाजरचना', 'भारतीय लोकसत्ता', 'माझे चिंतन', 'लोकसत्तेला दंडसत्तेचे आव्हान' या ग्रंथांच्या व लेखसंग्रहांच्या रूपाने त्यांची ही लेखनशक्ति आविष्कृत झाली आहे. त्यांच्या विवेचनातील अभिनिवेशात एक प्रकारची धग आणि रग आहे. प्रस्तुत लेखातहि याची प्रतीति येण्यासारखी आहे. पुण्याच्या सर परशुरामभाऊ कॉलेजातील मराठीचे कुशल प्राध्यापक, विचारप्रेरक ग्रंथकार आणि प्रभावी वक्ते असा डॉ. सहस्रबुद्धे यांचा त्रिविध लौकिक आहे.

## संतांनी प्रवृत्ति शिकविली काय ?

मोक्षासाठी अरण्यात जाण्याची जरुरी नाही, संसारात राहूनहि त्याची प्राप्ति होऊ शकते. परमेश्वरार्पण बुद्धीने सर्व कृत्ये केली असता ती मोक्षाच्या आड येत नाहीत, असे संत सांगतात; आणि प्रत्येक मनुष्याने जन्माने प्राप्त

झालेले विहित कर्म केले पाहिजे, त्यातच त्याचे कल्याण आहे, असा उपदेश करतात. आणि एवढ्यावरून बहुतेक सर्व पंडित, संत प्रवृत्तिवादी होते, निवृत्तीची शिकवण त्यांनी दिली नाही, राष्ट्रीय प्रपंचाकडे, समाजाच्या अभ्युदयाकडे, ऐहिक उत्कर्षाकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही, असे मत बनवितात. हे पाहून मोठा विस्मय वाटतो आणि खेदहि होतो. राष्ट्रीय प्रपंचातील यश ही अशी सहजसाध्य गोष्ट आहे काय ? 'करायला हरकत नाही', 'ती आमच्या आड येणार नाही', अशा वृत्तीने जिच्याकडे बघावे अशापैकी ही एक कनिष्ठ दर्जाची आकांक्षा आहे काय ? राष्ट्रीय प्रपंचातील यशःसिद्धि ही महान् प्रयत्न, अनन्य निष्ठा, अहोरात्रीचा ध्यास, सर्वस्व-अर्पण, सर्व सामर्थ्यांचे केंद्रीकरण, यावर अवलंबून आहे, हे या पंडितांनी दृष्टिआड का करावे ते समजत नाही. बुद्धि, मन, शरीर यांची सर्व सामर्थ्ये पणास लावावी तेव्हाच अभ्युदयाची एखादी पायरी चढता येते हे आज कोणाला सांगावयास पाहिजे काय ? उत्साह, धैर्य, साहस, आत्मविश्वास इत्यादि गुणांची जन्मोजन्मी केलेली जोड जेव्हा खर्ची टाकावी तेव्हा ऐहिक उत्कर्षाचे क्षितिज दृष्टीला दिसू लागते, याविषयी भिन्नता असू शकणार नाही. असे जर आहे तर या जगाच्या संसारातील स्वातंत्र्य, समृद्धि, विद्याकलादि वैभव यासाठी हिरीरीने उडी घ्यावी, त्यावर सर्व सामर्थ्य केंद्रित करावे, मानवाने तो ध्यास घ्यावा असे संतांनी कोठे सांगितले आहे काय हा मुख्य प्रश्न आहे.

**संत म्हणतात, संसार हा मळ आहे.**

संतांनी याचा बरोबर उलट कृति केली आहे. संसारात राहावे असे ते म्हणतात; पण जो संसार करण्याची त्यांनी मोठ्या औदार्याने परवानगी दिली त्याच्याविषयी कोणालाहि कसलाहि उल्हास वाटू नये, त्याची किळस यावी, उबग यावा अशी त्यांनी व्यवस्था करून ठेविली आहे. संतांची संसाराची वर्णने वाचूनहि एखाद्याला त्याच्याबद्दल उत्साह शिल्लक राहिला तर ती त्या नराची बहादुरीच समजली पाहिजे. ज्ञानेश्वर म्हणतात, संसार हा मळ आहे, ही घाण आहे, ही ओकारी आहे, हे विषाचे कांदे आहेत, हे इंगळाचे अंथरूण आहे; मनुष्याने याचा धसका घ्यावा, त्याला भ्यावे. राखोंडी फुंकली तरी तीतून जशी ज्वाला निघत नाही तसे या संसारांतून सुख मिळणार नाही. लज्जा (ऱ्ही) या शब्दाचा अर्थ स्पष्ट करताना ते म्हणतात, जन्माला आलो हीच

सर्वांत लाज वाटण्याजोगी गोष्ट आहे. श्रीतुकारामांचे संसाराविषयी असेच मत आहे: 'विटले हे चित्त प्रपंचापासूनी, वमन ते मनी बैसलेसे!' ढेकणाच्या बाजेवर सुख मिळत नाही तसेच संसारापासून मिळणार नाही. 'संसारसंगे परमार्थ जोडे, ऐसे काय घडे जाणतेवो, का रे दास होसी संसाराचा खर, दुःखाचे डोंगर भोगावया,' असे तुकाराम महाराजांचे उद्गार आहेत. ही वर्णने काहीच नव्हेत अशी अत्यंत किळसवाणी वर्णने सर्व संतांनी संसाराची केली आहेत. संसारात राहावे असे संत म्हणतात; पण तेथे राहाताना त्या संसाराविषयी अशी वृत्ति असावी अशी त्यांची अट आहे.

**संत सांगतात–पुत्र, वित्त, कलत्र ही विषाची पात्रे आहेत.**

संसारात कर्तृत्व करावे, पराक्रमाच्या कोटी कराव्या ही माणसाच्या मनाला उभारी येते ती आपल्या स्त्रीपुत्रांवरील प्रेमामुळे येते. पहिली प्रबळ प्रेरणा हीच असते आणि तेथूनच मनाचा विकास होत जाऊन त्याची दृष्टि राष्ट्रीय प्रपंचाकडे वळते. स्त्री-पुत्र, बंधु, भगिनी, आप्तइष्ट यांच्या विषयीचा हा जो मनाला वाटणारा लोभ त्यावर संतांनी नेमकी कुऱ्हाड घातली आहे. या स्त्री-पुत्रांची त्यांनी अशीच हिडीस निंदा केली आहे. तुकाराम म्हणाले,—'हो का पुत्र पत्नी बंधु, त्यांचा तोडावा संबंधु, फोडावे मडके, मेल्या लेखी घाये एके ॥' पुत्र, पत्नी हे चोर आहेत. त्यांच्या पाल्नापासून हित काय होणार ? असेहि त्यांनी म्हटले आहे. ज्ञानेश्वर म्हणतात, पुत्र, वित्त, कलत्र ही विषाची पात्रे आहेत. वाटेने जाताना झाडाची सावली दिसते, तिच्याविषयी जितकी आस्था वाटते तितकीच स्त्रीविषयी वाटावी; आणि त्या झाडाखाली जी गुरे बसलेली असतात, त्यांच्याइतकेच प्रेम आपल्या मुलांवर असावे. मुलांचा वाढदिवस हा घरातला मोठा आनंदोत्सव असतो. अपत्यप्राप्तीमुळे माणसाच्या पराक्रमाला उभारी येते, उत्साह वाटतो. पण ज्ञानेश्वर बालकांचा वाढदिवस करणाऱ्यांची चेष्टा करतात: मुलाचा वाढदिवस होतो याचा अर्थ असा की, तो मृत्यूच्या जास्त जवळ गेला आहे; हे कोणी ध्यानांत घेत नाही. आणि वेड्यासारखे—'वाढती करती उल्हासे, उभवविती गुढिया' (९–५१२). तुकारामांनी तर असे म्हटले आहे की, 'कोणाला संतान व्हावे, मुलगा व्हावा असे शब्द माझ्या मुखातून कधीहि निघू नयेत. कारण संतान धन यांच्या लोभाने मनुष्याचा शेवटी अधःपात होतो' (जोग गाथा–५४९). संसार करावा

असे संत म्हणतात, अरण्यात जाण्याची गरज नाही असे त्यांचे मत आहे; पण घरीच संसाराचे असे अरण्य केले पाहिजे अशी अट ते घालतात.

**निवृत्तिनिष्ठा हा भरतभूमीस शाप आहे.**

मोक्षधर्मावरची ही जी अतिरेकी, एकांतिक, इहनिरपेक्ष निष्ठा तिचेच नांव निवृत्ति असे आहे. ही आत्यंतिक निष्ठा हा भरतभूमीस एक शाप आहे. त्यामुळेच तिचे कर्तृत्व वरचेवर खची होत असते. या मोक्षधर्माचे हे असले वर्चस्व आपल्या मनावर जोपर्यंत आहे तोपर्यंत प्रवृत्तीची खरी रग आपल्या ठायी निर्माण होणार नाही. प्रवृत्तीधर्माचा मूळ पाया कोणता हे ज्यांना पाहावयाचे असेल त्यांनी महाभारतातील शांतिपर्वातले राजधर्मप्रकरण समग्र अभ्यासावे. भीष्म, श्रीकृष्ण, व्यास यांसारख्या त्या काळच्या समाजधुरीणांनी एक विचार निश्चित केला होता की, राजकीय दृष्ट्या राष्ट्र समर्थ, बलाढ्य असणे, ते आत्मसंरक्षणक्षम असणे, समाजात अराजक नसणे ही समाजाच्या धार्मिक उन्नतीसाठी पहिली आवश्यक गोष्ट आहे. म्हणून सर्व धर्मात राजधर्म श्रेष्ठ असे त्यांनी निक्षून सांगितले आहे. 'सर्वा विद्या राजधर्मेषु युक्ताः। सर्वे लोका राजधर्मे प्रविष्टः। तस्माद् धर्मो राजधर्माद् विशिष्टो। नान्यो लोके विद्यतेऽजातशत्रो'।

**राजधर्म हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे.**

राजधर्म म्हणजेच अलीकडच्या भाषेत राजकारण किंवा राष्ट्रनिष्ठा. याहून श्रेष्ठ धर्म असूच शकत नाही, असे महाभारतकारांचे मत होते. (शांति. ६२-२९,३०). कारण राजधर्माचे साह्य नसेल तर चोर, दरवडेखोर, पुंड, आक्रमक हे अराजक माजवितात, आणि मग मोक्षधर्माचेहि आचरण करता येत नाही. संतांनी स्वधर्माचरण म्हणजे विहितकर्म केलेच पाहिजे असे सांगितले आहे. पण ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र—शिंपी, कुंभार, परीट यांना शत्रूंनी गुलाम केले, विकून टाकले, सक्तीने बाटविलें, त्यांचे संसार उध्वस्त केले तर ते विहितकर्म कसे करणार? जातिप्रमाणे, वर्णाप्रमाणे नेमून दिलेले कार्य कसे पार पडणार? ते साधण्यासाठी, म्हणजे स्वधर्माचरण करून मोक्ष मिळविण्यासाठीसुद्धा प्रथम राष्ट्र बलसंपन्न असले पाहिजे. तेथे शांतता व सुव्यवस्था असली पाहिजे. हे संतांनी कधीहि सांगितले नाही. आणि महाभारतकारांनी ते अनेक वेळा आवर्जून सांगितले

आहे. जेव्हा जेव्हा धर्म लयास जातो तेव्हा तेव्हा त्याची उन्नति क्षात्रधर्मानेच---राजधर्मानेच करता येते. म्हणून क्षात्रधर्म सर्वांत श्रेष्ठ होय, यांत सर्व धर्मांचा समावेश होतो, असे त्यांचे मत होते. (शांति. ६३-२३). भगवान् विष्णूने पूर्वी क्षात्रधर्माचा आश्रय करून शत्रूला मारून, देवांचे व ऋषींचे (म्हणजेच संतांचे) रक्षण केले. त्याने जर असे केले नसते तर?— 'न च ब्रह्मा, नैव लोकादिकर्ता। सन्तो धर्माश्चादिधर्माश्च न स्युः।' अशी स्थिति झाली असती – धर्म, आदिधर्म, संत, लोक व स्वतः भगवान् ब्रह्मदेव यांचा नाश झाला असता. म्हणून पितामह म्हणतात,—

तस्मात् श्रेष्ठा राजधर्मा न चान्ये। वीर्यश्रेष्ठा राजधर्मा मता मे।
(शांति. ६४-१२)

'वीर्यशौर्यसंपन्न असा राजधर्मच श्रेष्ठ होय असे माझे मत आहे.' महाराष्ट्रीय संतांनी राजधर्माची, समाजसंरक्षणाची, राष्ट्राच्या सामर्थ्यसंपन्नतेची अशी महती गाइली असती तर त्यांना प्रवृत्तिवादी म्हणणे कांहीसे सार्थ ठरले असते. समर्थांनी अल्पांशाने का होईना, पण निःसंदिग्ध शब्दात हे महत्त्व सांगितले आहे. पण त्यांच्यावर सध्या पंडितांची गैरमर्जी झालेली आहे.

**संतांनी राजधर्माची निंदा केली आहे.**

राजधर्मांचे म्हणजे समाजाच्या संरक्षणसामर्थ्याचे महत्त्व एकदा मान्य केले म्हणजे इहलोकातल्या सर्व शक्तिकेंद्रांचे महत्त्व आपोआपच मान्य करावे लागते. त्यामुळेच बुद्धिबल, बाहुबल, धनबल यांचे महाभारतात अतिशय आदराने वर्णन केले आहे आणि यावरच सर्व पारलौकिक धर्म, सर्व परमार्थ अवलंबून आहे, असे पुन्हा पुन्हा सांगितले आहे.

महाभारतकारांच्या मते मोक्षधर्म, परलोक, परमार्थ, पंढरी, विठ्ठल, जन्ममृत्यूंचा नाश, स्वकर्म, विहितकर्म, चातुर्वर्ण्य हे सर्व राजधर्माधीन आहे; म्हणजे समाजातील लष्करी सामर्थ्य, संघटणा, धनसमृद्धि, ऐहिक विद्यांचा अभ्यास, बौद्धिक सामर्थ्य यावर अवलंबून आहे. राजवाडे प्रवृत्तिधर्म म्हणतात तो हा होय. ज्यांना संतांना प्रवृत्तिवादी ठरवावयाचे आहे त्यांनी अशा तऱ्हेचे विचार त्यांच्या वाङ्मयातून काढून दाखविणे अवश्य आहे. संतांनी असले विचार कोठेहि सांगितलेले नाहीत. बुद्धि, बल, धन, यांची स्त्रीपुत्राप्रमाणेच

त्यांनी ओंगळ निंदा केली आहे. 'जया राज्य, द्रव्य करणे उपार्जना, वश दंभ माना इच्छे झाले!'—तुकाराम. ज्यांना राज्य, धन यांची आकांक्षा आहे त्यांच्या ठायी दंभ, अहंकार येतातच असे सरसकट विधान संत करतात. वास्तविक भगवद्भक्तीमुळेसुद्धा मनात दंभ, अहंकार निर्माण होतात. संतांनीच असे अनेक ठिकाणी म्हटले आहे. पण तेवढ्यासाठी भगवद्भक्ति वमनासारखी त्याज्य मानावी असे ते म्हणत नाहीत. पण राज्य, धन यांच्यावर मात्र त्यांचा कटाक्ष आहे. भगवद्भक्तीत दंभ, ढोंग, अहंकार यांचा प्रवेश झाला तर ती धनाइतकीच किंबहुना जास्तच घातक ठरते, हा आपला रोजचा अनुभव आहे. पण संत राज्य, धन यांनाच फक्त धारेवर धरतात. धनसंचय संसारासाठीसुद्धा करू नये असे तुकाराममहाराज सांगतात. पक्षी, अजगर धन साठवीत नाहीत तरी अनंत त्यांचा प्रतिपाळ करतो; तसाच आपला करील. द्रव्याच्या मागे कलिकाळाचा लाग आहे, ते निरयाचे मूळ आहे, अन्न, वस्त्र, घर प्रारब्धाधीन आहेत, तेव्हा त्यांची काळजी सोडून, 'वाणी नारायणी वेचा,' असा त्यांचा उपदेश आहे. क्वचित् कोठे धन मिळविण्यास ते परवानगी देतात; पण संसार करण्याची जशी, तशीच ही अनुज्ञा निराशाजनक आहे. तेव्हा राजधर्माची प्रमुख साधने म्हणजे बुद्धि, बाहु, धन—ही बले यांचीहि संतांनी स्त्रीपुत्राप्रमाणेच निंदा केली आहे. मोक्ष धर्माचा अतिरेक, आत्यंतिक निवृत्ति ती हीच होय.

**प्रवृत्ति म्हणजे प्रबळ विजिगीषु धनभावना**

इहलोकीचे जीवन समृद्ध, संपन्न, आणि अत्यंत वैभवशाली करण्यासाठी त्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत जे अपरिमित कष्ट करावे लागतात, ते त्या वैभवावर अगदी पराकाष्ठेची निःसीम निष्ठा असल्यावाचून मनुष्याच्या हातून होणे शक्य नाही. विजेचा दिवा शोधण्यासाठी एडिसनने नऊ हजार वेळा प्रयोग केले आणि अनेक वेळा दिवाळखोरी पत्करून चार लक्ष रुपये खर्च केले. हिंदुस्थान, चीन, ब्रह्मदेश, दक्षिण अमेरिका या देशांच्या गहन अरण्यात योग्य बांबू शोधण्यासाठी त्याची माणसे वर्षानुवर्षे वणवण भटकत होती. अमेरिकेतील भांडवलदारांनी त्याच्याविरुद्ध अनेक कारवाया केल्या होत्या. अनेकांनी त्याला वेडा ठरवला होता. अशाहि परिस्थितीत चिकाटी धरून अविरत कार्य करीत राहण्याची जी वृत्ति ती खरी प्रवृत्ति होय. मेरी क्युरी व पेरी क्युरी यांनी रेडियम शोधण्यासाठी कसे व किती प्रयोग केले हे

सर्वविश्रुत आहे. दिवसभर पोटाचा उद्योग करावयाचा आणि नंतर रात्री प्रयोगशाळेत जाऊन मणावारी माती उकळावयाची, ढवळावयाची, त्यातून निघणाऱ्या विषारी वायूंनी अनेक वेळा मूर्च्छा आली तरी ती सोसावयाची, या प्रयत्नांत हाताला कॅन्सर होऊन मृत्यू येण्याचा संभव दिसत असला तरी मानवाच्या सेवेसाठीच ही आपत्ती येत आहे, अशी श्रद्धा ठेवून मन स्थिर ठेवावयाचे, असे हे अग्निदिव्य आहे. हे संशोधन प्रारब्धाधीन आहे, अशी संतप्रणीत कल्पना एक क्षणभर जरी या संशोधकांच्या मनात आली असती तरी त्यांच्या हातून हे प्रयत्न झाले नसते. केप्लर, न्यूटन यांनी तीस-तीस वर्षे अलोचन जागरणे करून ग्रह, तारे यांचे वेध घेऊन गुरुत्वाकर्षणा-सारखे सिद्धांत प्रस्थापित केले. हा संसार वमनासारखा आहे, असे त्यांना वाटत असते तर त्यांच्या हातून ही तपश्चर्या झाली असती काय, याचा विचार आपण करावा. इतिहासकार नानासाहेब सरदेसाई यांनी सतत पंचा-वन्न वर्षे परिश्रम करून आज सहा हजार पृष्ठांचा मराठ्यांचा इतिहास आपल्यापुढे ठेविला आहे. लक्षावधि कागदपत्रे पाहाणे, तपासणे, लावणे, नवे संशोधन झाल्यावर पहिली प्रसिद्ध झालेली पुस्तके रद्द करून फिरून सर्व पहिल्यापासून लिहून काढणे, या यातनांना व या कष्टांना सीमा नाही. मराठयांचा इतिहास इंग्रजी भाषेत लिहिला गेला तो इंग्रजी, पंजाबी, बंगाली अशा परकीय पंडितांकडून. त्यांनी अनेक ठिकाणी प्रमाद केले आहेत, विपर्यास केला आहे. त्यामुळे मराठ्यांच्याविषयी जगाचे मत कलुषित झाले आहे. मराठा पंडितांनी मराठ्यांचे चरित्र जगापुढे मांडलेच नाही. ही उणीव ध्यानी घेऊन नाना-साहेबांनी वयाची ऐंशी वर्षे झाल्यावरहि तो उद्योग हाती घेतला व इंग्रजीत मराठयांचा इतिहास लिहिण्याचे कार्य पुरे करीत आणले. या जगात जन्माला आल्याचीच लाज वाटली पाहिजे अशी ज्या माणसाची वृत्ति आहे, जगात आलोच आहो, मोक्ष मिळेपर्यंत राहाणे भागच आहे, तेव्हा एखाद्या पांथस्था-प्रमाणे, वाटसरूप्रमाणे या संसाराकडे पाहात कालक्रमणा करावी, अशी भावना ज्या माणसाची झाली आहे, ज्याने संतांच्या उपदेशामुळे ती प्रयत्न-पूर्वक बनविली आहे, त्या माणसाच्या हातून असा उद्योग होईल काय, हा प्रश्न वाचकांनी मनात घोळत ठेवावा, म्हणजे त्यांना प्रवृत्तिधर्म म्हणजे काय याचा अर्थ समजेल. संसारात राहिले तरी चालेल, ते मोक्षाच्या आड येणार नाही, अगदी अलिप्तपणे राहावे म्हणजे झाले; वृत्ति उदास ठेवावी, पांथस्था-

प्रमाणे बायका–मुलांकडे पाहावे, मग संसाराचे भय राहणार नाही, असे संत सांगतात आणि याला सध्याचे पंडित प्रवृत्ति म्हणतात. प्रवृत्ति ही अशी ऋण भावना, अकरणात्मक भावना नाही. ती एक प्रबळ, समर्थ, उत्साहदायी, विजिगीषु अशी धनभावना आहे. संताच्या तत्त्वज्ञानाला प्रवृत्ति म्हणणे ही त्या शब्दाची विटंबना आहे. त्यांच्या मनात हे नवे पंडित त्यांच्यावर लादीत असलेला प्रवृत्तिभाव केव्हाहि नव्हता. जगाची त्यांना काळजी वाटे ती मोक्षापुरती. 'बुडती हे जन, पहावेना डोळां' असे तुकाराम म्हणाले, तेव्हा जनतेवरील परकीय आक्रमण, तिची आर्थिक विपत्ति, अनान्नदशा, अज्ञान, दौर्बल्य, रोगराई, दुष्काळ इत्यादि संकटांचा त्यांच्या मनात विचार नव्हता. या जनांना पंढरीला कसे न्यावे, त्यांना संसारात ठेवून संसाराबद्दल त्यांच्या मनात किळस कशी उत्पन्न करावी, त्यांना मोक्ष कसा मिळवून द्यावा एवढीच चिंता त्यांच्या मनात होती. 'बायको मेली तर बरे झाले, एका मायेतून सुटलो; पोर मेले तर चांगले झाले, दुसऱ्या पाशातून मुक्त झालो; माता मेली तर सगळीच चिंता संपली; आता विठो, तू आणि मी' अशी त्यांची वृत्ति होती. यावरून त्यांना काळजी कशाची होती ते स्पष्ट होईल.

### देशाच्या ऐहिक उत्कर्षाला प्रवृत्तिनिष्ठा आवश्यक आहे.

या विषयाचा एवढ्या आग्रहाने प्रपंच करण्याचे कारण वर सांगितले आहे. एथून पुढे आपला देश आपणास धनधान्याने समृद्ध करावयाचा आहे. बुद्धिबल, शास्त्रबल, शस्त्रबल यांनी त्याला संपन्न करून टाकण्याची आपण आकांक्षा धरलेली आहे. प्रत्येकाला अन्न, वस्त्र, घर व विद्या आपणास सुलभ करून द्यावयाची आहे. साहित्य, कला, विज्ञान या संस्कृतीच्या अंगोपांगांचा बहुजनांना लाभ करून देण्याच्या गोष्टी आपण बोलतो. हे सर्व साधावयाचे तर अनंत प्रकारचे कर्तृत्व, फार मोठा प्रयत्न, महान उद्योग, प्रचंड साहस, दुर्दम उत्साह, अपराजित असे मनोधैर्य, तीव्र क्रांतिकारक वृत्ति, वाटेल त्या पाशवी सत्तेशी लढा देण्याची शक्ति या गुणांची जोपासना आपल्या समाजात झाली पाहिजे. आणि प्रत्यक्षाकडे दृष्टि टाकली तर आपण बहुसंख्यजन अजून निराशावादी, दैववादी, प्रारब्धावर हवाला ठेवणारे, दिवसातून दहा वेळा कपाळाला हात लावणारे असे आहो असे दिसेल. थोडासा आघात होताच मागे फिरून परमार्थाचा आश्रय करावा, उदासीन व्हावे, तेथली भाषा बोलून मनाचे समाधान

करण्याचा प्रयत्न करावा अशी आपल्या मनाची घडण अजून कायम आहे. ही घडण आहे तोपर्यंत आपल्यामधून राष्ट्राला अवश्य तेवढे कर्तृत्व निर्माण होणे शक्य नाही. आणि खऱ्या प्रवृत्तिधर्मांच्या उपदेशावाचून, प्रसारांतून त्या धर्मांची रग आपल्या रक्तांत निर्माण झाल्यावाचून आपल्या मनाची घडण बदलणे शक्य नाही. अशा स्थितीत संतांनी शेकडो जी निवृत्तीची, उदासीनतेची, मोक्षैकनिष्ठेची बीजे आपल्या समाजात पेरून ठेविली आहेत तीच प्रवृत्तीची लक्षणे आहेत असे जेव्हा नवे पंडित सांगू पाहातात, तेव्हा नव्या पिढीच्या दृष्टीने ही फार हानि असे वाटते. ब्रिटन, अमेरिका, जर्मनी या राष्ट्रांनी आपल्या समाजाची जी भव्य उभारणी केली आहे, तिला आवश्यक असलेल्या प्रवृत्तीचे स्वरूप काय हे जर आपण जाणले तर आपल्या हातून वरील प्रमाद होणार नाही असे वाटते. संसाराविषयीची अनासक्ति, उदासीनता यांची जी शिकवण तिचा परिपाक झाला म्हणजे काय होईल? ज्ञानेश्वर म्हणतात, असा परिपाक झाला की त्या पुरुषांचे संसाराविषयीचे प्रेम ढिले, निर्बळ होऊन जाते; त्या वेळी फळ देठाला राहू शकत नाही, देठ फळाला धरू शकत नाही, अशी अवस्था होते. नेमकी हीच गोष्ट व्हावयास नको आहे. तो परिपाक किती जणांना साधेल तो साधो, पण प्रारंभापासूनच आमची दृष्टि मात्र इहविमुख होते. आम्ही संसार करतो; पण तो दुबळेपणाने, ढिलेपणाने करतो. जोपर्यंत अशी वृत्ति आहे, संसारावर पराकाष्ठेची, अगदी निःसीम अशी निष्ठा जोपर्यंत आमच्या मनात नाही तोपर्यंत नव्या राष्ट्रीय प्रपंचाच्या सिद्धीसाठी जी प्रचंड उभारी अवश्य आहे ती आमच्या ठायी निर्माण होणार नाही. संसारावरील दृढ निष्ठेमुळेच मनुष्य ऐहिक उत्कर्षाचे उद्योग करू शकतो, त्यासाठी अवश्य त्या यातना सोसू शकतो.

**संतांचे वैराग्य हे कर्तृत्ववानांच्या अध्यात्मनिष्ठेहून निराळे!**

प्रा. फाटक म्हणतात की संतांनी वैराग्याचा उपदेश केला तो योग्यच होता. सर्व क्रांतिकारकांना, देशभक्तांना वैराग्य अवश्यच असते. फाटक येथे मोठीच दिशाभूल करीत आहेत असे वाटते. लेनिन, वॉशिंग्टन, सन्‌यत्‌सेन, सावरकर, केमालपाशा यांचा निग्रह, यांचा त्याग, यांनी संसारसुखाची केलेली उपेक्षा आणि संतप्रणीत वैराग्य ही एकच आहेत काय? या लोकांना जगाचा उबग येऊन त्यांनी त्याग केलेला नव्हता. आपल्या स्त्री-पुत्रांविषयी मडके फोडून टाकण्याच्या कल्पना त्यांच्या मनात कधीच नव्हत्या. उलट

त्यांच्याविषयी त्यांच्या मनात अखंड प्रेमच होते. ते प्रेम हीच त्यांची प्रबळ प्रेरणा होती. 'माझ्या स्त्रीवरील प्रेमामुळेच मी साहसकर्माला, आत्मार्पणाला प्रवृत्त होतो,' असे स्वित्झरलंडचा क्रांतिकारक विल्यम टेल याने सांगितल्याचे प्रसिद्धच आहे. या क्रांतिकारकांनी त्याग केला तो इतरांना जगातले भोग मिळावे म्हणून केला; सर्वांनाच जगाविषयी तिटकारा यावा म्हणून नव्हे. अध्यात्मनिष्ठेविषयी लिहिताना प्रा० सरदार म्हणतात की तसे पाहिले तर टिळक व महात्माजी हेहि अध्यात्मनिष्ठच होते. प्रा. न. र. फाटकांच्या क्रांतिकारकांच्या वैराग्याप्रमाणेच सरदारांनी उल्लेखिलेली टिळक-गांधी यांची अध्यात्मनिष्ठा आहे. टिळक व महात्माजी यांचे श्वसनसुद्धा या जगातल्या अभ्युदयासाठी असे. इतकी त्यांची इहनिष्ठा जाज्वल्य होती. इतकी ही निष्ठा असल्यानंतर मग माणसाचे मन कितीहि अध्यात्मनिष्ठ असले तरी त्यामुळे समाजाची हानि होत नाही. टिळक–महात्माजीच काय, पण सध्याचे जगांतले आइन्स्टाइन, एडिंग्टन्, जीन्स, ऑलिव्हर लॉज् हे अग्रगण्य शास्त्रज्ञहि अध्यात्मनिष्ठ आहेत. पण टिळक–महात्माजींप्रमाणे तेहि दिवसाचा क्षण न् क्षण या जगाच्या अभ्युदयासाठी वेचीत असतात. यानंतर जी अध्यात्मप्रवृत्ति राहील ती माणसाच्या कर्तृत्वाची हानि करीत नाही. इतकेच नव्हे तर ती त्या कर्तृत्वाला पुष्कळ वेळा पोषकच ठरते. लोकांनी आपापल्या विहित कर्मात मग्न असावे असे संतांनी शेकडो वेळा लिहिले आहे; पण ते विहित कर्म ज्या संसारासाठी, ज्या जगासाठी करावयाचे त्याचे सहस्र वेळा अत्यंत ओंगळ वर्णन करून, त्याच्याविषयी किळस निर्माण करून, मृत्यु उद्या येणार आहे अशा वृत्तीने वागण्याचा उपदेश करून, त्यांनी मनुष्यांच्या कर्तृत्वाच्या मागची मूळ प्रेरणाच पांगळी करून टाकली; आणि ते त्यांनी हेतुपूर्वक केले आहे. अशा वर्तनाने जगाविषयीचे प्रेम दुबळे होते, शिथिल होते हे त्यांनी अभिमानाने सांगून तसा उपदेश केला आहे. याचा अर्थ असा की, प्रवृत्तीचे मूळच त्यांनी उपटून टाकिले आहे.

**मराठी संतांनी काही विधायक कार्यहि केले आहे.**

संतांच्या कार्याचे अशा प्रकारचे मूल्यमापन केल्यावरहि राजवाडे यांचे एकांतिक मतच आपण स्वीकारले पाहिजे असे मला वाटत नाही. कारण धर्म व भाषा या क्षेत्रात त्यांनी जे एक विशिष्ट कार्य केले आहे त्यासाठी महाराष्ट्र सदैव त्यांचा ऋणी राहील. त्या काळीं बहुजनसमाजात जाखाइ—जोखाई,

मरी-आई इत्यादि हीन, क्रूर, अमंगळ अशा देवतांचे पूजन चालू होते. त्याचा निषेध करून देव ही एक क्रूर, सौदा करणारी, केवळ शासन करणारी, सूडबुद्धि बाळगणारी शक्ति नसून ती माउली आहे, मातेप्रमाणे ती भक्तांचा प्रतिपाळ करते आणि यासाठी तिला काही बळी द्यावा लागत नसून केवळ भक्तीने, प्रेमाने ती वश होते, हा अतिशय उदात्त विचार संतांनी येथल्या समाजांत दृढमूल करून टाकला. ज्या समाजाची दैवते उंच झाली तो संस्कृतीच्या वरच्या पातळीवर चढला यात वादच नाही, आणि याचे श्रेय संतांनाच आहे. धार्मिक क्षेत्रात समतेची प्रस्थापना हे संतांचे दुसरे बहुमोल कार्य आहे. समता हे तत्त्वच असे आहे की, त्याचे अत्यल्प आचरणहि मानवाचा काही तरी उत्कर्ष घडवितेच. त्या काळीं आपल्या समाजात धार्मिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक—कोणत्याच क्षेत्रात उच्चवर्णीयांखेरीज इतरांना प्रतिष्ठा किंवा श्रेष्ठ स्थान प्राप्त करून घेण्यास अवसर नव्हता. त्यामुळे त्यांच्या जीविताचा सर्वस्वी कोंडमारा होत होता. संतांनी धार्मिक क्षेत्रात, परमार्थापुरती अगदी मर्यादित अर्थाने का होईना, पण ही कोंडी फोडली आणि बहुजन-समाजाच्या मानसिक विकासाला काही अवकाश प्राप्त करून दिला. यानंतर मराठी भाषेतील संतांनी केलेली ग्रंथरचना, तिला त्यांनी प्राप्त करून दिलेले उन्नत रूप याचे महत्त्व इतके आहे की, त्यामुळेच महाराष्ट्राला महाराष्ट्रत्व—भिन्नराष्ट्रीयत्व प्राप्त झाले आहे. फ्रान्स, जर्मनी, इटली येथील समाजांना जे भिन्नत्व प्राप्त झाले ते धर्म किंवा वंश यामुळे नसून भाषाभेदानेच प्राप्त झाले आहे. त्याचप्रमाणे गुजराथ, महाराष्ट्र, कर्नाटक, यांचे भिन्नराष्ट्रीयत्व हे पिंडान्वयापेक्षा भाषान्वयानेच सिद्ध झाले आहे, असे लो. टिळकांनी म्हटले आहे. आणि मराठी भाषेला संतांनी जे पृथक्, स्थिर व शोभिवंत रूप प्राप्त करून दिले, त्यामुळेच महाराष्ट्राचे भिन्नत्व प्रस्थापित झाले हे उघड आहे.

**राष्ट्रात प्रबळ प्रवृत्तिपर जीवननिष्ठा संवर्धिली पाहिजे.**

वास्तविक यातूनच पुढे समाजाचा सर्वांगीण विकास व्हावयास हवा होता. धार्मिक समता ही सर्व प्रकारची—सामाजिक, राजकीय—समता निर्माण करण्यास पुरेशी प्रेरणा आहे. त्याचप्रमाणे भिन्नराष्ट्रीयत्वाची जाणीव ही तर सर्व प्रकारच्या सामर्थ्याची जननी आहे. पण संतांचेच प्रारब्धवादाचे तत्त्वज्ञान समाजात जास्त प्रभावी ठरल्यामुळे दुर्दैवाने हा विकास झाला नाही. पोपची

सत्ता, राजसत्ता, सरंजामी सत्ता यांवर चौफेर हल्ला चढविणारे युरोपांतील मार्सिग्लिओ, विल्यम, वायक्लिफ, जॉन हस, लूथर येथें निर्माण झाले नाहीत. समर्थ रामदासस्वामींच्या लेखनात ऐहिकतेच्या बऱ्याच प्रवृत्ति दिसतात. राष्ट्रीय स्वातंत्र्याची आकांक्षा, संघटणेच्या माहितीची जाणीव, राज्य भौतिक शक्तीने मिळते, क्षात्रधर्माने मिळते हा ठाम निश्चय इ. ऐहिक उत्कर्षाला पोषक असे बरेच विचार, जे पूर्वीच्या संतांच्या वाङ्मयात अभावानेच दिसतात, असे अनेक विचार समर्थांच्या वाङ्मयात दिसतात. पण दुर्दैव असे की, त्यांचे एकंदर लेखन पाहिले तर हे विचार म्हणजे दर्यामे खसखस इतक्याच प्रमाणात आढळतात. शिवछत्रपतींच्या चित्तांत क्रांतिकारक विचार विपुल प्रमाणांत होते. त्यांनी समाजाची राजकीय व आर्थिक घडी बरीच बदलली होती; पण त्यांचे तत्त्वज्ञान बनवून त्याला त्या वेळी ग्रंथरूप देणारा स्वयंसिद्ध तत्त्ववेत्ता कोणीच न निघाल्यामुळे त्यांच्यामागे त्या क्रांतिप्रवृत्ति पंचवीसतीस वर्षांपेक्षा जास्त काळ टिकल्या नाहीत. त्यांनी निर्माण केलेल्या परंपरेत मराठे पराक्रम करीत राहिले हे खरे. पण समाजकारण, राजकारण, अर्थकारण या क्षेत्रात नवे तत्त्वज्ञान निर्मून राष्ट्रनिष्ठा, लोकसत्ता, बुद्धिप्रामाण्य, प्रयत्नवाद, विज्ञाननिष्ठा, समता यांच्या पायावर नवसमाजरचना करण्याची ऐपत त्यांच्या ठायी नव्हती. त्यामुळे ब्रिटिशांची राजवट सुरू होऊन पाश्चात्यांच्या भौतिक ज्ञानाचा येथें प्रसार होई-पर्यंत संतप्रणीत निवृत्तीच्या तत्त्वज्ञानातच आपला समाज बुडून राहिलेला होता. गेल्या शंभर वर्षांत ते निवृत्तीचे तत्त्वज्ञान मागे हटून प्रवृत्तिधर्माचा प्रसार मागल्या मानाने पाहाता पुष्कळच जास्त प्रमाणात झाला आहे. पण अजून बहुजनसमाजापर्यंत भौतिक ज्ञानाची निष्ठा पोचलेली नाही; आणि त्यामुळे तो बहुसंख्य समाज प्रारब्धवाद, अंधश्रद्धा, गुरुप्रामाण्य यांच्याच मगरमिठींत आहे. निराशा, दारिद्र्य यामुळे ऐहिक संसाराचे वैय्यर्थ हे त्यांच्या मनात घर करून राहिलेले आहे. नव्या ज्ञानावर अजून त्याची मुळीच श्रद्धा बसलेली नाही. त्याच्या मनांत धाडस, साहस, विजिगीषा, सृष्टीशी झुंज घेण्याइतकी कणखर वृत्ति, विषमतेविरुद्ध लढा करण्याची रग या वृत्तींची जोपासना करावयाची असेल तर त्या निवृत्तीच्या तत्त्वज्ञानाचा समूळ उच्छेद करणे अवश्य आहे. त्यावाचून नवराष्ट्रनिर्मितीसाठी, नव्या विश्वाची उभारणी करण्यासाठी अवश्य असलेले प्रचंड कर्तृत्व त्याच्या ठायी निर्माण होणार नाही.

* * *

# २. सुखसाधनांचे समायोजन

श्रीनिवास नारायण बनहट्टी

सांप्रत सुखाची साधने दिवसेंदिवस एकसारखी वाढत चालली आहेत; पण सुख मात्र दुर्मिळ होत चालले आहे. सुखसाधनांच्या अतिरेकामुळे सुखाचा आस्वाद घेणारी इंद्रिये व मन या दोन्ही वस्तु बधिर होत चाललेल्या आहेत. हा बधिरपणा म्हणजे सुखसाधनांची रेलचेल उडवून देणाऱ्या यांत्रिक संस्कृतीचा एक शाप आहे. तो कसा घालविता येईल व मनाचा ताजेपणा व टवटवीतपणा कसा टिकविता येईल यासंबंधी प्रा. बनहट्टींनी प्रस्तुत लेखात जो मार्ग सुचविला आहे तो सनातनच आहे पण आजच्या बदललेल्या परिस्थितीच्या संदर्भातहि त्या मार्गाची उपयुक्तता कशी अबाधित आहे हे त्यांनी पटवून दिले आहे.

भाषाशास्त्रज्ञ आणि नागपूर-विदर्भाकडील मराठीचे ज्येष्ठ व श्रेष्ठ प्राध्यापक म्हणून ख्यातनाम असलेले प्रा. श्री. ना. बनहट्टी (जन्म १९०१) हे आधुनिक मराठीतले एक मान्यवर ग्रंथकार. ‘मयूरकाव्यविवेचन’, ‘ज्ञानोपासना आणि भारतीयांचे कर्तव्य’, ‘मराठी रंगभूमीचा इतिहास खंड पहिला’ व ‘टिळक आणि आगरकर’ हे त्यांचे प्रतिष्ठाप्राप्त ग्रंथ. नियतकालिकातून त्यांनी विविध वाङ्मयीन विषयांवर वेळोवेळी जे लेख लिहिले त्यांचेहि अनेक संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. वाङ्मयीन विषयाप्रमाणे वाङ्मयबाह्य विषयाचेहि विवेचन प्रा. बनहट्टी किती मुद्देसूद व मार्मिक रीतीने करतात याचा प्रस्तुत लेख हा एक उत्तम नमुना आहे.

### सुखसाधनांची वाढ म्हणजे प्रगति

मानवी प्रगति म्हणजे साधनांचे विकसन व बहूभवन. मानवी मनाला जे सुख होते ते इंद्रियांना त्यांचे त्यांचे खाद्य पुरविल्यामुळे. इंद्रियाची वासना ज्या ज्या पदार्थांवर जाते ते ते पदार्थ त्या त्या इंद्रियाला अधिकाधिक सुलभ करून देणे, तसे पदार्थ स्वेच्छेनुसार कृत्रिम रीतीने निर्माण करणे आणि अगोदरच असलेल्या पदार्थांची इंद्रियांना सुखदायक अशी जुळणी करणे, हेच आजवर संचित झालेल्या मानवी संस्कृतीचे सार म्हटले असता चालेल.

म्हणजे असलेले पदार्थ मिळविण्याबरोबरच नको असलेले, म्हणजे इंद्रियांना दुःखदायक असे पदार्थ नष्ट करण्यासाठी किंवा दूर लोटण्यासाठीहि मनुष्याची धडपड चाललेली असते. इंद्रियाची वासना ज्या पदार्थावर जाते त्याला विषय म्हणतात. तेव्हा मानवी संस्कृतीचे विधिनिषेधात्मक दोन्ही रीतींनी वर्णन करावयाचे झाल्यास विषयविस्तार आणि अविषयसंकोच असे करता येईल.

प्रकाश हा डोळ्यांना सुखदायक, शरीराच्या सुखकारक हालचालीस साह्य करणारा आणि दुःखदायक हालचाली टाळण्यास मदत करणारा. म्हणून तो निसर्गाच्या व्यवस्थेनुसार जेव्हा व जेथे मिळत नाही तेव्हा व तेथे देखील मिळावा यासाठी मनुष्याने धडपड सुरू केली. निसर्गात दिसून येणाऱ्या आकस्मिक ज्वलनक्रियेपासून प्रकाश मिळतो हे पाहून तसे ज्वलन स्वतःच्या नियंत्रणात निर्माण करण्याची मानवाची धडपड सुरू झाली. या धडपडीतून ज्योतीचा दिवा निर्माण झाला. आभाळात चमकणारी वीज पाहून ती अद्‌भुत प्रभा भूमितलावर स्वतःच्या नियंत्रणात कशी उतरविता येईल याविषयी प्रयत्न सुरू झाले. त्यातून विजेचा दिवा निर्माण झाला. हा इतिहास तर अगदी ताजा आहे. पण इतक्यातच या सुखसाधनाचा इतका विस्तार झाला आहे की ज्यांचे सर्व आयुष्य शहरात गेले आहे अशा आजच्या मुलांना तेल-वातीच्या दिव्याची कल्पनाहि असत नाही. जिभेचे सुख अथवा लौल्य पुरविण्याठी जमिनीची मशागत व जनावरांची जोपासना करून अधिकाधिक रोचक पदार्थ मानवाने निर्माण केले व त्यांची नाना प्रकारची मिश्रणे अग्नीच्या साह्याने अथवा कच्च्या स्वरूपात करून जिभेचे लळे पुरविले.

इंद्रियांच्या विषयोपभोगातून कला निर्माण झाली. निसर्गातले काही विशिष्ट देखावे, काही विशिष्ट रेखा व रंग आणि त्यांची जुळणी डोळ्यांना सुखदायक वाटते असे आढळून आल्यावर तसे देखावे, तशी रेखांची व रंगाची जुळणी स्वप्रयत्नाने निर्माण करण्याचा यत्न सुरू झाला. यातून चित्रकला निर्माण झाली. शिल्पकलेच्या उद्भावाचाहि प्रकार तसाच. मनुष्याच्या गळ्यांतून निघणारे काही सूर, आघात व त्यांची जुळणी कानांना आल्हाददायक वाटते असे आढळून आल्यानंतर तसे सूर, आघात व त्यांची जुळणी कृत्रिम रीतीने निष्पादित करण्यासाठी प्रयत्न सुरू झाला. त्यातून तत (तारांची), घन (घुमटाकार, तबला वगैरे) आणि सुषिर (छिद्रयुक्त, अलगूज, बाजाची पेटी इ०) अशी नाना प्रकारची वाद्ये निर्माण झाली. मानवी स्वरालापांचे अनुकरण करणे हे त्यांचे ध्येय.

इंद्रियांचा संबंध मनाशी असतो. इंद्रियांच्या विषयोपभोगामुळे जे सुख वा दुःख होते ते मनाला होते असे आपल्या तत्त्वज्ञांनी मानिले आहे. सुखदुःखाची संवेदना मनाला विषयेंद्रियसंयोगापासून मिळू शकते; पण मनाचा व्याप तेवढ्यापुरताच मर्यादित नाही. स्मरण, मनन, कल्पन या केवळ स्वतःच्या व्यापारातहि मनाला सुखानुभव येऊ शकतो. तसेच सुताने स्वर्गास जावे त्याप्रमाणे मन हे विषयेंद्रियसंयोगाच्या स्थूल आधारावर स्वतःची भावनामय रचना करून त्यातून आनंद निर्माण करू शकते. कलात्मक आनंद हा अशाच प्रकारचा आनंद होय. अमक्या गाण्याचे स्वर करुण आहेत, असे आपण म्हणतो; तेव्हा कारुण्य त्या स्वरालापात नसते. पूर्व संस्कारांमुळे त्या स्वरालापां-भोवती आपले मन जे भावनाजाल निर्माण करते त्यात कारुण्य असते. मनाला होणाऱ्या आनंदात इंद्रियसंयोगजन्य अंश जितका कमी तितका तो आनंद अधिक सूक्ष्म व अधिक उच्च दर्जाचा मानला जातो. मनुष्याच्या संस्कृतीचे उच्चनीचत्वहि याच मापाने आजमावले जाते.

काव्यानंद, वाङ्मयानंद हा सर्व आनंदात श्रेष्ठ मानला जातो आणि वाङ्मयकला ही सर्व कलात शेखरीभूत मानली जाते याचे बीज हेच आहे. वाङ्मय हे शब्दनिष्ठ असते. आणि शब्द ही एक अशी अद्‌भुत व चमत्कारिक चीज आहे की तिला इंद्रियभोग्य विषयाचा आधार असून देखील तिचे स्वरूप मुख्यतया मानसिक आहे. शब्द हा उच्चाररूप असतो आणि उच्चार हा कर्णेंद्रियाचा विषय होय. पण तो उच्चार कानांनी ग्रहण केल्यावर त्यापासून अर्थाचे जे उद्भवन होते ते सर्वस्वी मनाच्या व्यापारांमुळे होते. हे मनोव्यापार स्मरण, तर्क, भावना इत्यादि स्वरूपाचे फार गुंतागुंतीचे असतात. हा सगळा भाषाशास्त्राचा विषय असल्या-मुळे त्याचा येथे विस्तार करणे योग्य होणार नाही. पण उच्चाररूप स्थूल केंद्रा-भोवती अर्थाचे जे सूक्ष्म वलय निर्माण होते ते अद्‌भुत मानसिक शक्तींमुळेच होते एवढे येथे लक्षात ठेवणे बस आहे. म्हणूनच वाङ्मयातील पदलालित्यामुळे होणारा आनंद जर सोडला तर त्यापासून होणारा बाकीचा सर्व आनंद सूक्ष्म मानसिक वृत्तींच्या उल्लासविलासांमुळे होतो. या आनंदाला ब्रह्मानंदसहोदर म्हटले आहे ते यामुळेच.

मानवी प्रगति म्हणजे विषयांचा—सुखसाधनांचा—विस्तार आणि अविषयांचा—दुःखसाधनांचा—संकोच असे मागे सांगितले. या विस्तार संकोचाची दोन विशिष्ट स्वरूपे फार महत्त्वाची आहेत. त्यांचा येथे उल्लेख अवश्य केला

पाहिजे. एक स्थिरीकरण आणि दुसरे अंतरनिवारण. इंद्रियांचे जे विषय क्षणविनाशी असतात ते शास्त्रीय शोधांनी निर्माण केलेल्या साधनांच्या योगाने टिकाऊ स्वरूपात स्थिर करून आपल्याला त्यांचा वाटेल तेव्हा उपभोग घेता येईल अशी सोय करणे, म्हणजे स्थिरीकरण. मुखातून उच्चारलेल्या शब्दांना कायम टिकविण्याचे साधन जी लिपि ती या स्थिरीकणाचे अत्यंत प्रमुख उदाहरण होय. या साधनाने शेकडो, हजारो वर्षांपूर्वी निर्माण झालेले शब्द आज आपण वाचू शकतो. मुद्रणकला, फोनोग्राफ इ० शोध हे स्थिरीकरणाविषयी मानवाच्या चाललेल्या प्रयत्नांचेच मोठमोठाले विजय होत. सुखसाधनांच्या विस्ताराचे दुसरे अंग जे अंतरनिवारण त्यांची उदाहरणे आगगाडी, विमान, तारायंत्र, ध्वनिक्षेपण इत्यादि होत हे सहज समजण्याजोगे आहे. हजारो मैलांवर उच्चारलेले शब्द व गाइलेले गायन माझ्या रेडियोवर मी तत्क्षणी ऐकू शकतो ही अंतरनिवारणाची अद्‌भुत किमया होय.

वर वर्णिलेले स्थिरीकरण हे देखील एकप्रकारचे अंतरनिवारण आहे असे म्हणता येईल. स्थिरीकरणाच्या साधनांच्या योगाने कालकृत अंतर निवारण होते; आगगाडी, तारायंत्र, रेडियो इत्यादिकांच्या योगाने स्थलकृत अंतर निवारण होते.

### ही वाढ सुख वाढवीत नाही, विषमता वाढवते:

सुखसाधनांच्या होत असलेल्या वाढीमुळे निर्भेळ सुख मिळते असे मात्र नाही. सुखसाधनांच्या अफाट विस्तारामुळे दोन प्रकारचे प्रश्न उत्पन्न होतात; एक वैयक्तिक व दुसरा सामाजिक. सामाजिक प्रश्न वितरणासंबंधीचा होय. आजपर्यंत तरी मानवजातीला असा अनुभव आला आहे की सुखसाधनांचे उत्पादन जरी अफाट प्रमाणात होत असले आणि सुखसाधनांमध्ये जरी घोडदौडीने प्रगति होत असली तरी ही सुखसाधने सर्वांना समान प्रमाणात, किंवा ज्याच्या त्याच्या इच्छेनुसार मिळतात असे नाही. कोणतेच वाहन जेव्हा निर्माण झाले नव्हते तेव्हा सर्वच लोक चालणारे असल्यामुळे माणसामाणसात फरक नव्हता. पुढे चाकाचा शोध लागून गाड्या किंवा रथ निर्माण झाले तेव्हा काही थोडेच लोक गाडीत बसणारे झाले व बाकीचे पादचारी राहिले. म्हणजे माणसामाणसांत वैषम्य निर्माण झाले. आजच्या सुधारणेच्या अवस्थेत एकजण विमानाने जातो तर दहाजण मोटार बाळगून असतात; या दहाजणांच्या पाठी शंभरजण

पायचाकीवरून जाणारे तर हजारजण पायी चालणारे असतात. असे वैषम्य हे सर्वच सुखसाधनांच्या बाबतीत आढळून येते. काहींच्या पुढ्यात रोज तीनतीन तासांनी नानापरींची सुग्रास अन्न नको म्हणेपर्यंत येऊन पडतात, तर काही लोक कोरड्या भाकरीलाहि महाग झालेले असतात.

**ही विषमता दोन संप्रदाय दूर करू पाहात आहेत.**

ही जी विषमता निर्माण होते ती कमी कशी करावी याचा गेली शेदीडशे वर्षे फार जोरात विचार चाललेला असून त्याजवर उपाय सांगणारे तत्त्वज्ञांचे दोन संप्रदाय मुख्यतया निर्माण झाले आहेत. एक संप्रदाय, ज्या सुख-साधनांमुळे विषमता निर्माण होते त्या साधनांचा त्याग करा आणि नैसर्गिक राहाणीचा स्वीकार करा असे प्रतिपादन करतो. रस्किन, टॉलस्टॉय, गांधी, विनोबा हे या पंथाचे प्रमुख आचार्य होत. हा संप्रदाय सामाजिक समतेच्या उद्दिष्टांनी प्रेरित झाला असला तरी त्याबरोबरच त्याची बैठक बरीचशी आध्यात्मिक आहे. आणि ती भारतातल्या पुरातन आत्मवादी तत्त्वज्ञांच्या विचारांशी जुळती आहे.

विषयेंद्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ।
परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ।।

असे म्हणणारी गीता, किंवा

न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ।

असे घोषित करणारा मनु, यांचा दृष्टिकोण टॉलस्टॉय किंवा रस्किन यांच्या विचारसरणीहून फारसा भिन्न नाही. गांधीजींच्या मध्ये तर या सर्वांचा प्रमाणशीर सुंदर मिलाफ झालेला आहे.

अध्यात्माच्या बैठकीवर वैषम्याचा सामाजिक प्रश्न सोडवू पाहणारा हा एक संप्रदाय; तर जडवादाच्या बैठकीवर समता प्रस्थापित करू पाहणारा मार्क्स-प्रभृति साम्यवाद्यांचा दुसरा संप्रदाय होय. सुखसाधनांचे सक्तीने समान वितरण केले पाहिजे असे हा संप्रदाय म्हणतो. सुखसाधनांच्या विस्ताराला काही मर्यादा घालावी असे हा चुकूनसुद्धा म्हणत नाही.

या दोन पंथांचे ओझरते दिग्दर्शन करण्यापलीकडे येथे अधिक काही करण्याचा मानस नाही. त्या विषयाचे खूप मंथन सर्वत्र चालले आहे.

सुखसाधनांच्या विस्तारामुळे जो वैयक्तिक प्रश्न उत्पन्न होतो त्याकडे विशेष रीतीने लक्ष वेधण्याचा प्रस्तुत लेखकाचा उद्देश आहे. कारण या संबंधात फारसा विचार होताना दिसत नाही. सुखसाधनांच्या उमाप वाढीमुळे त्या साधनांचा उपभोग घेणारी इंद्रियेच उपभोगाला अक्षम, दुबळी किंवा बोथट होऊन जातात, तेव्हा सुखसाधनांचा उपभोग कसा व कोणत्या रीतीने घ्यावा असा प्रश्न उत्पन्न होतो. याच प्रश्नाची दुसरी बाजू अशी की अनेक प्रकारची सुखसाधने जेव्हा एकाच प्रकारचा आनंद देण्यासाठी योजिली जातात, तेव्हा त्यांची परस्पर अतिव्याप्ति ही गोंधळ उत्पन्न करणारी, अतएव मानसिक आनंदाला विघातक ठरू लागते.

**आजच्या माणसाची इंद्रिये बोथट होत आहेत.**

सुधारलेले आधुनिक जीवन इंद्रियांवर चोहोकडून आदळणाऱ्या सुखसाधनांनी इतके पर्याकुल झालेले आहे की त्यामुळे मानवी मनाची स्वस्थता आणि आनंदास्वादातली लज्जत नाहीशी होऊ लागली आहे. पैशाच्या जोरावर सगळी सुखसाधने ज्याला संपादन करता येतात अशा मूठभर नशीबवान माणसांपुढेच केवळ नव्हे, तर मोठमोठ्या शहरातील सामान्य मनुष्यांपुढे देखील आपल्या मनाचा ताजेपणा व संवेदनक्षमता कायम कशी ठेवावी, हा प्रश्न उभा ठाकतो. सिनेमा आहे, रेडियो आहे, रहस्यकथा कादंबऱ्या आहेत, पैसे लावून खेळण्याचे अड्डे आहेत. आणखी व्यसनांच्या सदरात जमा होणाऱ्या उत्तेजक गोष्टी आहेत. परवाच्या गांधी जयंतीचा दिवस (२ आक्टो. १९५३) हा पुण्याच्या रेसेसचा दिवस होता. गांधी जयंतीच्या निमित्ताने जे जे कार्यक्रम झाले त्यांना त्यांना श्रोत्यांची पातळाई फार जाणवत होती. आणि सगळी गर्दी कुणीकडे लोटत होती म्हणाल तर रेसग्राऊंडकडे (शर्यतीच्या मैदानाकडे). रेसच्या नादात पैसे मिळविण्याचा हेतु असतो; पण त्याच्याकडे लोक खेचले जातात ते त्याच्या तीव्र उन्मादकतेमुळे. सर्व उन्मादक व्यसनांचा गुण प्रसिद्धच आहे, की त्यांच्यापासून जे सुख मिळायचे ते मिळण्यासाठी त्याचे प्रमाण एकसारखे वाढवीत न्यावे लागते. त्यामुळे मनुष्याची अंगे व इंद्रिये हतबल व बोथट होतात.

श्रीमंत शेटजी किंवा बड्या ऑफीसचे मॅनेजर घराच्या बाहेर पडले की त्यांचे पाऊल मोटारीतच पडते. ऑफीस वरच्या मजल्यावर असले तर

चढण्यासाठी उत्तोलक उर्फ लिफ्ट आहेच. शेजारच्या खोलीतल्या मुनिमाशी बोलायचे असले तरी खुर्चीवरील आसन ढळविण्याची जरुरी नाही; टेबलावरील फोन कानाशी व तोंडाशी लावला की झाले. रोजच्या सगळ्या दिनचर्येत पायांचा उपयोग जवळजवळ शून्य! शरीराला वाहून नेण्याकरिता म्हणून जो अवयव निसर्गाने दिला त्याचा, सुखसाधनांच्या विपुलतेमुळे, उपयोग करण्याचा प्रसंग म्हणजे गोल्डस्मिथने म्हटल्याप्रमाणे अक्षरशः निळ्या बिछान्यावरून पिवळ्या बिछान्यावर जाण्यापुरताच. देहधर्माकरिता चार पावले अंगणात जाणे भाग पडावे, म्हटले तर तेहि नाही! बंगल्याच्या प्रत्येक खोलीला 'बाथरूम अटॅच्ड' असायचीच! याचा परिणाम असा की साहेब (आणि बाईसाहेब) यांचे पाय दुबळे होऊन जातात. सांधेदुखी, स्नायूंची दुर्बलता, हृदयाची अशक्तता इत्यादि लक्षणे प्रकट होऊन शरीर भारभूत वाटू लागते. मग साहेब शहाणे असतील तर पहाटे गावाबाहेर शुद्ध हवेत रपेट करण्यास जाऊ लागतात. म्हणजेच निसर्गाने दिलेल्या साधनांचा वापर करून त्याची क्षमता कायम राखणे त्यांना भाग पडते. हे सुखसाधनांचे वैयक्तिक समायोजन होय.

भावना आणि मनोवृत्ति यांच्याशी ज्याचा विशेष संबंध नाही, अशा शरीरव्यापाराचा वर उल्लेख केला. पण स्थूल शारीर व्यापारांकडून सूक्ष्म मानसिक सृष्टीकडे लक्ष वळविल्यास तेथेहि तृप्तिसाधनांच्या गर्दीमुळे असलीच आपत्ति ओढवताना दिसते. जिज्ञासा किंवा कुतूहल या मनोवृत्तीचे उदाहरण घेऊ. आपल्या भोवताली काय चालले आहे, आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांची, आपल्या गावाची, देशाची काय हालहवाल आहे हे जाणण्याची इच्छा माणसाच्या मनात स्वभावतः असते. ती तृप्त करणाऱ्या साधनांचा भडिमार किती व्हावा, याला सध्याच्या सुधारलेल्या जीवनात काही सुमार राहिलेला नाही. पहाटे उठतो न उठतो इतक्यात दोन चार वर्तमानपत्रे घरात येऊन पडतात, त्यात कुठल्या तरी गल्लीत नवऱ्याने बायकोच्या थोबाडीत मारली इथपासून तो बर्म्यूडा बेटात आयसेनहॉवरने रशियाला कशी चपराक हाणली इथपर्यंत शेकडो बातम्या आणि त्यांचा काथ्याकूट यांचे अस्ताव्यस्त प्रदर्शन नजरेसमोर उभे ठाकते. दिवसातून अनेकवार बातम्या सांगण्यास रेडियो सज्ज आहेच. दुपारचे ३।४ वाजतात तो संध्याकाळची वृत्तपत्रे विकणाऱ्या पोरांच्या आरोळ्या कानांवर आदळू लागतात. या सामग्रीतून लहान मोठ्या शेकडो बातम्या इतक्या त्वरेने आपल्या मेंदूवर आघात करीत असतात की त्यांच्या

दंगलीने आपले मन गोंधळून जाते. आपल्याला महत्त्वाचे कोणचे, उपयुक्त कोणचे, सद्वृत्तींचे पोषण करणारे कोणचे व सद्वृत्तींना हानिकारक कोणचे, याचा विवेक राखणे कठीण होते; आणि अखेर परिणाम असा होतो की आपली जिज्ञासा अथवा कुतूहलबुद्धि मरगळीस येते. रोगट पचनशक्तीच्या मनुष्याला ज्याप्रमाणे खमंग मसालेदार पदार्थांखेरीज काही रुचत नाही, त्याप्रमाणे चटकदार, प्रक्षोभक किंवा पाचकळ हकीकती वाचण्याची चट लागू लागते.

सकाळपासून संध्याकाळपर्यंत वातम्या वाचणाऱ्या व ऐकणाऱ्या आजकालच्या सुधारलेल्या मनुष्यास आपल्या शेजारच्या घरी कोणी आजारी किंवा अडचणीत असले तर त्याची दाद नसते; त्याला त्याच्याविषयी अनुकंपा व सहानुभूति तर राहोच, साधे कुतूहलहि नसते; हा आधुनिक युगाचा खेदकारक दुर्विलास होय.

रसिकतेची व कलास्वादाची गोष्ट तशीच. संगीताची भरमार व्हावी ती किती? रेडियो आहे, ग्रामोफोन आहे, सिनेमा आहे, जलसे आहेत; ही सर्व द्वारे एकसारखे गाणे ओकीत असतात. वाङ्मयाचेहि तसेच. दैनिके आहेत, साप्ताहिके आहेत, मासिके आहेत, रहस्यकथा आहेत; या सगळ्यातले सकस कोणते, फोलकट कोणते, मनोवृत्तींना पोषक कोणते व घातक कोणते, याचा विवेक करणार कसा व केव्हा ? सटरफटरातून दृष्टि पलीकडे जाऊन सत्त्वशील अक्षर वाङ्मयापर्यंत पोचेल तेव्हा !

ही धावपळ थांबणार कशी? या धावपळीतून इंद्रियांची संवेदनक्षमता, मनोवृत्तींचा तजेला आणि अभिरुचीचा चोखंदळपणा कायम कसा राखायचा? आगगाडीतून किंवा मोटारीतून अत्यंत वेगाने जाताना बाहेर सर्व सारवल्यासारखे दिसते; एखादे दृश्य न्याहाळून त्याचे सौंदर्य नजरेत साठवण्याइतकी स्वस्थता कधीच लाभत नाही; तशी आज सुधारलेल्या मानवाची स्थिति झाली आहे. एका बैराग्याची अशी गोष्ट सांगतात की तंबाखू, चरस, माजूम इत्यादिकांचे अखंड सेवन करून त्याची जीभ अशी झाली होती की जणू सकलादीचा तुकडा. कोणच्याहि पदार्थाने त्याला नशा येईनाशी झाली तेव्हा त्याने एक नागीण बाळगली; तिजकडून तो आपल्या जिभेला चाववून घेई तेव्हा कुठे त्याला थोडी नशा चढून बरे वाटे. इंद्रियोपभोगसाधनांच्या भरमसाट तारतम्यशून्य उपयोजनामुळे सुधारणाशिखरावर डौलाने मिरवणाऱ्या माणसाची स्थिति वरील बैराग्यासारखी होऊ घातली आहे की काय, असे वाटू लागते.

वाङ्मयाच्या प्रांतातली एक प्रवृत्ति लक्षात घेऊ. एक काळ असा होता की

ज्या वेळी मनोरंजन, नवयुग, रत्नाकर यांच्यासारखी मासिके डौलाने चालत असत. आशय व शैली दोन्ही दृष्टींनी वाचनीय असे पुष्कळ साहित्य त्यातून प्रसिद्ध होई. बातम्यांची वाहक त्यावेळी बहुतांशी साप्ताहिके होती. केसरी, काळ इ. साप्ताहिकांमध्ये उच्च दर्जाचे लिखाण प्रसिद्ध होत असले तरी ते बहुतांशी राजकीय स्वरूपाचे किंवा तात्कालिक विषयास धरून लिहिलेले असे. दैनिकांचे प्रचलन फार थोडे. ही पूर्वीची गोष्ट झाली. यांत्रिक सुधारणांच्या घोडदौडीमुळे आता कशी स्थिति झाली आहे हे लक्षात घेणे मौजेचे आहे. दैनिकांचे प्रचलन इतके वाढले आहे की त्यांनी मासिकांना जगणे तर कठीण करून सोडले आहेच, पण साप्ताहिकांनाहि गिळून टाकले आहे. सर्व दैनिके आता विविध विषय विभाग किंवा 'मॅगेझिन सेक्शन' आठवड्यातून एकदा प्रसिद्ध करतात, त्यात मासिके व साप्ताहिके यात येण्याजोगे लेख देतात. इतर वारीहि सवडीनुसार असे लेख दैनिकात येतातच. त्यामुळे दोन्ही बाजूंनी हानि कशी होत आहे हे पाहण्याजोगे आहे. दैनिकाचे लेख तयार करण्यास अवकाश अगदी थोडा, त्याचे स्वरूपहि क्षणभंगुर—त्यामुळे लेखकांकडून व्हावे तसे मनन होत नाही. वाचकांची वृत्तिहि तशीच. धरधरीत, पांगलेल्या मनःस्थितीत, पुष्कळशा सटरफटर मजकुराबरोबर काही चिरस्थायी लिखाणाचे वाचन व्हावयाचे. धड वाचले न वाचले अशा स्थितीत, त्या कागदाचा चोळामोळा किंवा फाडाफाड होऊन त्याची वासलात लागणार. या परिस्थितीत लेखकाचे लेखनसामर्थ्य आणि वाचकाचे आस्वादनक्षमत्व वाढेल की घटेल, याचे अनुमान करावयास मोठा तर्कशास्त्री नको.

**हा बोथटपणा घालविण्याचा उपाय एकच—संयम!**

या एकंदर परिस्थितीवर तोड काय? निसर्गवादी तत्त्वज्ञांच्या उपदेशानुसार सुखसाधनांच्या बहूभवनाकडे पाठ फिरवून निर्भेळ नैसर्गिक जीवन जगावयाचे की काय? आगगाडी, मोटार, तारायंत्र, रेडियो, हे सर्व नको; इतकेच काय, छापायची, शिवण्याची, धुण्याची इत्यादि यंत्रेहि नकोत; कपडा नको, चाकाचे वाहन नको, लिहिलेला मजकूरहि नको—कारण हे सर्व माणसाच्या यांत्रिक प्रगतीतलेच टप्पे आहेत व त्यामुळे तेवढ्यापुरता निसर्ग माणसाला दुरावला आहे!

निर्भेळ निसर्गवादाची असली हाक लाखातून कोटीतून एखाद्या तपस्वी

साधूने ऐकली, तरी एकंदर मानवजातीला ती ऐकणे परवडणार नाही. रस्किन, गांधी प्रभृतींचा अर्धामुर्धा निसर्गवादहि प्रसार पावत आहे असे दिसत नाही. पण त्यातील मुख्य तत्त्व तरी मानवांच्या वृत्तीत रुजलेच पाहिजे. या तत्त्वाचा आविष्कार फार काळापूर्वी मनूने करून ठेवला आहे.

वशे कृत्वेन्द्रियग्रामं संयम्य च मनस्तथा।
सर्वान्संसाधयेदर्थानक्षिण्वन्योगतस्तनुम् ॥

"इन्द्रिये ताब्यात ठेवून आणि मनाचा संयम करून योगाने शरीरसामर्थ्य कायम राखून चारी पुरुषार्थांचे चांगल्या रीतीने साधन करावे." यात संयमाची कल्पना महत्त्वाची आहे. संयम म्हणजे अजीबात प्रतिबंध नव्हे. आपले उद्दिष्ट साधण्यासाठी जरूर असेल त्या वृत्तींना जरूर असेल तेवढ्या प्रमाणात वाव देणे, म्हणजे संयम. उद्दिष्टामध्ये सर्व अर्थांना मनूने गोवले आहे. त्यात धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चारी पुरुषार्थ येतात. पहिले तीन धर्म, अर्थ, काम म्हणजेच मनुष्याचे ऐहिक जीवन. हे उत्कृष्ट रीतीने सफल होण्याकरिता देखील संयमाची जरूरी आहे.

संयम, योग या शब्दांना अध्यात्माची डूब आहे. पण त्यामुळे बिचकण्याचे कारण नाही. आपण पाहिजे तर 'समायोजन' हा शब्द वापरू. इंग्रजीतील adjustment या शब्दास हा प्रतिशब्द बनविलेला आहे. पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या गोष्टींना नव्याने उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळेल व आपले उद्दिष्ट साधेल असे वळण देणे म्हणजे adjustment किंवा समायोजन. मानवाच्या मनोवृत्ति, भावना या सर्व पूर्वीच्याच आहेत. त्यात काही बदल झालेला नाही. मानवाला उपलब्ध असलेला अवकाशहि तितकाच आहे. मानवाचे उद्दिष्ट समाधान किंवा सुख हेच आहे; तेहि बदललेले नाही. सुखाच्या जड साधनांचे मात्र एकसारखे बहूभवन चाललेले आहे. एकच परिमाण बदलते आहे व बाकीची स्थिर आहेत. तेव्हा हे त्रैराशिक अवघड वाटण्याचे कारण नाही. गरिबीत वाढलेल्या माणसाला श्रीमंती आली म्हणजे तो आपल्या घरात नाना प्रकारच्या मूल्यवान वस्तु आणून भरतो. परंतु सर्व गोष्टींची व्यवस्था लावणारे कोणी माणूस नसल्यास सर्वत्र अव्यवस्थितपणे माजलेल्या पसाऱ्यानेच ते घर खायला उठते. योजकता असलेल्या चतुर गृहिणीचा हात सारखा फिरत असला की त्याच वस्तु त्याच जागेचे सौंदर्य

वाढविण्यास कारणीभूत होतात. मानवी संस्कृतीची आज हीच अवस्था झाली आहे. समायोजनाच्या अभावी तिला बकाली बाजाराची कळा येऊ पाहत आहे. जसजसे समायोजन होईल तसतसे रेखीव व पद्धतशीर मांडणी केलेल्या बहुप्रयोजन भांडाराचे उर्फ 'मल्टिपरपझ स्टोअर'चे वांछनीय स्वरूप तिला प्राप्त होईल.

हे समायोजन दोन प्रकारचे व्हावे लागेल. एक सामाजिक आणि दुसरे वैयक्तिक. पहिल्याविषयी येथे विचार केलेला नाही हे मागे सांगितलेच आहे. दुसऱ्याविषयीच येथे काही विचार प्रदर्शित केले आहेत. बोलून चालून हे प्रत्येक व्यक्तीपुरते समायोजन असल्यामुळे त्याचे स्वरूप व्यक्तिगणिक वेगवेगळे असणार. प्रश्न पुढे मांडून त्याच्या सोडवणुकीसाठी सूचक विवेचन करण्यापलीकडे येथे काही करणे अशक्य. सुखसाधने ही सुखाचीच साधने; दुःखाची साधने तर खास नव्हेत. आपली जन्मजात प्रवृत्ति आणि आपल्याला प्राप्त झालेली परिस्थिति यास अनुसरून सुखसाधनांचे समायोजन करावे. इंद्रियांची संवेदनक्षमता आणि मनाची आस्वादक्षमता, भावनांचा सकसपणा आणि वृत्तींचा सोज्वळपणा कायम राहील अशा बेताने आणि पद्धतीने सुखसाधनांचा उपभोग घेणे म्हणजेच समायोजन किंवा संयम किंवा योग. याच्या आचरणाने खऱ्या समाधानाप्रत आपण जाऊ. ही जाणीव ठेवली म्हणजे 'योगस्थः कुरु कर्माणि' या गीतावचनाचा देखील काही एक अभिनव आणि हृद्य असा अर्थ मनात उतरू लागतो.

× × ×

# ३. साहित्य आणि सेवा

**प्रल्हाद केशव अत्रे**

आचार्य प्र. के. अत्रे म्हणजे विनोदी भाषण आणि विनोदी लेखन, असे समीकरण सर्वसाधारण मराठी माणसाच्या मनात घर करून बसले आहे. हे समीकरण प्रमाण मानणे म्हणजे अत्र्यांच्या व्यक्तिमत्वाची केवळ अर्धीच ओळख करून घेण्यासारखे आहे. अत्रे आपल्या भाषणातून व लेखनातून हास्याच्या लहरींवर लहरी निर्माण करीत असतात हे खरे आहे; पण त्याचबरोबर, या लहरींना आधारभूत असा गांभीर्याचा सागर त्यांच्या अंतरगात स्थिर आहे, हेहि लक्षात घेणे आवश्यक आहे. अत्रे जीवनाकडे खेळकरपणे पाहू शकतात; त्याचप्रमाणे जीवनाच्या शोकगंभीर प्रसंगांचाहि हृदयस्पर्शी ठाव ते घेऊ शकतात हे त्यांच्या नाट्यलेखनाने सिद्ध करून दाखविले आहे. जीवनाचे गंभीर आत्मपरीक्षण करणारा त्यांचा प्रस्तुत लेख त्यांच्या 'मी कसा झालो ?' या आत्मचरित्रातून घेतला आहे.

अत्रे (जन्म १८९८) हे नाटककार, कवि, निबंधकार, कथालेखक, कादंबरीकार, पत्रकार, पटकथालेखक अशा विविध नात्यांनी साहित्यात ख्यातनाम झालेले आहेत. कोणाहि मराठी लेखकाला हेवा वाटावा इतके यश त्यांनी प्रसन्न, प्रवाही व प्रभावी मराठी गद्य लिहिण्यात निःसंशय मिळविलेले आहे.

**वाङ्मय म्हणजे जीवनाचा अनुभव**

वाङ्मय म्हणजे जीवनातला मधु. जीवनात सर्वत्र मधु भरलेला आहे. विषहि आहे. पण मधमाश्यांप्रमाणे वाङ्मयकार उत्तम मधूच गोळा करतात. वाङ्मय म्हणजे मधाचे पोळे. कोळ्याचे जाळे नव्हे. मधाच्या पोळ्यापेक्षा कोळ्याचे जाळे दिसते सुंदर. त्याचे धागे किती नाजुक. रचना किती कलात्मक. पण माश्यांना मारण्याचा तो फास आहे, दुसरे काय ? त्या जाळ्यात अडकणे म्हणजे मरण.

मधाच्या पोळ्यात कला नसते असे नाही. त्याच्या रचनेत केवढे कौशल्य असते ! पण पोळ्यातल्या कलेला महत्त्व नाही. मधाला महत्त्व. मध म्हणजे

अनुक्रम........८७८२५. वि: निबंध


जीवन. जो ते पितो, तो जिवंत होतो. वाङ्मयात शब्दांना महत्त्व नाही, कलेला नाही, तंत्राला नाही. त्यात मधु आहे की नाही हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

**सोनियाचा कळस। माजी भरला सुरारस**
**मृत्तिकेचा घट। माजी अमृताचा साट**

भांड्याला किंमत नाही. त्यात काय भरले आहे ह्याला किंमत आहे. विनोबा म्हणतात, "ज्याने चित्ताची शुद्धि होते, ते वाङ्मय." वाङ्मयाने जीवनात माधुरी उत्पन्न झाली पाहिजे, हर्ष निर्माण केला पाहिजे, नवीन दृष्टि दिली पाहिजे. ज्ञानेश्वर, तुकाराम, विनोबा किंवा साने गुरुजी ह्यांचे वाङ्मय म्हणजे मधाची पोळीं. त्यातला मध प्यावा नि अमर व्हावे. त्याच्या उलट, फडक्यांच्या कामुक कादंबऱ्या म्हणजे कोळ्याची जाळीं. त्यांची कला सुंदर, पण वाचक त्यात अडकले की मेलेच.

वाङ्मय म्हणजे जीवनाचा अनुभव. कलेचा विकास नव्हे. मधमाशी मध कशी गोळा करते ? तिला हिंडावे लागते. फुलाफुलाकडे जावे लागते. मध हे सत्य आहे, कल्पना नाही. ते शोधावे, तेव्हा मिळते. पण कोळी काही हिंडत नाही. तो बसल्या बसल्याच जाळे विणतो. त्याच्या तोंडातून तंतू निघतात. कोळ्याचे जाळे म्हणजे निव्वळ कल्पना.

पुष्कळसे लेखक घरातच बसतात, पुस्तके वाचतात आणि जाळी विणतात. पण हे त्यांचे लेखन क्षणजीवी असते. त्यात सत्य नसते. जीवनाचा शोध नसतो. वाङ्मयकारांनी जीवनाकडे जायला पाहिजे. जीवनाचे संशोधन केले पाहिजे. सेवेच्या कोणत्या ना कोणत्या तरी क्षेत्रामध्ये उडी घेतली पाहिजे. साहित्यात जीवनाचा साक्षात्कार घडावयाला पाहिजे. जीवनाचा अनुभव असल्याखेरीज हे कसे होईल ?

विनोबा आणि साने गुरुजी ह्यांच्या साहित्यामध्ये तेज आहे. त्याचे कारण आधी ते सेवक आहेत. अन् मग साहित्यिक. आजकाल साहित्याची आणि सेवेची फाळणी झालेली आहे. म्हणून साहित्याचा अधःपात झाला आहे. हा कोण तर म्हणे कवि. तो कोण तर म्हणे कादंबरीकार. धंदा काय करता ? तर म्हणे नुसत्याच कविता अन् कादंबऱ्या लिहितो.

पूर्वीचे संत हे काय नुसते साहित्यिक होते ? ते लोकसेवक होते. नुसतेच कवित्व करावयाची तुकोबांना लाज वाटत होती. ते देवाला दुःखाने म्हणाले,

"देवा, अजून मला पुरता अनुभव नाही. मग मी काय नुसता कवि होऊ अन् जगात माझे हसू करून घेऊ काय रे?"

**करू कवित्व काय नाही आता लाज,**
**मज भक्तराज हासतील.**
**अनुभवाविण कोण करी पाप**
**रितेचि संकल्प लाजवावे.**

कबीराने तर शाईला न् कागदाला कधी हातहि लावला नाही. 'मसि कागद छूयो नहि!—' कबीर शेले विणायचा. आणि विणता विणता जीवनाचे तत्त्वज्ञान गायचा :

**झिनि झिनि बिनि चदरिया**
**काहे कै ताना, काहे कै भरनी**
**कौने तारसे, बिनि चदरिया**

वैदिक काळात गृत्समद नावाचा एक मंत्रद्रष्टा ऋषि होऊन गेला. ह्याने ऋग्वेदाचे दुसरे मंडल लिहिले. पण तो काही नुसता 'कवि' नव्हता. तो विणकर होता. त्याने विणता विणता ऋग्वेदातले मंत्र लिहिले. आणि गणितामधले मोठमोठे शोधहि लावले. दहापर्यंतचे पाढे त्यानेच प्रथम रचले. त्यामुळे त्याला एवढा आनंद झाला की त्याने इंद्राची प्रार्थना पाढ्यांमध्येच केली : "हे इंद्रा, तू दोन घोड्यांच्या, चार घोड्यांच्या, सहा घोड्यांच्या, आठ घोड्यांच्या नि दहा घोड्यांच्या रथातून ये..."

**श्रेष्ठ वाङ्मय श्रमातून जन्मास येते.**

अशा रीतीने वैदिक मंत्रांची उत्पत्ति ही कल्पनेतून झालेली नाही. जीवनाच्या सेवेमधून झालेली आहे. श्रमातून आणि कामातून जे वाङ्मय निर्माण होते, त्याची गोडी अवीट असते. गेल्या पन्नास वर्षांत महाराष्ट्रामध्ये कवींचे केवढे पीक आले? त्यांच्या काव्यांचे संग्रह काय निघाले अन् त्यांच्या प्रतिभेचे कौतुक काय झाले? पण माजघरात दळता दळता अन् कांडता कांडता, आमच्या अडाणी गृहिणींनी केवढे अलौकिक काव्य रचून ठेवले आहे!

**बाप पुसे लेकी । सासुरवास कसा**
**वळचणीचा वासा । लागतो ठसा ठसा**

**पाऊस की पडे। मृगा आधी रोहिणीचा**
**भावाआधी बहिणीचा। संवसार**

**वनदेवतांचे। काजवे जणू डोळे**
**बघाया बाळ माझे। त्यांनी रात्री उघडले**

**आधणाचे पाणी। ओतिते विसावण**
**पतीच्या रागात। मिसळले प्रेमगुण**

**फोडिले चंदन। त्याच्या केल्या बारा फोडी**
**स्त्रियांची जात वेडी। पुरुषांना माया थोडी**

ह्या काव्यांवरून महाराष्ट्रातील सर्व आधुनिक कविता ओवाळून टाकावीशी वाटते. अहिराणी भाषेतील एका निरक्षर गृहिणीचे हे काव्य पाहा :

**अहेव मरन। नका लावण्या चंदन**
**मायना हातनं। संगे येऊ द्या गोंदनं**

'अहेव मरणाची इच्छा करणाऱ्या सासुरवाशिणीला एकच समाधान असते की मेल्यानंतर अंगावरचे दागदागिने काढून घेतले, तरी आपल्या अंगावरचे आईच्या हातांनी केलेले गोंदणे मात्र आपल्याबरोबर निश्चित येईल!'

बहिणाबाई चौधरी ह्यांची खानदेशी भाषेत अलीकडेच प्रसिद्ध झालेली गाणी म्हणजे प्रतिभेचा चमत्कार आहे. रोजचे घरातले काम आणि शेतातले काम करता करता त्यांचा जन्म गेला. त्यांना लिहिताहि येत नव्हते किंवा वाचताहि येत नव्हते. चूल फुंकता फुंकता 'माय भिमाई माऊली। माझी आंब्याची साऊली' किंवा दळता दळता 'माझ्या माहेराची वाट। माले वाटे मखमल।' असले जिवंत काव्य निश्वासासारखे सहज त्यांच्या मुखामधून प्रकट होई. अन् मग त्यातले काही थोडेसे मागून कोणी तरी टिपून ठेवी. पुष्कळसे त्यांचे काव्य असे वाऱ्यावरच गेले.

धरित्रीच्या कुशीत झोपलेले बीबियाणे कसे प्रकट होते ह्याचे त्यांनी केलेले हे वर्णन पाहा :

**ऊन वाऱ्याशी खेयता**
**एका एका कोंबातून**
**पगंटले दोन पान**
**जसे हात जोडीसन**

टाया वाजविती पान
दंग देवाच्या भजनी

माहेरच्या वाटेचे वर्णन करताना बहिणाबाईच्या प्रतिभेने तर अमृताचा सडाच शिंपलेला आहे.

माझ्या माहेरच्या वाटे, जरी आले पायी फोड
पाय चालले चालले, अशी माहेराची ओढ
माझ्या माहेरच्या वाटे, जरी लागल्या रे ठेचा
वाटेवरच्या दगडा, तुले फुटली रे वाचा
माझ्या माहेराच्या वाटे, माले लागली गुचकी
आली उडत उडत, एक दिसली सायंकी
माझ्या माहेराच्या वाटे, मारे सायंकी भरारी
माझ्या जायाच्याच आंधी, सांगे निरोप माहेरी

मातीच्या घटातले अमृत म्हणतात ते हे. जीवन खांडावे तेव्हा असे अमृताचे जिवंत झरे त्यातून उचंबळतात. जीवनाकडे पाठ फिरवून नुसती कलेची आणि कल्पनेची 'जाळी' विणीत बसलेले आजचे बहुतेक लेखक आणि कवि शाईचा नि कागदाचा विनाकारण व्यय करताहेत.

लेखन ही काही वेठ नाही. लिहिता येते म्हणून काय लिहिलेच पाहिजे ? त्यापेक्षा वाचावे. वाङ्मयाच्या अमृतात यथेच्छ डुंबावे. सर्वांगाने ते शोधून घ्यावे. अंतर्बाह्य शुद्ध व्हावे. कपड्याला कसर लागू नये म्हणून आपण त्यात केवड्याची कणसे घालतो. वाङ्मयाचे हेच काम आहे. ते जीवन सुगंधित करते. जीवनाचा अधःपात होऊ देत नाही.

ह्या दृष्टीने पुष्कळसे 'आधुनिक वाङ्मय' व्यर्थ आहे. जीवनावर परिणाम करण्याचे सामर्थ्य त्यात नाही. मानवतेच्या कल्याणासाठी प्राचीन काळातील महापुरुषांनी देवभाषेत आणि लोकभाषेत 'केवड्याची बेटे' लावून ठेवली आहेत. त्यांचा सुगंध शतकानुशतके दरवळतो आहे.

मी जीवनात पुष्कळ हिंडलो. पण वाङ्मयाची सोबत सोडली नाही. जीवनाची सेवा मी वाङ्मयाने केली. वाङ्मयाचा उगम सेवेतून व्हावा, आणि सेवेतच त्याचा विनिमय व्हावा. वाङ्मयात रंजन तर हवेच, पण त्यात जागृति पाहिजे. समाजात डोंगराएवढे अज्ञान आहे. लक्षावधि लोक झोपले आहेत.

त्यांना कोण उठवणार! जे निजले आहेत त्यांनाच जागे करावे. जे जागे आहेत त्यांना उठवण्यात काय शहाणपणा आहे?

**मराठीचा पक्ष हा स्त्री-शूद्रांचा पक्ष**

पुष्कळसे लेखक अज्ञानांना सज्ञान करण्याऐवजी, पंडितांना महापंडित करण्याच्या मागे लागले आहेत. निर्वासितांना घरे नाहीत. आणि ज्यांना घरे आहेत, ते मजले बांधताहेत. गीता म्हणते, 'दरिद्रान् भर कौंतेय, मा प्रयच्छेश्वरे धनम्।' गरिबांना धन द्यावे. श्रीमंतांना नाही. संस्कृताचा आणि पांडित्याचा दंभ माजला म्हणून बहुजनांच्या उद्धारासाठी मराठी भाषेचे निशाण संतांनी हाती धरले.

केशवदेवांनी संस्कृतमध्ये ग्रंथ लिहिला. तेव्हा नागदेवाचार्य रागावून म्हणाले, "पंडित केशवदेवा, तुमचा अस्मात्-कस्मात् नेणो : मज चक्रधरे निरूपली मऱ्हाटी भाषाः तियाची पुसा : ग्रंथी निका झाला : परी निवृत्तिया जोगा नोहे : प्रवृत्तिया जोगा झालाः माजीया म्हातारीया नागवतील की!"

मराठीचा पक्ष हा बायाबापड्यांचा आणि स्त्रीशूद्रांचा पक्ष आहे. मराठी लेखकांनी हे कदापि विसरू नये. समाजातले खड्डे अन् खाचखळगे आधी भरा. मनोरे कसले बांधताहात? ज्ञानेश्वर म्हणतात :

**निम्न भरलिया विणें। तोय ढळेचि नेणे**
**तेवी श्रांता तोषोनि जाणे। समोरे पां॥**

वाटेतला खड्डा भरून काढल्यावाचून पाणी पुढे वाहातच नाही. त्याप्रमाणे श्रांत पीडितांना संतुष्ट केल्यावाचून समाजाची प्रगति मुळी होतच नाही. महापुरुषांचे लक्ष खाली असते, वर नसते. ते खाली पाहून चालतात. गंगेचा जन्म हिमालयावर झाला. पण जनतेला जीवन देण्यासाठी ती खाली उतरली. लहानांना जो कडेवर उचलतो, तोच मोठा.

**जे कां रंगले गांजले। त्यांसि म्हणे जो आपुले,**
**तोचि साधु ओळखावा। देव तेथेची जाणावा.**
**मृदु सबाह्य नवनीत। तैसे सज्जनाचे चित्त,**
**ज्यांसि आपंगिता नाही। त्यांसि धरे जो हृदयी,**
**दया करणे जे पुत्रांसि। तेचि दासा आणि दासी,**
**तुका म्हणे सांगू किती। तोचि भगवंताची मूर्ति.**

मानवतेच्या सेवकांना यापेक्षा मोठा संदेश काय द्यावयाचा?

धर्माने आणि ज्ञानाने आजपर्यंत अज्ञ जनांचा बुद्धिभेद केला. जीवनापेक्षा मरणाला अन् मोक्षाला त्यांनी महत्त्व दिले. त्यामुळे वैराग्याचे, जपजाप्याचे नि क्रियाकर्मांचे अवडंबर माजले. तीर्थांचे, देवळांचे आणि मूर्तिपूजेचे प्रस्थ वाढले. भिक्षुक आणि पुजारी गोरगरिबांना राजरोस लुटू लागले. म्हणून जनतेच्या उद्धारासाठी संतांना धावून यावे लागले.

**कामात राम आहे**

कबीराने लोकांना सांगितले, "अरे, देव तुमच्या हृदयात आहे. त्याला तुम्ही कोठे शोधता?"

**मोको कहाँ ढूँढ़े बन्दे, मैं तो तेरे पासमे**
**ना मैं देवल ना मैं मसजिद, ना काबे कैलासमे.**
**ना तो कौन क्रियाकर्ममे, नही योग बैरागमे.**
**खोजी होय तो तुरतै मिलि हौं, पल भरकी तालासमे.**
**कहे कबीर सुनो भाई साधो, सब स्वाँसोंकी स्वाँसमे.**

"भक्ता, मला कुठे रे धुंडतोस? मी तर तुझ्याजवळ आहे. मी देवळात नाही. मशिदीत नाही. काब्यात नाही. कैलासात नाही. मी क्रियाकर्मात नाही, योगात नाही नि वैराग्यात नाही. मला तू शोधलेस, तर एका पळात मी तुला भेटेन." कबीर सांगतो, "ऐकलेस भक्ता, सर्व श्वासांचा 'तो' श्वास आहे अरे!"

रामनाम घ्या अन् आपले काम करा. कामात राम आहे. हा सामान्य लोकांच्या कल्याणाचा धर्म कबीराने सांगितला. धर्माचे हेंच 'सोपे वर्म' तुकोबांनी पण सांगितले :

**ॐ तत्सत् इति सूत्रांचे सार**
**कृपेचे सागर पांडुरंग**

शास्त्रे, सूत्रे अन् पुराणे वाचण्याची काही जरूरी नाही. सर्वांचे सार पांडुरंग आहे. घरी बसल्या बसल्या काम करता करता त्याचे नाव घ्या. रानावनात अन् तीर्थक्षेत्रांना जायची काही जरूरी नाही.

चारी वेद जयासाठी। त्याचे नाम धरा कंठी
न करी आणीक साधन। कष्टसी का वायावीण
अठरा पुराणाचे पोटी। नामाविण नाही गोष्टी
गीता जेणे उपदेशिली। ते ही विटेवरी माऊली
तुका म्हणे सार धरी। वाचे हरिनाम उच्चारी

संत गाडगे महाराज नेहमी सांगतात, "घरोघर तीर्थक्षेत्र आहे. त्यासाठी भटकण्याची जरूरी नाही. गंगेत स्नान केल्याने पाप जात नाही. त्याने पापे नाहीशी होतात असे जे सांगतात, ते शास्त्रांचा काळाबाजार करतात." दीनांच्या आणि दलितांच्या उद्धाराची ही दृष्टि संतांनी सदैव बाळगलेली आहे.

जगाच्या उद्धारासाठी भगवंतांनी 'गीता' सांगितली. 'गीता' म्हणजे सर्व उपनिषदांचे गोपालनंदनाने पिळून काढलेले दूध—नव्हे अमृत. पण हे अमृत जनतेला कुठे प्यायला मिळाले? संन्याशांनी आणि पंडितांनी स्वतःची अक्कल त्यात ओतून ते नासविले. त्यामुळे गीतेची भलतीच शिकवण जनतेला मिळाली. अर्थाचा अनर्थ झाला. लोकमान्य टिळकांना गीतेचे रहस्य उद्घोषून सांगावे लागले.

मोक्ष मिळविण्यासाठी संसार सोडण्याची जरूरी नाही. संसारात राहून प्रत्येकाने आपले कर्तव्य करावे. पण ते करताना स्वार्थाचा विचार करू नये. लोककल्याणाची दृष्टि बाळगावी. परमेश्वरावर श्रद्धा ठेवावी. त्यातच ऐहिक आणि पारलौकिक कल्याण आहे. हे गीतेचे रहस्य आहे.

**खरा संन्यासी कोण?**

संन्यास आणि वैराग्य ह्या कल्पनांचा विपर्यास झालेला आहे. त्याचा विनोबांनी फारच सुंदर अर्थ सांगितला आहे. जो कर्म सोडतो तो संन्यासी नव्हे, सर्वांपेक्षा जो जास्त कर्म करतो तो संन्यासी. तो कर्म करीत आहे असे लोकांना वाटत नाही. चाक जोराने फिरत असले, म्हणजे ते नाही का स्थिर वाटत? तसे संन्याशाचे कर्म हे बाह्यतः अकर्म वाटते. त्याचप्रमाणे लोकसेवेसाठी स्वतःचे पाश तोडणे ह्याचे नांव वैराग्य. नवीन बीज पेरण्यापूर्वी जमिनीतले तण तोडून ती शुद्ध करावी लागते. पण जमिनीत पेरणी करावयाची नसेल तर हे शुद्धीकरण निरर्थक आहे. वैराग्य म्हणजे लोककल्याणाच्या कार्यासाठी केलेली आत्मशुद्धि.

कोणत्याहि परिस्थितीत कर्म हे सुटत नाही. परमेश्वरप्राप्ति झाली तरीहि कर्म सुटत नाही. पुंडलीक आईबापांची सेवा करीत होता. त्याच्या भेटीला देव आले. पण देव आले तरी तो उठला नाही. त्याने आपले कर्म सोडले नाही. त्याने देवालाच सांगितले की, 'राहा त्या विटेवर उभा.' त्याने आपले काम चालूच ठेवले.

देवाच्या दर्शनासाठी जो स्वतःचे कर्म सोडतो, त्याला देव भेटत नाही. देवाचे नाव आणि स्वतःचे कर्तव्य करावे.

**तुका म्हणे चवी आले। जे का मिश्रित विठ्ठले।**

भाजीत चमचाभर मीठ किंवा चहात दोन चमचे साखर टाकली म्हणजे जशी त्यांना रुचि येते, तसा प्रत्येक कामात थोडासा तरी 'विठ्ठल' मिसळीत जावे म्हणजे त्याला गोडी येते.

देवधर्माप्रमाणे नीतिधर्माचाहि आजवर विपर्यास झाला आहे. त्यामुळे बहुजनांची फार नागवणूक झाली आहे. 'नीती'चा खरा अर्थहि पुष्कळांना माहीत नाही. पाश्चात्य भाषेत तर 'नीती'ला समान अर्थी शब्दच नाही. म्हणून 'नीती'च्या अर्थाबद्दल फार गैरसमज आहे. 'नीति' म्हणजे साधु किंवा बैरागी ह्यांची जगण्याची 'रीति', अशी पुष्कळांची समजूत आहे. अनेक व्रतवैकल्यांनी आणि यमनियमांनी जो स्वतःला आयुष्यात बांधून घेतो तो नीतिमान् असे कित्येकांना वाटते. पण तसा नीतीचा खरा अर्थ नाही.

**नीति म्हणजे जीवनाचे व्यवहारज्ञान**

नीति म्हणजे शहाणपणाने जीवन जगण्याची रीति. संसार किंवा समाज न सोडता व्यवहारी माणसाने जीवनामधल्या जास्तीत जास्त आनंदांचा कसा आस्वाद घ्यावयाचा हे जिच्यामुळे समजते ती 'नीति.'

ह्या जगात दुष्ट माणसे पुष्कळ आहेत. सज्जन माणसांना त्यांच्यापासून उपसर्ग होण्याचा संभव असतो. म्हणून प्रत्येकाने सावधगिरीने वागावे. दारिद्र्य हे जगांतले दुसरे संकट आहे. म्हणून पैसा असल्यावाचून चालणार नाही. पण संपत्तीचा लोभ करू नये. जगात मैत्रीसारखा आनंद नाही. म्हणून चांगल्या माणसाशी मैत्री जोडावी. विद्याभ्यासात आणि काव्यशास्त्रविनोदात काळ घालवावा. आपल्या अंगातील सर्व गुणांचा विकास होईल असे वागावे. प्राचीन वाङ्मयात 'पंचतंत्र' ह्या 'नीतिशास्त्रा'चा जो अनुपम ग्रंथ आहे

त्यात नीतीच्या स्वरूपाचे असे निरूपण केलेले आहे. त्यावरून हे लक्षात येईल की नीति म्हणजे 'मोक्षाचे तत्त्वज्ञान' नव्हे. नीति म्हणजे 'जीवनाचे व्यवहारज्ञान.'

तीन तऱ्हेची माणसे बहुजनांची दिशाभूल करतात. सत्ताधारी, अहंकारी आणि ढोंगी. ती त्यांच्या अज्ञानाचा नि दुर्बलतेचा फायदा घेतात. धर्म, ज्ञान अन् नीति ह्या गोष्टी त्यांच्या आटोक्याबाहेर आहेत असे ती भासवितात. आणि कुष्टयाची भावना त्यांच्या मनात निर्माण करून स्वतःचे अवडंबर माजवितात. या पातकाला देवाच्या राज्यात क्षमा नाही.

सूर्यापेक्षा जगात श्रेष्ठ काय आहे? पण तो देखील लहान मुलांना दिसतो. देवाने जे जे केले ते प्रत्येकाला कळते. सर्वांना मिळते. ज्ञान कितीहि मोठे असले, तरी ते कळणार नाही एवढा अज्ञ जगात कोणीच नाही. समाजातील सर्व सामर्थ्याचा उपयोग दीनांच्या उद्धारासाठी व्हावा. सर्वांना कळावे. सर्वांना मिळावे. सर्वांनी फुलावे. सर्वांनी हसावे. ही भावना समाजात वाढली पाहिजे.

मी उपदेशक नाही. उपासक आहे. सिद्ध नाही. साधक आहे. समाजातील अनंत दुःखांची आणि दैन्यांची मला जाणीव आहे. त्यांजवर फुंकर घालण्याचाच माझ्या लेखणीने मी सतत प्रयत्न केला आहे. जनतेचा कैवार घेण्यात मी माझे सामर्थ्य खर्च केले आहे. जगातील म्लान वदने प्रफुल्लित कशी होतील ह्याचीच मी सदैव चिंता केली आहे. माझ्या दोषांची आणि चुकांची मला जाणीव आहे. माझ्या हातून अनेक अपराध घडले आहेत. पण असद्भावनेचा प्रचार करून जनगंगेचे जीवन गढूळ करण्याचा प्रयत्न मात्र मी कदापि केलेला नाही.

## आपल्या अशुद्ध चित्ताची जाणीव ठेवावी

मी संतुष्ट नाही. अनेकांशी मी भांडलो आहे. पण माझ्या स्वतःशी माझे सर्वात मोठे भांडण आहे. ते भांडण संपता संपत नाही. क्षुद्र गोष्टींचे मला अजून महत्त्व वाटते. अमुक काय बोलतोय अन् तमुक काय लिहितोय हे मी मनाला उगाच लावून घेतो. माझे मोह मला सुटत नाहीत. त्याने माझ्या वेळेचा नि बळाचा व्यय होतो.

माझ्या अंगी पुरेशी नम्रता नाही. लोक जेव्हा माझी निंदा करतात, तेव्हा त्यात माझा काही दोष नाही असेच मला वाटते. तुकोबाचा हा अभंग सारखा माझ्या डोळ्यांसमोर असतो.

**चंदनाच्या वासे धरतील नाक**
**नावडे कनक न घडे हें,**
**साखरेची गोडी सारिखी सकळा**
**थोरा मोठ्या बाळा धाकुट्या**
**तुका म्हणे माझें चित्त शुद्ध होते**
**तरि का निंदिते जन मज ?**

चंदन बघून काही कोणी नाक धरीत नाही. सोने सर्वांना आवडते. साखरेची गोडी सर्वांना कळते. मग मलाच कां लोक नावे ठेवतात? माझे चित्त शुद्ध नाही. माझेच काही तरी चुकते म्हणून. तुकोबांना सुद्धा जी चित्तशुद्धि साधली नाही, ती तुम्हा आम्हाला काय साधणार? पण आपल्या अशुद्ध चित्ताची जाणीव जरी आपण ठेवली तरी पुष्कळ आहे.

पण मी गुणांचा पूजक आहे, हे माझे सर्वांत मोठे सामर्थ्य आहे. भुंगे जसे फुलांवर झेप घेतात, तसे गुण मला दिसले रे दिसले, की मी त्यांजवर तुटून पडतो. कुठून सुवास आला की मी चाललोच त्या बाजूला. कुठून चांगला सूर ऐकू आला की मी धावलोच तिकडे. चांगल्या गोष्टीवर प्रेम करण्याची मजमध्ये उपजत प्रेरणा आहे, हे केवढे माझे भाग्य? तुकोबा म्हणतात :

**मुंगीचिया घरा कोण जाय मूळ ?**
**देखोनिया गूळ धाव घाली**

जगातल्या चांगल्या गोष्टी आपल्याला आमंत्रण पाठवतील अशी वाट पाहात बसू नये. आपण त्यांच्याकडे धावत जाण्यामध्येच आपले हित आहे. जीवनात माती आणि साखर ह्यांची विलक्षण भेसळ झालेली आहे. कबीरजी म्हणतात, "हत्ती होऊन ही साखर खाता येणार नाही. मुंगी होऊनच ती खाल्ली पाहिजे." चांगल्या गोष्टींना शरण गेले, तरच त्यांचे चारदोन कण पदरात पडतात. सद्‌गुणांच्या दारांशी जन्मभर मी जी माधुकरी मागितली, त्याच शिदोरीवर मी आजपर्यंत गुजराण करतो आहे.

गुणांची पूजा करताना एक काळजी घ्यावी, विभूतिपूजक होऊ नये. माझ्यामध्ये तो दोष आहे. मी मूर्तिपूजक आहे. आणि मूर्तिभंजकहि आहे. माझ्या

'देवा'ने सदैव माझ्या नवसाला पावावे असा माझा हट्ट असतो. लहानपणी क्रिकेटचा सामना पाहताना, आम्ही एक 'म्हसोबा' तयार करीत असू. विरुद्ध बाजूचा खेळाडू बाद झाला की आम्ही त्या म्हसोबाच्या डोक्यावर गवत वाहायचे. आणि आमच्या बाजूचा खेळाडू 'आऊट' झाला, की आम्ही त्या म्हसोबाची खेटरांनी पूजा बांधायचे. जीवनात असेच माझ्या हातून पुष्कळदा घडले आहे. सदैव ज्यांची पूजा करता येईल असे 'देव' माणसांच्या जगांत नसतात असे नव्हे. पण थोडे असतात.

लोकमान्य टिळकांच्या नि महात्मा गांधींच्या काळात आमची पिढी जन्माला आली हे आम्ही आमचे भाग्य समजतो. शेकडो वर्षे थांबून राहिलेले जनता-क्रांतीचे प्रचंड चक्र आमच्या डोळ्यांसमोर फिरू लागले. स्वातंत्र्याचे शिखर भारताने गाठले. पण जनतेच्या उद्धाराचे प्रचंड कार्य अजून अपूर्णच आहे. ते शिखर अद्यापि आपल्याला गाठायचे आहे.

### शुद्ध प्रेमाची लयलूट करा

तोपर्यंत हे क्रांतिचक्र कोण फिरत ठेवणार ? ते सामर्थ्य ज्याच्या बुद्धीत आणि अंगांत आहे, असा एकच महापुरुष सुदैवाने आज ह्या भारतात आहे. आणि तो म्हणजे विनोबा. कोट्यवधि कंगालांची नि दलितांची आरोळी विनोबांनी आपल्या कनवाळू हृदयामध्ये झेलली. आणि ती साऱ्या भारतावर उधळून दिली. 'दे दान, सुटे गिऱ्हाण !' मानवतेचे ग्रहण दानाखेरीज सुटणार नाही, हा विनोबांचा संदेश आहे. 'देवांनी दमन करावे, राक्षसांनी दया करावी अन् मानवाने दान करावे.'

विनोबांचा मार्ग हा राजकारणी पुरुषांचा मार्ग नव्हे. राजकारणाचा मार्ग हा द्वेषाचा नि कलहाचा मार्ग आहे. त्या मार्गाने जाऊन भारताचे कल्याण साधणार नाही. रंजल्यागांजल्यांना हृदयाशी धरणाऱ्या संतांचा प्रेममार्ग हाच विनोबांचा मार्ग आहे. श्रीमद्भगवद्गीता, ज्ञानेश्वरी आणि तुकोबा ह्यांच्या सावलीत विनोबा वाढलेले आहेत. 'सर्वभूतहिते रतिः' हा गीतेचा संदेश त्यांच्या रोमरोमी भिनलेला आहे. 'भूतांची दया हे भांडवल संता' ह्या अमृतावर त्यांचा पिंड पोसलेला आहे.

माणसाच्या हृदयाला त्यांनी हात घातलेला आहे. आणि त्याच्या चांगुलपणाला आवाहन केले आहे. प्रेम वाटा आणि प्रेम लुटा. शुद्ध प्रेमाची लयलूट करा.

'गोविंद द्या, अन् गोपाळ घ्या—' हा गजर साऱ्या भारतांत उठवा. ही विनोबांची शिकवण आहे.

स्वातंत्र्य आले. समता कधी येणार? हा एकच सवाल देशापुढे आता आहे. ममतेवाचून समता येणार नाही, असे संतांनी पूर्वी सांगितले. विनोबाहि आज तेच सांगताहेत.

समतेचा मार्ग ममतेमधून आहे, असेच मला वाटते.

४. ४. ४

# ४. भौतिक शास्त्रांचे सामर्थ्य

**दत्तात्रेय केशव केळकर**

अध्यात्म, धर्म, परमार्थ इत्यादि शब्दांनी जे काही व्यक्त होते त्याचे भारतीयांना जबरदस्त आकर्षण. हे आकर्षण कमी व्हावे आणि भारतीयांना भौतिक शास्त्राचे माहात्म्य पुरेपूर पटावे व तदनुसार त्यांच्या वृत्तीत व वर्तनात बदल व्हावा असे मनापासून वाटणारे जे काही थोडे विचारवंत लेखक महाराष्ट्रात आहेत त्यात प्रा. द. के. केळकर (जन्म इ. स. १८९५) यांचे स्थान फार मानाचे आहे. प्रा. केळकरांनी प्रारंभी काव्यशास्त्रविषयक लेखन केले ते 'काव्यालोचन' या ग्रंथरूपाने प्रसिद्ध आहे. पुढे मात्र त्यांनी आपले बहुतांश ग्रंथलेखन विज्ञाननिष्ठेचा पुरस्कार व त्या निष्ठेला अनुसरून केलेले भारतीय व पाश्चिमात्य संस्कृतींचे मूल्यमापन या विषयांना धरून केलेले आहे. 'संस्कृति संगम,' 'उद्याची संस्कृति,' 'विज्ञान आणि संस्कृति' हे त्या दृष्टीने त्यांचे प्रसिद्ध ग्रंथ. भौतिक शास्त्रावरील त्यांच्या निष्ठेचा निदर्शक असा प्रस्तुत लेख हा त्यांच्या 'वादळी वारे' या लेखसंग्रहातून घेतलेला आहे. प्रा. केळकरांनी आपले सगळे चिंतन-लेखन मुंबईच्या रुइया कॉलेजातील आपले प्राध्यापकाचे काम सांभाळून केले आहे.

### मानवाचे कर्तृत्व

गेल्या शे-दीडशे वर्षांत भौतिक शास्त्राने मानवी संसारावर जो शृंगारसाज चढविला आहे तो केवळ अपूर्व होय. आपल्या संसारात सुखसोयींची भर टाकतील असे शोध मनुष्य हजारो वर्षे लावीत आलाच आहे. पण या शे-दीडशे वर्षांत अशा शोधांचा जणो नुसता पाऊस पडला आहे. स्वच्छ नीलाकाशात रात्रीच्या समयी एखाद दुसरी उल्का तळपून जात असता हमेश पाहावयास सापडते; पण कार्तिक मार्गशीर्ष मासामध्ये काही रात्री अशा असतात की, ह्या रात्री आकाशाच्या ज्या भागाकडे नजर फेकावी त्या त्या भागात तेजःपुंज तारका नुसत्या उड्या घेत असताना आढळून येतात. तसेच भर पौर्णिमेच्या

दिवशी सागराच्या लाटांवर लाटा उसळू लागून भरती येऊ लागली म्हणजे वाटते की, जणो ह्या लाटांची अनंत परंपराच सुरू राहणार. तशीच गेल्या शे-दीडशे वर्षांत शास्त्रीय शोधांची नुसती गर्दी उसळून गेली आहे.

मानवी संस्कृतीच्या विकासाला अत्यंत आवश्यक असे काही मूलभूत शोध फार प्राचीन काळींच लावले गेले. ऐतिहासिक दृष्टीने फार दूरच्या प्राचीन काळात न्याहाळून पाहू गेले तरी दृष्टि पोहोचते तेथपर्यंतच्या समाजाने शेतकी, विणकाम, भाषा व समाजनियमन वगैरे मूलभूत गोष्टी आधीच साध्य केलेल्या दिसतात. गोल चाकाचा शोध लावून, मानवाला रथारूढ करून ज्याने पायपिटी वाचविली, काष्ठावर काष्ठ घासून अग्नि हुकमी तयार करण्याच्या कृतीने हिंस्र प्राण्यांपासून व थंडीपासून निवारण करण्याचे अमोघ शस्त्र ज्याने निर्माण केले, मिळतील तेव्हाच व मिळतील तेवढीच फळे झाडावरून नुसती ओरबडून खाण्याऐवजी त्यांचे बी पेरून हुकमी धान्य मिळवून मानवाची आद्यतम चिंता जी क्षुधा ती ज्याने दूर केली, लिपीचा शोध लावून वाङ्मयाला स्खलनशील अशा मानवी स्मृतीच्या संदुकेतून सोडवून अभंग अशा शिलालेखाचे चिरंजीवित्व ज्याने मिळवून दिले, ते सर्व प्राचीन काळचे ऋषिवर्य महान् अव्वल दर्जाचे शोधक होत. त्यांच्या शोधांनीच एरवी दुर्बल असा हा साडेतीन हाती मानव-प्राणी आपल्यापेक्षा शतपटींनी सामर्थ्यवान् अशा इतर अनेक प्राण्यांना पुरून तर उरलाच, पण इतर प्राण्यांप्रमाणे शतकानुशतके एकाच एक स्थिरावस्थेत रखडत न पडता शास्त्र, कला, वाङ्मय, नीतिनियमन यांनी समृद्ध असा संस्कृति-प्रासाद त्याने उठविला.

### सृष्टीवरील स्वामित्व

या प्रासादातील भौतिक सुखसोयींमध्ये तर गेल्या शेपन्नास वर्षांत जितकी विलक्षण भर पडली आहे, तितकी पूर्वी केव्हाच पडली नसावी. भौतिक सुखसोयींची मुख्य गुरुकिल्ली म्हणजे सृष्टीवरील स्वामित्व. सृष्टीच्या जामदारखान्यात ऐश्वर्य नुसते लोळत पडले आहे; तिला नेत्रकटाक्षावर नाचविण्याची मोहिनी मात्र पाहिजे; मग तिच्या स्वामीच्या ऐश्वर्याला सीमा नाही. आणि हे अमार्याद ऐश्वर्य खास प्राप्त होईल अशी आशा वाटू लागण्याइतके सृष्टीचे रहस्य दिवसेंदिवस उकलूहि लागले आहे. एकापेक्षा एक क्रांतिकारक अशा लागत चाललेल्या शोधांच्या परंपरेने शास्त्राच्या

महत्त्वाकांक्षेची झेप आता एवढी वाढली आहे की सृष्टीचे अमुक रहस्य वा कोडे आपल्या बुद्धीस उकलणार नाही, किंवा कल्पनेला सुचलेल्या अमुक घटना आपल्या कर्तबगारीस व्यवहारात उतरून दाखविता येणार नाहीत असे त्याच्या स्वप्नीहि येत नाहीसे होत चालले आहे. आणि यावे तरी का? त्याच्या शास्त्रीय बुद्धीला आणि अजस्र उद्योगाला यशाच तसे अचाट आलेले आहे.

शतकानुशतके ज्या गोष्टी केवळ कविकल्पनेच्या विलासाचा विषय होऊन राहिल्या होत्या त्या आता त्याने प्रत्यक्ष आपल्या सेवेस हजर केल्या आहेत. आकाशाच्या अमर्याद विस्तारात स्वच्छंदपणे विहार करणाऱ्या पक्ष्यांकडे मानव हा शतकानुशतके केवळ आशाळभूतपणे पाहात बसला होता. पण आता पक्षिराज गरुडालाहि हेवा वाटावा अशा विलक्षण भरारीने तो उडू शकतो, आणि उभा जन्म वरुणाच्या साम्राज्यात घालविणाऱ्या जलचरांनीहि थक्क व्हावे अशा निर्घोरपणे दर्यामध्ये डुंबू शकतो. प्राचीन काव्ये व संहिता यातून विमानाची नावेच नव्हे तर काहीशी तपशीलवार वर्णनेहि आढळतात, यावरून पूर्वी एके काळीं विमानविद्या साध्य झाली होती असे मानले, तरी पुढे मात्र तिचा आत्यंतिक लोप झाला असला पाहिजे. कारण विमानातून आकाशाचे अवगाहन करणाऱ्या राजांची वर्णने आढळतात ती सर्व पौराणिक काळात. ऐतिहासिक काळी कोणाहि राजाच्या दिमतीला विमान असल्याचा उल्लेख नाही. ते वैभव प्राप्त झाले आहे ते अगदी अलीकडेच—म्हणजे आजच्या तरुण पिढीच्या डोळ्यांदेखतच प्राप्त झाले आहे. तसेच पाण्यामध्ये दडी मारून राहण्याची विद्या दुर्योधनास काय साध्य झाली असेल ती असो; पण 'पाण्यामध्ये मासा झोप घेई कैसा' याचा अनुभव चाखावयाचा झाल्यास, माशाच्याच जन्मास गेल्याशिवाय गत्यंतर नाही अशी तुकारामाप्रमाणे सामान्य जनाची आजवर समजूत व स्थिति होती. पण आता मासोळीचा जन्म न स्वीकारताहि पाणबुडीत बसून या मानव देहीच 'येणेचि डोळा येणेचि काये' तो खुशाल दर्याच्या कुशीत जाऊन पहुडू लागला आहे. लहान मुलामुलींना आता उखाणा घालून विचारण्यास हरकत नाही की, 'पंख नसता नभी उडतो व कल्ले नसता जळी पहुडतो असा प्राणी कोण?'

### शास्त्रीय सिद्धींचे अपूर्व सामर्थ्य

योगी लोकांनी असली सामर्थ्ये फार प्राचीन काळीच साध्य केली होती

याची या ठिकाणी वाचकांना आठवण झालीच असेल. आकाशात संचार करणे किंवा जलात बुडून राहणे, विश्वातील कोणत्याहि ठिकाणचे ऐकणे किंवा पाहणे या गोष्टी योगी लोकांच्या हातचा मळ होता अशी साक्ष अनेक ग्रंथात वाचावयास सापडते. हस्तिनापुरातील राजवाड्यात धृतराष्ट्राच्या सिंहासनाशेजारी बसून कुरुक्षेत्रावरील रणधुमाळी दिव्य दृष्टीने पाहून वर्णन करणाऱ्या संजयाची अद्भुत कथा तर प्रत्येकाच्या परिचयाची आहे. त्या कथेत काय सत्य असेल ते असो; पण आज मात्र रेडिओ आणि टेलिव्हिजन यांचा यंत्रसंसार आपल्या दिवाणखान्यात सजवून ठेवणाऱ्या संजयरावाला स्वतःच्या घरच्या शेजेवर सुखेनैव पडल्या पडल्या जर्मनीत गेलेले आपले हिंदी बांधव ऑलिंपिक सामन्यात काय करामत करीत आहेत हे प्रत्यक्षच पाहता येते व त्यांच्या गौरवपर केलेली भाषणे साक्षात् ऐकावयास सापडतात. योगमार्गात या किंवा याहिपेक्षा अद्भुत अशा सिद्धि प्राप्त होत असतीलहि, पण आधुनिक शास्त्राने साध्य केलेल्या सिद्धींची मातबरी काही निराळीच आहे.

योगमार्गामध्ये सिद्धि प्राप्त करून घेण्याकरिता प्रत्येक साधकाला व्यक्तिशः उग्र तपश्चर्या करावी लागते. उलट रेडिओ, टेलिव्हिजन वगैरेंसारख्या ज्या सिद्धि शास्त्राने साध्य केल्या आहेत त्यांची साधना चालू असता मूळ शोधक सिद्धाला जे काय घोर अनुष्ठान करावे लागले असेल तेवढेच; पण एकदा का ह्या सिद्धि शास्त्रज्ञांच्या आश्रमात येऊन अवतरल्या म्हणजे मग त्यांच्याकडून सेवाचाकरी कोणीहि करून घ्यावी. त्या आश्रमात येतात त्या आजन्मसेविका म्हणून राहण्याकरिता, शापभ्रष्ट अप्सरेप्रमाणे काही तरी कुरापत काढून स्वर्गात परत पळून जाण्याकरिता नव्हेत! शास्त्रज्ञाला विद्युत्सिद्धि जी एकदा वश झाली ती कंसमामाच्या हातून निसटून कडाडून वर निघून जाणाऱ्या श्रीकृष्णभगिनीप्रमाणे शास्त्रज्ञाला शिव्या देत परत तर पळून गेली नाहीच, तर उलट पतिव्रता सतीप्रमाणे त्याच्या आश्रमात अहोरात्र त्याची सेवा करीतच राहिलेली आहे. योगमार्गातील सिद्धि या काहीशा अधून मधून भूलोकाची सफर करणाऱ्या अप्सरेसारख्या होत. काही काल एखाद्या सिद्धाची सेवा करावी आणि त्याने देह ठेवला की, बाकीच्यांची क्षिति न बाळगता तडक गंधर्वलोकी निघून जावे ही त्यांची रीत. उलट शास्त्रीय सिद्धि या वसिष्ठ मुनींच्या आश्रमातील नंदिनी कामधेनूसारख्या अखंड कामनापूरक होत.

या शास्त्रीय सिद्धि मानवी संसारात राहावयास आल्यापासून सुखसोयींची

इतकी लयलूट झालेली आहे की, आजच्या सामान्य सुखवस्तु गृहस्थाला आपला संसार सजविण्यास चैनीच्या आणि हौसेच्या जितक्या गोष्टी साध्य झालेल्या आहेत तितक्या अवघ्या पन्नास वर्षांपूर्वी पृथ्वीवरील अत्यंत संपन्न व शक्तिमान् अशा सम्राटालाहि असाध्य होत्या. नुसत्या ग्रामोफोनची गोष्ट घ्या. चाहील त्या गवयाचे गाणे करविणे हे पैशाची रास समोर ओतण्याची ऐपत असणाऱ्या कुबेराला पूर्वीहि अशक्य नव्हते. पण मन मानेल तेव्हा व मन मानेल तितके आणि विद्यमान व दिवंगत अशांचेहि गाणे चालू ठेवणे हे सुल्तानी सत्ताधीशालाहि शक्य नव्हते. पण आता फोनोची तबकडी तुमच्याजवळ असली की, हवे तेव्हा व हव्या तितक्या वेळेला तुम्ही आपल्या आवडत्या खांसाहेबाला पाचारण करा. कलावंताचा सुप्रसिद्ध लहरीपणा विसरून तो ताबडतोब तुमच्यापुढे तंबोरा घेऊन हजर झालाच म्हणून समजा! गवयाची लहर संभाळण्याची आता बिलकूल तकलीफ नाही. सांगाल ती गायकी गाईल, एकच चीज हव्या तितक्या वेळा म्हणेल, आणि वेडीविद्री तोंडे दाखवून रसभंग न करता सुरेल आवाजी तेवढी ऐकवील, हे वर! आणि हे सर्व फोनोपूर्व जगाचा विश्वासहि बसणार नाही एवढ्या अल्प मोबदल्यात!

फोनोच्या ऐवजी रेडिओची तुम्ही स्थापना केलीत म्हणजे मग तर काय, सगळे विश्व तुमच्या कानात सामावेल म्हणा ना! यंत्राची गुंडी हातांनी हलके हलके फिरवीत घटकेत मुंबईतील संगीत ऐकावे, व जरा कंटाळा आला की, गुंडी फिरवून क्षणभर विलायतेतील क्रिकेटचा स्कोअर ऐकावा, आणि तो ऐकून झाला न झाला तोच गुंडी फिरवून अमेरिकेतील प्रेसिडेन्टाचे भाषण ऐकावे. टेलिव्हिजनच्या शोधाने तर एक यःकश्चित् हाताचे बोट समोर धरले असता पलीकडचे न दिसणाऱ्या तुमच्या दुर्बळ दृष्टीला सगळ्या भूगोलावरील हवा तो देखावा दिसण्याचे सामर्थ्य प्राप्त करून दिले आहे. श्रीकृष्ण सोळा हजार स्त्रियांच्या महाली एकाच वेळीं प्रगट होत असे, असे आपण वाचले आहे; पण आता त्याचे तुम्हाला फारसे आश्चर्य वाटावयास नको. हजार ठिकाणी एकसमयावच्छेदेकरून तुम्हास प्रत्यक्ष सदेह जरी हजर राहता आले नाही तरी टेलिव्हिजनच्या यंत्रासमोर तुम्ही उभे राहिलात तर तुमच्या देशोदेशींच्या हजारो मित्रांना तुम्ही एकाच वेळी दिसू मात्र खास शकता!

निमिषार्धात हजारो ठिकाणी जाता येत नसले तर न येवो; पण एकंदरीत संचारसामर्थ्य केवढे प्रचंड वाढले आहे पाहा. दीडशे वर्षांपूर्वी गंगेची कावड

रामेश्वरास पोहोचविण्याची व्यवस्था करणाऱ्या अहल्याबाईस किती टप्पे ठेवावे लागले असतील, किती माणसे नेमावी लागली असतील आणि इतके करून किती दिवसांनी ती रामेश्वरास जाऊन पोहोचत असेल! पण आजच्या तिच्या नातीपणतीच्या मनात गंगेची कावड रामेश्वरास वाहावयाचे आले तर तिने पहाटे उठून मुखमार्जन करून महेश्वरच्या सौधशिखरावरून विमानोड्डाण करावे, सूर्यबिंब दिसू लागले नाही तोच वाराणशीत गंगातीरावर उतरावे, तेथे स्नानविधि उरकून गिंडी भरून घ्यावी आणि पुन्हा उड्डाण करावे तो मध्यान्ही रामेश्वरी उतरून गंगोदकाचा अभिषेक करावा. नंतर भोजन करून सेतु घेऊन पुन्हा विमानारूढ जे व्हावे ते पोटातील पाणीहि हलणार नाही अशा विमानस्थ सुखशय्येवर वामकुक्षी घेत, सावल्या फिरू लागल्यावर थेट काशी क्षेत्री हजर व्हावे, सेतु टाकून अवघ्या दिवसात काशीयात्रा संपूर्ण करावी व चंद्रबिंब दिसू लागेतो पुन्हा मुक्कामाला महेश्वरी उपस्थित व्हावे! विमानाचा वेग आजच ताशी चारशे मैलांच्यावर गेलेला आहे आणि तो सध्याच्या दुप्पट-तिप्पट वाढला तर सूर्याच्या वेगाने अवघ्या एका दिवसांत वैमानिक सबंध पृथ्वीप्रदक्षिणा करून येऊ शकेल. सूर्याच्या बरोबर तो एवढ्या वेगाने पूर्वेकडून पश्चिमेकडे भ्रमण करू लागला तर जयद्रथवधाच्या वेळी श्रीकृष्णाने सूर्यबिंबाला रोखून धरले तसा तो सूर्यबिंबाला आपल्या माथ्यावर कायमच तळपत ठेवू शकेल! सूर्यग्रहणाच्या पर्वकाळी सूर्य ग्रस्तस्थितीत अस्तमान झाल्यास पुन्हा दर्शन घडेपर्यंत तोंडात पाणी घालता येत नाही; पण विमानात बसून तो वरील वेगाने धावू लागला म्हणजे ग्रहण सुटेपर्यंत सूर्यबिंबाला क्षितिजाखाली मुळी जाऊच देणार नाही. ही गोष्ट पुढची, पण सूर्यदर्शन न घडल्यामुळे वर्षाकाळी जे उपोषण पडते ते आजहि त्याला विमानसिद्धीने टाळता येईल, कारण सूर्यबिंबाला झाकून टाकणाऱ्या मेघाच्या पडद्यापलीकडे उंच उडून सूर्याचे दर्शन घेणे, विमानाने आता अगदीच सुलभ झाले आहे. असो.

### शास्त्रांनी शल्ये दूर केली!

विमाने, पाणबुड्या, रेडिओ, टेलिव्हिजन, बोलपट वगैरे शास्त्रीय सिद्धि या विशेष क्रांतिकारक, व आंधळ्याच्याहि डोळ्यात भरतील अशा सिद्धि होत. पण यांशिवाय इतक्या शतसहस्र लहानसहान बाबतीत शास्त्राने आपल्या लाडक्या सुखलोलुप कल्पनेचे चोचले पुरविले आहेत की, तितके स्त्रीलंपट सम्राटाने

आपल्या प्रेमपात्राचे काय पुरवावे! रात्रीची भयाणता दूर करणारा दिवा, वारा लागणार नाही पण पलीकडचे दिसेल अशी पारदर्शक काच, दगडापेक्षा कठीण पण तुकडा न पडता वाकेल असे लोखंड, अमृतासारखे गोड असे गायीचे दूध आणि झाडांची फळे, थंडीवाऱ्यापासून निवारण करील असा ऊबदार कपडा वगैरे सुखसाधने फार प्राचीन काळीच मानवाने हस्तगत केली. पण या प्रत्येकात काही उणिवा आहेत याचे शल्य त्याला बोचत होते. रमणीला वार्धक्य यावे, चंद्राला डाग लागावा, वगैरे सप्तशल्यांचे सुभाषितकाराने वर्णन केले आहे, त्याप्रमाणे आजूबाजूच्या सर्व पदार्थांना उजळणाऱ्या दिव्याला स्वतःच्या खालचा अंधार नष्ट करता येऊ नये; पारदर्शक काच पैदा केली, पण ती केव्हा फुटेल या धास्तीने तिची तब्येत सांभाळत राहावी लागावी; फत्तरालाहि फोडणारा लोखंडी धातु वश झाला पण शिखंडीपुढे भीष्माचार्यांनी हात टेकावे तसे साध्या चिखलमातीच्या स्पर्शाने तो खंगू व गंजू लागावा; अग्नीने डोळ्यांना तेज आणावे पण त्याच्या धूमाने दृष्टि धुंद करावी; कपड्याने थंडीपासून निवारण व्हावे, पण पावसात तोच अंगावर भिजला म्हणजे हिवताप आणण्यास कारणीभूत व्हावा; अमृतोपम दुग्ध आणि फळे सापडावी पण थोडक्याच काळात विटून आणि नासून जाऊ लागावी; विहिरीला पाणी लागावे पण ते इतक्या खोलीवर की चुळकाभर पाणी वर येईपर्यंत ओंजळभर पाणी डोळ्यातून गळावे;—अशा प्रकारची अनेक शल्ये त्याच्या मनात शतकानुशतके बोचत होती.

ही सर्व शल्ये आता शास्त्रज्ञांनी उपटून टाकली आहेत. दिव्याला ओशाळगत करणारा त्याच्या खालचा अंधार तर त्याने नष्ट केलाच आहे, पण हात न भाजता, तेल न सांडता, पेट न घेता, वाऱ्याने न विझता हवा तेथे उशाशी, पायथ्याशी, हातात, खिशात व हवातसा उभा आडवा खेळविता येईल असा त्याचा विद्युत् देह बनविला आहे. या दीपाने 'दिव्याखाली अंधार' ही म्हण जशी मारून टाकली, तशी पाहायला पारदर्शक पण वापरायला दगडी फरशीवर पडली असताहि न फुटणारी अशी काच निर्माण करून 'अब्रू म्हणजे काचेचे भांडे' हे रूढ रूपकहि शास्त्राने रद्दीत काढले आहे. आणि काचेला अभंगत्व आणावयाचे कसे? तर बायका सांजाची पोळी लाटतात तसे. दोन पोळ्यांमध्ये सांजाचा पातळ थर भरतात तसे दोन तावदानांमध्ये सेल्युलॉइडसारख्या एखाद्या पारदर्शक पदार्थाचा पातळ थर बसविला की झाली भंगुर काचेची अभंग काच.

जणो द्वैत म्हणजे नश्वरता व अद्वैत म्हणजे शाश्वतता या वेदांती सूत्राचे ही अभंग काच म्हणजे व्यावहारिक प्रतीकच! भिजलेले घोंगडे भिजत पडावयाचे याहि वाक्प्रचाराला भिजत न टाकता त्याने निकालात काढले आहे. घोंगड्यावर तो आता अशी रासायनिक क्रिया करू शकतो की मुसळधार पाऊस अंगावर घेऊनहि, अखंड पाण्यात राहून निर्लेप राहणाऱ्या पद्मपत्राप्रमाणे ते खुशाल खडखडीत राहू शकते. अंगी असल्या नीरनिरोधक घोंगडीचा डगला, पायी गुडघ्यावर डोकावणारे गरम बूट, शिरी डोक्यावर नाचू पाहणाऱ्या जलधारांना हट् म्हणून झिडकारणारी हॅट व तोंडी पेटलेला लठ्ठ सिगार, अशा थाटाने नटल्यावर ऐन मुसळधार पाऊस पडत असता मुद्दाम बाहेर पडून, खिशात हात घालून, गडगडून सरींवर सरीचे चाबूक उडविणाऱ्या काळ्याकुट्ट ढगांकडे तुच्छतेने पाहत, चिखलातूनहि 'नमयतीव गतिर्धरित्रीम्' अशा थाटाने दणकून पावले टाकीत जाण्याचा कैफ कोणास चढणार नाही?

पायी चालण्याची ही ऐट! मग मोटार, आगगाडी किंवा विमान यांच्यावर स्वार होऊन वाटेतील नद्यानाले, दऱ्याखोरी, जंगले-अरण्ये यांच्याकडे उर्मटपणे पाहात तुफान वेगाने धावत जाणाऱ्या प्रवाशाचे ऐश्वर्य काय वर्णावे? रात्रीच्या प्रहरी फर्स्ट क्लासच्या डब्यातील लठ्ठ गुबगुबीत गादीवर पडावे, दिवा बंद करावा, पंखा सुरू करावा, आणि खुशाल घोरत झोपी जावे. वाटेत डोळे फिरविणारे कडे-कपारी येवोत, धो धो वाहून गिळू पाहणारी नदी येवो, वा हिंस्र पशूंनी व्याप्त अशी निबिड जंगले येवोत, स्वतः खाचखळग्यातून पायी रखडणारी माता जशी आपल्या तान्हुल्याला पोटाशी धरून त्याच्या ओठातील दूधहि हालणार नाही अशी अलग वागविते, तशी आगगाडी-माउलीहि स्वतः डोंगराच्या कड्यावरून तोल सांभाळते, नदीवरून परतीरावर उडी मारते, पण आपल्या मांडीवर विश्रब्धपणे पहुडलेल्या प्रवाशाला नुसते चाळवून या कुशीवरून त्या कुशीवर वळण्याइतकीहि तकलीफ पडू देत नाही. आजकालच्या आगबोटी म्हणजे तर तरते राजवाडेच. त्यात रेडिओ काय, सिनेमा काय, नाचरंग काय, मेजवान्या काय, टेनिस काय, पोहण्याचे तलाव काय, आणि नाही काय? भर्तृहरीचे जुने वचन आहे की, 'किं सुखं अप्रवासगमनम्' म्हणजे सुख काय तर प्रवास करण्याचे नशिबी न येणे हे होय. राजा भर्तृहरि जर आजच्या एखाद्या बोटीवर गुप्तपणे प्रगट होऊन तेथील सुखसोयी निरीक्षण करील तर त्याला आपले सुभाषित नेमके उलटे लिहावे असे वाटल्यावाचून राहणार नाही. राजा

भर्तृहरीच्या काळीं प्रवास म्हणजे गैरसोय असे समीकरण असल्याने प्रवास हे प्रोषितभर्तृकेप्रमाणे इतरांनाहि मनःशल्यच होते. पण आता प्रवासाला मनःशल्य कोण करंटा म्हणेल ?

### शास्त्राने मानवाचे कष्ट कमी केले

सुखसोयीच्या या लयलुटीबरोबर मानवाचे कष्ट कमी करण्यातील शास्त्राची कामगिरीहि कमी आश्चर्यकारक नाही. कष्टाचा मूर्तिमंत पुतळा म्हणजे शेतकरी ! काळींत नांगर घातल्यापासून तो दाणा खळ्यातून उचलून घरच्या कणगीत येऊन पडेपर्यंत शेतकऱ्याला हाडांची नुसती काडे करावी लागतात. प्रत्येक बाब जिकिरीची आणि चिंतेची. आधी मेघराजा वेळेवर निघाला पाहिजे. मृगाच्या ठोक्याला पावसाची झिमझिम सुरू झाली तर ठीक, नाही तर आभाळात कोरडे पांढरे ढग नुसते भिरभिरू लागले म्हणजे आकाशातून पाणी पडेल म्हणून वाट पाहता पाहता याच्या काळजाचे पाणी होऊन जावे. बरे, पाऊस पडला आणि पीक आले तरी त्यावर कीड पडून उपयोगी नाही. रोग पडून उपयोगी नाही. त्यातून पीक वाचले तरी पाखरांच्या तोंडून बचावले पाहिजे. इतक्या सर्वातून वाचून बचावून धान्य घरच्या ओसरीवर येऊन पडले म्हणजे मग बळिराजाच्या तोंडावर हास्य फुटू लागायचे आणि तोंडात लावणीचे सूर खेळू लागायचे.

या कष्टमय जीवनातील सर्वच काटे शास्त्राला काढून टाकता आले आहेत असे नाही. शास्त्रज्ञ झाला तरी हुकमी पाऊस थोडाच पाडू शकतो ! इंद्राच्या हातचे विजेचे खड्ग त्याने हस्तगत केले आहे. पण खुद्द पर्जन्यराज इंद्राला तो अद्याप हुकूम करू शकत नाही. दीपराग आळवून पूर्वी दिवे लागत असत म्हणतात त्याप्रमाणे विद्युत्-साहाय्याने निमिषार्धात तो आज दिवे लावू शकतो. पण पर्जन्यसूक्त तोंडपाठ म्हणून पर्जन्य पाडण्याच्या काव्यमय युक्तीच्या तोडीची शास्त्रीय युक्ति त्याला अद्याप वश झालेली नाही. पण पर्जन्य हा लहरी असला आणि तुमच्याच शेतवाडीवर तो रुसला तरी इतर कोठे तरी डोंगरमाथ्यावर व नदीकाठी तो लयलूट करीत असतोच ना ? मग झाले तर ! तेथे त्याने स्वैर हस्ताने उधळलेली संपत्ति प्रचंड बंधारे बांधून आणि प्रदीर्घ कालवे खणून शास्त्रज्ञ तुमच्या पानमळ्यात आणून सोडील. कोठे भाटघर व कोठे बारामती-बेलापूर ? पण बारामतीवर पर्जन्यराज रुष्ट झाला तर भाटघरच्या डोंगरावर जाऊन

शास्त्रज्ञ त्याची समजूत काढील आणि तेथील पाणी आणून फलटण-बारामतीचा ऊस पिकवील. लांबून कालवा बांधून आणण्याचेच कशाला? हवे तेवढे खोल खणत जाण्याची उमेद असली म्हणजे म्हणाल तेथे पाणी लागेल. शरपंजरी पडलेल्या भीष्माच्या तोंडी पाताळची गंगा तीर मारून अर्जुनाने घातली असे आपण वाचतोच ना? आणि त्याचे इतकेसे आश्चर्य वाटावयास नको! कारण आजचा शास्त्रज्ञ हा खोदक यंत्र आणि पंप यांच्या साहाय्याने सप्त पाताळांपैकी सांगाल त्या पाताळातील गंगा तुमचा मळा शिंपण्यास उभी करील. सहारासारख्या वैराण वाळवंटात सस्यशामला वनराजी निर्माण करण्याची स्वप्ने आजच त्याला पडू लागली आहेत. तात्पर्य, साक्षात् पर्जन्यराज इंद्राकडून खंडणी वसूल करण्याचे त्याला साधले नसले, तरी त्याच भोळ्या इंद्राने इतस्ततः स्वैर उधळलेली सलिल-संपत्ति युक्तिप्रयुक्तीने हस्तगत करणे शास्त्रज्ञाला आजहि साधले आहे.

**शास्त्रांची आणखी एक कामगिरी**

मानवी जीवन सुखी करण्यात शास्त्राने जी अमोलिक कामगिरी बजाविली आहे, तिचे हे पुराण असेच सांगत बसलो तर वेळ पुरणार नाही. म्हणून शेवटी आणखी एका बाबीचा उल्लेख करून पोथी गुंडाळतो. ती बाब म्हणजे रोगहरण. जीवन नीरस करून टाकणाऱ्या ज्या आपत्ति मानवाच्या पाठीमागे लागलेल्या आहेत त्यात शारीरिक व्याधींचा क्रमांक फार वरचा आहे. व्याधि-ग्रस्त शरीर म्हणजे तिळतिळ तुटून येणारा मृत्यु. रौरव नरकात काय हाल होत असतील ते यम जाणे; पण मृत्युलोकचा रौरव पाहावयाचा असल्यास व्याधिग्रस्तांनी गजबजलेले रुग्णालय पाहावे. आता सर्वच रोगांना शास्त्रज्ञांना अद्याप जिंकता आलेले नाही. महतो महीयान् असा पर्वत फोडा म्हणाल तरीहि तो करून दाखवील, पण क्षयरोगासारख्या काही रोगांचे जंतु असे चिवट आढळले आहेत, की त्यांचा नाश कसा करावयाचा हा शास्त्रज्ञांच्या पुढे बिकट प्रश्न आहे. तो सुटला नाही तरी इतर अनेक रोगांवर त्यांनी विजय मिळविला आहे. विशेषतः शस्त्रक्रिया करण्याकरिता जी भूल द्यावी लागते तिचे अनेक प्रकार शोधून काढण्यात जे त्यांना यश मिळाले आहे ते केवळ अद्‌भुत आहे. आजच्या शस्त्रक्रियेने साध्य होणारे बरेच रोग पूर्वीच्या आयुर्वेदिक क्रियेने औषधोपचाराने बरे केले जात असत. पण जेथे शस्त्रक्रिया

करणे अपरिहार्यच ठरे तेथे तो अनुभव म्हणजे पूर्वी यमयातनाच असत. पण आता तुमच्या दाढेत ठणका मारतो आहे ना? मग जा दंतवैद्याकडे आणि लाफिंग गॅस घेऊन हसत हसत खुशाल दात समूळ उपटून टाका. गळू झाले आहे आणि कापणे अवश्य आहे? मग फिकीर मुळीच नको. डॉक्टर तुमच्या गळवावर एथिल स्प्रे सोडील तेव्हा तुम्हाला इतके गारगार वाटेल, की डॉक्टर तुमचे गळू सुरीने कापत नसून जणो चंद्रिकेच्या शलाकेनेच कापीत आहे. तुम्हाला मधुमेह झाला आहे आणि पाय तोडून घेण्याचा प्रसंग ओढवला आहे? शस्त्रवैद्याकडे जा. तो तुमच्या मणक्यात एक औषध टोचील, मग तुम्ही स्वतःचा पाय तोडीत असता ते दृश्य खुशाल निर्विकार मनाने पाहू शकाल. काय म्हणता? रक्तस्राव पाहवणार नाही? त्याचीहि काळजी करू नका. निःस्राव शस्त्रक्रियाहि साध्य होण्याच्या मार्गात आहे.

प्रसूतिप्रसंग हा स्त्रियांच्या आयुष्यातील एक मोठा जिवावरचा प्रसंग असतो. नवीन अर्भकाच्या स्वागताविषयी एकीकडे वात्सल्यपूर्ण उत्सुकता तर त्याच वेळी दुसरीकडे प्रसूतिवेदनांच्या यातना. यातून तोड पूर्वी निघाली नव्हती. शस्त्रक्रियेच्या प्रसंगी दिल्या जाणाऱ्या भुलीचा शोध लागून पुष्कळ वर्षे झाली, तरी प्रसूतीच्या वेदना शमन करणारी भूल गवसली नव्हती; पण आता ह्या बाबतीत इतके बिनधोक व सर्वांना वापरता येईल इतके स्वस्त औषध शास्त्रज्ञांनी शोधून काढले आहे की, वंध्येला आता 'न हि वंध्या विजानाति गुर्वी प्रसववेदनाम्' असा टोमणा ऐकून घेण्याचा प्रसंग येणार नाही. आणि खुद्द वंध्यत्वहि नष्ट करण्याकरिता शरीरातील अन्तःस्रावी ग्रंथींवर प्रयोग करून पाहण्याचा शास्त्रज्ञांचा सपाटा सुरू आहेच. या ग्रंथींची किमया कळू लागल्यापासून तर शास्त्रज्ञांना जणो जीवितरहस्य गवसले अशी स्वप्ने पडू लागली आहेत. तो म्हणतो, माणूस म्हणजे माझ्या हाती असलेला ओल्या मातीचा गोळा आहे असे समजा. या गोळ्याला कोणता आकार देऊ ते बोला. उंचाला खुजा करू, की खुजाला उंच करू? लठ्ठाला फाटका करू, की फाटक्याला लठ्ठ करू? रडतराउताला रंगेल बनवू, की वाल्याला वाल्मीकि करू? शेवटचे वाक्य उच्चारीत असताना तो तुमच्याकडे मिस्किलपणे हसत पाहील. कारण वाल्याचा वाल्मीकि करण्याची किमया अद्याप तरी शास्त्रज्ञांच्या स्वप्नसृष्टीतच आहे. पण शास्त्रज्ञांचे पुराण ऐकत बसलात तर शास्त्र काय करू शकेल याचे मोठे रसभरित वर्णन तो तुम्हाला ऐकवील.

### शास्त्रांच्या दुरुपयोगाला शास्त्रे जबाबदार नाहीत

पण ते ऐकत असता तुमच्यापैकी एखादा हळूच म्हणेल, "पुढे काय काय साध्य होईल ते होवो, आजच शास्त्राने मानवाला मिळवून दिलेले ऐश्वर्यहि डोळे दिपवून टाकण्यासारखे आहे हे मी प्रांजलपणे कबूल करतो. पण आता एकच विचारू का? एवढ्या ऐश्वर्याने नटून तरी मानव अधिक सुखी झाला आहे काय? सुखसोयींचे शोध जसे आपण लावलेत तसेच, महाराज! विषारी धुरासारख्या व ॲटम् बॉम्बसारख्या संहारी अस्त्रांचे शोधहि आपल्याच मेंदूतून निघाले ना?" शास्त्रज्ञ उत्तर करील, "होय! तो टोमणा तुम्ही मला मारणार हे मला माहीत होते. पण एवढे ऐश्वर्य प्राप्त करून दिले असताहि तुम्हाला सुख खुपत असेल तर तुमच्या करंटेपणाला दोष लावा! कुबेराला हेवा वाटावा अशी संपत्ति मी तुम्हाला प्राप्त करून दिली, पण तिची सर्व समाजात खैरात करण्याऐवजी तिला सत्ताधीशाच्या संदुकेत तुम्ही कोंडून गाडून टाकलीत तर मी काय करणार? तीच गोष्ट संहारी अस्त्रांची. सत्ताधीशात सैतानी वृत्ति संचारत आहे म्हणूनच तुम्ही असली आसुरी सेवा माझ्याकडून करून घेता. माझ्या बुद्धीचा सदुपयोग तुम्हास करून घेता येत नाही तर त्याला मी काय करू? मुलीचे लग्न करून देताना गजान्त लक्ष्मीचे स्थळ पाहून देणे हे बापाचे काम. पण सासरी मुलगी नांदू शकली नाही तर तो बिचारा काय करणार? पण मी आपणाकडून तुमचा संसार सुखाचा करण्यासाठी मनःपूर्वक झटलो आहे येवढे समाधान मला पुरे आहे."

✕ ✕ ✕

## ५. मूलोद्योगी शिक्षणयोजना

**विठ्ठल दत्तात्रेय घाटे**

मूलोद्योगी शिक्षणयोजना हे गांधीजींच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचे एक महत्त्वाचे अंग. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर त्याने विकासाचा जो मार्ग स्वीकारलेला आहे त्याच्याशी या गांधीप्रणीत शिक्षणयोजनेची अंमलबजावणी कितपत सुसंवादी राहील, हा आपल्या देशातील समग्र शिक्षणयोजनेशी निगडित असा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. प्रस्तुत लेखात श्री. वि. द. घाटे (जन्म इ. स. १८९५) यांनी या प्रश्नासंबंधी, आपली स्वतंत्र समीक्षणशक्ति जागृत ठेवून, निर्भीड विवेचन केले आहे. अनेक वर्षे शिक्षणाधिकारी राहून त्यांनी हा प्रश्न अगदी जवळून न्याहाळलेला असल्यामुळे असे विदारक विवेचन करण्याचा त्यांना अधिकार प्राप्त झालेला आहे. घाटे मुख्यतः शिक्षणाधिकारी म्हणून सुविदित असले तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वातला साहित्यनिर्मितीचा पैलूहि मोठा डौलदार राहिलेला आहे. ते रविकिरणमंडळाचे सदस्य. डॉ. माधवराव पटवर्धन (माधव ज्यूलियन) यांचे मित्र. कवि या नात्याने मराठी शारदेची त्यांनी केलेली सेवा माधवरावांच्या कवितांबरोबर 'मधुमाधवां'त समाविष्ट आहे. 'काही म्हातारे व एक म्हातारी' (१९३९) ने एक कसबी व्यक्तिचित्रकार म्हणून घाटे नावारूपास आले. त्यांच्या अंगच्या या व्यक्तिचित्ररेखाटनकौशल्याला अगदी अलीकडे आलेले पक्वमधुर फळ 'पांढरे केस, हिरवी मने' च्या रूपाने प्रकट झालेले आहे. आयुष्याच्या संध्याकाळी 'दिवस असे होते' हे सांगून घाट्यांनी आपल्या गतायुष्याचा चित्रपट उलगडून दाखविला आहे व चित्रपट दाखविता दाखविता त्यावर मधून मधून रोचक व खोचक असे भाष्यहि केले आहे. प्रस्तुत लेख हा त्यांच्या या आत्मचरित्रातूनच घेतलेला एक उतारा आहे. घाट्यांच्या स्वतंत्र बाण्याच्या मराठमोळ्या प्रकृतीचा परिचय करून घेण्याच्या दृष्टीने व गांधीजींच्या शिक्षणयोजनेचे निःपक्षपाती मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने प्रस्तुत लेख निःसंशय उद्बोधक वाटण्यासारखा आहे.

### गांधीजींची मानसकन्या

मूलोद्योगी शिक्षणयोजना ही मोठ्या घरची लेक आहे. भोवतालच्या

गोतावळा वाखाणतो तशी ती हजार दहा हजारातली नाही. टीकाकार हिणवितात तशी ती पाचदहा जणीतलीहि नाही. नाकीडोळी उठून दिसेल आणि दिसल्याबरोबर भोवताली तत्काळ लावण्याचा प्रभाव पाडील इतके सामर्थ्य तिच्यात नाही. अलीकडे माफक देखण्या बाया नीटनेटके नेसल्या म्हणजे आहेत त्यापेक्षा पुष्कळच बऱ्या दिसतात, तशी ती दिसते. कुरूप असती तर ती तशी दिसली नसती. साजशृंगार केला तरी कुब्जा राधा दिसणार नाही हे काय सुज्ञास सांगावयास पाहिजे ?

ही गांधीजींची लेक. तशी तिची मूळपीठिका लांबवर मागेमागे पोहोचते— पेस्टॉलॉक्सी, रूसो, मॉंटेसरी, स्टॅनले हॉल आणि जॉन डयूई. पुस्तकात डोके खुपसून बसलेल्या मुलांना ज्या ज्या महाभागांनी अठराव्या एकोणिसाव्या शतकात जीवनाभिमुख केले ते सारे हिचे पूर्वज आहेत. गांधीजींच्या या मानसकन्येला या स्वातंत्र्यवादी महाभागांचा वारसा फारसा लाभला नाही, हे सत्य आहे. तथापि स्वतःचे डोळे बांधून हिच्याकडे निरखून पाहणारे धूर्त कधीकधी गांधीजींना कुशलतेने बाजूला सारून या बाळेचे नाते त्या महाभागांशी जोडतात आणि तिच्यात नसणाऱ्या किंवा सूक्ष्म रूपाने वसणाऱ्या रूसोच्या किंवा डयूईच्या वारशाबद्दल तिचे कोडकौतुक करतात. ती मात्र लबाडी असते, किंवा ते निर्भेळ अज्ञान असते.

गांधीजींना या पूर्वजांची जाणीव होती की नाही हे मला माहीत नाही. आनुवंशिकता रक्तातून प्रवाहित होण्यासाठी जाणिवा लागत नसतात. रक्तच ते काम बजावते. मला वाटते, बहुधा गांधीजींना जाणीव नसावी. ते इतके प्रामाणिक आणि चोखंदळ होते की जॉन डयूईच्या वारशाची त्यांना जाणीव असती तर त्यांनी त्याचा अवश्य उल्लेख केला असता, आणि दखल घेतली असती. जाणीव असती तर कदाचित् त्यांची योजना वेगळी आणि मोकळी झाली असती. किती वेगळी झाली असती हे सांगता येणार नाही, कारण डयूईच्या 'प्रॉजेक्ट मेथड'ची झेप आणि व्याप प्रचंड होता. त्या मानाने गांधीजींची बैठक क्षीण आणि संकुचित होती. १९३७ साली ऑक्टोबरमध्ये वर्ध्यास भरलेल्या राष्ट्रीय शिक्षणप्रणेत्यांच्या बंदिस्त सभेत गांधीजी अध्यक्षपदावरून आपली योजना निमंत्रितांना समजावून सांगत होते; तेव्हा झाकिर हुसेनांनी त्यांना दोनदा अडविले आणि आपल्या अभिजात खानदानी पद्धतीने नम्रपणे सांगितले,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ५०६२५ घाटे वि:
क्रमांक २०२५ नोंद दि: १७।५।७


"माफ करा, महात्माजी, आपली पद्धत नवी नाही, जुनीच आहे." महात्माजींनी उत्तर दिले नाही; त्यांना ड्यूई अज्ञात असावेत.

मूळ कल्पना गांधीजींची—ढोबळ आणि स्थूल. त्यांनी नुसता आराखडा आखून दिला. मुख्य गोष्ट सांगून टाकली : ग्रामीण व्यवसायातून द्यावयाचे सात वर्षांचे स्वावलंबी शिक्षण. झाकिर हुसेन आणि सैयदैन या शिक्षणतज्ज्ञांनी मूळ योजनेस शैक्षणिक आकार दिला. गांधीजींच्या कल्पनेला आणि विचारांना मुरड घालून त्या योजनेला चार जणींसारखे टाकठीक रूप दिले. विनोबा आणि कदाचित मश्रुवाला या गांधीय जीवनवाद्यांनी आणि कताई-तज्ज्ञांनी या टाकठीक दिसणाऱ्या कन्यकेवर जाडीभरडी खादीची वस्त्रे चढविली. त्या यतींपाशी तलम वस्त्रे नव्हती, भूषणेहि नव्हती. यतींना ती वर्ज्य असतात. एवंच, या गंगाजमनी सहकार्यामधून ही लंकेची पार्वती निर्माण झाली.

ही गांधीजींची मानसकन्या. परंतु १९३७पासून आजतागायत तिच्यावर अनेक प्रदेशात अनेक वेळा प्लॅस्टिक सर्जरी झाली. इतकी झाली की गांधीजींना ही आपलीच मुलगी आहे हे आज ओळखता आले नसते. कदाचित् गांधीजींनी तिला पत्करले नसते. सांगता येत नाही. पत्करलेहि असते. तसे त्यांनी अनेक आपद्धर्म आपत्काळी पत्करलेच.

हे रूपक आता येथेच पुरे करतो. कधीकधी रूपकामधून मूळ रूप स्पष्ट दिसत नाही. गैरसोय होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे (स्थल प्रत) ९२३१०

### गांधींच्या समाजदृष्टीचे एक अंग

गांधीजींची योजना सरळ आणि सीधी होती. त्यांनी भारतातल्या समाजरचनेचे जे मानचित्र डोळ्यासमोर ठेवले होते त्याचे ही शिक्षणयोजना हे एक अविभाज्य अंग होते. ह्या अंगाला देहापासून अलग करून त्याचा स्वतंत्र आणि पृथक् असा विचार करणे योग्य होणार नाही. गांधीजींवर तो अन्याय केल्यासारखे होईल. त्यांनी आखलेल्या समाजव्यवस्थेच्या सर्वांगीण योजनेच्या संदर्भातच मूलोद्योगी शिक्षणाचा विचार केला पाहिजे. तुम्हाला गांधीप्रणीत समाजरचना मान्य असेल तर तुम्हाला मूलोद्योगी शिक्षणयोजना मान्य करावी लागेल. ती मध्ययुगीन समाजरचना मान्य नसेल तर तिचे अंग असलेल्या या शिक्षणयोजनेला स्थान आणि अभिप्राय राहात नाही.

(एक महत्त्वाची सूचना आताच देऊन टाकतो. गांधीजींची समाजरचना

घटकाभर मान्य केली तरीसुद्धा वर्धा योजना ही तिला पोषक अशी एकमेव शैक्षणिक पद्धत आहे हा दावा मला मान्य नाही. तसे मान्य केले तर मानवी प्रज्ञेची आणि प्रयोगशीलतेची १९३७ सालच्या त्या ऑक्टोबर महिन्यात वर्ध्यास गतीच खुंटली आणि संपली असे मानावे लागेल. मी ही बौद्धिक शरणागति व अगतिकता पत्करायला तयार नाही.)

आपापले अन्न आणि वस्त्र उत्पन्न करणारी, आपल्या मूलभूत गरजा भागविणारी स्वयंपूर्ण आणि अल्पसंतुष्ट अशी खेडी गांधीजींना हवी होती. ते निसर्गवादी होते. निसर्गाच्या कुशीत जगण्याची त्यांची वृत्ति होती. शहरांपेक्षा खेडी निसर्गाच्या पुष्कळच जवळ आणि म्हणूनच समाजरचना आखताना व वर्धा योजना तयार करताना गांधीजींना फक्त खेडी दिसत होती. प्रचंड यंत्रे धुडगूस घालीत असलेले कारखाने त्यांना नको होते. लोकांनी घरोघर साध्यासुध्या अवजारांच्या मदतीने जीवनास अवश्य असे मूलभूत व्यवसाय करावेत, जास्ती हाव धरू नये, जास्ती महत्त्वाकांक्षा बाळगू नये, अशी त्यांची अपेक्षा होती. माणसाच्या भौतिक गरजा जितक्या वाढवाव्या तितक्या वाढतात, त्यांना अंत नाही. माणसाच्या या ऐहिकतेची जितकी जोपासना कराल तितकी तिची भूक वाढतच जाणार. गांधीजींना ही अमर्याद ऐहिकता आणि बेबंद सुखवाद नको होता. या सुखवादाला शिस्तीत आणण्यासाठी राष्ट्राच्या नेत्यांनी जनतेच्या मूलभूत अशा ज्या थोडयाच गरजा आहेत त्या भागविण्यासाठी योजनाबद्ध प्रयत्न करावे असे त्यांचे सांगणे असे. थोडया निवडक लोकांनाच घी-शक्कर खाऊ घालू नका. त्यांची घी-शक्कर थोडी कमी झाली तरी चालेल (गांधीजी श्रीमंतांची घी-शक्कर बंद करण्यास तयार नव्हते. इंग्रजांशी चाललेल्या लढ्यांत त्यांना या वर्गाची मदत हवी होती.), परंतु बहुजनसमाजाला पोटभर मीठभाकर मिळेल अशी तजवीज करा, असा गांधीजींचा आग्रह होता.

**आपण गांधीजींची वाट सोडली आहे**

आपण प्रामाणिकपणाने कबूल केले पाहिजे की आपण गांधीजींच्या मार्गाने चाललो नाही. आपले राष्ट्रीय नियोजन आधुनिक पद्धतीच्या औद्योगीकरणाकडे वाटचाल करीत आहे. ही वाट गांधीजींची नव्हती. नेहरूंच्या प्रेमासाठी हा आपद्धर्म त्यांनी मागेपुढे पत्करलाहि असता; परंतु स्वतः त्या वाटेने गेले नसते. गेले असते तर ते गांधी राहिले नसते. आपण ग्रामोद्योगांची,

घरगुती धंद्यांची आपल्या नियोजनांत तजवीज केली आहे. नाही असे नाही. पण तो आपला मुख्य मार्ग नाही. ते आपले मुख्य साधन नाही. आपल्या संकल्पित विशाल प्रासादाचे ते आउट हाउस आहे. आपण झपाट्याने देशाचे औद्योगीकरण करीत आहोत. प्रचंड कारखाने काढीत आहोत. थोडक्यात सांगायचे म्हणजे आपण गांधीजींच्या ग्रामव्यवसायप्रधान समाजरचनेचा स्वीकार केलेला नाही. तसे आपण स्पष्ट बोलत नाही एवढेच. गांधीजींच्या संदर्भात आपण स्पष्ट कधीच बोलत नव्हतो. आपली ती जुनी सवय आहे. आपली कृति मात्र निराळी आहे. आणि आपल्याला जे बोलायचे ते ती बोलते.

औद्योगीकरणाकडे झपाट्याने धाव घेणाऱ्या देशास अवश्य असे नवेनवे उपक्रम गेल्या दहाबारा वर्षांत शिक्षणक्षेत्रात आपण सुरू केले आहेत. माध्यमिक शिक्षणाच्या क्षेत्रात आपण 'मल्टिपर्पज' शाळा शहरोशहरी काढीत आहोत. टेक्निकल आणि टेक्नॉलॉजिकल शिक्षणसंस्थांचा पुरवठा देशभर करीत आहोत. मोक्याच्या ठिकाणी 'पॉलिटेक्निक्स' काढीत आहोत. काही केंद्रस्थानी निरनिराळ्या प्रकारच्या राष्ट्रीय प्रयोगशाळा उभारीत आहोत. यांत्रिक उद्योगधंदे शिकण्यासाठी सहस्रावधि तरुणांना परदेशात पाठवीत आहोत. शिक्षणाच्या वरच्या श्रेणीचे असे आधुनिकीकरण घडत असताना त्या बापड्या प्राथमिक शिक्षणाने मध्ययुगीन का राहावे ते मला समजत नाही. हे पायाचे शिक्षण 'मल्टिपर्पज' का होऊ नये? ते उद्योगप्रवण का नसावे? आणि ते उद्योग नाना प्रकारचे का असू नयेत?

वर्धा योजना ही मूलतः खेड्यातील शिक्षणाची योजना आहे. गांधीजींनी ते स्पष्ट केले होते. झाकिर हुसेन समितीने अहवालात आपल्या योजनेस 'बेसिक नॅशनल एज्युकेशन' असे उल्लेखिले होते. गांधीजींनी समितीच्या अहवालाला प्रस्ताव जोडताना ती चूक दुरुस्त केली, आणि लिहिले, "A more correct though much less attractive description would be Rural National Education through village handicrafts."

## गांधीयोजनेने येणारे द्वंद्व लोकशाहीला मारक आहे

प्रश्न असा आहे की आमची खेडी शहरांपासून इतकी अलग आणि अस्पृष्ट अशी राहिली आहेत का? आमच्या खेड्यापाड्यात यंत्रांचा प्रवेश,

मंदगतीने का असेना, पण होत आहे. आमचे ग्रामीण जीवन आणि व्यवसाय यांचा विकास करण्यास यंत्रांची मदत मिळत आहे. लिफ्ट इरिगेशनच्या बळावर आमच्या बागायतीची वाढ होत आहे. सुखवस्तु शेतकरी आपल्या विहिरीवर एंजिन बसवून थोड्या वेळांत अनेक एकरांना पाणी पाजीत आहे. तो मला सांगतो, "ती महागडी बैलजोडी मला परवडत नाही. हे एंजिनच बेश काम देते." आमचा शेतकरी आधुनिक होत चालला आहे. तो नवी नवी खते वापरतो. पिकांवरच्या जंतूंचा नाश करण्यासाठी अगत्याने नवी रसायने विकत घेतो. ग्रामीण विभागात सुखवस्तु शेतकरी सहकारी साखर कारखाने काढीत आहेत. कारखान्यांना ऊस पुरवीत आहेत, मोटारी वापरीत आहेत, खिशांत पैका खुळखुळ वाजवीत आहेत. यंत्रांची कामापुरती माहिती घेत आहेत. आमची आकाशवाणी गावच्या चावडीपर्यंत पोहोचली आहे. उद्या ती घरात शिरणार यात शंका नाही. गावकरी उत्सुकतेने ग्रामीण कार्यक्रम ऐकतात. शेतकरी क्लब्स् स्थापन करतात. आकाशवाणीला मुद्देसूद प्रश्न विचारतात. वाहतूक सारखी वाढत आहे. रस्ते–पोटरस्ते गावागावाचा ठाव घेत आहेत. 'यष्टी' गावोगाव जात आहे. आणि गावोगावच्या हॉटेलांमध्ये 'किलनर साहेब' आणि 'ड्रायव्हर साहेब' मोडक्या बाकांवर किंवा पाय तुटलेल्या खुर्च्यांवर विराजमान झालेले दिसत आहेत.

पूर्वी शहरे खेड्यांसारखी होती. आता खेडी शहरांसारखी होत चालली आहेत. ती आता गांधीजींच्या संकल्पाप्रमाणे जुनीपुराणी राहिली नाहीत. त्यांच्या जीवनात यंत्रे आली आहेत. यंत्रांच्या मागोमाग हळूहळू पाऊल न वाजविता भले आणि बुरे आधुनिक जीवन खेड्यापाड्यात शिरत आहे. आपण या नवागतांचे मोकळ्या मनाने स्वागत केलें पाहिजे.

नुसते स्वागत चालायचे नाही. त्यांना जागा दिली पाहिजे. त्या जागेसाठी पूर्वतयारी केली पाहिजे. माध्यमिक आणि उच्च शिक्षणाप्रमाणेच प्राथमिक शिक्षणानेसुद्धा आधुनिक जीवनाच्या अंगोपांगांची दखल घेतली पाहिजे, सोय केली पाहिजे. सात वर्षांचे प्राथमिक शिक्षण मध्ययुगीन गरजा भागविणारे आणि पुढचे शिक्षण आधुनिक गरजांची दखल घेणारे; खेड्यांचे शिक्षण मध्ययुगीन आणि शहरांतले अर्वाचीन, असे द्वंद्व लोकशाहीत चालणार नाही. शिवाय शिक्षणाच्या शिल्पाच्या बांधणीत एकात्मता (Organic unity) पाहिजे. पाया वेगळा, वेगळ्या जातीचा, ढिसूळ आणि वरचे मजले वेगळे, असे शिल्प कामाचे नाही.

**गांधींचे ट्रान्सव्हालमधील यश—त्याच्या मर्यादा**

गांधीजींनी ट्रान्सव्हाल्मध्ये व्यवसायप्रधान शिक्षणाचा अनुभव घेतला होता. नेमके हेच वाईट झाले. कारण तो अनुभव फार वेगळा, वेगळ्या परिस्थितीतला आणि वातावरणातला होता. सत्याग्रहाची मोहीम चालू असताना त्यांनी आपल्या अनुयायांना आणि आश्रितांना सहकुटुंब गावापासून दूर नेले आणि एका निवांत ठिकाणी टॉलस्टॉय फार्म ही वसाहत स्थापन केली. वसाहतवाल्यांना गांधीजींबद्दल विलक्षण श्रद्धा वाटत होती. त्या अभिनव आंदोलनात त्यांच्या भावना तापल्या होत्या. गांधीजी सांगतील ते करण्यास ते सिद्ध होते. गांधीजींनी आपल्या अनुयायांच्या सहा ते सोळा वर्षांपर्यंतच्या मुलांवर आपला निसर्गवादी आणि व्यवसायप्रधान शिक्षणप्रयोग केला. त्यांना दररोज आठ तास जमीनखुदाई, स्वैंपाक, भंगीकाम, चांभारकाम, सुतारकाम करायला लावले आणि फक्त एक, कधी कधी दोन, तास पुस्तकी शिक्षण दिले. १८ सप्टेंबर १९३७च्या 'हरिजन'च्या अंकात गांधीजी म्हणतात, "माझा हा प्रयोग यशस्वी झाला."

अगदी शक्य आहे. प्रयोग यशस्वी झालाहि असेल. अर्थात् कशाला यश म्हणायचे हा प्रश्न आलाहिदा. उद्दिष्टच संकुचित असले, धावच कुंपणापर्यंतची असली, तर शर्यत जिंकली असे निखालस म्हणता येईल. हा दक्षिण आफ्रिकेतला प्रयोग, गांधीजींसारख्या थोर पुरुषाने स्वतः हाती घेतलेला आणि नेटाने चालविलेला असा होता. ज्यांच्यावर प्रयोग केला ती मुले व त्यांचे पालक सर्वस्वी गांधीजींवर अवलंबून, त्यांच्यापाशी रात्रंदिवस राहणारे, गांधीजींवर निस्सीम श्रद्धा ठेवणारे आणि सत्याग्रहाच्या वातावरणात, प्राण पणास लावण्यास सिद्ध झालेले, असे होते. अशा माणसाने, अशा वातावरणात, अशा प्रकारच्या विद्यार्थ्यांवर केलेला प्रयोग भारतात मामुली थंड वातावरणात, लक्षावधि निमशिकलेल्या, पोटभरू प्राथमिक शिक्षकांकडून कार्यान्वित होईल ही अपेक्षा चुकीची होती. शिवाय सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे एखाद्या अद्‌भुतरम्य आणि धाडसी कल्पनेने व ध्येयाने भारावलेला एखादा महापुरुष वाटेल ते अद्‌भुत कृत्य शिक्षणक्षेत्रात करू शकेल. पेस्टॉलॉक्सीने ते करून दाखविले. ज्यांना श्रद्धा आणि सामर्थ्य आहे त्यांनी अवश्य अशी धाडशी कामे अंगावर घ्यावीत आणि समाजाच्या विरोधाला न जुमानता चिकाटीने ती करीत राहावे. परंतु धाडशी

आणि अद्‌भुतरम्य प्रयोग एका सबंध राष्ट्राची अधिकृत आणि सार्वत्रिक अशी शिक्षणयंत्रणा (State system of Education) होऊ शकत नाही.

गांधीजींनी टॉलस्टॉय फॉर्मवर नेमके काय केले ते विचार करण्यासारखे आहे. त्यांनी वसाहतीत त्यांच्यापाशी राहणाऱ्या मुलांकडून चारपाच, परस्परांशी संबंध नसलेली कामे करून घेतली व त्यानंतर तास दोन तास त्या मुलांना पुस्तकी शिक्षण दिले. नक्की काय शिकविले ते आपल्याला माहीत नाही. परंतु भंगीकाम, चांभारकाम, जमीन खुदाई या परस्परांपासून भिन्न असलेल्या उद्योगांशी त्याचा कशाच प्रकारचा संबंध असणे संभवनीय दिसत नाही. थोडक्यात सांगायचे म्हणजे गांधीजींचा प्रयोग हा 'एज्युकेशन (दोन तासांच्या शिक्षणाला एज्युकेशन म्हणायचे असेल तर) अँड क्राफ्ट' (भंगीकाम, जमीनखुदाई यांना क्राफ्ट म्हणायचे असेल तर) या स्वरूपाचा होता; 'एज्युकेशन थ्रू क्राफ्ट' असा नव्हता. व्यवसायांमधून शिक्षण देता येईल का याचा गांधीजींनी स्वतः विचार केला असता आणि टॉलस्टॉय फार्मवर स्वतः अनुभव घेतला असता तर त्या 'थ्रू' या शब्दयोगी अव्ययातील धोका त्यांच्या ध्यानात आला असता.

### गांधींची एकांगी शिक्षणदृष्टि

गांधीजींची भारतातील योजना मूलतः आर्थिक होती, शैक्षणिक नव्हती. या योजनेत मुख्य भर स्वावलंबी शिक्षणावर होता. गांधीजी स्पष्टच म्हणतात, "Such education can be, must be, self supporting. In fact, self-support is the acid test of its reality." गांधीजींची झेप दांडगी होती. त्यांना या दरिद्री राष्ट्रातील सर्व मुलामुलींना त्यांच्या कमाईतून सात वर्षे मातृभाषेतून शिक्षण द्यायचे होते. या शिक्षणाला ते पायाचे शिक्षण म्हणत. पायाच्या शिक्षणात प्राथमिक व माध्यमिक या दोन्ही श्रेणींचा समावेश ते करीत. माध्यमिक शिक्षण ही श्रेणीच त्यांना मान्य नव्हती. ते म्हणत, माध्यमिक शिक्षण म्हणजे मुख्यतः इंग्रजी भाषेचे शिक्षण. ते वगळले तर माध्यमिक शाळात फारसे सामान्य शिक्षण शिल्लक राहातच नाही. इंग्रजीची हकालपट्टी केली तर सात वर्षात मुलाला मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण देता येईल असा त्यांचा अंदाज होता.

माध्यमिक शिक्षणाची अशी वासलात लावल्यावर त्याच्या वरच्या उच्च

शिक्षणाची गांधीजींनी वेगळ्याच रीतीने बोळवण केली. त्यांचा मुळी उच्च शिक्षणावर विश्वास नव्हता. घेतले ते उच्च शिक्षण मी घेतले नसते तर काही बिघडले नसते असे ते म्हणत. पुस्तकातल्या ज्ञानावर त्यांचा विश्वास नव्हता. व्यवसाय करताना त्यामधून मिळणाऱ्या अनुभवातून जे ज्ञान मिळेल तेच खरे, असा त्यांचा आग्रह होता. उच्च शिक्षण द्यायचेच असेल तर सरकारने त्या भानगडीत पडू नये. सरकारने आपली कॉलेजे बंद करावी. गिरणीवाल्यांनी कापडधंद्यातले शिक्षण द्यावे, टाटा कंपनीने आपल्या लोखंडाच्या कारखान्याला जोडून त्याला पोषक असे यंत्रशिक्षण द्यावे, दवाखान्यांनी वैद्यकीय शिक्षण द्यावे आणि ज्या अर्थी बडे लोकच जास्ती आजारी पडतात, (हे खरे नाही. साथ आली म्हणजे गोरगरीब लाखांनी मरतात; अंगात त्राण नसल्याने गरीब आजारात दगावतात, अमीर वाचतात.) त्या अर्थी त्यांच्या देणग्यावर या संस्थांचा चरितार्थ चालवावा, असे ते बिनदिक्कत म्हणतात. लांडग्यांच्या हाती कोकरांना चारापाणी घालण्याची कामगिरी! खाशी योजना! मला वाटते, 'First Thing First' असे त्यांचे धोरण असावे. पायाचे शिक्षण आधी; तो कार्यक्रम आटोक्यात आल्यावर पुढचे पुढे पाहून घेऊ अशी त्यांची समजूत असावी.

आपल्याला पुढचे पुढे म्हणून चालायचे नाही. गांधीजींना जे पुढचे होते ते आपल्याला आजचे झाले आहे. ते आपल्यापुढे आ वासून उभे आहे. त्याच्याकडे पाहिलेच पाहिजे. आपल्याला आधुनिक ज्ञान, विज्ञान आणि कला यांची जोपासना आणि अभिवृद्धि करायची आहे. आणि तीहि थोड्या निवडक लोकांसाठी नाही. आपल्याला शतकानुशतकातून आलेले आणि पुस्तकात स्थिर झालेले ज्ञान व कला आपल्या मुलांना द्यायची आहेत. आपल्याला बहुविध अशा उच्च शिक्षणाची राष्ट्रीय योजना कार्यवाहीत आणायची आहे, आणि या असल्या उच्च शिक्षणाचा विचार मनात बाळगून त्याच्या संदर्भात आजच्या प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाची तपासणी आणि रचना करायची आहे.

लक्षावधि मुलामुलींना सात वर्षे सक्तीचे शिक्षण देण्यासाठी खूपच पैका लागणार होता. १९३७ साली प्रादेशिक राज्ये राष्ट्रीय सभेच्या म्हणजेच गांधीजींच्या ताब्यात आली होती. परके सरकार ऐकत नाही, सढळ हाताने शिक्षणावर पैका खर्च करीत नाही, असे म्हणून या वेळी सुटका होणार नव्हती. शिक्षणाच्या या उद्दिष्टासाठी पैका उपलब्ध करण्याची जबाबदारी प्रादेशिक

सरकारांवर आणि गांधीजींवर होती. गांधीजींच्या नंतर ज्या मार्गांनी राष्ट्र-विकासासाठी अब्जावधि रुपयांची सोय लागली ते मार्ग बहुधा गांधीजींच्या डोळ्यांसमोर नव्हते. तसे ते त्यावेळी आवाक्याबाहेरचे होते. शिवाय अन्य मार्ग गांधीजींच्या समाजरचनेच्या योजनेत बसत नव्हते. विशेषतः परक्या देशांकडे भीक मागण्याची गांधीजींची वृत्ति नव्हती.

**योजनेच्या आर्थिक परिणामांचा पूर्ण विचार झाला नाही.**

गांधीजी दरिद्रानारायणाचे उपासक. या विराट राष्ट्रव्यापी दरिद्रानारायणाच्या परिश्रमामधूनच त्यांना आपल्या शिक्षणयोजनेसाठी पैका पैदा करायचा होता. विद्यार्थ्यांच्या श्रमातूनच शिक्षकांचा पगार भागवायचा होता. गांधीजींपाशी विनोबाजी बसले होते. कताईतज्ज्ञ होते आणि गणितज्ञ होते. त्यांनी सीधा हिशेब केला, गणित केले आणि गांधीजींपुढे ठेवले. गांधीजींनी ते पटकन मान्य केले. प्राथमिक शिक्षकास सरासरी २५ रु. पगार पुरे होता. पुढचे गणित सोपे होते. प्रत्येक वर्गातील सरासरी २५ अशा सात वर्गातील १७५ मुलांनी महिन्यातून २५ दिवस सुमारे चार तास सूतकताई केली की हे शिक्षकाच्या पोटापाण्याचे गणित जमत होते. शिक्षकाचे पोट कागदावर भरणार होते. त्याच्या बायकामुलांच्या पोटांची तर कागदावर सुद्धा सोय झाली नाही. या देशात शिक्षकांचे संघ आहेत, ते चळवळ करतील, याची कल्पनाच कोणाला नव्हती.

गांधीजींनी इतर उद्योगांना मनाई केली नव्हती. परंतु शिक्षण स्वावलंबी करण्याचे ठरविताना त्या उद्योगांचा त्यांनी व त्यांच्या जवळच्यांनी विचार केला नाही. शेती, सुतारकाम (!) पुठ्याचें काम (!) इत्यादि स्वीकृत मूल उद्योगांचा हिशेब केला नाही. केला असता तर बहुधा शिक्षकांच्या पोटापाण्याचे गणित चुकले असते आणि पत्त्यांचा बंगला ढासळला असता. सुतारकाम, पुठ्याचे काम या हस्तव्यवसायातून ('आतून' या शब्दयोगी अव्ययाला वर्धा योजनेत फार महत्त्व आहे. आतून म्हणजे आतून, कुशीतून. आतून म्हणजे जवळून नव्हे, शेजारपाजारातून नव्हे. आतून म्हणजे समन्वय नव्हे!) गणित, पदार्थविज्ञान, रसायन इत्यादि शास्त्रे; इतिहास, भूगोल, वाङ्मय, भाषाशिक्षण, हे सारे विषय 'आतून' काढून दाखवावे लागले असते. या लाखो मुलांच्या सुतारकामातून, पुठ्याच्या कामातून जे लाखो पदार्थ तयार व्हायचे त्यांची विल्हेवाट कशी

लावायची, ते कसे विकायचे, कोणी विकत घ्यायचे (आणि का घ्यायचे ?), या उत्पादनातून किती कमाई व्हायची, त्या कमाईतून असंख्य शिक्षकांचे पोट कसे भरायचे, हेहि दाखवावे लागले असते.

कृतिपरायण शिक्षणाचा विचार दक्षिण आफ्रिकेत गांधीजींच्या मनात आला तसा, त्यापूर्वी व त्यानंतर, अमेरिकेत आणि युरोपात अनेकांच्या डोक्यात आला. काही विचार तळापासचे असतात, पण खोल बुडी मारणाऱ्या धाडसी माणसांना ते हटकून गवसतात. खरे म्हणजे ते विचारच त्या माणसांना गाठतात आणि त्यांच्या मनाची पकड घेतात. या भारावलेल्या माणसांनी आपापल्या देशात आपापल्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या कृतिप्रधान आणि कृतिशील शाळा काढल्या आणि चालविल्या. गांधीजी स्वतःपुरते पाहणारे नव्हते. 'आपुल्या सारीखे करिती तात्काळ' असे त्यांचे व्रत होते. त्यांनी आपला विचार देशाला दिला आणि देशभर त्याची रोपे लावायचा आदेश दिला. माझ्या मते ही चूक झाली, घाई झाली. गांधीजींनी खास आपल्या देखरेखीखाली काही काळ हा प्रयोग चालवायला हवा होता. व्यवसायातून शालेय विषयांचे ज्ञान देता येते हे आपल्या प्रयोगशाळेत दाखवायला हवे होते. ठिकठिकाणच्या कार्यकर्त्यांना आपली प्रयोगशाळा दाखवायला हवी होती आणि काय व किती उचलून घेऊन जायचे हे त्यांच्यावर सोपवायला हवे होते. ज्याची जेवढी कुवत होती तेवढे त्याने उचलले असते आणि नेले असते. पण तसे झाले नाही. जिकडे तिकडे जी. आर. निघाले. परिणाम व्हायचा तोच झाला. सारे प्रधानजी राज्याचा बंदोबस्त ठीक असेच सांगू लागले!!

### समन्वय पाहिजे, पण कसा ?

गांधीजींची योजना आणि इतर देशातल्या त्यांच्या समानधर्म्यांच्या योजना यात एक मोठा फरक होता. साऱ्याच योजना कृतिशील होत्या. कृतीला त्यांच्यात भरपूर वाव होता. परंतु कृतीमधून ज्ञान हा विशेष फक्त जॉन ड्यूईचा व गांधीजींचा होता. ड्यूईनी 'एज्युकेशन थ्रू प्रॉजेक्ट' (Education through Project) या तत्त्वातील शब्दयोगी अव्ययाचा प्रामाणिकपणाने आणि पुरेपूर उपयोग केला आणि अपेश पत्करले. गांधीजींच्या 'एज्युकेशन थ्रू क्राफ्ट' (Education through Craft) या तत्त्वातील शब्दयोगी अव्ययाची कार्यकर्त्यांनी दुर्दशा केली आणि आमच्या शाळाखात्यांच्या रामरगाड्यात त्या

अव्ययाचा खेळखंडोबा झाला. 'एज्युकेशन थ्रू क्राफ्ट' प्रत्यक्ष व्यवहारात 'एज्युकेशन कोरिलेटेड टु क्राफ्ट' असे झाले. दोन्ही विचारात मूलभूत फरक आहे. पहिल्या विचारात दोघे दोन वेगळ्या खुर्च्यांवर आधीपासून बसलेले नाहीत. खुर्ची एकच आहे, व तिच्यावर उद्योग बसला आहे. आणि त्याच्या कुशीतून ज्ञान जन्म घेणार आहे. म्हणजे पहिल्या विचारात उद्योग हा खराखुरा मूल उद्योग आहे. दुसऱ्या विचारात ज्ञान आधीच आणि केव्हाच जन्मलेले आहे, निश्चित आहे; अभ्यासक्रम तयार आहेत आणि दुसऱ्या खुर्चीवर बसलेल्या उद्योगाशी त्या ज्ञानाचा सोइरसंबंध जुळवायचा आहे. या विचारात व योजनेत कार्यकारणभाव संभवत नाही. दोन स्वतंत्र आणि पृथक् वस्तूंचा घरोबा घडवून आणला जातो. अनेक विवाहांप्रमाणे हा विवाह कधी सुखी होतो, कधी अपेशी होतो आणि भांडण चव्हाट्यावर येते; किंवा पुष्कळ वेळा आपसात तडजोड होते आणि दोघेहि एका घरात पण आपापल्या खोल्यात संसार करतात.

समन्वयाची कल्पना चुकीची नाही. द्यावयाचे ज्ञान समन्वित असावे, परस्परात गुंफलेले असावे, असा त्याचा उद्देश आहे. ज्ञान या वस्तूतच समन्वय येऊन जातो. जे समन्वित नाही ते ज्ञानच नाही. ती नुसती माहिती—सटरफटर, विस्कळित, तुकडया–तुकड्यांची; एखाद्या जुन्या वाड्यांत इतस्ततः पडलेल्या अडगळीसारखी. ज्ञान हे शृंगारलेल्या आधुनिक दिवाणखान्यासारखे असते. खुर्च्या, टेबले, चित्रे, फुलपात्रे, साऱ्या वस्तु योग्य त्या जागी आणि परस्परांशी संबद्ध अशा. विद्यार्थ्यांना द्यावयाचे ज्ञान हे मुळात ज्ञानच असले तर मग आगंतुक समन्वयाची आवश्यकता नसते. शिकविताना काही वेळेला इतर ज्ञानाशी म्हणजेच इतर विषयांशी समन्वय जुळवावा लागतो. तसे केले, ज्ञान ज्ञानात गुंफले म्हणजे ते घट्ट होते. इतिहास आणि भूगोल या पृथक् ज्ञानविषयात असे समन्वय कधीकधी जोडावे लागतात. नेहमी नाही; जेथे अपरिहार्य असेल तेथेच. उदाहरणार्थ भारतांतल्या महत्त्वाच्या लढाया पानपतच्या मैदानावरच का झाल्या हे ऐतिहासिक सत्य शिकविण्यासाठी त्याचा भूगोलाशी समन्वय जोडणे अवश्य आहे. कुशल शिक्षक विषयाविषयातील अशा अवश्य समन्वयांचा नेहमीच सहजगत्या अवलंब करीत असतात. त्यांना सांगावे लागत नाही.

प्रत्येक विषय तसा स्वयंपूर्ण असतो. त्याचे ज्ञान मुळातच परस्परसंबद्ध असे असते—असावे लागते.

जेथे बेसिक जमत नसेल तेथे दुसरे उपक्रम करावेत. शिक्षण जर जीवनानुसारी पाहिजे असे आपण म्हणतो तर जीवन किती वेगवेगळ्या प्रकारचे आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे आणि जीवनाभिमुख असलेल्या अनेक प्रयोगांना स्थान ठेवले पाहिजे.

आपली मुले ही आपली खरी दौलत आहे. तिची काळजी घ्या. आपल्या राष्ट्राची उद्याची घडण हीच मुले करणार आहेत. त्यांची तयारी करा. त्यांची शरीरे व मने खंबीर होतील असे त्यांना शिक्षण द्या. प्राथमिक शाळातच त्या शिक्षणाचा पाया घालायचा असतो. पाया कच्चा राहू देऊ नका. फार काळजी घ्या. मुलांची मने तयार होतील, त्या मनात आधी कुतूहल व मग जिज्ञासा उत्पन्न होईल, असे पायाचे शिक्षण द्या. नाना प्रकारचे हस्तव्यवसायांचे शिक्षण देऊन त्यांचे हात तयार करा. कारण त्यांना पुढे हातांचे पुष्कळच काम करावे लागणार आहे. सौंदर्याचा परिचय याच पायाच्या शिक्षणात हस्तव्यवसायांमधून, वाङ्मयामधून, चित्रकलेमधून, गायनामधून, आणि अन्य माध्यमामधून घडवून आणा. त्यांची प्रज्ञा जागी करा. नुसते घोकायचे आणि ओकायचे असले करंटे ज्ञान देऊ नका. फार फार काळजी घ्या.

✻ ✻ ✻

# ६. समाजसत्ता आणि आत्मसत्ता

**शंकर दत्तात्रेय जावडेकर**

सत्याग्रह हे भारतीय मूल्य; आणि समाजवाद हे पाश्चिमात्यांनी पुरस्कारिलेले मूल्य. या दोन मूल्यांचा योग्य समन्वय साधून भारताला एकवर्ग समाजरचनेचे ध्येय सफल करून दाखविता येईल, अशी आचार्य शं. द. जावडेकरांची पक्की श्रद्धा होती. आचार्य जावडेकर ( जन्म इ. स. १८९४ मृत्यु इ. स. १९५५ ) हे आधुनिक महाराष्ट्रातले एक मान्यवर विचारवंत. त्यांच्या बहुतांश लेखनात उपरोक्त श्रद्धा प्रकट झालेली आहे. त्यांच्या या श्रद्धेला समाजवाद आणि अध्यात्मवाद या दोन्ही विचारप्रणालींच्या सखोल व्यासंगाचे अधिष्ठान लाभलेले आहे. सत्याग्रही समाजवादाचा मार्ग हा केवळ भारतालाच नव्हे तर सर्व जगाला तारक ठरणारा आहे, हा त्यांचा अढळ विश्वास प्रस्तुत लेखावरूनहि प्रतीत होण्यासारखा आहे. प्रस्तुत लेख त्यांच्या 'आधुनिक भारत' या सुप्रसिद्ध ग्रंथातून निवडून घेतला आहे. इंग्रजी अंमल प्रस्थापित झाल्यानंतर भारतात, व विशेषत: महाराष्ट्रात जे राजकीय आणि सामाजिक विचारप्रवाह व संप्रदाय उत्पन्न झाले त्यांचे तात्त्विक विवेचन करणारा जावडेकरांचा 'आधुनिक भारत' हा ग्रंथ आधुनिक मराठीचे एक भूषण समजण्यात येतो.

**वर्णधर्मातून विचारकलह व वर्गकलह निर्माण झाला.**

भरतखंडांत आर्य लोक येऊन राहिल्यानंतर त्यांनी वर्णाश्रमधर्माच्या स्वरूपांत आपली संस्कृति निर्माण केली. यापैकी शूद्रवर्ण आणि अतिशूद्रवर्ण हे दासकर्म करणारे वर्ण होते. वर्णाश्रमधर्माची संस्कृति ही ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य या त्रैवर्णिकांचीच संस्कृति असून शूद्र व अतिशूद्र हे त्यांचे दास होते. तत्कालीन सर्व समाजात दाससंस्था होती. युरोपीय समाजातहि मध्ययुगाच्या अखेरीपर्यंत इकडील चातुर्वर्ण्यासारखे चार वर्ग होते. त्या काळात सामाजिक समता याचा अर्थ समाजातील चार वर्ग मोडणे असा नसून ते वर्ग कायम ठेवूनहि प्रत्येक वर्गात जन्मलेल्या कोणत्याहि व्यक्तीला आपल्या गुणकर्मानुसार वाटेल त्या

वर्गात प्रवेश मिळावा असा होता. सर्वात खालच्या शूद्रवर्णासहि सर्वात वरच्या ब्राम्हणवर्गापर्यंतचा दर्जा प्राप्त करून घेण्याचा मार्ग मोकळा असावा, एवढीच सामाजिक सुधारणेची कल्पना त्या वेळीं होती. ज्या वेळीं समाजातील धनोत्पादन फार अल्प प्रमाणातच होऊ शकते, त्या वेळीं समाजातील बहुजनसमाज हा संस्कृति व संपत्ति यापासून पारखाच असतो. सर्वांना सुसंस्कृत व सुसंपन्न करण्याचे ध्येय अशा काळीं बहुधा कोणास सुचत नाही व सुचले तरी त्याचा व्यवहारात उपयोग होऊ शकत नाही. आपल्याइकडेहि शूद्रवर्गाचे दास्य कमी करावे, त्यांना भौतिक उन्नतीचे आणि ज्ञानप्राप्तीचे मार्ग मोकळे करावेत, अशाबद्दलच प्रयत्न करणारे पंथ जैन-बौद्धांच्या काळापासून किंवा त्याच्या पूर्वीच्या काळापासूनहि निघालेले आहेत. चार्वाकाचे लोकायत–मत हे अशाच प्रकारचे एक मत असावे, असा पुष्कळांचा अंदाज आहे. वसिष्ठ–विश्वामित्रांच्या काळापासून वाटेल त्या वर्णात जन्मलेल्या व्यक्तीस ब्राह्मण व ब्राह्मणाचा दर्जा प्राप्त करून घेण्याची कल्पना निघालेली असून या कल्पनेच्या प्रचारातून एक विचारकलह आणि या विचारकलहातून एक प्रकारचा वर्गकलहि निर्माण झालेला होता. श्रीकृष्णाच्या भागवत धर्मात 'स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम्'—हे मत मान्य करून स्त्रियांना व शूद्रांना समाजातील सर्वश्रेष्ठ दर्जा प्राप्त करून घेण्याची मुभा दिलेली आहे. बौद्धकाली जी क्रांति झाली, ती एकप्रकारची सर्वांगीण समाजक्रांति होती; आणि त्या वेळी विचारकलह व वर्गकलह चालू असावा असे वाटते. नंतरच्या काळात शूद्रांना वैदिक संस्कृतीचा अधिकार देण्यात आला नाही हे खरे असले, तरी ती वैदिक संस्कृतीच मागे पडून बौद्ध संस्कृति व भागवत संस्कृति पुढे आली असे म्हणण्यास हरकत नाही. बौद्ध संस्कृतीने वैदिक परंपरेविरुद्ध उघड बंड पुकारिले. भागवत संस्कृतीने हा उघड बंडाचा मार्ग स्वीकारिला नाही; तरी एकपरीने भगवद्गीतेला वेदांपेक्षा अधिक श्रेष्ठ स्थान देऊन वैदिक संस्कृतीला गौणत्वच दिले. ज्ञानेश्वरी वेदासंबंधी म्हणते :

वेदु सम्पन्न होये ठांई । परि कृपणु आन नाहीं ॥
जें कानीं लागला तिहिं । वर्णाचां चि ॥
एरां भवव्यथा ठेलेयां । स्त्रीशूद्रादिकां प्राणियां ॥
अनवसरु मांडूनियां । असे नव्हे ॥

तरी मज पांतां तें उणें। फेडावेया गीतापणें ॥
वेदु वेठला भलेतेणें। सेव्यु होआवेया ॥

—राजवाडे-ज्ञानेश्वरी, अ. १८, श्लो. १४४७-४९.

अशाच प्रकारे एकनाथ, तुकाराम वगैरे साधुसंतांनी स्त्रीशूद्रादिकांना वेदाचा अधिकार नाही म्हणून वेदालाच गौण ठरविले आहे. वेदातील व उपनिषदातील आत्मोद्धाराचे सर्व तत्त्वज्ञान भगवद्‌गीतेत आहे आणि भक्तिमार्गातील इतर प्राकृत भाषांतील ग्रंथांतहि ते भरपूर आहे; मग आम्हास तुमच्या वैदिक ज्ञानाचे तरी काय महत्त्व आहे, असे भागवतधर्मी संत उघडपणे बोलू लागले. "वेदाचा तो अर्थ आम्हासचि ठावा। इतरांनी वहावा भार माथा॥" असे तुकाराम छातीठोकपणे सांगतो. शूद्र कितीहि मोठा झाला तरी त्याला आम्ही ब्राह्मण म्हणणार नाही किंवा राज्याभिषेक करणार नाही,—असा दुराग्रह वैदिक म्हणविणारे ब्राह्मण अद्यापीहि धरितात पण व्यास-वाल्मीकि हे ऋषिकोटीत गेले आणि शूद्र–अतिशूद्र जातीतील साधुसंत हजारो ब्राह्मणांचे आध्यात्मिक गुरु बनले. शूद्रांना वैदिक पद्धतीने राज्याभिषेक केला नाही, तरी त्यांनी राजसत्ता व साम्राज्यसत्ता उपभोगिली आणि त्यांची सेवा करून ब्राह्मणांनी त्यांची स्तुतिस्तोत्रेहि गाइली. जो शूद्र केवळ परिचर्यात्मक कर्म करण्यासच लायक असे मानण्यात येत होते, तो कृषीगौरक्ष्य–वाणिज्य कर्म करू लागलाच; पण मंत्री, राजा, इतकेच नाही तर साधुसंत, ऋषि व आध्यात्मिक गुरूहि बनला.

**त्यातून पुढे सामाजिक क्रांति घडून आली.**

भारतीय संस्कृतीत घडून आलेली ही एक प्रचंड विचारक्रांति होती. तिचे वर्णन इतिहासाचार्य कै. राजवाडे हे पुढील शब्दात करितातः "उत्तरकुरूत जो अर्धरानटी शूद्र केवळ दासकर्म करून समाजसोपानाच्या अगदी खालच्या पायरीवर लाथाडला जात होता, तो आता नंदांच्या व मौर्यांच्या शूद्र व वृषल राजवटीत अध्यात्म, नीति, प्रव्रज्या, एकवर्णता, सर्वसमता व साम्राज्य यांचा विजयी चालक झाला. बुद्ध व जिन यांनी, विशेषतः गौतम बुद्ध याने केलेली ही क्रांति केवळ सामान्य धर्मक्रांति नव्हे, किंवा राजक्रांति नव्हे, किंवा मतक्रांति नव्हे; ही सर्वव्यापी अशी भयंकर सामाजिक क्रांति होती. त्या प्रचंड क्रांतीने

वैदिक समाजाचे पाये उखडून, चातुर्वर्णिक समाज सुलटाचा उलटा होऊन गेला."* ही प्रचंड समाजक्रांति वर्गविग्रहाखेरीज झालेली नाही. यानंतर बुद्धधर्म जरी हिंदुस्थानात उरला नाही, तरी त्याने केलेले हे कार्य कायम टिकले. बुद्धाने वैदिक देवताकांड, यज्ञयागादिक कर्मकांड आणि सामाजिक विषमता यांच्या विरुद्ध बंड उभारिले. पुढे बुद्धधर्म जाऊन मूर्तिपूजा उदयास आली आणि काही काळ पौराणिक देवताकांड, व्रतोद्यापने व पूजाविधाने आणि कुमारिलभट्टादींचा कर्मठ मीमांसाधर्म यांचे स्तोम माजले. तथापि, शंकराचार्यांनी अद्वैतवेदांताचे ज्ञानकांड पुढे आणून देवताकांडास व कर्मठपणास गौणत्व दिले आणि भागवतधर्मीय संतांनी अद्वैत वेदान्ताचे शुद्ध तत्त्वज्ञान भक्तिमार्गात आणून सामान्य जनतेला निष्काम भक्तीने आत्मोद्धाराचा व मोक्षाचा मार्ग दाखवून दिला. या सर्व गोष्टी घडत असता कर्मठ मीमांसकांनी ज्ञानमार्गीयांचा व भक्तिमार्गीयांचा पिच्छा पुरविला. प्रत्येक साधुसंताच्या वेळी त्याच्या समताप्रस्थापनेच्या कार्यास विरोध केला व एक प्रकारचा वर्गकलहहि निर्माण केला. पण साधुसंतांनी सत्याग्रही वृत्ति धारण करून आपले धर्मसुधारणेचे कार्य पुढे चालविले. जो गौतम बुद्ध नास्तिक व वेदनिंदक मानला जात होता, त्याला हिंदु जनतेने ईश्वरी अवतार बनविले; अशा संस्कृतिसुधारणेचे हे कार्य झाले, तरी मध्ययुगीन भारत आधुनिक युगात येऊ शकले नाही. ब्रिटिश अमदानीत आता महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भागवतधर्मीय साधुसंतांच्या सत्याग्रही वृत्तीतून एक निःशस्त्र राज्यक्रांतिशास्त्र निर्माण झाले आहे. हे क्रांतिशास्त्र स्वतंत्र भारतात निर्माण झाले असते, तर त्याला सहजच सर्वांगीण क्रांतीचे स्वरूप आले असते, ते अद्यापि आले नाही. तथापि लवकरच ते येईल आणि त्याच्या आश्रयाने वर्गविग्रहाची सर्वांगीण समाजक्रांति झाली, तरीहि भारतीय राष्ट्रीयत्व आणि लोकसत्ता यांना धक्का न लागता ती होईल अशी आमची कल्पना आहे. अशा प्रकारे आधुनिक युरोपात निर्माण झालेली संस्कृति आत्मसात् करून, त्याला जी क्रांति घडवून आणता आली नाही ती शांततेच्या मार्गाने घडवून दाखविली, म्हणजेच सत्याग्रही तत्त्वज्ञानाची खरी महती जगाला कळणार आहे; आणि आधुनिक भारत निर्माण करणारी संस्कृति आधुनिक युरोपीय संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ ठरणार आहे.

* राधामाधवविलासचंपू, प्रस्तावना, पृ. १५१

**भारतात एकवर्ग समाजस्थापनेचे ध्येय कसे सफल होईल ?**

महात्मा गांधी ही भारतात निर्माण झालेली श्रीकृष्ण किंवा गौतम बुद्ध यांच्यासारखीच एक अत्यंत थोर विभूति आहे. त्यांच्या सत्याग्रही तत्त्वज्ञानात भागवतधर्म आणि बौद्धधर्म या दोहोतील तत्त्वांचा समन्वय झाला असून त्यास त्यांनी राजकीय व सामाजिक क्रांतीचे स्वरूप दिलेले आहे. श्रीकृष्णाच्या अगर बुद्धाच्या वेळीं ज्या प्रकारची सर्वांगीण क्रांति भरतखंडात झाली, त्याहून अधिक व्यापक अशा प्रकारची सर्वांगीण क्रांति घडवून आणण्याचा काळ आज प्राप्त झाला आहे. शूद्र किंवा अतिशूद्र वर्गापैकी कोणत्याहि लायक व्यक्तीला गुणकर्मानुसार द्विजत्व प्राप्त व्हावे, अथवा वैश्य, क्षत्रिय किंवा ब्राम्हण बनता यावे, एवढाच आजचा प्रश्न नाही. आज समाजातील वर्गभेदच नष्ट करून एकवर्ग-समाज स्थापन करण्याची आवश्यकता आणि शक्यता वाटू लागली आहे. आधुनिक युरोपात व्यापारीवर्गाच्या नेतृत्वाखाली जी संस्कृति निर्माण झाली, तिच्यातून लोकसत्तेचे व सामाजिक समतेचे ध्येय उदय पावल्यापासूनच ही एकवर्ग-समाजाची कल्पना जगापुढे आलेली आहे. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळीं समता, स्वतंत्रता व बंधुता या तत्त्वांवर मानवसंस्कृतीची उभारणी करण्याचा प्रयोग प्रथम झाला. लोकसत्तेची व नागरिक-स्वातंत्र्याची स्थापना झाली म्हणजे सर्व लोक एकाच वर्गात येतील अशी त्या वेळीं कल्पना होती. सरंजामशाही मोडून जमीनदारवर्ग नाहीसा झाला आणि सर्वांना सामाजिक समतेचे व नागरिक स्वातंत्र्याचे हक्क मिळून शूद्रवर्ग अथवा दास किंवा भूदासवर्ग नाहीसा झाला. अशा प्रकारे क्षत्रिय व शूद्रवर्ग मोडून समाजात केवळ शेतकरी, कारागीर व व्यापारी यांचा एक वैश्यवर्ग राहिला. प्रत्येकास बौद्धिक व धार्मिक स्वातंत्र्य मिळाले, आणि नैतिक, आध्यात्मिक अगर धार्मिक उन्नति करण्यासाठी स्वतंत्र धर्माधिकारी वर्गाचीहि आवश्यकता उरली नाही. प्रत्येक शेतकऱ्यास स्वतःची जमीन मिळाली. व्यापारी व कारागीर यांना धंद्यात मिळणारा नफा त्यांच्या कष्टाच्या, साहसाच्या व संयमाच्या प्रमाणातच मिळाल्यास समाजातील कोणत्याहि व्यक्तीला वाटेल ते स्थान प्राप्त करून घेता येते व त्यामुळे एखाद्या व्यवसायातील लोकांना काही काळ वाजवीपेक्षा जास्त फायदा मिळाला, तर त्या व्यवसायात इतर लोक शिरतात आणि अवास्तव फायद्याचे प्रमाण कमी होते. याच्या उलट, कोणत्याहि

व्यवसायात काम करणाऱ्यांना त्यांच्या श्रमाचे योग्य मोलहि मिळेनासे झाले म्हणजे त्या व्यवसायातील लोक इतर धंद्यात शिरतात आणि उरलेल्या लोकांना योग्य नफा मिळू लागतो. अशा प्रकारे व्यवसायस्वातंत्र्य आणि करारस्वातंत्र्य यांच्या पायावर सर्वांना आपआपल्या श्रमाच्या प्रमाणात संपत्ति कमविता येईल व आपोआपच एकवर्ग–समाज निर्माण होईल, अशी त्या वेळीं अपेक्षा होती. ही अपेक्षा औद्योगिक क्रांतीतून निर्माण झालेल्या प्रचंड कारखानदारीचे स्वरूप आणि परिणाम लक्षात न घेतल्यामुळे निर्माण झालेली होती. औद्योगिक क्रांतीचे स्वरूप जसजसे विशद होऊ लागले आणि तिचे समाजातील बहुसंख्य वर्गांवर घडणारे परिणाम दिसून येऊं लागले, तसतसे नागरिक–स्वातंत्र्य, व्यवसाय–स्वातंत्र्य व करार–स्वातंत्र्य एवढ्या पायावर लोकशाहीतून एकवर्ग–समाजरचना निर्माण होऊ शकत नाही असे दिसून येऊ लागले. कारखानदारीमुळे घरगुती धंदे बुडून गेले आणि शेतकऱ्यास मिळालेल्या जमिनीच्या विक्रयस्वातंत्र्यातून सावकार, दुकानदार व भांडवलदार यांच्या दडपणाखाली पुनः मोठी जमीनदारी निर्माण होऊ लागली. यांत्रिक साहाय्याने प्रचंड कारखानदारीप्रमाणे प्रचंड प्रमाणावर शेती करणेहि शक्य आहे हे लक्षात येताच, छोटी शेती मोडून कारखानदारी पद्धतीची प्रचंड शेती निर्माण होऊ लागली. या सर्व प्रवृत्तीचा स्वाभाविक परिणाम प्रत्येक देशातील कारखाने, जमिनी व खाणी एका अल्पसंख्य धनिकवर्गाच्या हाती जाण्यात होणार आणि प्रत्येक राष्ट्रातील बहुसंख्य जनता या अल्पसंख्य मालकवर्गाच्या आर्थिक दास्यात जाणार, हे पाहून कारखाने, जमिनी व खाणी यांच्यावर सार्वजनिक मालकी स्थापन केल्याखेरीज एकवर्ग-समाज, स्वतंत्रता, समता व बंधुता ही ध्येये अमलात येत नाहीत असे समाजवादी तत्त्वज्ञांनी ठरविले. हे समाजसत्तेचे तत्त्व म्हणजे औद्योगिक क्षेत्रात लागू केलेले लोकसत्तेचेच तत्त्व आहे. या लोकसत्तेची प्रस्थापना मालकवर्गाच्या औदार्यातून न होता कामगारवर्गाच्या बंडातून होईल, अशी शास्त्रीय समाजवादाची मांडणी कार्ल मार्क्सने करून भांडवलशाहीतील अंतर्विरोध आणि वर्गकलह यांच्या आधारावर भावी समाजसत्ताक क्रांतीचे शास्त्रीय भविष्य वर्तविले. हे भविष्य रशियात स्थूल मानाने खरे झाले, आणि त्या वेळेपासून समाजसत्तेचे व एकवर्ग–समाजाचे ध्येय जगभर पसरले. हिंदुस्थानास लोकशाही व राष्ट्रीय स्वातंत्र्य याबरोबरच हे समाजसत्तेचे ध्येय स्वीकारावे लागणार आहे आणि जमिनी व कारखाने यांच्यावरील खाजगी

मालकी नष्ट करून सार्वजनिक मालकी स्थापन करण्याचे क्रांतिकार्य निःशस्त्र मार्गाने यशस्वी करून दाखवावयाचे आहे.

**समाजसत्तावादाला सत्याग्रहाची साथ पाहिजे.**

आधुनिक जगातील भौतिक विद्या, तिच्यामुळे प्राप्त झालेली धनोत्पादनाची भौतिक साधने, यंत्रकला आणि विद्युच्छक्तीसारख्या नैसर्गिक शक्ति यांचा उपयोग करून घेणे शक्य असल्यामुळे आज समाजात शूद्र–अतिशूद्रवर्ग यासारखा दासवर्ग किंवा दाससदृश वर्ग ठेवण्याची आवश्यकता कोणत्याहि समाजास उरलेली नाही. तसेच सरंजामशाही व भांडवलशाही यांचीहि आज समाजास आवश्यकता उरलेली नाही. औद्योगिक क्रांतीमुळे आज समाजसत्ताक क्रांतीची आवश्यकता निर्माण झाली आहे. समाजसत्ताक क्रांतीनंतरहि काही व्यक्तींच्या हाती अधिक सत्ता द्यावी लागेल, आणि काहींना इतरांहून अधिक संपत्तीचा उपभोगहि घेऊ द्यावा लागेल. या सत्तेचा व संपत्तीचा उपभोग त्यांनी कसा घ्यावा याला काही कायद्याची बंधने असली, तरी या कायद्याच्या बंधनांनी हे कार्य पूर्णपणे होणार नाही. त्यासाठी नैतिक तत्त्वांचा उपदेश आवश्यकच राहील. पण या कामासहि हा उपदेश प्रत्यक्ष आचरून दाखविणारे आणि कायदेशीर मार्गाने जी सत्ता व संपत्ति मिळणे शक्य आहे तीहि मिळविण्याच्या मार्गास न लागता केवळ आपल्या किमान गरजा भागतील इतकी संपत्ति आपल्या कष्टाने मिळवून अधिक संपत्तीचा व सत्तेचा अभिलाष न धरणारे, तसेच अधिकारीवर्गाने जनतेवर जुलूम केल्यास जनतेला त्याचा प्रतिकार कसा करावा हे दाखवून देणारे, आणि असा जुलूम असह्य होईल तेव्हा समाजसत्ताक लोकशाहीविरुद्धहि अनत्याचारी असहकारितेचा प्रयोग करून प्रस्थापित राज्ययंत्र बंद पाडणारे सत्याग्रही लागतील. समाजसत्ताक लोकशाही प्रस्थापित झाली, तरी अधिकारी व प्रजा, अथवा शास्ते व शासित असा भेद राहाणारच आहे आणि हा भेद कायम आहे तोपर्यंत खरी एकवर्ग–समाजरचना होऊ शकत नाही. समाजसत्ताक लोकशाही ही मानवसमाजाची पूर्णावस्था नव्हे. या समाजसत्ताक लोकशाहीतहि अधिकारीवर्गास आणि बहुमतास न कळणारे किंवा अपरिहार्य वाटणारे अन्याय जाणणारे व ते अन्याय परिहार्य आहेत असे ओळखणारे दूरदर्शी, निःस्वार्थी लोकसेवक लागतील. सत्यसंशोधन आणि सत्यसंस्थापन हाच ज्यांनी आपला नित्य

व्यवसाय बनविला आहे आणि त्यासाठी आपल्या शारीरिक, बौद्धिक व आत्मिक शक्तीचा उपयोग करणे यातच ज्यांना खरा आनंद व जीवितसाफल्य वाटत आहे, असा सत्याग्रहीवर्ग समाजसत्ताक लोकशाहीच्या भावी विकासास अत्यंत अवश्य आहे.

**सत्याग्रह हे सर्वांगीण समाजक्रांतिशास्त्र आहे.**

महात्मा गांधींनी सत्याग्रहाच्या रूपाने जे आत्मबल संघटित व संवर्धित करण्याचा प्रयत्न केला, त्या आत्मबलाची परंपरा भरतखंडात फार मोठी आहे. अत्यंत प्राचीन काली आश्रमवासी ऋषींच्या ब्राह्मतेजाच्या रूपाने ते भरतखंडात निर्माण झाले. पुढे ब्राह्मणवर्गाने यज्ञयागादि कर्मकांडाचे आणि देवताकांडाचे स्तोम माजवून स्वर्गप्राप्तीच्या सकाम धर्माला प्राधान्य दिले; तेव्हा गौतम बुद्धाने या आत्मबलाचे संरक्षण व संवर्धन करून देवताकांड, कर्मकांड आणि सामाजिक विषमता यांच्याविरुद्ध क्रांति करण्यासाठी बुद्धधर्माची व भिक्षुसंघाची संघटना केली. नंतर हा भिक्षुसंघहि अवनत होऊन परिग्रही बनला व राजेलोकांच्या दास्यात गेला. यानंतर कुमारिलभट्टादींनी वैदिक धर्माचे जे पुनरुज्जीवन केले, त्यात पुनः कर्मकांडाचे व देवताकांडाचे प्रस्थ माजले. यानंतर श्रीशंकराचार्यांनी पीठे स्थापून अद्वैतवेदान्ताच्या आधारावर जाणत्या लोकात शुद्ध तत्त्वज्ञानाचा प्रसार केला आणि भागवतधर्मीय संतांनी याच अद्वैताच्या आधारावर निष्काम भक्तीचा मार्ग उपदेशून सामान्य लोकांतील आत्मबल जागृत केले. आज महात्मा गांधींनी याच परंपरागत प्राचीन आत्मबलाची संघटना करून त्याला राजकीय व सामाजिक क्रांतिकारक स्वरूप दिले आहे. सत्याग्रहीवर्ग हा आता विशिष्ट मतावर अधिष्ठित असलेला एखादा धर्मसंप्रदाय उरलेला नाही. केवळ व्यक्तिगत आध्यात्मिक मोक्ष हे सत्याग्रहाचे ध्येय नाही. लोकांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी त्यांना सर्वांगीण क्रांतीचा मार्ग दाखवून देणारे ते एक सामाजिक अखंड क्रांतिशास्त्र आहे. लोकसत्ता व समाजसत्ता या रूपांनी उदित झालेली एकवर्ग-समाजाची ध्येये आत्मसात करून मानव-समाजाला पूर्णावस्था प्राप्त होईपर्यंत त्याचे नेतृत्व करण्याचे सामर्थ्य या सत्याग्रही तत्त्वज्ञानांत आहे. भौतिक विद्या व यंत्रकला यांच्याशी त्याचा विरोध नाही. बाह्य सृष्टीशी कसे व्यवहार करावे आणि तिची नियति आपणास अनुकूल आणि उन्नतिकारक कशी बनवून घ्यावी, हे ज्ञान मनुष्यास भौतिक विद्येनेच

प्राप्त होणार आहे. अन्नमय प्राण आणि प्राणमय पराक्रम या भौतिक सत्याकडे प्राचीन भारताचे दुर्लक्ष झालेले नव्हते. बुभुक्षित मनुष्याला ब्रह्म हे अन्नाच्याच रूपाने प्रतीत होते आणि वेदान्ती मनुष्यासहि दोन प्रहरी बारा वाजले म्हणजे 'अन्न हे पूर्ण ब्रह्म' असे म्हणून भोजन करावे लागते, याची विस्मृति ठेवून कोणतीहि समाजरचना टिकणार नाही व टिकविण्याचा प्रयत्न केला तरी तो साधणार नाही. भांडवलशाही धनोत्पादन पद्धतीमुळे बहुसंख्य लोकांच्या भुकेचा प्रश्न समाधानकारकपणे सुटत नाही आणि श्रीमंत-गरिबातील सापेक्ष अंतर वाढत जाऊन समाजाचे व राष्ट्राचे दोन विरोधी गट पडतात. बहुसंख्य सामान्य जनतेला जीविताची व वित्ताची क्षणभरहि शाश्वति मिळत नसल्यामुळे तिची नीतिमत्ताहि भ्रष्ट होऊ लागते. 'बुभुक्षितः किं न करोति पापम्। क्षीणा नरा निष्करुणा भवन्ति॥' यात वर्णिल्याप्रमाणे सामाजिक नीतिमत्तेचा पाया अन्नप्राप्तीच्या भौतिक आधारावर उभारलेला आहे, इकडे सत्याग्रही तत्त्वज्ञान दुर्लक्ष करीत नाही. तथापि, मनुष्यसमाजाच्या आवश्यक भौतिक गरजा भागल्यानंतर भौतिक संपत्तीच्या वाढीच्या प्रमाणात त्याची नैतिक उन्नति होते अथवा त्याची संस्कृति अधिक उन्नत बनते, हे तत्त्व मात्र सत्याग्रहास सम्मत नाही. 'नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकान्तमनश्नतः' म्हणजे फार खाल्ल्यानेहि योगप्राप्ति होत नाही, त्याचप्रमाणे न खाल्ल्यानेहि योगप्राप्ति होत नाही, असा आध्यात्मिक उन्नतीचा सिद्धांत आहे.

**भारतात धनोत्पादन व धनविभाजन समाजवादाप्रमाणे झाले पाहिजे.**

भांडवलशाही समाजात अपरिमित भौतिक उपभोग घेणारा एक छोटा मालकवर्ग आणि त्याच्या आर्थिक दास्यात रखडणारा दुसरा बुभुक्षित बहुसंख्य सेवकवर्ग असे निर्माण होत असल्याने अशा समाजात शांततेची व नीतीची अपेक्षाच करता येत नाही. ज्या समाजातील बहुसंख्य लोकांना आपल्या जीविताची व जीवित-साधनांची मुळींच शाश्वति नाही, अशा समाजात शांतता व नीतिमत्ता नांदणे अशक्य आहे. हिंदुस्थानसारख्या खंडतुल्य राष्ट्रातील पस्तीस कोटी लोकसंख्येच्या पोटापाण्याचा प्रश्न भांडवलशाहीच्या व साम्राज्यशाहीच्या मार्गाने सोडविणे अशक्य आहे. आणि एवढ्या मोठ्या लोकसंख्येची जीवित-यात्रा सुखाने चालविण्याचे सामर्थ्य केवळ हस्तव्यवसायाच्या ग्रामोद्योगात अथवा छोट्या प्रमाणावरच्या वैयक्तिक शेतीत आहे, असे वाटत नाही.

शिवाय, एवढा मोठा भारतीय समाज हा केवळ आश्रमवासी ऋषींप्रमाणे सुखाविषयी विरक्त आणि आत्मिक सुखावर संतुष्ट राहील, ही गोष्टहि शक्य कोटीतील नाही. या खंडतुल्य भारताचा प्रश्न सोडविण्यास भौतिक विद्या आणि यंत्रकला यांचा भरपूर उपयोग केला पाहिजे व तो धनोत्पादनाचे व धनविभाजनाचे कार्य समाजसत्तेखाली आणूनच केला पाहिजे. पण ही समाजसत्ता स्थापन करताना व स्थापन केल्यावरहि सत्याग्रहीवर्गाची आवश्यकता भरतखंडालाच नव्हे, तर सर्व मानवसंस्कृतीलाहि आहे.

**भौतिक विद्या आणि आत्मिक विद्या यांची सांगड घालावयाची आहे.**

यापुढे भारतीय संस्कृति व मानवसंस्कृति असा भेद राहाणार नाही. भौतिक दृष्ट्या आज सर्व मानवसमाज एका कुटुंबात अथवा एका घरात आणून कोंडल्यासारखा झाला आहे. त्यातील लोकांना एकत्र नांदल्याखेरीज सुटका नाही व त्यांनी एकत्र नांदावे यातच मानवकुलाची उन्नति आहे. पण एका घरात एकत्र नांदणाऱ्या लोकांप्रमाणे त्यांनी बंधुभावनेने नांदावयास शिकले पाहिजे. येथून पुढे मानवसंस्कृतीची उन्नति या बंधुभावनेच्या प्रचारावर आणि प्रस्थापनेवर अवलंबून आहे. मानवांच्या अंतःकरणांतील या बंधुभावनेस प्रेम अशी संज्ञा आहे, आणि हा प्रेमरूप परमेश्वर प्रत्येकाच्या अंतःकरणांत वास करीत असतो, या सिद्धांतावर सत्याग्रही संस्कृतीचा आधार आहे. एका राष्ट्राकडून दुसऱ्या राष्ट्रावर अथवा एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी अत्यंत निकराचा लढा करीत असताहि या बंधुभावनेच्या अंतिम सिद्धांतावर सत्याग्रहीची दृढ श्रद्धा असते. मानवी अंतःकरणातील न्यायबुद्धि व प्रेमबुद्धि म्हणजेच सत्य आणि अहिंसा—याहून परमेश्वराचे श्रेष्ठ स्वरूप दुसरे कोणतेहि नाही. ज्यांचा सत्यावर व प्रेमावर विश्वास आहे आणि सत्यसंशोधन व सत्यसंस्थापन यासाठी करावा लागणारा त्याग व भोगावे लागणारे क्लेश सहन करण्याची ज्यांची तयारी आहे, ते आपणास सेश्वरवादी म्हणवोत किंवा निरीश्वरवादी म्हणवोत, ते बुद्धाप्रमाणे शून्यवादी असोत अथवा श्रीशंकराचार्यांप्रमाणे क्षर सृष्टीच्या बुडाशी अक्षर असे एक अव्यक्त निर्गुण तत्त्व आहे असे म्हणोत, ते खिस्ताचे अनुयायी असोत किंवा महंमदाचे अनुयायी असोत, त्यांना सत्याग्रही बनता येईल. सत्याग्रहीला आत्मविद्या लागते, पण त्या आत्मविद्येत गूढ किंवा विवादात्मक असे काही नाही. आत्मा हा रथी आहे, बुद्धि हा सारथी आहे, इंद्रिये हे घोडे आहेत

आणि मन हा त्यांचा लगाम आहे, एवढे अध्यात्मशास्त्र त्याला पुरे होते. बुद्धिरूप सारथी विषयोपभोगाने झिंगून जाऊ नये, त्याच्या हातचा मनोनिग्रहाचा लगाम ढिला पडू नये आणि विषयोपभोगांच्या पाठीमागे लागून इंद्रियरूपी घोडे मोकाट सुटू नयेत, एवढेच हे अध्यात्मशास्त्र आहे. बाह्यसृष्टीवर प्रभुत्व स्थापन करणे आणि समाजाच्या भौतिक सुखांचा प्रश्न सोडविणे हा व्यवहार करण्यास जशी भौतिक विद्येची आवश्यकता आहे, तशीच अंतःसृष्टीवर प्रभुत्व प्रस्थापित करण्याच्या व्यवहारास आत्मविद्येची आवश्यकता आहे. सत्याग्रही आत्मविद्या विवादासाठी नसून व्यवहारासाठी आहे. ग्रंथप्रामाण्य ही तिची कसोटी नसून अनुभवप्रामाण्य ही तिची अंतिम कसोटी आहे. केवळ भौतिक विद्येची उपासना करणारे लोक अंधःकारात पडतात आणि केवळ आत्मिक विद्येची उपासना करणारे त्याहूनहि घोर अंधःकारात पडतात, असे ईशोपनिषदाने म्हटले आहे. याचा अनुभव आधुनिक युरोपच्या इतिहासावरून आणि गेल्या दोन–तीनशे वर्षांच्या भारतीय इतिहासावरून जगाला आलेला आहे. आधुनिक भारताने त्याची अत्यंत अनिष्ट फळे भरपूर चाखलेली आहेत. तेव्हा यापुढे तो भौतिक विद्या किंवा आत्मिक विद्या यापैकी कोणाकडेहि दुर्लक्ष करील, असे वाटत नाही.

अनियंत्रित परकीय राजसत्तेतून स्वकीय लोकसत्तेत आधुनिक भारताचा प्रवेश झालेला आहे. यापुढे थोड्याच काळात, ज्या सत्याग्रही तत्त्वज्ञानाच्या आश्रयाने त्याला लोकसत्तेचीहि प्रस्थापना करता आली, त्याच्याच आश्रयाने तो समाजसत्तेचीहि प्रस्थापना करील. पण समाजसत्ता हाहि भारताचा अंतिम संदेश नव्हे. भारताचा अंतिम संदेश आत्मसत्ता हा आहे. या आत्मसत्तेची प्रस्थापना होऊन मानवसमाजाला दंडधारी राजकीय संस्थांची मुळींच गरज उरली नाही, म्हणजेच खरी एकवर्गसमाजरचना स्थापन होणार आहे. आधुनिक काळातील एकवर्ग-समाजाचे ध्येय आणि प्राचीन ब्राह्मण्याचे ध्येय यात फारसे अंतर नाही व सत्ययुगात केवळ एकच ब्राह्मणवर्ग होता, त्याचप्रमाणे पुनः समाजाला अशी एकवर्गी अवस्था प्राप्त व्हावी, हीच मानवसमाजाची पूर्णावस्थेची कल्पना भारताच्या अंतःकरणात समाजवाद आत्मसात केल्यानंतर निर्माण होईल.

✕ ✕ ✕

# ७. विश्व मोठें, पण माणूस त्याहूनहि मोठा !

**श्रीपाद महादेव माटे**

विश्व अनंत आहे आणि मानवप्राणी अगदीच क्षुद्र आहे. हा विचार वस्तुतः मनाला मरगळ आणणारा आहे; पण नेमक्या याच विचाराच्या पार्श्वभूमीवर मानवाच्या वैशिष्ट्याची आणि कर्तृत्वाची महति प्रा. श्री. म. माटे यांनी प्रस्तुत लेखात पटवून दिली आहे; आणि तीहि आपल्या स्वतंत्र वेधक शैलीने. प्रा. माटे (जन्म १८८६–मृत्यु १९५७) हे आधुनिक महाराष्ट्रातले एक थोर बहुश्रुत विचारवंत, साहित्यिक तसेच समाजसेवक. सामाजिक दुःखाविषयी त्यांचे मन अखंड जागृत असल्यामुळे त्यांनी जे विपुल कथालेखन केलेले आहे ते सामाजिक करुणेने ओतप्रोत भरलेले आहे. सामाजिक दुःखाच्या निराकरणाइतकीच त्यांना विज्ञानबोधाच्या वाढीची विलक्षण तळमळ आहे. विज्ञानाविषयी आस्था वाढविणारे प्रभावी लेखन मराठीत प्रथम प्रा. माटे यांनीच केलेले आहे. पुन्हा त्यांनी सगळे लेखन आपल्या खास कमाविलेल्या शैलीतून केलेले आहे. माट्यांची शैली हे मराठी गद्यलेखनाचे एक बहुमोल भूषण आहे. खालील उताऱ्यातहि या शैलीचा प्रत्यय येण्यासारखा आहे. हा उतारा त्यांच्या 'विज्ञानबोधाची प्रस्तावना' या पुस्तकातून घेतलेला आहे.

## विश्वाचे अनंतत्व आणि माणसाची क्षुद्रता

विश्वाच्या एवढ्या विस्तीर्ण व्यापात माणसाचे महत्त्व किती मानावे हा मोठा मनोरंजक प्रश्न आहे. विश्व केवढे असेल याची शास्त्रज्ञांनी कल्पना केली आहे. पण ती कल्पनासुद्धा ते निश्चित म्हणून सांगतात असे नाही. अमुक एका मर्यादेपर्यंत हा अवकाश अथवा ज्याला जुन्या भाषेत दिक् म्हणून म्हणतात ती असेल तर त्याच्या पुढे काय असेल हा प्रश्न शिल्लकच उरतो. त्याचे काही अंदाजी उत्तर दिले तर त्याच्या पलीकडे काय आहे हा प्रश्न पुन्हा शिल्लकच राहाणार. विश्व हे गोलाकार आहे असे म्हटल्याने भागण्यासारखे नाही. ते तसे असेलहि. पण या गोलाकार वस्तूच्या बाहेरल्या अंगाला काय आहे हा

जिज्ञासूचा प्रश्न तर्कास धरून आहे असे म्हणावयास हवे. म्हणून त्याच्याहि पलीकडे काय आहे हा प्रश्न शिल्लक राहातो. म्हणजे असे की अवकाशाच्या ज्या भागात पृथ्वीसकट सर्व नभोगोलक फिरत राहिले आहेत तो भाग संपल्यानंतर फार झाले तर आणखी दुसरे गोलक नाहीत एवढे विधान कदाचित पत्करता येईल. पण गोलक नसले तरी तेथे पोकळी किंवा अवकाश हा असावयासच हवा ही अपेक्षा शिल्लक उरते. म्हणूनच अनंत या शब्दाचा उपयोग पूर्वजांनी केलेला आहे. त्यांचे अनंतत्व आपल्या सध्याच्या अनंतत्वाच्या मानाने अगदी नजीक असेल इतकेच काय ते; पण त्यांच्यापेक्षा आकाशाची आता जरी जास्त माहिती झाली असली तरी अनंतत्व हे शिल्लकच राहाते. हे दिक्‌संबंधाने झाले. कालाचेहि असेच आहे. पृथ्वी उत्पन्न होऊन अमुक वर्षे झाली, हे पत्करून त्याच्या मागे गेले म्हणजे जे काय होते ते किती युगे आहे हा प्रश्न, व त्याचे काही अंदाजी उत्तर मिळाल्यानंतर त्याच्या मागे काय होते असा प्रश्न विचारीत विचारीत अनंतत्वाची बाधा होईपर्यंत मागे जाता येते; तसेच हे सर्व विश्व विकृत व क्षीण होत होत जाईल व शेवटी सर्व आकाश काही एका प्रकारच्या तेजस्वी धुक्याने भरून राहील असे जे शास्त्रकारांचे म्हणणे ते मानल्यावर त्याच्या पुढे काय हे विचारणे शिल्लकच उरते. अत्यंत दूरचा भविष्यकाळ कल्पिल्यानंतर सुद्धा त्याच्या पुढे काय असे विचारावेसे वाटणारच; व शेवटी हे अनंत आहे म्हणजे स्थल व काल यांचा अंत मानवी मनाला कल्पिता येत नाही असे शेवटी होते. एवढ्या अवाढव्य अनंतत्वात आकाशस्थ गोलक एकंदर अवकाशाच्या मानाने फार थोडे आहेत. गोलकांची संख्या व परस्परसापेक्ष स्थळे यासंबंधीच्या कल्पना कोणच्याहि ठरल्या तरी एकंदर अवकाशातील फार थोडा भाग ते व्यापतात हेहि खरे आहे. आता या अनंत कोटी ब्रह्मांडांपैकी सूर्य नावाचा जो एक बारीकसा तेजस्वी कण आहे त्याच्याभोवती फिरणाऱ्या एका अत्यंत क्षुद्र व निस्तेज अशा पृथ्वी नावाच्या एका लहानशा परमाणूवर प्राणी नावाची जी एक अत्यंत नश्वर अशी कोटी आहे, तिच्यात मनुष्य नावाचा जो एक अल्पायुषी प्राणी आहे तो म्हणजे आम्ही अशी स्थिति आहे. ही पृथ्वी केवढी असावी याची कल्पना येण्यासाठी म्हणून शास्त्रकारांनी जो एक दाखला दिला आहे तो येथे घेण्यासारखा आहे. माहीत असलेल्या व ज्याचे छायाचित्र घेता येण्यासारखे आहे, त्या विश्वाचे जर एक छायाचित्र घेतले

व आपले आशिया खंड जेवढे आहे तेवढा जर त्या चित्राचा विस्तार केला तर तेवढ्या नकाशात आपली पृथ्वी ही सरासरी एका गांधिल्माशी एवढी दिसेल; इतकाच तिचा सापेक्ष आकार आहे. अशा या पृथ्वीवर असलेल्या मानवप्राण्याने आपल्याकडे किती महत्त्व घ्यावे हा खरोखर फारच मोठा प्रश्न आहे. या प्राण्याने सगळे विश्व आपल्यासाठीच उत्पन्न केले आहे असे मानीत राहाण्याचा काळ पूर्वी होता. पण आकाशाचे अनंतत्व व आकाशस्थ गोलकांची संख्या व अंतरे ही ध्यानात येऊ लागल्यापासून माणसाची ही अहंता अगदी गळाली व आपल्या क्षुद्रत्वाची प्रतीति त्याला येऊन चुकली. आपल्यासारख्या नश्वर व अल्पायु प्राण्यासाठी हे सर्व विश्वाचे अवडंबर करणाराने केले असेल किंवा ते आपोआप उद्‌भवलेले असले तर आपण आपल्यालाच त्याचे मध्यवर्ती कल्पावे हे त्याला वेडेपणाचे वाटू लागले.

**शेवटी अध्यात्मवादी आणि शास्त्रकार दोघेहि अगतिक !**

हा वेडेपणा जास्तच प्रत्ययास येण्याला आणखी एक गोष्ट कारण झाली. मनुष्यप्राणी हा कर्त्याचा मोठा लाडका व खुद्द विश्वकर्ता हा त्याच्यासाठी त्याच्याच रूपाने पृथ्वीवर अवतरतो, ही आपली कल्पना; तसेच मनुष्यप्राणी हा कर्त्याने आपल्या स्वरूपाबरहुकूम बनविला व आपल्या उच्छ्वसिताने त्याला 'जीवदान' केले ही खिस्ती कल्पना; मानवप्राण्याची वाढ अगदी शेवाळेरूप अशा वस्तूपासून झालेली आहे, या शास्त्रीय ज्ञानाने अगदी लटकी ठरविली. आपण स्वतःस मानीत होतो तसे आपण नाही ही अवमानकारक जाणीव माणसाला प्राप्त झाली. अशा या मनुष्यप्राण्यासाठी या सर्व विश्वाची भव्य रचना विश्वकर्त्याने केली असेल अथवा ती आपोआप झाली असेल असे काही मानणे खरोखरच अगदी बालिशपणाचे आहे. याच विचाराच्या प्रणालीने आणखी थोडेसे पुढे जाता येते. शास्त्रकारांचे म्हणणे आहे की, ज्यावेळी मानवप्राणी अस्तित्वात आला नव्हता त्यावेळी विश्व अर्थातच होते; व ते कित्येक कोटि वर्षे आधी अस्तित्वात होते. नंतर माणसाचा जन्म झाला. मनुष्य हा मनुष्यप्राणी या संज्ञेला प्राप्त होऊन आज फार झाले तर तीन लक्ष वर्षे झाली असतील. पण याच्या आधी विश्वाचा पसारा होताच. तसेच मानवी प्राण्याचे भावी जीवितहि विश्वाच्या मानाने मर्यादितच आहे. म्हणजे मानवप्राणी नष्ट झाल्यानंतर सुद्धा

पुढे विश्व राहाणारच आहे. अशा प्रकारे दोन्ही टोकी सुदीर्घ असलेला हा जो काळ त्याच्या एका लहानशा खंडात मानवप्राणी हा उत्पन्न होऊन विलयास जाणार आहे. असे जर आहे तर त्याने आपणाकडे एवढे महत्त्व का ओढून घ्यावे? हा प्रश्न खरोखरच फार समर्पक आहे. अंधाऱ्या रात्री एखाद्या विस्तीर्ण पठारावर गार वाऱ्याच्या सोसाट्यात बसलेल्या एखाद्या एकाकी माणसाने ज्याप्रमाणे भोवताली डोळे लुकलुकत बघत बसावे, तशीच स्थिति दिक्कालांचे भव्यपण लक्षात घेता त्याच्या मनाची होते व आपले लघुत्व त्याच्या मनात अधिक अधिक बिंबत जाऊन शेवटी वेदान्त्याच्या मनाला जी मर्गळ यावयाची तीच याच्याहि मनाला आल्याशिवाय राहात नाही. तो मनात म्हणतो की, ज्याला हा एवढा विचारच करावयाचा नसेल त्याची गोष्ट अलाहिदा, पण ज्याला करावयाचा असेल त्याचे मन दिक्कालांच्या विस्तारात झेपावत राहून लघुत्वप्रतीतीने शेवटी निराश झाल्याशिवाय कधीहि राहाणार नाही. वेदान्ती तरी सर्वस्वत्यागाला यामुळे उन्मुख होतो. त्याला जे औदासीन्य प्राप्त होते तेहि यामुळेच होते. आधिभौतिक शास्त्री झाला काय किंवा बुद्धिदृष्ट्या जगाचा विचार करणारा वेदान्ती झाला काय, दोघेहि शेवटी एकाच मुक्कामाला येतात. पूर्वीच्या वेदान्त्याला विश्वाचा विस्तार एवढा आहे हे आताच्यासारखे तपशिलाने माहीत नसेल इतकेच, पण त्याच्याहि तोंडी परमेश्वराचे वर्णन करताना 'अनंतकोटी ब्रह्मांडनायक' हा जो शब्दप्रयोग येतो त्यावरून अशा प्रकारची ब्रह्मांडे अनंत कोटी असावीत हे त्याच्याहि मनाला कळलेले होते हे दिसून येते. म्हणून दोघांचीहि शेवटी विचाराची परिणति एकच आहे. पण तेथे पोहोचल्यावर तो असे समाधान उत्पन्न करून घेणार की असे जरी असले तरी या विश्वाला कोणी तरी कर्ता असलाच पाहिजे; त्याचे स्वरूप मला उकलिता येत नसेल व वर्णिता तर बिलकूलच येत नाही. पण अशा प्रकारे कोणी एखादा घटना करणारा असावा हे तर्कप्राप्त आहे, व म्हणून असा कोणी असेल त्याच्यापुढे माझे शिर मी नमवितो व या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी त्याच्यावर सर्व भार टाकतो. इकडे शास्त्रकार मात्र मनाची जी असहाय स्थिति वर्णिली तिच्यातच राहाणार व जर कर्ता मानावा तर त्याचा तरी कर्ता कोण या अनवस्थेत सापडून अनिश्चयाच्या बाधेने व्यग्र होऊन गप्प बसणार. म्हणजे शेवटी हिशेब एकच आला !

**क्षुद्र मानवालाहि स्वतंत्र महत्त्व आहे.**

आता या ठिकाणी एक स्वतंत्र विचार आपल्या मनात उत्पन्न होतो व त्याच्या योगाने उत्पन्न होणारी ही जी असहाय व निराशेची स्थिति ती नष्ट होण्याला जागा उत्पन्न होते. ज्या गोष्टी, आमचे लघुत्व सिद्ध करण्यासाठी, शास्त्रकार पुढे मांडतात त्याच गोष्टींच्या आश्रयाने आम्हास या स्थितीतून थोडेबहुत तरी बाहेर पडता येते. मनुष्यप्राणी हा अल्पायु व निर्बळ खरा. पण इतर सर्व वस्तुजातापेक्षा आपण श्रेष्ठ आहोत ही भावना त्याच्या चित्तात उत्पन्न होणे हे अगदी क्रमप्राप्त आहे. सूर्य तेजस्वी असेल पण सूर्याला मन नाही. नवग्रह कांतिमान् असतील पण आम्हीच त्यांच्यावर आरोपित केलेले जे गुण आहेत ते काढून घेतले म्हणजे त्यांनाहि मने नाहीत हेच शिल्लक उरते. जोरजोराने धडधडत असलेल्या प्रचंड होळ्यांपलीकडे त्यांची काहीच किंमत नाही. ते जळत राहिले आहेत इतकेच काय ते; पण त्यांचे त्यांना स्वत्त्वाचे ज्ञान कोठे आहे? पण ज्याला पामर म्हणून म्हटले त्या मानवप्राण्याचे काय वैभव आहे पहा! त्याला मन नावाची काही चमत्कारिक वस्तु लाभलेली आहे. तिच्या बळावर तो सर्व विश्वाचा विचार करतो; इतकेच काय, पण स्वतःकडे सुद्धा तिऱ्हाईत दृष्टीने पाहू शकतो. माणसाहून सहस्रपटींनी दीर्घ जीविताच्या, तेजस्वी व बलिष्ठ अशा कोणत्या वस्तुजाताला हे वैभव प्राप्त झाले आहे? आधिभौतिक शास्त्रकारांच्या मताने सुद्धा मनुष्य प्राण्याची वस्ती ही केवळ ह्या पृथ्वीवरच आहे; मग सूर्य कितीहि मोठा असो, विश्व कितीहि विशाल असो, व पृथ्वी कितीहि गारठलेली असो! हे इतर वस्तुजातांच्या वैभवाचे नतोन्नत भाग लक्षात घेता मानवप्राण्याचे स्वतंत्र महत्त्व जलदीने मनात भरते. त्याला लांबवर पाहाता येते व त्याला अनुमानिता येते. ज्या गोष्टी प्रत्यक्ष दिसत नाहीत व त्याच्या दूरदर्शिकेतहि सापडत नाहीत त्या अमुक ठिकाणी असल्या पाहिजेत असा कयास तो गणिताने बांधतो व काही दिवसांच्या शोधानंतर असे दिसून येते की, हा त्याचा कयास खरा होता. हिमालयाचे कांचनगंगा हे शिखर फार मोठे यात काहीच शंका नाही. चंद्र हा आपल्या सुशीतल तेजामुळे अत्यंत सुशोभित दिसतो हेहि खरेच आहे; व सूर्य हा सर्व तेजाचे उगमस्थान हेहि खरे; पण यांच्याच्याने असे कयास कधी झाले आहेत काय? मी कोण आहे अशी गर्जना आपल्या प्रचंड तोंडाने

हिमालयाने कधी केली आहे काय? चंद्राला आपल्या सौंदर्याचा अभिमान कधी वाटला आहे काय? त्यांच्या हातून यातले काही एक झालेले नाही. पण चुटकीने ज्याचा प्राण सहज घेता येईल असा जो मानव नावाचा ओल्या मातीचा पिंड तो हे सर्व करतो. एक मन या शब्दाने जरी या वस्तूचा बोध होत असला तरी त्या वस्तूला सहस्र अंगे उत्पन्न झालेली आहेत. आणि इंद्राच्या अंगच्या हजार डोळ्यांना जसे विश्वाकडे पाहता येते तसे या मनाच्या हजारोहूनहि अधिक डोळ्यांना विश्वगोल निरखिता येऊन वरती स्वतःचे परीक्षणहि करता येते. असे वैभव ज्याला प्राप्त झाले त्याला स्वतःच्या संबंधाने श्रेष्ठपणाची कल्पना वाटू लागली तर त्यात अस्वाभाविक असे काय आहे बरे! इतर वस्तु-जात हे प्रत्येक माणसापेक्षा अधिक बलवान आहे हे खरे; पण मनबुद्धींच्या बळावर दिवसेंदिवस अधिक उन्नत होत चाललेल्या मानव्यापेक्षा हे बलवत् वस्तुजात अधिक महत्त्वाचे आहे असे मानावयाचे कारण नाही. इतकेच नव्हे, तर त्याच्याइतके महत्त्वाचे आहे असेहि मानावयाचे कारण नाही.

**एवढेच नव्हे, त्याची बुद्धि विश्व जिंकू पाहात आहे!**

पूर्वीच्या काळी विश्वाची कल्पना सध्याइतकी भव्य व सध्याच्या इतपतहि निश्चित नसल्यामुळे माणसाने पृथ्वीवरील व डोईवरील सर्व वस्तुजात आपल्या-साठीच झाले आहे असे मानिले. अधिक ज्ञान झाल्यावर हा त्याचा सर्व गर्व गळाला. पण असे जरी झाले तरी आपल्या सचेतनत्वाच्या मुद्द्यावर व मन-बुद्धींच्या विलासाच्या बळावर आपण इतर वस्तुजातापेक्षा श्रेष्ठ आहो असे त्यास वाटणे अगदी बरोबर आहे. आपल्या बुद्धीच्या बळावर सृष्टिरचनेची नियमने हुडकून काढून त्यांना आपल्या सेवेला लावून तो आपले सामर्थ्य दिवसेंदिवस वाढवीत आहे व जे वस्तुजात त्याला यापूर्वी आपल्याहून श्रेष्ठ वाटत असे ते आता तो आपल्या पायातळी घालू लागला आहे. एवढाले प्रचंड भरलेले समुद्र पण ते त्याने हातातील आचमनाच्या पाण्यासारखे लहान करून टाकले आहेत. हजारो मैलांच्या अंतरावरून एकमेकांचे बोलणे ऐकावे व चेहरेसुद्धा पाहावे अशी योजना करून दुरावलेले वस्तुजात त्याने सन्निध आणिले आहे. सृष्टीने आपल्या गर्भात ठेवलेली उत्तमोत्तम धने त्याने आपल्या ज्ञानाच्या बळावर बाहेर काढली आहेत व त्यांचा उपयोग तिच्या पदरी असलेली नवी नवी धने हस्तगत करण्याच्या कामी तो करीत आहे. ज्या हिमालयाची टाळू

कधी कोणी आजवर पाहिली नव्हती ती गरुडाप्रमाणे तिच्याभोवती गिरक्या घालून त्याने संथपणे पाहिली आहे. व ज्या अढळ ध्रुवाच्या खाली आजवर कधी कोणी जाऊ धजला नाही, त्या ठिकाणी शिरून सृष्टीचे सगळे हृद्गत त्याने हस्तगत केले आहे. उत्तरोत्तर या दगडमातीच्या भुईवर आपल्या गोजिरवाण्या पायाने चालणे हे अपमानाचे आहे असे समजू लागून पृथ्वीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत तो पक्ष्याप्रमाणे गगनसंचार करीत चाललेला आहे. पण एवढ्यावरच त्याची आत्मबलाची साक्ष थांबावयास तयार नाही. येथे बसूनच आकाशातील दूरस्थ गोलकांवर काय हालचाली होत आहेत याचेहि निरीक्षण तो करीत आहे; व सुमार दिसतो की, लवकरच डोक्यावरील एखाद्या परलोकाशी तो काही तरी संबंध उत्पन्न करील. ज्याने इतके केले आहे व आत्मसामर्थ्याच्या प्रत्ययामुळे वाटेल तितके करीन असे ज्यास वाटत आहे त्याला आपल्या श्रेष्ठतेविषयीची अहंता प्राप्त झाली तर त्यात काहीच गैर नाही. त्याला हा विजयाचा मद चढलेला आहे. त्याला कळून चुकले आहे की, या सर्व वस्तुजाताला काही एक हिशेब आहे; याला काही एक न्याय आहे; हा हिशेब व हा न्याय शोधून काढण्याला लागणारी बुद्धीहि आपल्यापाशी आहे, व याच्याहि वर म्हणजे शक्ति, आकार इत्यादि प्रकाराने जरी अनेक वस्तु आपल्यापेक्षा प्रचंड दिसत असल्या तरी ही जी बुद्धि म्हणून सांगितली तिच्या जोरावर या सर्वांचे बलहरण करता येण्यासारखे आहे.

**मानवप्राणी दोन लक्ष वर्षे केवळ खात, पीत, प्रजोत्पादन करीत राहिला काय ?**

अशा या बुद्धिमान माणसाची कर्तबगारी टिकून राहाणे शक्य आहे काय ? त्याने यापूर्वी अशी संस्कृति उत्पन्न केली नव्हती काय ? केली असली तर तिचे काय झाले ?

शास्त्रवेत्त्यांचा आग्रह काहीहि असो; मानवी जीविताची परिणति सध्या झाली आहे तितकी पूर्वकाली कधीहि झाली नव्हती असे ठाम मत पत्करण्यास मन धजत नाही. त्यांचा आग्रह असा आहे की, 'मनुष्य' या संज्ञेला मानवप्राणी जेव्हा पात्र झाला, तेव्हापासून तो आतापर्यंत त्याच्या दहा सहस्र पिढ्या होऊन गेल्या आहेत. अब्जावधि लोकांची एकएक रांग अशा दहा सहस्र रांगा भविष्यत्कालातून मजल दरमजल वर्तमानाकडे येऊन भूतात विलीन झाल्या आहेत. पण या एवढ्या सुदीर्घ मालिकेतील शेवटच्या पाचसहा

पिढ्यातच काय ती मानव्याची इतकी प्रगति झालेली आहे. बाकी सर्व झुंडीच्या झुंडी, सृष्टीची नियमने शोधिली पाहिजेत हा जो ज्ञानप्राप्तीचा मूलभूत विचार त्याला पारख्याच राहून गेल्या. मारावे, खावे, प्रजोत्पादन करावे; पेरावे, खावे, प्रजोत्पादन करावे; अपहरावे, खावे, प्रजोत्पादन करावे; खणावे, घडावे, खावे, प्रजोत्पादन करावे; बांधावे, विस्तारावे, खावे, प्रजोत्पादन करावे; येवढाच उद्योग माणसे करीत आली. त्यांनी थोडे आजूबाजूस पाहिले, नाही असे नाही; थोडे आकाशाकडेहि पाहिले व स्वतःचे प्रकृतिमानहि अवलोकिले आणि ज्योतिष व औषधि ही शास्त्रे थोडीबहुत निर्मिली; पण ही सोडिली तर ऐहिक सृष्ट वस्तूंचा उपभोग घेण्यासाठी जे काय करावे लागले ते करण्यापलीकडे त्यांची उडी गेली नाही. भोवताली जे वस्तुजात दिसते त्याच्या जीविताच्या इतिहासातील घडामोडी कोणच्या आणि त्याच्या जीवितातील सद्यःकालीन नियमने कोणची याची चवकशी करण्याचे त्यांनी मनातहि आणिले नाही. हे मत पतकरणे जड वाटते, असे वर म्हटलेच आहे. ह्याची कारणेहि देता येण्यासारखी आहेत.

ज्या दोन लक्ष वर्षांसंबंधी हा शेरा आहे त्यांचा इतिहास जर विद्यमान असता तर हे म्हणणे त्यातील पुराव्यावरून निष्पन्न म्हणून पतकरता आले असते. पण असा इतिहास उपलब्ध नाही. जो काही इतिहास आहे तो फार फार तर सात हजार वर्षांचाच आहे. व त्यातहि दोन तीन राष्ट्रे सोडली तर, पाच हजारांचा केवळ अनुमित केलेला असा आहे. एवढ्या माहितीच्या बळावर वरील सिद्धांत प्रस्थापिता येत नाही. इतिहासाच्या अभावी पूर्वी केव्हाहि सध्याइतकी प्रगति झालेली नव्हती, हे मत जर पतकरवत नाही तर त्याच कारणास्तव ती झालेली असेल हे मतहि पतकरण्यासारखे नाही असे कोणी म्हणेल. पण प्रस्तुत म्हणणे इतकेच आहे की, अशी प्रगति पूर्वी झालेली असणे संभाव्य आहे; झाली होती असे ठाम मत सांगावयाचे नाही; तथापि हा संभव पुष्कळच बळकट आहे असे मात्र म्हणावयास हरकत नाही. ज्या कोणत्या कारणास्तव माणसाच्या बुद्धिसामर्थ्यात गेल्या शतक दोन शतकात इतका विलक्षण फरक पडला ती कारणे—मग ती मनुष्यपिंडगत असोत किंवा मनुष्यपिंडनिरपेक्ष असोत—कोणती हे कोणासहि कळलेले नाही व म्हणून ती कारणे पूर्वी केव्हाहि उपस्थित झाली नव्हती असे म्हणता येत नाही. मनुष्याच्या बुद्धीला उत्क्रान्त होण्याला

इतक्या पिढ्या रेंगाळावे लागते व दहा सहस्र संख्या पुरी होण्याच्या वेतात आल्याबरोबर एकदम अपूर्व असे स्फुरण तिला प्राप्त होते असे म्हणणे नियम-प्रेमाचे द्योतक असेल, पण तारतम्याशी विसंवादी दिसते. सध्या जो प्रकार घडत आहे, तो पूर्वी केव्हा घडावयास सृष्टिविशेषांची अडचण होती असे शास्त्रज्ञांना म्हणता येत नाही. उलट असे मात्र म्हणता येते की, सृष्टिव्यापात काही एक स्थितिविशेष प्राप्त झाला, म्हणजे पृथ्वीवर उत्पात होतात, हिमप्रलय होतात व मानवी जीविताचा स्वाहाकार होतो. मनुष्यप्राणी सर्वच्या सर्व नष्ट व्हावे इतका सार्वत्रिक स्वाहाकार होतो असे नव्हे; पण त्याच्या योगाने प्रलय झाला असे मात्र खासच मानता येते. असे स्वाहाकार पूर्वी कितीदा झाले हे अनुमानिता येत नाही. पण प्रत्येक लोकसमूहाच्या पुराणग्रंथात अशा स्वाहाकारांचे वर्णन आढळून येते. त्या त्या कालापर्यंत माणसाने जे काही बनविले असेल, रचले असेल, कल्पिले असेल, ते सर्व किंवा सर्वकल्प नष्ट होऊन जाते व माणसे पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या' या न्यायाने झगडू लागतात. पूर्वी माणसांनी रचलेली संस्कृति आणि मिळविलेली ज्ञाने नाहीशी होतात व काही अवशिष्ट राहिली तर ती पुरेशी बोधक राहात नाहीत म्हणून पुढील युगमानाला पायारूप बनण्याच्या योग्यतेचीहि ती नसतात. अशाप्रकारे संस्कृतीचे वर्धन माणसांनी करावे व तिचे हनन सृष्टीने करावे असा प्रकार आजवर अनेकदा झालेला असणे अगदी शक्य आहे.

**विविध ज्ञानशाखांचा उगम व विस्तार कसा झाला ?**

पूर्वी झालेल्या संस्कृति थेट आताच्या सारख्या असतील व पैदा झालेली ज्ञाने सध्याच्या सारखीच असतील असेहि हटकून मानता येत नाही. सध्याच्या ज्ञानांचे उगमस्थान म्हणजे पुष्कळसे आकस्मिक प्रसंगच होत. त्यातून उगम पावून पुढे मात्र पद्धतशीर रीतीने वाट काढीत काढीत ही ज्ञानगंगा वाहात चालली आहे. अन्य युगात हेच आकस्मिक प्रसंग घडून आले असतील व ते पुढील ज्ञानविशेषांचे उगमस्थान ठरले असतील असे नाही. अर्थात् त्या संस्कृति आपल्या संस्कृतीहून भिन्न असू शकतील. त्या त्या ज्ञानविशेषांचे परिणाम त्यांच्या समाजरचनेवर होऊन त्या रचना आपल्या समाजरचनेहून भिन्न झालेल्या असणे अगदी संभाव्य आहे.

वास्तविक पाहता शास्त्रांचे मूलारंभ हे माणसाच्या शुद्ध जाणिवेने झाले असे

म्हणवत नाही. त्याला देव हवा होता. त्याला परीस हवा होता. त्याला अमृत हवे होते. त्याला आरोग्य हवे होते. यासाठी त्याची जोराची धडपड चालू होती. ज्ञानाच्या अगदी मूळच्या अणुरेणूपर्यंत येऊन पोहोचावयास त्याने किती हजार वर्षे खाल्ली हे कळावयास मार्ग नाही. पण सृष्टीच्या उत्क्रांति व्यापारात त्याच्या वाटणीला जी वर्षे आली आहेत, त्यापैकी कित्येक सहस्र या लहानशा व्यापारात खर्ची पडली असली पाहिजेत हे निःसंशय आहे. शास्त्रज्ञांच्या मते "आपल्या ह्या पृथ्वीला जन्मून सुमारे दीड अब्ज वर्षे झाली असतील. यापैकी निम्मी वर्षे जिवाला उत्क्रांतिव्यापारात मासा किंवा किडा येथपर्यंत येऊन पोहोचावयास श्रम करावे लागले. उरलेल्या ७५ कोटि वर्षांपैकी नऊदशांश वर्षे धडपड करता करता हा जीव सस्तन प्राण्यापर्यंत येऊन ठेपला. तेथून एक कोट वर्षांनी मनुष्यरूप पावून तो सरासरी एस्किमोच्या दर्जापर्यंत येऊन पोहोचला. या दर्जापासून पॉलिनेशियनपर्यंत येऊन पोहोचण्यास माणसाला दहा हजार वर्षे लागली. येथून पुढे त्याला काही संस्कृति प्राप्त झाली. तेथून आजच्या दर्जाला येण्याला पाचसहा हजार वर्षे लागली. पण या गेल्या शंभर वर्षांत मात्र माणसाने इतकी प्रगति केली आहे की, जी त्याच्याने पूर्वी हजारो वर्षांत झाली नाही." आता या सुदीर्घ जीवितात ज्याला शास्त्रज्ञान म्हणून म्हणता येईल त्याच्या आरंभापर्यंत येऊन पोहोचावयास त्याने किती वेळ खाल्ला हे सांगणे अशक्य आहे. पण एवढे मात्र दिसून येते की, त्याने वेळ कितीहि घेतला असला, तरी वर सांगितलेला जो चतुर्विध हव्यास त्यानेच माणसाला शेवटी शास्त्राच्या मार्गावर आणून सोडिले. कार्यकारणभावाची कल्पना त्याला कोणत्याहि इतर कल्पनांपेक्षा आधी आली, व हे जे काही डोळ्यापुढे दिसत आहे त्याला कोणी तरी कर्ता असावयास पाहिजे असे त्याच्या मनाने घेतले. इतके हाल असताना सुद्धा व अपरिमित संकटे असताना सुद्धा जगत राहाण्यात विशेष मौज आहे हे त्याने ओळखिले; व जर जगावयाचे तर आपल्याला काही दुखणेबहाणे होता कामा नये हेहि त्याने पाहिले. यातून ज्योतिष व औषध ही दोन शास्त्रे जन्मली. यापुढे कित्येक सहस्र वर्षांनी धातूची कल्पना आल्यानंतर, त्यातहि सुवर्णाची योग्यता कळल्यानंतर, ते हाताशी पुरेसे असावे म्हणून त्याला परीस हवासा वाटू लागला; व आपण काही किमया केल्याने प्राप्य वस्तु आपल्याला प्राप्त होतील असेहि त्याच्या मनाने घेतले. यातून रसायन व पदार्थविज्ञान ही शास्त्रे निघाली. पण एखाद्या खिंडारातून ज्याप्रमाणे

राजमंदिराला वाट असावी, त्याप्रमाणे असल्या या हव्यासांतून जन्म पावलेली ज्ञानाची भूक शेवटी शास्त्रज्ञानांचे अत्यंत उत्तेजक असे रूप घेऊन आपला व्यापार करू लागली. गेल्या थोड्याशा वर्षांत तिने आपला व्यापार जोराने चालू ठेविला आहे. युद्धोत्तर काळात तर ही शास्त्रज्ञानाची प्रगति केवळ कल्पनातीत झाली आहे. आणि हे संशोधनाचे मादक पेय प्यालेला मानव-प्राणी 'मोठमोठाल्या गोष्टी यापुढे मी साध्य करीन' असे म्हणू लागला आहे.

× × ×

# ८. जीवनकला

## दत्तात्रेय बाळकृष्ण कालेलकर

आधुनिक मराठीत कलातत्त्वविवेचन भरपूर झाले आहे. कला ही एक स्वतंत्र निष्ठा आहे, कलासाधना आणि जीवनसाधना या दोन वस्तु परस्परनिरपेक्ष आहेत, असे मानणारा त्यात एक पक्ष आहे आणि कला ही जीवनसापेक्ष असली पाहिजे, जीवनमूल्यांना मन:पूर्वक व समजून साथ देणारी असली पाहिजे असे मानणारा त्यात दुसरा पक्ष आहे. आचार्य द. बा. ऊर्फ काकासाहेब कालेलकर (जन्म १८८५) हे दुसऱ्या पक्षाचे एक प्रभावी पुरस्कर्त आहेत. सदाचाराचे संगीत ऐकविणाऱ्या कलेचे प्रस्तुत लेखात त्यांनी समर्थन केलेले आहे. हे समर्थन आत्मप्रतीतीच्या रसाने संपन्न असल्यामुळे त्यातील विवेचनाला एक वेगळीच गोडी प्राप्त झालेली आहे. प्रस्तुत लेख त्यांच्या 'जीवनातील आनंद' या पुस्तकातून घेतलेला आहे.

कालेलकरांची एक खास गद्यलेखनशैली आहे. तिच्यातून त्यांच्या धर्मसमृद्ध व्यक्तिमत्वाचा सुगंध दरवळलेला आहे. 'हिमालयाचा प्रवास', 'लोकमाता', 'जीवनातील आनंद', 'हिंडलग्याचा प्रसाद' ही त्यांची पुस्तके वाचली असता शुभमंगल जीवनतत्त्वांवरील आस्था वाढविणाऱ्या त्यांच्या नागर शैलीचा उत्कृष्ट परिचय होण्यासारखा आहे. 'स्मरणयात्रा' हे त्यांचे आत्मचरित्रात्मक पुस्तक सद्भावना जागृत करणाऱ्या सौंदर्याने संपन्न आहे.

**जीवनाच्या अभ्यासातून कलेचे भान झाले.**

सुदैवाने कलेचे भान मला फार उशीरा आले.

लहानपणी किंवा मोठेपणी शाळेतील शिक्षणाला मी माझ्या जीवन-विकासाच्या आड येऊ दिलेच नाही. अगदी लहानपणापासून मी निसर्गाच्या मांडीवरच खेळत खेळत मोठा झालो आहे. माझ्या लहानपणीचा आनंद म्हणजे प्रवास. आणि तो प्रवासदेखील काही एखाद्या पार्सलप्रमाणे रेल्वेच्या डब्यात बसून केलेला नसून बैलगाडीच्या बरोबर मजल दर मजल, बहुधा पायी

केलेला. लहान मुलांशी किंवा मोठ्यांशी मी फारसा मिसळत नसे; यामुळे पशुपक्षी व वनस्पति यांच्याशीच माझी विशेष दोस्ती झाली होती. डोंगरातून वाहणाऱ्या निर्झरांच्या काठी बसून त्यांच्याबरोबर अर्थ–निरपेक्ष गोष्टी बोलायलाहि मी शिकलो होतो. थोड्याच दिवसात मला असे दिसून आले की, शाळेतील बहुतेक विद्यार्थ्यांनी अरुणोदयाची शोभा कधी पाहिलीच नव्हती! रात्री उशीरा चंद्र जेव्हा मावळतो त्यावेळी तो कसा मजेदार तरसाळ्यासारखा दिसतो त्याची तर त्यांना कल्पना देखील कोठून असायला? एकदा आम्ही सावंतवाडीच्या रस्त्याने प्रवास करीत होतो. चंद्र अस्तास जाण्याच्या बेतात होता. रात्री दोनचा सुमार असेल. मी गाडीत पडल्या पडल्या चंद्राकडे पाहात होतो. चंद्र थेट क्षितिजापाशी आला आणि त्याच्यावर लाल कालिमा पसरला. सबंध सृष्टीच उदासवाणी झाल्यासारखी दिसू लागली. निसर्गाच्या ठिकाणी सौंदर्याबरोबरच भावनाहि असतात या गोष्टीची छाप माझ्या दहा वर्षांच्या बालहृदयावर पहिल्यांदा त्या दिवशी उमटली.

तथापि एवढ्याने कलेचे भान जागृत झाले नव्हते. घरात आणि मंदिरातून धार्मिक संस्कार व विधि, सणावारांचे कार्यक्रम आणि उत्सव या सर्वांचा परिणाम लहानपणापासून होतच होता. तीन तीन तास देवघरात बसून देवपूजा करण्याचा माझा आग्रह असल्यामुळे मूर्तींच्या नव्या नव्या रचना, निरनिराळ्या रंगांची फुले, दुर्वा, तुळसीपत्र व बेल या सर्वांची नवी नवी आरास पाहण्याची सवय पडून त्याबरोबरच आनंदहि मिळे. वडिलांच्याबरोबर प्रवास करताना असे नजरेस आले की, प्रत्येक प्रांतातील भांडीकुंडी वेगळ्या प्रकारची, पोषाख वेगळा, चालीरीति वेगळ्या व घराची घाटणीहि वेगळ्या प्रकारची असते. हे पाहून त्यातील भेदाकडे व साम्याकडे आपोआपच लक्ष वेधले जाई. देशी संस्थानांच्या राजधान्याहि पुनः पुनः पाहाण्याची संधि मिळे; त्यामुळे दरबारी थाट, गायन, नाच, राजवाडे व तेथील शिष्टाचार हे सर्व पाहावयास मिळे. आणि तरंगी मन या सर्व गोष्टींचा अनेक प्रकारे विचार करून नाना प्रकारच्या कल्पना निर्माण करी. संस्कृतीच्या निरीक्षणाचा तो काळ होता.

तरीहि अद्याप कलेचे भान आले नव्हते. कलारसिकता मुग्धच राहिली होती. तिचे शुभ्र संस्कार मिळत होते तरी तिच्या उन्मादाचा नावालसुद्धा स्पर्श झाला नव्हता. म्हणून आजहि माझे असे मत आहे की, मुलांना 'भक्तिपूर्ण

कलेचे वातावरण' भरपूर व अवश्य मिळाले पाहिजे; परंतु कलेच्या जाणिवे-सह कलासेवन त्यांच्यासाठी नसणे हेच इष्ट आहे.

शिक्षण संपल्यावर जेव्हा मी जीवनाच्या अंगोपांगांचे मनन व विवेचन करू लागलो, तेव्हाच मला पहिल्यांदा कलेचे भान झाले, तिचे महत्त्व समजले. ऐष-आरामात व चैनीत गुरफटलेल्या लोकांचे जीवन किती हीन, उथळ आणि दंभी असते याचे भान मला त्यापूर्वीच झालेले असल्याने खऱ्या कलेचे स्वरूप सम-जण्याला मला काही अडचण पडली नाही. इतकी तयारी झाल्यावर कलेवरील प्रमाणभूत ग्रंथ वाचण्याची गोडीहि वाटू लागली आणि शंका–कुशंकांचे वादळहि डोक्यात उठले नाही.

**कला सदाचाराच्या अधिष्ठानावर उभारलेली पाहिजे.**

कलेचे विवेचन सुरू करण्यापूर्वीच वरील अनुभवाचा निष्कर्ष सांगून टाकतो की, जीवनाच्या पूर्वावस्थेत अगोदर सद्गुण कमावले पाहिजेत, दृढ केले पाहिजेत, सदाचाराची थोरवी व दुराचाराची हीनता हृत्पटलावर शिलालेखाप्रमाणे कोरली गेली पाहिजे. इतके झाले म्हणजे मगच कलेची दीक्षा घेण्याची तयारी झाली असे समजावे. यौवनाचा काळ हा जसा चारी पुरुषार्थांच्या साधनाच्या दृष्टीने श्रेष्ठ काळ आहे, तसाच अनंत प्रमादांचे उगमस्थान देखील तोच काल आहे. यौवनापाशी सर्व काही असते, एक सुकाणूच तेवढे नसते. हे सुकाणू जर धर्मसंस्कार आणि सदाचारापासून मिळाले नाही तर कलेकडून मिळण्याची आशाच नको. व्यापक धर्मांची एकदा जीवनात प्रतिष्ठा झाली म्हणजे माणसाच्या अंगी सर्व शक्ति आल्याच असे समजावे. धर्म आणि पौरुष यांच्या जोरावर मनुष्याला वाटेल त्या क्षेत्रात किंवा विषयात खोलपर्यंत शिरता येते आणि त्या क्षेत्राचे यथार्थ रहस्य आकलन करता येते; प्रत्येक वस्तूचे समस्त जीवनात कोणते स्थान आहे, तिचे प्रयोजन काय व तिचा विनियोग कसा करावा, हे त्याला निर्मळ दृष्टीने नक्की करता येते.

धर्मांच्या म्हणजे सदाचाराच्या अधिष्ठानावर उभारलेली कला, रसगंभीर असते, प्राणपोषक असते, अनंतवीर्य आणि अमित–विक्रम असते. कलेच्या आधारावर उभारलेल्या सदाचारात पुष्कळ वेळा मात्र वरवरचा पोकळ शिष्टा-चारच असतो. जसे नासक्या फळावर झिरझिरीत रंगीत कागद गुंडाळून त्याला गोजिरवाणे करण्याचा प्रयत्न करतात त्याचप्रमाणे असंस्कारी व स्वैर जीवनावर

नागरपणाचा मुलामा चढवून ते सदाचारी असल्याची बतावणी करता येते. केवळ कलेच्या द्वारा कमावलेला सदाचार म्हणजे हलक्या धातूवर चढविलेला मुलामाच होय.

मांसाहार सदाचाराचा विरोधी आहे असे जर आपण मानीत असलो तर या मान्यतेला धर्माचे अधिष्ठान असावयास पाहिजे, कलेचे नव्हे. मांसाहारात क्रौर्य आहे, पाप आहे, हृदयधर्माचा द्रोह आहे, अशा भावनेने केलेला मांसाहाराचा त्याग टिकाऊ असतो, बलप्रद असतो. परंतु कित्येक कलाकार आणि कवि म्हणतात, 'आम्ही मांसाहार करीत नाही याचे कारण मांसाहार विश्री आहे हे होय. मांसाहारामुळे आमच्या सौंदर्यविषयक भावनेला आघात बसतो, म्हणून आम्ही निरामिषभोजी आहोत.' अशा लोकांच्या निरामिषभोजनात व्रताची दृढता नसते. एखाद्या वेळी ते मांस खावयाचे देखील. केवळ कलेचा पुरस्कार करणारे लोक कलेचे सेवन करू जाणोत, परंतु प्रत्यक्ष जीवनपरिवर्तनाच्या द्वारा जे पूजन करावयाचे असते ते त्यांना करता येणार नाही. अशा पूजनाची वृत्ति धर्मातूनच उद्भवते. स्वार्थ व अहंकाराचा नायनाट केल्याशिवाय आत्मार्पणाने होणारे पूजन संभवत नाही.

जीवनाविषयीची कल्पना जोवर विशुद्ध झाली नाही तोवर कला म्हणजे काय चीज आहे याची शुद्ध कल्पना करता येणार नाही. पशूप्रमाणे मनुष्याच्या ठिकाणी देखील भोगवृत्ति आहे, स्वामित्व-बुद्धि आहे, आळस आहे, घसरगुंडीवरून घसरत खाली जाण्याचा आनंद आहे. परंतु मनुष्य बुद्धिमान प्राणी असल्यामुळे या सर्व वृत्तींना त्याला सुव्यवस्थित रूप देता येते आणि शब्दजाल पसरून पशुजीवनहि रसमय किंवा यथार्थ होऊ शकत नाही, हा अनुभव मागाहून व्हावयाचा असतो; आणि एकाच्या अनुभवावरून मिळणाऱ्या शहाणपणाचा फायदा फुकट घेण्याची जोपर्यंत लोकांची तयारी नाही तोपर्यंत तत्त्वज्ञानाला आणि त्याच्याच पायावर उभारलेल्या सौंदर्यशास्त्राला नवे नवे अनुयायी मिळतच जाणार.

जीवनाचे साफल्य कशात आहे, कोणत्या प्रकारचे जीवन व्यतीत केल्याने आपण निष्प्राण, निर्वीर्य होणार नाही, हीन होणार नाही, विनाशाच्या मार्गाला लागणार नाही, हे अगोदर ठरवून टाकले पाहिजे. आणि मगच अशा मंगल जीवनाला उपकारक होईल अशी जीवनकला आपण निर्माण केली पाहिजे. इंद्रियांची आपआपल्या विषयांकडील ओढ नैसर्गिक आहे. या ओढीलाच

जर कोणी कलावृत्ति मानले, हिलाच कोणी रसवृत्ति समजून चालले, तर त्याने आत्मघात करून कलेचाहि अपमान केला आहे असे समजावे. कलेचा व्यापार जरी इंद्रियगोचर असतो, तरी तिचा आनंद विषयातीतच असला पाहिजे.

कित्येक विरक्त लोक इंद्रियांविषयी अगदीच विश्वास बाळगतात. ते म्हणतात, "इंद्रियांना मोकाट सोडल्यास ती आपल्या विषयांकडे धाव घेणारच. आणि विषयांचे सेवन म्हणजे आध्यात्मिक मरण होय, ही गोष्ट कोणाला नाकारता येईल? इंद्रियांची प्रवृत्ति शुभ तर नाहीच; ती एकदम बंद होत नाही, एकदम बंद करू गेल्यास बलवान इंद्रियग्राम काही तरी विकृति उत्पन्न करतोच. म्हणून क्रमाक्रमाने, युक्तिप्रयुक्तीने, दक्षतेने परंतु दृढतेने इंद्रियांना विषयांपासून परत वळवणे एवढाच एक पुरुषार्थ आपल्या स्वाधीनचा आहे. व तो आपण साधला पाहिजे."

कलेच्या उपासकांची दृष्टि याहून थोडीशी वेगळी असते. ते देखील असेच म्हणतात की, "इंद्रियांना विषयसेवन करण्यासाठी मोकाट सोडली तर ती पाहता पाहता जीवनातील सगळ्या सौंदर्यांची नासाडी करून टाकणार. विषय-सेवनात तात्पुरते सुख असेल, उन्मादहि असेल, परंतु सौंदर्य तर नसतेच नसते. सौंदर्य, काव्य आणि कला या इंद्रियातीत वस्तु आहेत. त्यांचा आनंद वास्तविकपणे इंद्रियनिरपेक्ष असतो, म्हणूनच शुद्ध सात्त्विक असतो. आम्हाला विशेष सांगावयाचे म्हणजे एवढेच आहे की, निर्विषय आनंद सेवन करण्याच्या कामी इंद्रियांची मदत घेता येते. इंद्रियांची सगळीच प्रवृत्ति अधःपाताला सहायक होते असे काही नाही. अंतःकरणाची असुक अंशी शुद्धि झाल्यानंतर याच इंद्रियांकरवी सौंदर्याचे आकलन करविता येते. जसे एकाच युवतीकडे पति व पिता हे भिन्न भिन्न दृष्टींनी पाहू शकतात त्याचप्रमाणे विषयी मनुष्य आणि कलेचा उपासक एकाच वस्तूकडे निरनिराळ्या दृष्टींनी पाहू शकतात. पित्याच्या दृष्टीचा निर्मळपणा दुर्लभ असतो हे आम्हाला मान्य आहे. कलारसिक म्हणून गणले जाणारे आजचे बहुतेक लोक विषयी किंवा विलासी असतात ही गोष्ट देखील आम्हास नाकबूल नाही. आमच्या जमातीत या गैरलोकांचीच संख्या भरमसाट वाढली आहे, हेहि आम्हाला माहीत आहे. ज्ञातिशुद्धीचा प्रयत्न आम्ही करू, सर्वांनीच करावा; परंतु या जमातीचा नाश कसा करता येईल?"

**कलेचा खरा आनंद भावसृष्टि निर्माण करण्यात आहे.**

खऱ्या कलापूजकांना माहीत असते की, कलापूजनाच्या कामी सर्वच इंद्रियांची एकसारखी पात्रता नसते. स्पर्शेंद्रिय व स्वादेंद्रिय ही इतकी काही उन्मादकारी व असंयत असतात की, कलापूजनात त्यांची मदत घेताच येणार नाही. गंध हे देखील एक स्पर्शजन्य सुखच आहे, त्यामुळे गंधग्राही इंद्रियाचे देखील कलापूजनातील स्थान संशयास्पदच आहे. राहता राहिली दोन ज्ञानेंद्रिये; श्रवण आणि नयन. या दोघांची सूक्ष्म परंतु प्रचंड शक्ति अलिप्तपणे काम करण्यासारखी आहे. या दोहोंच्या विलासीपणावर प्रतिबंध घालून त्यांना कलाग्रहणाची दीक्षा देता येण्यासारखी आहे; त्यांना भोगपराङ्मुख करून केवळ सौंदर्यपूजक करता येते.

परंतु कलेचा खरा आनंद शब्दाच्या किंवा रूपाच्या आस्वादात नाही. निर्दोष भाव-सृष्टि निर्माण करण्यातच कलेला आनंद वाटतो. म्हणजे हात व कंठ यांच्या मदतीने कलेची उपासना उत्तम प्रकारे होऊ शकते. गळ्यातून स्वर्गीय संगीत काढण्याचा आनंद हाच कलेचा मुख्य आनंद आहे; परंतु कान जोवर ते तपाशीत नाहीत, श्रवणाच्या द्वारा संगीताच्या अनुरंजक शक्तीचे आणि भावना उद्दीपित करण्याचे सामर्थ्य तपासले जात नाही, तोपर्यंत संगीताचा आनंद मिळणेच अशक्य. संगीताचा चरम आनंद हा शेवटी इंद्रियांहून परच असतो, परंतु श्रवण आणि कंठ यांच्या सहाय्यानेच जाग्रत होऊ शकतो.

वास्तविकपणे प्रत्येक इंद्रियाच्या द्वारा कलेचा आनंद मिळणे शक्य आहे. पण तो ओळखण्याची पात्रता अंगी असली पाहिजे. कित्येक इंद्रियांचा संपूर्ण संयम करण्यापासून एक असाधारण आणि निर्विषय आनंद मिळविता येतो. मनुष्यजातीने अशा आनंदाचा अनुभव फार थोडा घेतला आहे हे तिचे दुर्दैव होय. खरूज झालेला माणूस खाजवण्याच्या विषयसुखालाच आनंद मानतो; परंतु निरोगी माणूस शुद्ध आरोग्यानंदच पसंत करतो. थंडीच्या दिवसात प्रकृति फार चांगली असली आणि पहाटेस लवकर गार पाण्याने स्नान केलेले असले म्हणजे शरीराच्या रोमारोमातून जो आनंद स्फुरतो, जो उत्साह झिरपतो त्याला टाकून देऊन आपण अंग खाजविण्याचे सुख पसंत करू काय? ब्रह्मचर्याचा आनंद हा आरोग्याच्या आनंदाहून हजारपटीने अद्भुत व उन्नत असतो. त्याचा अनुभव घेतलेले लोक फार थोडे असतात हा काही ब्रह्मचर्याचा दोष नव्हे.

**जीवनपोषक मजुरीत कलेचा शुद्ध आनंद आहे.**

पालखीत किंवा मेण्यात बसून फिरण्यातहि आनंद आहे, आणि समोरून सोसाट्याचा वारा वाहात असता टेकडीवर चढण्यात आनंद आहे. आळसातहि आनंद आहे व उद्योगातहि आनंद आहे. परंतु या दोहोंपैकी प्राणपद कोणता आहे व प्राणनाशक कोणता आहे ते ओळखूनच निवड करावयाची असते. या दृष्टीने विचार करणाऱ्या माणसाला कला व मजुरी याच्यात विरोध आहे अशी कल्पनाच करवणार नाही.

जीवन–रसालाच शोषून घेणारी विसाव्या शतकातील मजुरी ही काही खरी मजुरी नव्हे. कलेच्या नावाने विलासीपणाला पोसणाऱ्या श्रीमंत लोकांनीच ही जीववेऊ मजुरी उत्पन्न केलेली आहे ही गोष्ट आपण एक क्षणभर देखील विसरता कामा नये. अमेरिकन स्त्रियांच्या टोप्या शृंगारता याव्यात म्हणून अनेक देशातील असंख्य पक्षी मारण्याचा धंदा सुरू झाला. अशाने काय कलेची वाढ होते ? लॉर्ड कर्झनने हिंदुस्थानचे इतर वाटेल ते नुकसान केले असले तरी हिंदुस्थानातील मोर किंवा इतर पक्ष्यांची पिसे परदेशी पाठविण्याची त्याने बंदी केली ती त्याची एक खरोखरच अभिनंदनीय कामगिरी म्हटली पाहिजे.

प्रत्येक प्रामाणिक मजुरीत—जीवनपोषक मजुरीत—कलेचा शुद्ध आनंद असतो. जी वस्तु निर्माण करण्याच्या वेळी पदोपदी व क्षणोक्षणी अवधानाची आवश्यकता असते, जी आपल्याला सर्जनाचा आनंद देते तीत कला ही असतेच असते. चरक्यावर सूत काढीत असताना प्रत्येक क्षणी सुताच्या सौंदर्याकडे मला लक्ष द्यावे लागते; इतकेच नव्हे, तर सुताच्या सौंदर्याविषयीचा माझा आदर्श प्रतिक्षणी चढतच जातो. निष्काळजीपणाने कातलेले सूत आपल्या बेपर्वाईचे असे काही स्मारक होऊन बसते की, जितक्या वेळा त्याच्यावर दृष्टि पडते तितक्या वेळा मनात ग्लानीच उत्पन्न होते. जेथे जेथे एकाग्रता व सावधानतेची जरूर असते तेथे तेथे कलेला वाव आहे; जी जी क्रिया स्वायत्त असते त्या त्या क्रियेत कलेला अवकाश असतो, असा सर्वसामान्य सिद्धांत आपल्याला बिनधोक बसवता येईल.

**कला जीवनाच्या संगीतरूप असली पाहिजे.**

कलेचा आनंद शांत असतो, स्थायी असतो. ज्यात विलासीपणा असेल त्यात क्लांति, ग्लानि आणि विषाद ही नेहमी हमखास येणारच. म्हणूनच

आपल्याला असे म्हणता येईल की, लालित्य आणि लालसा या दोन्ही परस्पर-भिन्न, परस्परविरोधी वस्तु आहेत.

एका बंगाली सद्‌गृस्थाने एकदा मजपाशी अशी तक्रार केली की, 'कलेच्या नावाने लोकांनी देशाच्या पुरुषार्थाची काही कमी हानि केली नाही. तरुणपणी जेव्हा विद्यार्थ्यांचे जीवन अमर्याद महत्त्वाकांक्षेने मुसमुसत असावयास पाहिजे, जेव्हा समस्त जगताचे दुःख मी एकटा निवारण करीन अशी आत्मविश्वासाची स्वप्ने त्याला पडावयास पाहिजेत, कीर्तीची हाव एवढा एकच दोष त्याच्या अंगी दिसावयास पाहिजे, कष्ट व हालअपेष्टा सहन करणे हाच हृदयाला समाधान देणारा त्याचा आनंद असावयास पाहिजे, अशा वेळी हल्लीचे तरुण कलेच्या नावाने हीन जीवन घालवू लागले आहेत, इतरांचे दुःख पाहून संतप्त होण्याच्या ऐवजी स्वतःच्या दुःखाच्या विचारानेच द्रवू लागले आहेत, आणि अश्रुपात करण्यात आणि स्त्रियांची खुशामत करण्यातच पुरुषार्थ मानू लागले आहेत. या नरवीरांना जगात निवारण करण्यासारखे एकच दुःख दिसते, व ते म्हणजे युवतीजनांच्या वैधव्याचे!' त्या सद्‌गृहस्थांची सगळी टीका येथे देत नाही, कारण अतिशयोक्तीने रंजित झालेली टीका स्वतःच्याच उद्देशाला मारक होते. परंतु एवढे तर प्रत्येक विचारवान माणसाला कबूल करावे लागेल की, सदाचार आणि पराक्रम या दोहोमध्ये देखील विरोध नसला पाहिजे, त्याचप्रमाणे कला आणि जीवन या दोहोमध्ये देखील विरोध नसला पाहिजे. खरी कला ही जीवनाच्या संगीतरूप असली पाहिजे. जीवनाच्या सगळ्या अंगोपांगामध्ये संगति साधली म्हणजेच संगीताला पूर येतो.

**सदाचार ही सर्वश्रेष्ठ कला आहे.**

म्हणूनच सदाचार ही सर्वश्रेष्ठ कला आहे. सदाचारातच कलायुक्त जीवन आहे. रूपाच्या उपासनेपेक्षा प्रेमाची उपासनाच श्रेष्ठ आहे. लयला व मजनूंची गोष्ट रूढ करणाऱ्या सुफी कलाकारांनी मजनूंला रोडक्या सुदामजीचाच प्रतिअव-तार कल्पून आणि श्यामवर्ण लयलाला कृष्णरात्रीचे कुसुम कल्पून हीच गोष्ट जगजाहीर केली आहे की, उच्च कला बाह्य रूपाची उपासना करीत नाही. घरच्या दिवाणखान्यात हरणांच्या डोळ्यांचे किंवा शिंगांचे प्रदर्शन करणारा माणूस सौंदर्याचा उपासक खुशाल गणला जावो, परंतु त्याचे जीवन कलाशून्य असते, यात काय संशय आहे? मग शत्रूंच्या कवट्या गोळा करणाऱ्या

तिबेटच्या लोकांना तुम्ही रानटी का म्हणावे? मृगयेवर उपजीविका चालवणाऱ्या राष्ट्रांपासून कलेचे धडे घेण्यास बसल्यानंतर कला, विकला आणि अवकला यांचा संकर झाल्यास त्यात नवल काय? हरणांच्या डोळ्यांनी दिवाणखान्याला सजवणारा आधुनिक रसिक मनुष्य आणि जित लोकांची मुंडकी चिखलात रोवून त्यांचा मनोरा रचणारा कोणी तैमूरलंग या दोघांमध्ये काळाचा भेद असला तरी जातीचा भेद खास नाही. लहान मुलांचे चिमुकले सुंदर हात तोडतोडून त्यांना फुलपात्रात ठेवून दिवाणखान्याला सुशोभित करणाऱ्या माणसाला जर तुम्ही नरपशु म्हणता तर दयाधर्माला विसरून जाऊन कलेचा विकास करू पाहणाऱ्या माणसाचे तुम्ही तेच नाव ठेवायला नको काय?

**कलेने धर्माचा व सत्याचा द्रोह करू नये.**

कलेला धर्माचे पद कधीहि घेता येणार नाही; व ती धर्माची विरोधीहि न झाली पाहिजे. चरम सत्यापर्यंतची मजल कलेने गाठली नाही तरी चालेल, परंतु तिने सत्याचा द्रोह कधीहि करता कामा नये; कलेत संपूर्ण पुरुषार्थ समाविष्ट झालेला नसला तरी हरकत नाही, परंतु ती पुरुषार्थाला विघातक असून मात्र चालावयाचे नाही. समाजोपयोगी प्रत्येक मजुरीच्या कामात कला पाहाण्याची दृष्टि आपल्याजवळ नसली तरी कलेने मजुरीचा तिरस्कार तरी निदान कधी करू नये. तिने मजुरीच्या जीवनाला विषम किंवा विषादमय तर नच करावे. मजुरीचा द्रोह करून जीवन देखील टिकणे जर अशक्य जेथे आहे तेथे कला किती वेळ टिकाव धरणार?

कोणी म्हणेल की, कलेला इतक्या सगळ्या बंधनांनी जखडून टाकल्यानंतर तिला वाव तो किती राहील? याचे असे उत्तर द्यावे लागेल की, ही कलेची बंधने नसून हे तिचे संरक्षक बंधु आहेत. त्यांच्या सहवासातच कलेची निराबाध वाढ होऊ शकेल. त्यांची मदत जर नसली तर कलेचे नाव धारण करणारी कलेची नित्यवैरिणी विकला पाहता पाहता कलेला कंठस्थान घालील. भावांच्या सहवासात बहिणीला जीवनव्यापी क्षेत्रात संचार करता येईल. भाऊ बहिणीचे क्षेत्र आकुंचित करीत नाहीत, तर तिला संपूर्ण क्षेत्राचा अधिकार प्राप्त करून देतात; आणि तो भोगण्यास आवश्यक अशी अनुकूल परिस्थितीहि उत्पन्न करून देतात.

× × ×

# ९. माझ्या अनुभवाचे सार

**वामन मल्हार जोशी**

सत्य, सौजन्य आणि सौंदर्य ही मानवी जीवनातली तीन श्रेष्ठ मूल्ये. मानव-समाजात सुख व सलोखा नांदण्याच्या दृष्टीने दुसरे सौजन्याचे मूल्य फार महत्त्वाचे आहे. सौजन्य ही फार व्यापक संज्ञा आहे. केवळ वागण्यातील चांगुलपणा म्हणजेच सौजन्य नव्हे. वैचारिक पातळीवर सज्जन होण्यात, विरोधी मताबद्दलहि सहिष्णुतेने, सहानुभूतीने व अनाग्रही वृत्तीने विचार करण्यास शिकण्यात सौजन्याची कसोटी आहे. या सौजन्याच्या अभावामुळेच मानव-समाजातले सगळे कलह निर्माण झाले आहेत. प्रस्तुत लेखात प्रो. वामन मल्हार जोशी यांनी या सौजन्याची महति पटवून दिलेली आहे. प्रो. वा. म. जोशी (जन्म १८८२ मृत्यु १९४३) हे स्वतः सौजन्याची उपासना करणारे; नव्हे, सौजन्यमूर्तिच. त्यांची सत्यभक्तीहि उच्च कोटीतली. सौंदर्यनिर्मितीचेहि श्रेय त्यांनी मिळविलेले. समग्र सुशिक्षित महाराष्ट्राला आदरणीय वाटणारे एक थोर सज्जन, विचारवंतांच्या विवेचकशक्तीला चालना देणारे एक कळकळीचे तत्त्व-संशोधक आणि मराठीतील कादंबरीवाङ्मय आपल्या स्वतंत्र वैशिष्ट्यांनी संपन्न करणारे एक यशस्वी ललितलेखक अशा त्रिविध नात्यांनी प्रो. वा. म. जोशी सुविद्य महाराष्ट्रास परिचित आहेत. प्रस्तुत लेख त्यांच्या 'विचार-लहरी' नामक लेखसंग्रहातून घेतलेला आहे.

ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष न च कश्चिच्छृणोति माम्
धर्माभासप्रसक्तैर्यत्सद्धर्मो नाशितः खलु ॥ १ ॥
अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम्
यज्जातिधर्ममोहेन हन्तुं स्वजनमुद्यताः ॥ २ ॥
सत्य-सौंदर्य-सौजन्यासक्तिधर्मो हि तात्त्विकः
वेष-भाषा-जाति-वर्णा गौणाश्चैवानुषंगिकाः ॥ ३ ॥
न श्रोष्यति जनः कश्चिज्जानन्नपि विरौम्यहम्
जनतानामके देवे भक्तिर्योजयते हि माम् ॥ ४ ॥

—उद्बाहु वामन

**माणुसकी ही सर्व कृत्रिम भेदांपलीकडील वस्तु आहे.**

सिंध हैद्राबाद येथील तुरुंगात असताना मला पुढील अनुभव आला. रोज ४० पौंड जोंधळे पिसण्याचे (दळण्याचे) सक्त काम माझ्याकडे आले असता माझ्यावर देखरेख करण्याकरिता जो मुकादम कैदी (Convict Overseer) नेमलेला होता तो पठाण होता व त्याला हिंदुस्थानातील कोणतीहि भाषा मुळींच येत नव्हती. त्याचे आणि माझे हिंदीचे ज्ञान 'इधर आव, उधर जाव' अशा प्रकारच्या पाचदहा वाक्यांपलीकडे विशेष काही नव्हते. तो त्यावेळीं रमजानच्या उपासांमुळे व दीड दोन वर्षे कैद अनुभवल्यामुळे अत्यंत कृश झाला होता त्याचा वेष निराळा, भाषा निराळी, आवडीनिवडी निराळ्या, जात निराळी, धर्म निराळा; तथापि तो त्या अशक्त स्थितीत मला आपली पोळी देत असे. व चक्की पिसण्यास मदत करीत असे. नको नको म्हटले तरी ऐकत नसे. त्याचे हे करणे जेलच्या नियमांच्या विरुद्ध असे. जर का तो हे करताना पकडला गेला असता तर त्याची पगडी गेली असती, म्हणजे मुकादमी गेली असती आणि सामान्य कैद्याप्रमाणे त्याला पुनः सक्त काम करावे लागले असते. हा इतका धोका असताना तो मला इतक्या आग्रहाने का मदत करीत असे? पुष्कळ दिवसांचा उपवास, दिवसा पोटात अन्न नाही, अशा स्थितीत तो चक्की पिसू लागला म्हणजे घामाघूम व्हावयाचा, दीर्घ श्वास घेऊ लागावयाचा आणि जोंधळ्याची ती भली मोठी रास आपल्या मदतीनेहि संपणे शक्य नाही असे पाहून व मला पुढील क्रमप्राप्त शिक्षा होणार हे मनात आणून तो हळहळत असे आणि पुनः जोर करून रास कमी करण्याचा प्रयत्न करीत असे. शेवटी दळलेले पीठ नेण्याकरिता जेव्हा दुसरा मुकादम येई तेव्हा तो मला पुरते काम न झाल्याबद्दल माफी व्हावी म्हणून काही तरी सबबी सांगून रदबदली करीत असे. असे तो का करीत असे याचा विचार करू लागल्यावर मला पुस्तकांच्या द्वारा नव्हे तर स्वानुभवाने असे दिसून आले की सौजन्य हे वेष, भाषा, जाति किंवा धर्म यांवर अवलंबून नसून ते 'माणुसकी' वर अवलंबून आहे; आणि ही माणुसकीच मनुष्याला मनुष्यत्व देते, निदान मनुष्यत्वामध्ये ही माणुसकी हेच प्रधान अंग आहे. तो पठाण अगदी अशिक्षित होता व त्याची सौंदर्याभिरुचि विशेष विकसित नव्हती म्हणून मनुष्याचे पूर्णत्व त्याच्या अंगी नसेल, पण ज्याचा बौद्धिक विकास पुष्कळ झाला आहे आणि कलाजन्य आनंद

ज्याला पुष्कळ अनुभविता येतो पण वरील माणुसकी ज्यामध्ये नाही अशा माणसापेक्षा तो पुष्कळ बरा असे मी तरी म्हणेन !

ह्या कैदी मुकादमाने आणि मी तुरुंगाचे नियम मोडले हे गैर केले किंवा काय हा प्रश्न प्रस्तुत प्रसंगी गौण आहे. मुद्दा असा की, माणुसकी ही शिक्षण, वेष, भाषा, धर्म इत्यादिकांवर विशेष अवलंबून नाही. या प्रश्नासंबंधी महत्त्वाचा असा दुसरा एक माझा अनुभव—जेलमधलाच अनुभव—असा की, एका अधिकारारूढ 'सुशिक्षित' डॉक्टराने, मी त्याचा समानधर्मी असताना व आमांशाने आजारी असता स्वच्छतेच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असलेली लंगोटीदेखील देण्याचे नाकारले आणि आरोग्याला अपायकारक व अत्यंत गलिच्छ झालेल्या अशा लंगोट्यांवर लज्जारक्षणाचे काम मला भागवावयास लावले ! वास्तविक डॉक्टरांचे स्वच्छतेकडे अधिक लक्ष असावयाचे आणि अधिकारारूढ डॉक्टराने आरोग्याच्या दृष्टीने अमुक एक गोष्ट आवश्यक म्हटली असता कोणालाहि ती नाही म्हणता यावयाची नाही. पण या डॉक्टरबहाद्दराने भर पावसाळ्यात गळत असलेल्या खोलीत ओल्या जागेवर निजावयास लावून व दात दुखत असल्यामुळे चर्वण करणे अशक्य असता भाकऱ्या खावयास देऊन हा आमांश अप्रत्यक्षपणे आपणच उत्पन्न केला असता आणि सर्व गोष्टी समजत असता व पूर्ण अधिकार असता, दीड दोन हात लांब अशी साधी लंगोटी देण्याचे नाकारले ! तेव्हा येथे भाषैक्य, धर्मैक्य, वगैरे सर्व होते; पण 'माणुसकी' तेवढी नव्हती असे म्हणावयाचे नाही तर काय ?

माझ्या पन्नास एक वर्षाच्या आयुष्यात असे अनेक प्रसंग आले आहेत. त्या सर्वांचा निष्कर्ष असा की, 'माणुसकी' ही ब्राह्मणब्राह्मणेतर, हिंदू–मुसलमान–खिश्चन, स्त्री–पुरुष, शिक्षित–अशिक्षित–अशा प्रकारच्या भेदांवर अवलंबून नाही; तर एक निराळी व स्वतंत्र चीज आहे. मला ब्राह्मणेतरांनी, खिश्चनांनी, मुसलमानांनी, भंग्यांनी (होय भंग्यांनीहि) मदत केली आहे व सनातीयांनी, स्वधर्मीयांनी, सुशिक्षितांनी फसविले आहे आणि एकदा नव्हे अनेकदा.

**पूर्ण सत्य कोणत्याहि एका मतविशेषात सामावणे अशक्य आहे.**

स्वतःच्या विशिष्ट अनुभवाची भाषा सोडून सामान्य दृष्टीने आता विचार करू या. मनुष्यत्व कशात आहे ? वेषविशेष, आहारविशेष, भाषाविशेष यांवर

ते अवलंबून नाही हे कोणीहि कबूल करील; पण शिक्षणविशेष, मतविशेष, धर्मविशेष, इत्यादिकांना मी 'वेषा'च्याच योग्यतेचे ठरविले तर ते मात्र प्रथमदर्शनी तरी पुष्कळांना गैर वाटेल. पण विचारांती माझे मत असे होत चाललेले आहे ही गोष्ट खरी. इतिहास, काव्य, गद्य वाङ्मय, तत्त्वज्ञान, धर्म, मानसशास्त्र इत्यादि विषयांसंबंधी मी जे अल्पस्वल्प वाचले आहे त्यावरून माझी अशी खात्री झाली आहे की, पूर्ण सत्य कोणत्याहि एका कवीच्या, इतिहासकाराच्या, दर्शनकाराच्या किंवा धर्मस्थापकाच्या हाती लागलेले नाही. आपले जुने ऋषी त्रिकालज्ञ व पूर्णज्ञानी होते आणि त्यांनी सांगितलेले खरे मानावयाचे तर कपिल ऋषींचेच खरे का मानावयाचे आणि कणादाचे का नाही ? (कपिलो यदि सर्वज्ञः कणादो नेति का प्रमा।) अशा प्रकारचे प्रश्न उत्पन्न होतात. धर्मस्थापकांना ईश्वरी साक्षात्कार होतो व त्यांचे ज्ञान पूर्ण होते म्हणावे तर मग धर्मस्थापकात एवढा मतभेद का ? आणि नवीन नवीन धर्म स्थापण्याची त्यांना जरूर का वाटली ? बुद्धिवान व विद्वान तत्त्वज्ञांचे खरे मानावयाचे असे ठरविले तर शंकराचार्यांचे मत खरे मानावे का रामानुजाचार्यांचे, प्लेटोचे का आरिस्टॉटलचे, 'नवोन्मेषी विकासवाद' (Creative Evolution) लिहिणाऱ्या बर्गसनचे का 'वर्तनवादा'(Behaviourism)चा पुरस्कार करणाऱ्या वॉटसनचे—हे प्रश्न मनात विकल्प उत्पन्न करतात.

तत्त्वद्रष्टे किंवा साक्षात्कारी (Mystic) असे ज्यांना म्हणता येईल अशा ज्ञानेश्वरतुकारामादि लोकांची कास धरावी तर त्यांचे म्हणणे काय आहे ते स्पष्ट कळत नाही, आणि थोडेबहुत कळते त्यात मतभेद दिसतो व कित्येक स्थळी तर ते अनुभवाच्या व विचाराच्या अगदी उलट दिसते. यांचे मतभेद गौण मानले आणि मतैक्यावर भर दिला तरी स्वतःला द्रष्टे किंवा साक्षात्कारी समजणाऱ्याशिवाय इतरांना ते समजत नाही असे मानणे बरोबर दिसत नाही. प्रो. रामभाऊ रानडे "महाराष्ट्रातील साक्षात्कार पंथ" (Mysticism in Maharashtra) या नावाच्या आपल्या इंग्रजीत लिहिलेल्या उत्तम पुस्तकात म्हणतात की, हे साक्षात्कार सर्व कालखंडांमध्ये अत्यंत सात्त्विक व बुद्धिमान लोकांना झाले आहेत, तेव्हा ते सत्यस्वरूप मानले पाहिजेत. पण जडवाद किंवा दुसरे वाद यासंबंधी देखील असाच युक्तिवाद करता येणार नाही का ? सार्वत्रिकता, सर्वकालीनत्व किंवा सुजनाभिमतत्व यावरून एवढे फार तर म्हणता येईल की, त्या त्या वादामध्ये सत्याचा अंश आहे. बाकी हे देखील म्हणणे युक्तीला

पूर्णपणे धरून नाही. कारण वरील गुण असलेले 'दर्शन' सर्वस्वी चूक असण्याचा संभव नाहीच, व तसे तत्त्वज्ञानाचा किंवा कोणत्याहि शास्त्राचा इतिहास जाणणाऱ्याला छातीठोकपणे सांगणे कठीण पडेल. तत्त्वज्ञानाचा इतिहास सोडूनच द्या. ज्योतिषशास्त्र किंवा पदार्थविज्ञानशास्त्र यांसारख्या शास्त्रातील देखील सार्वत्रिक व विद्वदभिमत मते चूक ठरलेली नाहीत काय? गणितशास्त्रातल्या सिद्धांताबद्दल वास्तविक मतभेद नसावा. कारण त्यात भावनांचा संबंध येत नाही व तर्क्य विषयात जास्तीत जास्त स्पष्टता व निश्चितता असते आणि कमीत कमी संमिश्रता असते. पण आईनस्टाईन-पूर्वीच्या सार्वकालीन व सर्वतज्ज्ञाभिमत कल्पना आज एका विशिष्ट अर्थाने तरी चूक ठरल्याच ना?

गणित, रसायनशास्त्र, ज्योतिषशास्त्र इत्यादिकातील भेद किंवा सामाजिक व राजकीय प्रश्नांबाबतचे मतभेद विशेष महत्त्वाचे नाहीत असे कबूल करण्यास काही लोक तयार होतील. पण आध्यात्मिक किंवा धार्मिक प्रश्न हे अत्यंत जिव्हाळ्याचे आहेत, कारण त्यात मनुष्याच्या अंतरात्म्याचाच संबंध येतो असे काही लोक म्हणतील आणि या बाबतीतील प्रामाणिक मतभेदांना वेषभेदाइतके गौणत्व देण्यास ते तयार होणार नाहीत. पण खोल विचार केल्यास या विषयातीलहि प्रामाणिक मतभेदांचे विशेष स्तोम माजविण्याचे कारण काय, हे समजत नाही. हे विषयच मुळी असे आहेत की, त्याविषयी मतभेद असणे साहजिकच नव्हे तर अपरिहार्य आहे. कारण अज्ञात व अज्ञेय अशा विषयांबद्दल कोणता समंजस मनुष्य अमुकच सत्य असे निश्चयाने सांगेल? फार झाले तर तो एकंदर उपलब्ध पुरावा पाहता, मला आपले असे वाटते, असे सांगेल. पण तो प्रांजल असेल तर लगेच असेहि म्हणेल की, या बाबतीत दुसरेहि मत असणे व ते बरोबर असणे संभवनीय आहे; कारण निश्चयाने बोलता येईल इतका भरभक्कम पुरावा उपलब्ध नाही व निकटवर्ती भविष्यकाळात उपलब्ध होण्यासारखाहि नाही. आत्म्याचे अमरत्व, त्याचे प्रवृत्ति-स्वातंत्र्य, ईश्वराचे अस्तित्व इत्यादि धार्मिक किंवा आध्यात्मिक प्रश्नांना अनेक तत्त्वज्ञांनी व धर्मज्ञांनी जी उत्तरे दिलेली आहेत त्यांना आधारभूत असलेले युक्तिवाद व पुरावे पाहता शेवटी असेच म्हणावे लागते. याबाबतीत निश्चित व दुसऱ्याला पटलाच पाहिजे असा युक्तिवाद किंवा पुरावा उपलब्ध नाही.

कोणत्याहि मतविशेषाबद्दलचा आग्रह हा दुराग्रह आहे.

ईश्वरास्तित्वच उदाहरणाकरिता घेऊ या. काही सांख्य व बौद्ध निरीश्वर वादी आहेत व अद्वैत वेदांती शंकराचार्यहि प्रच्छन्न बौद्ध व प्रच्छन्न निरीश्वरवादी आहेत. या गोष्टी जुन्यापुराण्या म्हणून सोडून दिल्या व जुन्यांच्या खांद्यावर बसणाऱ्या आणि अधिक पुरावा असलेल्या आधुनिक तत्त्वज्ञांकडे पाहिले तर त्यात निरीश्वरवादी नाहीत का? युरोपीय आधुनिक प्रमुख मानसशास्त्रज्ञांपैकी शेकडा ७५ हून अधिक लोक निरीश्वरवादी आहेत, असे कोठेसे वाचले ते जरी संशयित म्हणून सोडले तरी ही गोष्ट धादान्त स्पष्ट नाही का की आधुनिक तत्त्वज्ञांमध्ये अज्ञेयवादाचा अधिकाधिक प्रसार होत आहे? मी असे म्हणत नाही की, निरीश्वरवादात किंवा अज्ञेयवादात अंतिम सत्य आहे. जीवशास्त्रातील व पदार्थविज्ञानशास्त्रातीलहि नवे नवे प्रयोग व नवी नवी मते (Vitalism) वगैरे पाहता जगात काही तरी योजना दिसते असे मला स्वतःला म्हणावेसे वाटते. पण जडवादाचेहि बल वर्धिष्णु आहे व वृत्ति जयिष्णु आहे. तो जीवनान्तार्गत एक एक कार्य दिवसानुदिवस आपल्या क्षेत्रात आणीत आहे आणि त्याची प्रगति अशीच कायम राहिली तर मनुष्याचे शारीरिक व्यापारच नव्हेत तर मनाचे म्हणून ज्यांना आपण म्हणतो ते व्यापारहि कार्यकारणभावाच्या कक्षेत पूर्णपणे कधीच येणार नाहीत असे म्हणणे धाडसाचे वाटते. तात्पर्य असे की, परमाणू व प्रेरणा (Force) यांबद्दलची काही पदार्थविज्ञानशास्त्रज्ञांची मते 'अजडवादा' कडे झुकत आहेत आणि जीवशास्त्रज्ञांची मते तर त्याहूनहि अधिकच योजनावादाकडे झुकत आहेत. असे जरी मला दिसत असले, तरी जडवादाला मूठमाती देण्याची वेळ आली आहे, असे मात्र म्हणता येत नाही. अशा स्थितीत अमुकच सिद्धान्त खरा असा आग्रह धरण्यात फायदा काय? शिवाय आपली मते ही खरोखर पुष्कळ वेळा आपल्या पूर्वशिक्षणावर, आपल्या सहज प्रवृत्तीवर, आपल्या गूढ व सुप्त वासनांवर अवलंबून असतात; [आपण निर्विकार चित्ताने विचार करावयाचे ठरविले तरी आपल्या भावना, आपले हितसंबंध, आपल्या अंतःकोशातील गूढ, सुप्त व बोधरहित (unconscious) वासना यांचा परिणाम नकळत होत असतोच असतो.] हे सर्व ध्यानात घेतले म्हणजे विशिष्ट मताबद्दलचा आग्रह किती दुराग्रहस्वरूप आहे हे ध्यानात येते आणि अशी वृत्ति

होऊ लागते की, ईश्वरास्तित्वादि गूढ गहन प्रश्नांबद्दल ज्याने त्याने आपली प्रामाणिक मते स्वतःपुरती अवश्य स्वीकरणीय मानावीत, लोकांनाहि स्वीकारण्यास सांगावीत, पण त्यांबद्दल आग्रह धरू नये आणि दुसऱ्यांचा मतभेद दिसल्यास माणुसकीच्या दृष्टीने ते त्याज्य किंवा निंद्य आहेत असे तर मुळीच मानू नये.

**धर्माधर्मातील भेद हे गैरसमजांमुळे व असहिष्णुतेमुळे उत्पन्न झाले आहेत.**

लौकिक दृष्ट्या ज्यांना आपण हिंदू, ख्रिश्चन, बौद्ध, महंमदी वगैरे धर्म म्हणतो त्यांचा लौकिकतारतम्याच्या दृष्टीने विचार केला तरी देखील हाच निष्कर्ष निघतो. ख्रिश्चन लोक मुसलमानी किंवा हिंदू धर्माला कमी लेखतात, आपण मुसलमानांना कमी लेखतो, मुसलमान हिंदूंना तुच्छ मानतात. वास्तविक पाहता प्रत्येक धर्मात अंधश्रद्धेचा भाग आहे. प्रत्येक धर्माच्या काही आचारात खुळचट प्रकार आहेत आणि प्रत्येक धर्माच्या लोकांचे मूर्खपणाचेच नव्हे तर नीचतेचेहि पुष्कळ वेळा अनुकरण झालेले आहे. उलटपक्षी प्रत्येक धर्मात स्वीकरणीय भाग असतो. धर्माच्या काही काही विधीत व आचारात पावित्र्यादि सद्भावना जागृत करण्याची शक्ति असते आणि प्रत्येक धर्माच्या अनुयायांनी सौजन्य उत्कटत्वाने दाखविल्याची उदाहरणे आहेत. प्रत्येक धर्माचे संस्थापक सद्धेतुप्रेरित होते, प्रत्येक धर्माच्या अधिकारी उपाध्यायवर्गात साधुपुरुष होऊन गेले आणि खलपुरुषहि होऊन गेले. ख्रिश्चन लोक क्राइस्टच्या मातेला—मेरीला—'अदूषित कुमारी' मानतात, बातिस्मा देतात, अर्भकाला थंड पाण्याच्या कुंडात बुडवून काढतात, ख्रिश्चनेतर व अबातिस्मित लोक कायमचे नरकात जाणार असे मानतात; पण हेच लोक हिंदूंच्या वगैरे धर्मातील खुळचट आचार-विचारांची कुचेष्टा कित्येक वेळीं करताना आढळतात. हिंदू, मुसलमान, पारशी, शीख वगैरे सर्व लोक स्वेतर धर्माविषयी बोलताना असेच धोरण कित्येक वेळा स्वीकारतात. एखाद्या चांगल्या कुटुंबातील सदाचारी हिंदू मुलीने एखाद्या युरोपिअनाशी, पारशाशी किंवा मुसलमानाशी लग्न केले आणि हा विवाह केवळ धर्मभेदाशिवाय इतर सर्व दृष्टींनी अभिनंदनीय मानण्यासारखा असला तरी देखील काही हिंदू लोक अशी ओरड करू लागतात की ती मुलगी अगदी पतित झाली, तिने आपल्या कुटुंबाला काळिमा आणिला आणि तिच्या धर्माची अवनति होऊन तो लयास जाण्याच्या मार्गाला लागला! एखाद्या पारशी स्त्रीने

असेच केले तरी त्या समाजात देखील अशीच ओरड चालते. असे का? ती स्त्री इतर दृष्ट्या सर्वतोपरी सद्वर्तनी असता केवळ तिच्या धर्मान्तरामुळे तिचा व तिच्या समाजाचा अधःपात होऊन जिकडे तिकडे हाहाकार व्हावा असे त्यात काय आहे? मिश्रविवाहाची गोष्ट सोडून देऊन स्वेतर धर्मातील समाजात अनीति फार असते असे मानण्याची जी काही लोकात प्रवृत्ति आहे तिचा विचार क्षणभर करू या. मिस मेयोसारख्या स्त्रियांना हिंदू समाजात अनीतीचा आणि खुळचटपणाचा बाजार भरलेला दिसतो, आणि काही हिंदू लोकांना अमेरिकेत घटस्फोटादि प्रकार सर्रास चालून तेथील स्त्रीपुरुष पशुतुल्य स्वैर आचार करीत असतात असे वाटते, हा मोठा दोष तर खराच; पण यापेक्षा अधिक मोठा दोष असा की परकी समाजात अनीतिमत्ता आहे हे पाहून पुष्कळांना आनंद होतो! वास्तविक हिंदू समाजात जर खरोखरीच मिस मेयोने सांगितल्याप्रमाणे अनीतिमत्ता असेल तर त्याबद्दल सर्व विचारी खिश्चन लोकांना हळहळ वाटली पाहिजे, पण तसे न होता मिस मेयोचे पुस्तक काही खिश्चन लोक मिटक्या मारीत वाचतात! आमचेहि असेच. Uncle Sham हे अमेरिकेतील सामाजिक गटारे उपसणारे पुस्तक आपणहि मोठ्या हौसेने वाचतो व त्यातील गोष्टी इतरांना तिखटमीठ लावून सांगतो! खरे म्हटले म्हणजे कोठेहि वाईट प्रकार असेल त्याबद्दल नीतिप्रिय मनुष्याला खेद व्हावा, पण स्वेतर समाजांविषयी व धर्मांविषयी मनुष्याचे मन इतके पूर्वग्रहदूषित असते आणि सापेक्षतः आपला समाज व धर्म हे श्रेष्ठ आहेत असे सांगण्यात व ऐकण्यात असा काही आनंद असतो की परधर्मीयांची निंदा ही मेवामिठाईप्रमाणे आपणास वाटते आणि ती ऐकण्यास किंवा वाचण्यास मिळाली असता त्यातील अंश आपण इतरांना प्रसाद म्हणून वाटतो! ब्राह्मण-ब्राह्मणेतरातील भांडणे व हिंदूमुसलमानातील मारामाऱ्या अशाच प्रकारच्या दुरभिमानामुळे व दुःप्रवृत्तीमुळे उत्पन्न होतात. समाजकारणात व राजकारणात जातिभेदांमुळे जे बिकट प्रश्न उत्पन्न झालेले आहेत, त्यांच्या बुडाशी असलाच दुरभिमान व असलीच दुःप्रवृत्ति बव्हंशी आहे, व हे प्रश्न कधी सुटावयाचे असतील तर धर्मभेदांना व सामाजिक भेदांना जे फाजील महत्त्व आले आहे ते नाहीसे होईल तेव्हाच ते सुटतील. खरा सदाचार व खरे सौजन्य हे विशिष्ट जातीत जन्म घेतल्याने प्राप्त होत नाहीत किंवा विशिष्ट धर्मांचे आपण आहोत असे म्हणवून घेतल्यानेहि ते अंगी येत नाहीत. सामाजिक जाति व लौकिक

अनुक्रम ५४५२७ क्रमांक २०२४ नों. दि. ९-११-६२


धर्म इत्यादिकांतील भेद खरोखरच वेष-भाषादिकांप्रमाणे बाह्य आहेत. अंतरात्म्यातील चांगुलपणा त्यावर विशेष अवलंबून नाही. त्यांना आजकाल जे भलते महत्त्व प्राप्त झालेले आहे ते नाहीसे होईल तो सुदिन!

क्र. क्र. 92390

**नैतिक आचारविचारहि परिस्थितिसापेक्ष आहेत.**

लौकिक धर्मभेदच नव्हे, तर नीतिविषयक कल्पनांतील व आचारांतील भेदांनाहि मी विशेष महत्त्व देत नाही. स्त्री-पुरुष आपआपल्या प्रामाणिक समजुतीप्रमाणे नीतीने वागत आहेत किंवा नाहीत या प्रश्नालाच मी महत्त्व देतो. उदाहरणे घेऊन बोलावयाचे म्हणजे मांस खाणे निषिद्ध व अविहित असे वाटत असून जो मांस खाईल तो पापी, मांसभक्षणामध्ये पापपुण्याचा काही संबंध नाही असे ज्याला प्रामाणिकपणे वाटत असेल त्याने मांस खाल्ले असता त्याला मुळीच पाप लागत नाही असे मी मानतो. अशनपानादि क्षुल्लक गोष्टींबद्दलच नव्हे तर संततिनियमन, घटस्फोट, पुनर्विवाह इत्यादिकां-संबंधी माझ्या विचारांचे असेच धोरण आहे. एतद्विषयक कल्पना व आचार यांमध्ये देशभेद, ज्ञानभेद इत्यादिकांमुळे फरक होत असतो हे धादांत स्पष्ट आहे. यातील नीतिमत्व व अनीतिमत्व कालस्थलपरिस्थिति-सापेक्ष आहे; व अमुक एक कल्पना किंवा आचार नित्यत्वाने व कालस्थलादि-निरपेक्षतेने सत् किंवा असत् ठरविणे चुकीचे आहे हे नीतिशास्त्रज्ञांना माहीत आहे. इतिहास असे सांगतो की बालहत्त्या करणे, अनेक स्त्रिया करणे, अनेक पति करणे इत्यादि गोष्टी नीतीच्या म्हणून काही ठिकाणी गणल्या जात होत्या! लोकांच्या बायका पळवून नेऊन 'राक्षसी विवाह' वीरांनी किंवा विभूतींनी लावलेले आहेत व त्यांपैकी काही देवकोटीप्रतहि गेलेले आहेत! तात्पर्य काय तर नीतिविषयक आचारविचार हे परिस्थितिसापेक्ष आहेत. त्यातील नित्य व निरपेक्ष भाग एवढाच की, स्वतःला जे खरोखर अशिष्ट व अनीतीचे वाटते ते करणे पाप होय व स्वतःच्या मनाला जे खरोखर योग्य व नीतीचे वाटते ते करण्यात पाप नाही. याचा अर्थ असा नव्हे की पाहिजे त्याने पाहिजे तसे वागावे. स्वतःच्या मनाला 'पूत' वाटेल ते करावे म्हणजे "मनःपूतं समाचरेत्," याचा जो लौकिक अर्थ आहे त्याप्रमाणे वागावे असा अर्थ नाही. आपल्या समाजातील शिष्ट लोकांची चालरीत, सत्पुरुषांची शिकवणूक, स्वतःच्या मनाशी शांतपणे केलेला सर्वांगीण विचार इत्यादि गमकांवरून ज्याने त्याने आपले कर्तव्य-

अकर्तव्य ठरवावे व त्याप्रमाणे वागावे एवढाच याचा अर्थ. कर्तव्याकर्तव्य ठरविताना आपल्या मनोविकारांना आपण बळी तर पडत नाही ना, आत्मवंचना तर आपण करून घेत नाही, प्रचलित शिष्टाचार, धर्मवचने वगैरेंचा त्याग करणे आपणास प्रशस्त वाटत असल्यास असा त्याग करण्यापूर्वी आपण पूर्ण व सर्वांगीण विचार निर्विकार चित्ताने केलेला आहे ना, अशा प्रकारचे प्रश्न मनाला अर्थात् विचारलेच पाहिजेत; पण हे विचारून झाल्यावर आणि मन व मत निश्चित झाल्यावर आपला 'सद्सद्विवेक' म्हणा किंवा 'आत्मतुष्टि' म्हणा किंवा 'स्वस्य च प्रियमात्मनः' म्हणा, हीच शेवटी नीति-अनीतीची कसोटी आहे हे ओळखावे आणि त्याप्रमाणे वागावे. नीति-अनीति—आचारविचारांच्या बुडाशी गेल्यावर मनुष्य आपल्या प्रामाणिक बुद्धीला अनुसरून स्वतःचे व दुसऱ्याचे हित साधण्याचा प्रयत्न करीत आहे किंवा नाही एवढेच महत्त्वाचे तत्त्व हाती लागते. हे स्वहित व परहित [स्वसुख किंवा परसुख नव्हे हे ध्यानात धरावे] साधण्याची जी इच्छा आहे ती किती दृढ किंवा प्रबल, विचार-युक्त व निर्विकार आहे एवढ्यावर मनुष्याची नीतिमत्ता अवलंबून असते. तो कोणती वस्त्रे परिधान करितो, तो काय खातो-पितो, तो मक्केकडे तोंड करून अल्लाची प्रार्थना करतो का पूर्वेकडे तोंड करून सूर्याला अर्घ्य देतो, तो जातीने ब्राम्हण आहे का अब्राह्मण आहे, तो स्वजातीय स्त्रीशी विवाह करतो का परजातीय स्त्रीशी इत्यादि गोष्टींवर त्याची नीतिमत्ता अवलंबून नाही. ह्या गोष्टी बाह्य, गौण व आनुषंगिक आहेत. खरे सौजन्य, खरी नीतिमत्ता, खरे धार्मिकत्व यांहून महत्त्वाच्या, जिव्हाळ्याच्या व आंतर लक्षणांवर अवलंबून आहे.

**भेद दिसला की ज्यांचे सौजन्य मावळते ते लोक रानटी आहेत.**

लौकिक धर्माचे आचार-विचार, नीतिविषयक बाह्य आचार-विचार यांनाच असे हे गौण स्थान दिल्यावर पदार्थविज्ञानादि भौतिकशास्त्रे, कला, वाङ्मय, सामाजिक सुधारणा, राजकीय चळवळ इत्यादिकातील मतभेदांना व वर्तन-प्रकारांना सौजन्याचा विचार करताना माझ्या मते विशेष प्राधान्य देण्याचे कारण नाही हे ओघालाच येते. पण माझा अनुभव तर असा आहे की या मतभेदांना व वर्तनभेदांना आजकाल अवास्तव महत्त्व देण्यात येते आणि त्यामुळे पक्षभेद व पंथभेदच नव्हे तर पक्षद्वेष आणि पंथद्वेष उत्पन्न होऊन

असली ही हरतऱ्हेची भांडणे करण्यात गुंतलेल्या व या भांडणात आनंद मानणाऱ्या समाजात राहाणे नको असे कित्येक वेळा वाटू लागते. मतभिन्नता, जातिभिन्नता किंवा धर्मभिन्नता असताना सलोख्याने, गुण्यागोविंदाने व दुसऱ्याच्या प्रामाणिक आचार–विचारांबद्दल मनात आदर बाळगून महाराष्ट्रीयांना काय, हिंदवासियांना काय, वागणे शक्यच नाही काय? ४०–५० वर्षांपूर्वी रानडे, आगरकर, गोखले यांनी आपआपल्या प्रामाणिक समजुतीप्रमाणे सुधारणा करण्याचे प्रयत्न केले; त्याबद्दल त्यांचा जो छळवाद झाला तो काय महाराष्ट्राला शोभला? हल्ली देखील एखाद्याचे प्रथम माहात्म्य कबूल करून त्याने अस्पृश्योद्धाराची चळवळ हाती घेतल्याबरोबर त्याचे 'माहात्म्य' नाकबूल करून त्याची वाटेल तशी निर्भर्त्सना करावी आणि वारंवार भाल्याने भोसकल्यासारखे करून त्याला छळावे हे काय महाराष्ट्राला उचित आहे? बरे एखाद्याने कौन्सिलप्रवेशाची तरफदारी केली आणि असहकारिता अशक्य म्हणून सांगितले, म्हणून त्याला शाळेतल्या पोरांकडून खादीच्या टोपीचा जाहीर आहेर करण्यात यावा, हे तरी काय योग्य झाले? असे प्रकार पाहिले म्हणजे असे वाटू लागते की महाराष्ट्राला अद्यापि सौजन्याचा अंतरात्माच कळलेला नाही आणि म्हणून त्याला लहान मुलांप्रमाणे पोषाखावरूनच मनुष्याची ओळख पटते, रानटी लोकांप्रमाणे काचेच्या मण्यांनाच तो अलंकार समजतो व एखाद्या अडाणी स्त्रीप्रमाणे पोषाखाच्या व अलंकाराच्या फाजील आवडीमुळे अंतरात्म्याच्या शुद्धाशुद्धतेकडे तो दुर्लक्ष करतो!

**विरोधातहि सौजन्य शक्य आहे, आवश्यक आहे.**

मला कोणी येथे असे विचारील की प्रामाणिक मते जर तुम्हाला मान्य आहेत तर प्रामाणिक मतविरोध तुम्हाला अमान्य का असावा? खरी गोष्ट अशी आहे की मला मताविरोध नको आहे असे मुळीच नाही. प्रत्येकाने आपल्या मताचा पुरस्कार केलाच पाहिजे. अर्थात विरोध हा अपरिहार्यच आहे पण हलकटपणाचा विरोध आणि सौजन्ययुक्त विरोध यात फरक आहे. पौराणिक दाखला द्यावयाचा म्हणजे अर्जुनाने भीष्माशी व द्रोणाशी युद्ध केले तसे युद्ध देखील मला चालेल, मग केवळ विरोधाची गोष्टच बोलावयास नको. या जगात पूर्ण सत्य कोणाच्याच हाती न लागल्यामुळे (तसेच गैरसमज, भिन्न भावना, भिन्न हितसंबंध, कर्तव्ये इत्यादि गोष्टींमुळे) प्रामाणिक विरोधाची शक्यताच

नव्हे तर अपरिहार्यता कोणाच्याहि ध्यानात येईल. पण विरोधामध्ये बालिशता, कुत्सितपणा, कुचेष्टा करून प्रतिष्ठा मिळविण्याची बुद्धि, एखाद्याला एकदा शत्रू म्हटल्यानंतर त्याच्या पाठीस लागून व जे हाती येईल ते फेकून किंवा मारून त्याची जणू काय शिकार करावयाची अशा प्रकारची रानटी प्रवृत्ति इत्यादि गोष्टींचा अभाव असला पाहिजे.

भीष्म–द्रोण व अर्जुन यांच्या विरोधाचा वर उल्लेख केला तो पौराणिक म्हणून सोडून दिला तरी आधुनिक कालातहि उपरिनिर्दिष्ट भारती योद्धयांच्या सारखी आदरयुक्त युद्धे आयर्लंडच्या इतिहासात अलीकडे दिसून आली आहेत. इंग्लंडचा आयर्लंडशी तह झाल्यानंतर डी व्हॅलेरा याचे काही अनुयायी यांना तो तह मान्य नव्हता आणि निर्भेळ स्वातंत्र्याकरिता पूर्वी जे इंग्लिशांशी लढले त्यांना आता तह मान्य करणाऱ्या स्वकीयांशी लढणे प्राप्त झाले. म्हणजे तह होण्यापूर्वी इंग्लंडशी लढताना ज्यांनी खांद्याला खांदा लावून साहसाची अनेक कामे केली आणि एकमेकांच्या प्राणरक्षणार्थ आपले प्राणहि धोक्यात घातले त्यांनाच तह झाल्यावर एकमेकांना तुरुंगात टाकण्याचे, गोळ्या घालून ठार मारण्याचे काम करण्याची पाळी आली. अशा प्रसंगी कित्येक बापांना मुलांशी, भावांना भावांशी, मित्रांना मित्रांशी लढावे लागले; पण या कालखंडाच्या इतिहासात भारतीय युद्धातल्याप्रमाणे काही उज्ज्वल देखावे दिसून आले. त्यातले एक उदाहरण आठवते. ते असे की डी व्हॅलेराच्या एका अनुयायाला त्याच्या मित्रानेच पकडून तुरुंगात टाकल्यावर त्याची रीतसर चौकशी होऊन गोळी घालून त्याला दुसरे दिवशी बारा वाजता ठार करण्याचे ठरले. आपणाला अत्यंत प्रिय असलेल्या मित्राला तुरुंगात ठार करविण्याचे कटु कर्तव्य त्याच्या नशिबी आले व त्याने ते बजावलेहि. तुरुंगातून त्याला सोडविण्याचे हरतऱ्हेचे बरेवाईट प्रयत्न होत होते, ते विफल करण्याकरिता त्याचा मित्र रात्री डोळ्यात तेल घालून पहारेकऱ्यांवर वगैरे देखरेख करीत होता. दुसऱ्या दिवशी बारा वाजेपर्यंत त्याने सक्त पहारा केला. बरोबर बाराच्या ठोक्याला आपल्या मित्रावर गोळी झाडली जाऊन तो मृत झाला हे ऐकेतोपर्यंत कर्तव्यनिष्ठुरता त्याला स्वीकारता आली, कारण तो लगेच स्वतः रडू लागला व थोडक्याच अवधीत निश्चेष्ट पडला. कालांतराने लोकांनी त्याला सावध केल्यावर त्याच्या मृत मित्राने लिहिलेल्या मृत्युपत्राचा कागद त्याच्या हातात देण्यात आला. या मृत्युपत्रात असे लिहिले होते की, कर्तव्यनिष्ठेमुळे माझ्यासारख्या मित्राला

देखील मारण्यास तू कमी केले नाहीस हे पाहून तुझ्याबद्दल माझा आदर पूर्वीपेक्षाहि अधिक झाला आहे आणि म्हणून माझी सर्व इस्टेट मी तुझ्या स्वाधीन करतो. तिचा विनियोग तू पाहिजे तसा कर.

युद्धे व्हावयाचीच तर असली, अशा प्रकारची 'धर्म्य युद्धे' मला पाहिजे आहेत, 'धार्मिक युद्धे' नको आहेत. धार्मिक युद्धेहि चालतील–जर तेवढी खरीखुरी धर्मश्रद्धा असेल तर. पण मी मुंबईस होणारे जे दंगे पाहिले व त्यांची वर्णने जी ऐकिली त्यावरून या दंग्यांच्या बुडाशी खुळचट व आचरट समजुती, गैरसमज, दुरभिमान, स्वार्थसाधुत्व इत्यादि गोष्टीच असतात असे दिसून आले आहे. अशा दंग्यापासून तसेच सामाजिक, राजकीय वगैरे पक्षांपक्षांमधील क्षुद्र भांडणांपासून लोकांना शक्य तर निवृत्त करावे अशा हेतूने वरील लेख लिहिला आहे; आणि त्यात खरे सौजन्य हे विशिष्ट वेष, भाषा, जाति, धर्म, पक्षोपपक्ष, पंथ, मते इत्यादिकांवर अवलंबून नसून ते सद्बुद्धीवर अवलंबून आहे आणि ज्याने त्याने आपल्या प्रामाणिक समजुतीला अनुसरून वागावे आणि इतरांच्या प्रामाणिक समजुतींबद्दल आदर बाळगावा इत्यादि गोष्टी यथाप्रसंग सांगितल्या आहेत व त्यातील ग्राह्यांश घेऊन इतर अंशाची उपेक्षा करावी, [ किंवा विरोध करावयाचा असल्यास तोहि करावा. पण कुचेष्टेच्या दृष्टीने किंवा वैरभावाने करू नये ] एवढीच विनंती आहे.

# १०. भविष्यकथन

## नरसिंह चिंतामण केळकर

भविष्यकथन ही भोळ्याबापड्यांप्रमाणे स्वतःला बुद्धिवादी म्हणवून घेणारांना-सुद्धा वेड लावणारी वस्तु. ह्या वस्तूच्या या सार्वत्रिक आणि सार्वकालिक आकर्षणाची मोठी मनोज्ञ मीमांसा प्रस्तुत लेखांत श्री. न. चिं. केळकर यांनी केलेली आहे. भविष्यकथनाचा कडकडून निषेध नाही, पण त्याचबरोबर भविष्य-कथनाच्या इष्टानिष्ट बाजूंचे न्याय्य दर्शन घडविण्यात काही उणीव राहिली आहे असे वाटणार नाही असे मोठे खुबीदार विवेचन प्रस्तुत लेखात श्री. केळकरांनी केलेले आहे. श्री. न. चिं. केळकर (जन्म इ. स. १८७२ मृत्यु इ. स. १९४८) हे आधुनिक मराठी वाङ्मयातले साहित्यसम्राट! साहित्यप्रकाराचे असे एकहि दालन नाही की जेथे त्यांच्या लेखणीने हौसेने संचार केला नाही. निबंध, कादंबरी, नाटक, कविता, चरित्र, आत्मचरित्र, लघुनिबंध—या सर्व क्षेत्रात तिने पदार्पण केले आहे; पण तिच्या वैशिष्ट्यांचे सगळे वैभव मुख्यत: त्यांच्या निबंधलेखनात प्रकट झालेले आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनंतर मराठी निबंधाच्या कलात्मक गुणांची जाणीवपूर्वक जोपासना तात्यासाहेब केळकरांनीच केलेली आहे. याची एक साक्ष म्हणजे प्रस्तुत लेख.

**भविष्यवादी व त्यांचे पोशिंदे यांची परंपरा अखंड सुरू आहे.**

भोंदूंनी फसवावे आणि दुधखुळ्यांनी फसावे, असले जे अनेक प्रकार जगात आहेत, त्यातलाच एक प्रकार 'भविष्यकथन' हा होय. वास्तविक भूतकाल हा भविष्यकाळाइतकाच समृद्ध आहे. तथापि, एखादे ऐतिहासिक सत्य—पूर्वी माहित नसलेले असे—जरी कोणी खात्रीलायक पुराव्यानिशी सिद्ध करून दिले, तरी त्यामुळे कित्येकांस जो आनंद होणार नाही, तो भविष्यकाळची एखादी साधी गोष्ट सांगितली असताहि होतो; मग ती खरी न ठरली तरी चालेल. बाजारात नेहमी उधारीचा प्रकार असा असतो की, माल आधी काही दिवस गिऱ्हाइकाने ताब्यात घ्यायचा व त्याचे पैसे दुकानदारास मागाहून

द्यायचे. पण अर्धवट धर्मबुद्धीने मांडलेल्या तामसी श्रद्धेच्या बाजारात सर्व सट्याचाच व्यापार चालतो. म्हणजे विश्वासाचे दाम आज पटवावयाचे, आणि वायद्यावर खरेदी केलेले भविष्य-कथन पुढे कधी काळी खरे ठरेल म्हणून वाट पाहात बसावयाचे आणि ते खरे न ठरले तरी काय हरकत? विश्वासाचे दाम भविष्यवाद्याला तोपर्यंत फुकट वापरायला मिळतातच. शिवाय भविष्य खोटे ठरले तरी हे दाम सहसा कोणी परत मागत नाही व कोणी देतहि नाही. कारण श्रद्धाळू मनुष्य अशा बाबतीत मोठा दिलदार व उदार असतो! भविष्य-कथन खोटे ठरले तरी पुष्कळ वेळा त्याचा दोष भविष्यवाद्याचे माथ्यावर न लादता आपल्या नशिबाला बोल लावून स्वतःच्या डोक्यावर घेण्यास तो तयार असतो. 'भविष्य आयत्या वेळी खोटे ठरले तरी काय हरकत? कारण ते प्रथम सांगितले तेव्हा तरी खरे होतेच की नाही? पुढे खरे न ठरले तर आपले नशीब! त्याला भविष्यवादी काय करणार?' रोग बरा झाला तर आपल्या औषधाने, बरा न झाला तर रोग्याच्या कुपथ्याने, असा जो दुहेरी पेच 'कलिविडंबना'त वर्णन केलेला वैद्य रोग्याला घालतो, तोच भविष्यवादी आपल्या ताब्यात आलेल्या दुधखुळ्या लोकांनाहि घालतो. किंबहुना, ते लोक तसला पेच आपण होऊन आपणावर करून घेतात, असेहि म्हणता येईल. हा अलौकिक उधारीचा प्रकार जगाच्या प्रारंभापासून सुरू आहे. भविष्यवाद्यांचा कुलक्षय होण्याची भीति कधीच नाही; कारण त्यांचे पोशिंदे जे श्रद्धाळू लोक त्यांचाहि कुलक्षय कधी होत नाही. जगाच्या उत्पत्तीपासून या दोन्ही कुळांची परंपरा अखंड चालू आहे. कालमानाप्रमाणे त्या त्या पिढीचे पुरुष जरी नूतन पोषाख व पेहराव धारण करितात, तरी आतून त्यांची शरीररचना व त्याचा रंग ही कायमच असतात.

**पराक्रमाची आकांक्षा हे भविष्यप्रेमाचे एक कारण**

भविष्यकथनाच्या अंगाला इतके जे सोने लागले आहे, त्याचे कारण काय? हा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. वर्तमानकाळ तर बोलूनचालून रुक्ष व नीरस; त्यात अद्‌भुतत्व असे कोणास काहीच वाटत नाही. पण भूतकालाबद्दलहि मनुष्यमात्राला भविष्याइतके प्रेम वाटत नाही, ही जराशी चमत्कारिक व अनुभव-सिद्ध गोष्ट आहे. मनुष्याचे तोंड नेहमी पाहावे तो पुढच्या काळाकडे फिरविलेले! आगगाडीत आपण बसलो असता मागे किंवा पुढे वाटेल त्या बाजूस तोंड

करून बसण्याची सोय असते. शिवाय पुढच्या बाजूस तोंड करून बसलो असता जो भूभाग व देखावा केवळ क्षणभर आधी पाहावयास आपणास सापडणार तोच, क्षणभर उशीरा का होईना, पण मागे तोंड वळवून बसलो असताहि, पाहावयास सांपडणारच. असे असता शेकडा नव्याणव मनुष्ये पुढच्या बाजूस तोंड वळवून बसलेलीच आढळून येतील. या चमत्काराचे एक कारण असे असावे की, आपण मागे तोंड वळवून बसलो असता जरी तोच भूभाग व देखावा डोळ्यापुढून जातो, तरी तो हातातून निसटून पळून गेल्यासारखा वाटतो. म्हणजे त्याच्या दर्शनाने आपल्या बलसंपन्नतेची भावना मनात न येता, कमकुवतपणाची भावनाच येते. देखावा निघून जातो त्याला अटकाव करून धरून ठेवण्याची शक्ति आपणात नाही याचे आपणास नकळत वाईट वाटते. पण पुढच्या बाजूस तोंड करून बसलो असता, व दूर असलेला देखावा हळुहळू आपल्या डोळ्यांपुढे येत असता त्याचे आपण आक्रमण केले—तो आपण हस्तगत केला—अशी अभिमानाची भावना मनात येत असावी. भूतकाळ हा भूतकाळ, तो आपल्या पायांशी मरून पडलेला; अर्थात मेलेल्याला मारण्यात किंवा काबीज करण्यात कसला पुरुषार्थ? भविष्यकाळ हे श्वापद मात्र भयंकर असून ते अंधाऱ्या दरीत बसून राहिलेले असते. त्याला जर आपणाला हुसकून काढून जिंकता आले, तर तो मात्र पुरुषार्थ खरा असे मनुष्याला वाटते. तात्पर्य, अशा रीतीने पराक्रमाची आकांक्षा हे एक कारण होय.

**भविष्यप्रेम जिज्ञासाप्रेरित असावे.**

दुसरेहि एक कारण आहे. ते हे की, मनुष्य ज्ञानाच्या बाबतीत नेहमी जागृत असतो. नुसती क्षितिजापलीकडेहि आपली दृष्टि जात नाही, जाग्यावर उभे राहून आपणास सगळे जग दिसत नाही, ही परमेश्वराविरुद्ध मनुष्य-मात्राची एक कायमचीच तक्रार आहे. तथापि, भविष्यज्ञानाची आवड ही केवळ ज्ञानसंग्रहाच्या सात्त्विक भावनेने मनुष्य धरीत असेल तर तिला कोणी नावे ठेवणार नाही. पण ज्ञानवृद्धीची ही लालसा बहुशः सात्त्विक नसते. कारण भविष्यकाळ सोडून दिला तरी वर्तमानकाळी कोणाहि मनुष्याच्या कक्षेत, किंवा कक्षेबाहेर पण जवळच, ज्ञानभांडार इतके खच्चून भरलेले असते की, त्याने हा जन्मच काय पण पुढचे अनेक जन्म घालविले तरी ते सर्व त्याला संपादिता

येणार नाही. असे असता केवळ एका क्षणानंतर घडून येणारी गोष्ट जर क्षणभर आधी त्याला समजण्यासारखी असेल, तर तिच्याकरिता तो हे सर्व ज्ञानभांडार बाजूला सारील. बरे, क्षणभर आधी कळलेल्या गोष्टीचा हटकून फायदा करून घेईल इतका तो खरा विचारी असेल तरीहि चालेल; परंतु भविष्यज्ञानाला हपापलेली मनुष्ये सहसा इतकी विचारी असलेली आढळत नाहीत. त्यांना भविष्यज्ञानाची गोडी वाटते ती ज्ञानाकरिता नव्हे, तर एका क्षणानंतर कळणारी गोष्ट आगाऊ कळली एवढ्याचकरिता. चमत्कार किंवा अद्‌भुतपणा एवढ्याचाच त्यांना आनंद ! उठल्यासुटल्या ज्योतिषापुढे पत्रिका टाकून किंवा हात पसरून भविष्यकथनाची याचना करणाऱ्या शंभर लोकांपैकी एक मनुष्य तरी ज्योतिषापासून होणाऱ्या भविष्यज्ञानामुळे सन्मार्गास लागलेला सापडेल की नाही, याची शंकाच वाटते. पण लहान मुलांना समोर दिसणाऱ्या जिनसांपेक्षा तोच जिन्नस कुलुपात असला तर अधिक हवासा वाटतो; किंवा बायबलात सांगितल्याप्रमाणे मनुष्याच्या आद्य जनकजननींना ज्ञानवृक्षाचे फळ खाण्याचा प्रतिबंध झाला म्हणूनच ते खाण्याची इच्छा त्यांना अनिवार झाली, तोच प्रकार भविष्यज्ञानाकरिता हपापलेल्या लोकांचा असतो. भविष्यज्ञान हे सहसा होऊ शकत नाही; सामान्य नियमांच्या बंधनामुळे हे अप्राप्य किंवा प्रतिषिद्ध एवढ्याचकरिता ते मिळवावे असा त्यांस मोह पडतो. निसर्गदेवतेने घालून दिलेली मर्यादा ओलांडणे किंवा नियम मोडणे यातच विशेष पराक्रम आहे, अशी मनुष्याची कदाचित् बुद्धि असेल; किंवा त्याच्या बुद्धीत असली महत्त्वाकांक्षाहि नसून, केवळ अनपेक्षितांची अपेक्षा करणे किंवा अनुभव घेणे इतकी पोरकटच कल्पना त्याची असू शकेल. हजारो लहान मुलांना फटाकडीचा झालेला बार ऐकून मौज वाटते, पण त्या आवाजाचे कार्यकारण हुडकून काढण्याकडे एकाचेहि मन वेधत नाही. आवाज ऐकल्यापासून झालेला त्यांचा आनंद वांझोटा असतो, तो जिज्ञासेला प्रसवत नाही. त्या आनंदाची उत्पत्ति व लय ही समकालीनच असतात. याच्या उलट, फटाकडीचा आवाज ऐकल्यामुळे ज्याची जिज्ञासा जागृत झाली असा एखादा मुलगा आढळला, तर त्याबरोबर हेहि आढळून येईल की, त्या प्रौढ बुद्धीच्या मुलाला तो आवाज ऐकून होणारा आनंद इतर पोरकट पोरांच्या आनंदासारखा नसतो. खऱ्या जिज्ञासेशिवाय भविष्यज्ञानाची आवड धरणे पोरकटपणाचे आहे; उलट जिज्ञासाप्रेरित मनुष्याला भविष्यकथनाचा पोरकट आनंदहि होत नाही, व त्याचा त्याला चाळाहि लागत नाही.

**बहुतांश भविष्यकथने काल्पनिक असतात.**

भविष्यकथनाचा खेळ सर्व देशात सर्व काळी अनेक प्रकारचे लोक खेळत आले आहेत. पण भविष्यकथनाची म्हणून जी उदाहरणे आढळतात, ती काल्पनिक तरी असतात; किंवा खरी असल्यास त्यात अद्भुत असे मुळात फार थोडे असते, म्हणजे ती फक्त विशिष्ट अनुमाने असून अनुमानांच्या रीतीप्रमाणेच खरी ठरलेली असतात. पैकी पहिल्या प्रकारची म्हणजे काल्पनिक भविष्यकथनेच फार. अशांना मुळात काहीच आधार नसतो; पण विवक्षित गोष्टी घडून आल्यानंतर मग त्या संबंधाने पूर्वी भविष्ये झाली होती अशी भाविक लोक आपल्या व दुसऱ्याच्या मनाची समजूत करीत असतात. भारत-भागवतात सुवर्ण युगे व प्रलय यांविषयीची भविष्ये ठिकठिकाणी आढळतात. ज्याचे पूर्वी भविष्य झाले नव्हते म्हणजे ज्याचे भविष्य झाल्याविषयी लोक बोलू लागले नाहीत असा एकहि अवतार सापडणार नाही! रामचरित्राचे भविष्य शब्दशः अगाऊच झाले होते! खिस्ताचे भविष्य त्याच्या जन्माच्या पूर्वी झाले होते की नाही हे कोणी सांगावे? पण खिस्तानंतर झालेल्या बायबलात मात्र त्याचा उल्लेख हटकून सापडतो. कलंकीपुराण, गर्गसंहिता व भविष्यपुराण यात भविष्येच भविष्ये सांगितली आहेत! पण त्या त्या वेळी जिवंत असून जुन्या भविष्यांचे उल्लेख पाहून त्याबरहुकूम ज्यास अनुभव येईल तो खरा! हिंदु लोकांच्या 'कलंकी' प्रमाणे ज्यू लोकांचा 'मेसाया' अद्याप यावयाचा आहे; आणि ज्या वेळी खिस्त फिरून जन्माला येणार, त्या वेळी अनंत भूतकाळ व अनंत भविष्यकाळ यातले सर्व मनुष्य प्राणी आपापल्या थडग्यातून उठून देवाच्या सिंहासनापुढे उभे राहाणार असे भविष्य आहे! असले भविष्य अर्थात् खोटे ठरण्याचा संभव नाही; कारण खोटे ठरण्याचा प्रसंग जग बुडेल तेव्हा! संतुष्ट मनाने दिलेला आशीर्वाद किंवा संतापाने दिलेला शाप हा केव्हा केव्हा केवळ काकतालीय न्यायाने खरा होतो व फुलाबोलास गाठ पडून मूळच्या उद्गारांना भविष्य-कथनाचे स्वरूप येते! अशा तऱ्हेची भविष्ये तर कित्येक सापडतील. रास-मालेमध्ये असली भविष्यकथने अनेक आहेत. दिल्लीच्या बादशहाने शिख धर्मगुरु तेगबहादुर याचा छळ केला, तेव्हा त्याने मोगल पातशाही नष्ट होऊन इंग्रज येतील असे भविष्य केल्याचे आता सांगतात! पण तेच जर खरे माना-

वयाचे तर ' Akbar's dream' या काव्यात टेनिसन कवीने इंग्रज येण्याविषयी अकबरच्या वेळचे म्हणून काव्यपूर्ण भविष्य लिहिले, तेहि गंभीरपणाने खरे का मानू नये?

**काहीत केवळ बोला-फुलाची गाठ किंवा चतुराईचा तर्क असतो**

त्याचप्रमाणे व्हर्जिलच्या ' इलिअड ' काव्यातील "Over every shore the houses of Aeneas shall reign" या वाक्यावरून रोमन बादशाहीचे भविष्य, तसेच सेनेका याच्या नाटकातील "There shall come a time in later ages when ocean shall relax his chains and a vast continent appear, and a pilot shall find new worlds and Thule shall be no more earth's hound" या एका वाक्यावरून अमेरिकेचा शोध लागण्याचे भविष्य झाले होते, असे कित्येक भाविक लोक म्हणतात. पण अशा रीतीने काव्यातील तुटक शब्द घेऊन त्यांची भविष्ये बनवू लागल्यास वाटेल ती भविष्ये सिद्ध करता येतील! असल्या भविष्यांची उपपत्ति काकतालीय न्यायानेच ठरविली पाहिजे. कारण भविष्यगर्भ असे इतर शेकडो हजारो उद्गार फुकट जातात, तेव्हा त्याकडे कोणी लक्ष देत नाही व जेव्हा एखादी गोष्ट कशी तरी इकडून तिकडून जुळवून दाखविता येते, तेव्हा मात्र तिच्या बोकांडी बसून तिला ' भविष्यकथन ' असे गंभीर नाव देतात! भविष्यांची दुसरी एक उपपत्ति अशी लाविता येते की, कल्पनेची मजल अनुभवापुढे नेहमी काही थोडी तरी असतेच; आणि प्रतिभाशाली मनुष्य रेम्याडोक्या मनुष्याच्या पेक्षा पुढे जाऊन, घडून येणाऱ्या गोष्टीसंबंधाने सहजच अधिक चतुराईने तर्क करितो; व यामुळे त्याच्या उद्गारातून भावी वृत्तांताचे रूप किंचित पुसट पुसट प्रतिबिंबित होणे शक्य असते. पण चतुराईचा तर्क किंवा 'Intelligent anticipation' याहून अधिक अलौकिक किंवा दिव्य असे स्वरूप त्याला देता येत नाही. ज्याला गृहितार्थाने ' भविष्यकथन ' हे नाव दिले पाहिजे, असले चमत्कार क्वचित होतात असे घेऊन चालून त्या संबंधाने ही वरील कैफियत आम्ही दिली आहे. पण अनुभवी, चतुर, दूरदर्शी व प्रतिभासंपन्न अशा लौकिक व्यक्तींना अनुमानाच्या रूपाने करिता येणार नाहीत, अशी मुळी भविष्यकथनेच नसतात, असेच आमचे म्हणणे आहे. व जी जी भविष्यकथनाची उदाहरणे म्हणून देण्यात येतात

किंवा येतील, त्या घडलेल्या खऱ्या गोष्टी असल्या तरी, वरील वर्णनाखालीच आल्या पाहिजेत.

**भविष्यकथन हे अनुमानकथन आहे.**

'भविष्यकथन' या शब्दाने जरी अद्भुत भावना मनात उत्पन्न होते, तरी ते एक प्रकारचे अनुमानच आहे, व अनुमान हे ज्ञानाचे एक नेहमीचेच साधन होय. ज्ञानाचे दोन प्रकार असतात; प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष. इंद्रियार्थ—सन्निकर्षाने होणारे ते प्रत्यक्ष; पण असे ज्ञान फार थोडे व थोडा वेळ टिकणारे असते. आता स्मृतिजन्य ज्ञानाचाहि प्रत्यक्ष ज्ञानामध्येच समावेश करता येईल, कारण स्मृति हा ज्ञानेंद्रियांच्या धर्मांचाच एक परिणाम आहे. परंतु प्रत्यक्ष व स्मृतिजन्य दोन्ही मिळून होणारी ज्ञानाची भरती आपल्या एकंदर अनुमान-जन्य ज्ञानाच्या भरतीपेक्षा कमीच असते. उपमिति व शाब्द असे प्रमाणांचे आणखी दोन प्रकार मानण्यात येतात. पण त्या दोहोंचाहि अंतर्भाव अनुमानातच केला पाहिजे. कारण, उपमानात म्हणजे दाखला देताना आपण कित्येक मूलभूत गोष्टी म्हणून गृहीत घेतो, व त्यांवरून झाले तरी अनुमानच काढतो. शाब्दप्रमाणातील आप्तवचन झाले तरी पुष्कळ वेळाच्या अनुभवानेच ते खरे वाटत गेल्यामुळे, आप्तवचनाची यथार्थता आपण अनुमानितच करितो. असो; अनुमान म्हटले म्हणजे त्याची रीत येथून तेथून सारखीच; व ज्या गोष्टी आपण अनुमानाच्या मार्गाने न जाताहि आपणास समजतात असे वाटते, त्यांचेहि ज्ञान खरोखर अनुमानाच्या साहाय्यानेच झालेले असते. अनुमान करण्याची नित्य सवय लागल्याने केवळ पाटीवर आकडे मोडून सोडविलेल्या उदाहरणाप्रमाणे अनुमानाची कृति आपणास दर वेळेस करावी लागत नाही. पण तेवढ्याने अनुमानाची म्हणून काही कृतीच करावयाची नसते, असे मात्र होत नाही. ज्याची स्मृति धड असते तो तोंडाने हिशेब करितो, व ज्याची धड नसते त्याला आकड्यांचा सर्व तपशील मांडावा लागतो.

**अनुमानसोपानाशिवाय सिद्धांतप्राप्ति नाही.**

पण आकडे प्रत्यक्ष मांडले किंवा न मांडले तरी रीतीचा काही तरी कारभार करूनच उदाहरण सोडवावयाचे असते ही गोष्ट निर्विवाद आहे. तोंडाने

उदाहरण सोडविणारा मनुष्य रीतीशिवाय सोडवितो, आणि पाटीवर आकडे मोडणारा मनुष्य मात्र ते रीतीने सोडवितो असे म्हणता यावयाचे नाही. कारण, दोघांसहि उदाहरण सोडविण्यास रीत ही अवश्य व अनिर्वाह्यच आहे. आणि कोणचीहि रीत म्हणजे अनुमानपरंपरेपेक्षा दुसरे काही एक नाही. स्मृतीप्रमाणे कमीअधिक बुद्धीमुळेहि फरक पडतो. तथापि बुद्धिवान मुलाला अनुमानपरंपरेची स्फूर्ति लवकर झाली म्हणून त्याचे झाले तरी अनुमान-परंपरेशिवाय चालते असे म्हणता येत नाही. बुद्धिबळे मध्यम खेळणाराला दोन डाव टाकून होणारा तिसरा डाव आधी दिसतो; पण तोच खेळणारा निष्णात असेल तर पाचसातहि डाव आधी लक्षात घेऊन त्या धोरणाने तो मोहोरी चालवितो. पण असा भेद असला तरी मधल्या डावांच्या पायऱ्यावरूनच दोघां-नाहि जाणे आहे. सदरेवरून माडी चढण्याचा मार्ग एक म्हणजे जिना हाच; ह्यावरून चढणारे मूल असेल तर दोन पायांच्या भरतीला दोन हात लावून, चार चार पायांनी प्रत्येक पायरी चढेल; प्रौढ मुलगा असेल तर एका पायरीवर एक पाय तर दुसरीवर दुसरा पाय असा चढेल; व मोठा मनुष्य असेल, तर एक पायरी आड एक पायरी ओलांडून उड्या मारीतहि त्याला जिना चढता येईल. पण सोपानपरंपरा ही त्याला काही चुकणार नाही. अनुमान म्हणजे तीहि अशी एक सोपानपरंपराच असते.

मनुष्याचा अनुभव व बुद्धि जितकी ज्यास्त, त्या मानाने त्याला अनुमान-सोपानाच्या पायऱ्या—म्हणजे मुख्य अनुमानातील काही काही पोट अनुमाने—उड्या मारून ओलांडिता येतील. परंतु अनुमान सोपानावरूनच सिद्धांताकडे गेले पाहिजे हे त्याला टाळता येत नाही. अनुभव किंवा बुद्धि विशेष असली तर मनुष्याला पोटअनुमानांच्या पुरचुंड्या बांधून नेहमी तयार ठेविता येतात इतकेच. गणितशास्त्रात असे 'फॉर्म्युले' तयार असतात, किंवा महिन्यावरून दिवसांचे पगार आकारण्याची अथवा इंजिनियर खात्यात इमारती बांधण्याचे कामी लाकूड लोखंड वगैरेंवर पडणारा भार व त्या मानाने त्यांची रुंदीजाडीची मापे ठरविणारी कोष्टके असतात, तशी अनुमानविषयातील कोष्टके अनुभव व बुद्धि यांचे योगाने मनुष्याच्या डोक्यात तयार होऊन राहतात; आणि मग त्यांच्या सहाय्याने कोणत्याहि प्रश्नास मनुष्याला कमी जास्त जलदीने उत्तरे देता येतात. पुष्कळ गोष्टी मनुष्य हा आंगच्या उपजत बुद्धीने करितो असे म्हणतात; परंतु, उपजत बुद्धि अशी फार थोडी असते. व जी असते तिचेहि पृथक्करण

केले असता, तो त्याच्या स्वतःच्या अनुमानांचा परिणाम नसला तरी ज्यांच्या शरीरापासून तो निर्माण झाला, त्या एक अगर अनेक पिढ्यांच्या मातापितरांनी आपापल्या जन्मात मिळविलेल्या अनुमानजन्य ज्ञानाचा परिणाम होय, असे दाखविता येते. सहजस्फूर्तीचेहि स्वरूप असेच आहे. चकमक झडल्याबरोबर ठिणगी पडली किंवा बटन दाबल्याबरोबर विजेचा दिवा लागला, तरी त्या ठिणगीचा व त्या ज्योतीचाहि एक रासायनिक वृत्तांत म्हणून असतोच. या चमत्काराचा कार्यकारणभाव, त्याचे नियम, व तो चमत्कार उत्पन्न होण्यास लागणारी पूर्वतयारी यांचा वृत्तांत इतका मोठा असतो, की तो घडून येण्यास जशी कित्येक वर्षेहि लागली असतील तसा तो समजून घेण्यास कित्येक तासहि लागतील.

**भविष्यकथन जर अलौकिक—**

इतका प्रपंच करण्याचे कारण हेच की, 'भविष्यकथन' हे नाव जरी प्रायः गहनार्थप्रतिपादक आहे, तरी ती वस्तु केवळ 'अनुमान' या सदराखालीच पडेल. अनुमान हे नीरस व तर्करुक्ष नाव दिल्यामुळे भविष्यकथनाचे सर्व स्वारस्य, त्याची सर्व रम्यता आम्ही काढून टाकतो, असा कदाचित आक्षेप आमच्यावर येईल. परंतु तो आक्षेप सोसूनहि यथार्थ वस्तुरूप करविलेच पाहिजे. भविष्यकथन हे केवळ दिव्यस्फुरणाचे कार्य आहे, असे गौरवयुक्त शब्दांनी त्याचे वर्णन कोणी वाटेल तर करो; पण भविष्यकथनास केवळ अनुमानाखाली ओढणाराला आपल्या पदरी नास्तिकपणाच पत्करावा लागेल असे नाही. कारण याच स्फुरणातील दिव्य तेज तेवढे ईश्वरी चित्कलेतून आले असे मानण्यास काय कारण? व हे तेज जर चित्कलेतून आले, तर भविष्यकथन सोडून वर्तमानकाळी होणाऱ्या इतर लोकोत्तर मानसिक स्फुरणांचे जे प्रकार आपणास दिसतात, त्यालाहि कारण ईश्वरी चित्कलाच असे का मानू नये? ईश्वर मनुष्याला चित्कला उसनी देत असेल, तर ती भविष्यकाळासंबंधी सव्वाहात गप्पा मारण्यापुरतीच देतो असे का मानावयाचे? वर्तमानकालीहि बुद्धीचे किंवा मानसिक स्फुरणाचे चमत्कार आपणास दिसत असता, त्यांना मात्र लौकिक गोष्टी हे नाव देऊन त्यांची योग्यता आपण कमी का करावी? जे वर्तमान तेवढे लौकिक व जे भविष्य तेवढे अलौकिक, जे प्रस्तुत तेवढे मानुष व जे अप्रस्तुत ते सारे दिव्य, असले वर्गीकरण अन्यायमूलक नव्हे काय? ते

करणारांनी भगवद्गीतेत सांगितलेल्या 'विभूतिपूजना'च्या सिद्धांताचे मर्मच जाणले नाही असे म्हणावे लागते.

**—तर प्रतिभेची सगळी स्फुरणे अलौकिक !**

स्वतः बुद्धि हीच मुळी जर ईश्वरदत्त आहे, तर वर्तमानकाळी किंबहुना आपल्या डोळ्यांदेखत घडणाऱ्या तिच्या अनेक साक्षात्कारांनाहि आपण दिव्य चमत्कार का म्हणू नये? ज्याच्या डोक्यातून लोकोत्तर उज्ज्वल काव्य निघते, ज्याच्या हाताने अलौकिक सुंदर चित्र निर्माण होते, ज्याची बुद्धि सराफकट्ट्यावर किंवा शेअरबाजारात इतकी प्रभावशाली होते, की त्याच्या पुढे सर्व प्रतिपक्षी कोलमडून जाऊन त्यालाच तेवढे अव्याहत यश मिळते—त्या सर्वांच्या मनःस्फुरणाला दिव्यच का म्हणू नये? व आमच्या या युक्तिवादाने चिच्छक्तीची व्याप्ति जगात जर अधिक सिद्ध झाली, तर आम्ही नास्तिक न ठरता उलट अधिक आस्तिकच ठरत नाही काय? अमुक इतक्या इयत्तेपलीकडे मनःस्फुरण गेले म्हणजे त्याला दिव्य किंवा ईश्वरी असे नाव द्यावयाचे, तर आमच्या कवीला, आमच्या चिताऱ्याला, व आमच्या यशस्वी सट्टेवाल्यालाहि तुमच्या भविष्यवाद्याप्रमाणे चित्कलेचे अंशभागी मानून त्यांना ते गौरव तुम्ही देणार नाही, तर तुमच्या भविष्यवाद्यालाहि ते मिळणार नाही! ईश्वरी कृपेची वाटणी मनुष्यमात्रात इतक्या सढळ हाताने करावयाची की नाही—कारण तशी केल्याने त्या कृपेची दुर्मिळता जाऊन तिची योग्यता कमी झालेली तुम्हाला वाटेल—हे तुम्ही वाटेल तसे ठरवा. पण वाटणीचा प्रश्न उपस्थित झाला असता, न्यायाचा आग्रह आम्ही सोडणार नाही, इतकेच काय ते आमचे येऊन जाऊन म्हणणे.

**भविष्याच्या प्रांतात प्रवेश केल्याशिवाय माणसाला चैन पडत नाही !**

'पुढे काय ?' हा प्रश्न बहुधा प्रत्येक मनुष्याच्या पुढे उभा असतोच. उन्हात चालणाऱ्या मनुष्याला ज्याप्रमाणे आपल्या सावलीच्या टोकाला केव्हाहि गाठता येत नाही, त्याप्रमाणे 'पुढे काय?' या प्रश्नाच्या समाप्तीलाहि तो केव्हाच गाठू शकत नाही. हिमालय पर्वतावर चढणाऱ्या प्रवाशाने एक शिखर ओलांडले की दुसरे शिखर त्यामागे उभे असलेले त्याला दिसते; व तो तेहि चढून गेला की तिसरे! क्षितिजावर पृथ्वी आणि आकाश एकमेकास चिकटून

पृथ्वीची सीमा पोचली असे वाटते. पण तेथे एखादी खूण ठेवून त्याच क्षितिजप्रदेशावर आपण जावे, तो फिरून क्षितिज पहिल्याइतकेच दूर दिसते. 'पुढे काय?' या प्रश्नाचे उत्तर वास्तविक 'अनंत' असेच आहे. हे सर्व अनंतच्या अनंत मनुष्याच्या हस्तगत झाल्यास ते त्याला हवेसेच वाटेल; कारण खुद्द ईश्वराशी समव्याप्ति लाभली, तर ती कुणाला नको? आता मनुष्यमात्र महत्त्वाकांक्षी असला तरी ही समव्याप्ति अशक्य कोटीतली म्हणून सोडून देण्यास तो तयार असतो. तथापि, भविष्यावरचा सर्व हक्क मात्र सोडून देण्यास तो तयार नसतो. इतकेच नव्हे, तर आपापल्या शक्तीप्रमाणे भविष्याचा काही थोडा तरी प्रांत हस्तगत केल्याशिवाय त्याला चैनच पडत नाही. हावरा शेतकरी जसा आपले कुंपण थोडे तरी शेजारच्या शेतकऱ्याच्या हद्दीमध्ये ढकलून त्याची निदान हात दोन हात जागा तरी बळकावतोच, किंवा एखादा लोभी सम्राट् आपल्या राज्याच्या सरहद्दीवरचा प्रांत एकदम खालसा करण्यास नच मिळाला, तरी त्यावर आपले कोरडे वर्चस्व (Sphere of influence) तरी प्रस्थापित करू पाहतो त्याप्रमाणे मनुष्यालाहि भविष्याच्या दुर्भेद्य प्रांतात चंचुप्रवेश केल्याशिवाय समाधानच वाटत नाही.

**मनुष्याची भविष्याची उठाठेव स्वाभाविक आहे.**

एका अर्थाने त्याचे हे करणे बरोबरहि असते. कारण 'वर्तमानकाला'चा विस्तार फार संकुचित म्हणजे क्षणमात्र असतो. तेवढ्यावर त्याचे कसे भागणार? काल हा डमरूसारखा किंवा एखाद्या वाळूच्या घड्याळासारखा आहे. या घड्याळात दोन बाजूला दोन मोठे समान आकाराचे पारदर्शक फुगे असतात. त्यातला एक भूतकाळ व दुसरा भविष्यकाळ. भूतकाळाच्या फुग्यातले क्षणरूपी वाळूचे कण भविष्यकाळच्या फुग्यात हळुहळू पडत असतात. व युगांची कल्पना आपण ध्यानात घेतली तर, तास भरला म्हणजे पहारेकरी जसा भरलेला फुगा वर व रिता फुगा खाली करून वाळूचे घड्याळ उलटे टांगून ठेवतो, त्याप्रमाणे युगांतराच्या प्रारंभी लीलाप्रिय परमेश्वरहि हे कालाचे घड्याळ पुनःप्रवृत्तीकरिता उलटे टांगून ठेवतो ही कल्पनाहि चांगली शोभेल. पण ही दुसरी कल्पना पटाण्यासारखी असली किंवा नसली, तरी भूतकाळ व भविष्यकाळ हे वाळूच्या घड्याळातील फुग्याप्रमाणे असून वर्तमानकाळ हा फक्त त्या दोहोंना सांधणाऱ्या बारीक छिद्रासारखा असतो यात शंका नाही. त्या छिद्रातून एका वेळी एकच

वाळूचा कण खाली पडू शकतो व ज्याला आपण वर्तमानकाळ म्हणतो, तो वास्तविक इतकाच स्वल्पप्रमाण असतो. म्हणून, मनुष्याला केवळ वर्तमानकाळावरच नजर पुरवून चालत नाही, भविष्यकाळावरहि थोडी तरी नजर पुरवावी लागतेच. उचलले ते पाऊल भूतकाळातून, व टाकायचे ते पाऊल भविष्यकाळात; आणि दरम्याची जी संधि ती मात्र वर्तमानकाळ अशी स्थिति असल्यामुळे मनुष्याने भविष्याची थोडीबहुत उठाठेव केली, तर ती अगदीच वावगी नव्हे. तथापि भविष्यकाळाविषयी मनुष्याने उठाठेव करावी, ती कितपत आणि कशी हाच मुख्य प्रश्न आहे.

**भविष्याचा विचार केवळ समर्थनीयच नव्हे तर कर्तव्यप्राप्तहि आहे.**

केवळ संसारी मनुष्य घेतला तर त्याला 'पुढे काय?' हा प्रश्न बऱ्याच महत्त्वाचा असतो. कारण, संसारात आजची तयारी काल व उद्याची तयारी आज करावी लागते. 'श्वः कार्यमद्य कुर्वीत पूर्वाण्हे चापराण्हिकम्। न हि प्रतीक्षते मृत्युः कृतमस्य न वा कृतम्।' अशी नीतीच आहे. उद्याची तरतूद आज करून ठेवणाराला 'पुढे काय' हा प्रश्न अडचणीचा वाटत नाही, कारण तो त्याच्यापुढे भयप्रद रीतीने उपस्थित होत नाही; व झालाच तर त्याचे उत्तर देण्याची त्याची तयारी असते! पण जे दूरदर्शी नसतात, त्यांना हा प्रश्न फार भयप्रद होतो, आणि म्हणून ते तो प्रश्न सुचला तरी टाळू लागतात. पावसाळ्याकरिता धान्याचे कण वारुळात साठवून ठेवणाऱ्या मुंग्या, बाहेर धो धो पाऊस पडत असता आपल्या घरात सुखाने राहातात; आणि ज्या त्या दिवसापुरता मध मिळाला की तेवढा खाऊन टाकून, उन्हाळ्यात चैनीने दिवस काढणाऱ्या माश्या पावसाळ्यात उपाशी मरतात; हा साधा दाखला संसारी मनुष्याला नेहमी लावता येण्यासारखा आहे. यामुळे संसारी मनुष्य 'पुढे काय?' या प्रश्नाचा नेहमी जितका विचार करील व तो सोडविण्याची तयारी ठेवील तितके चांगलेच. असो; जी गोष्ट खाजगी व धाकट्या संसाराची तीच सार्वजनिक व मोठ्या संसाराची. संस्था चालविणारांना उद्याची तजवीज आजच्यापेक्षाहि आधी पाहावी लागते. एक पोट भरणे किंवा एका शरीराला कपडालत्ता पुरविणे, हे कुणालाहि फारसे कठीण जात नाही. पण संस्था ही व्यक्तीपेक्षा ज्या मानाने मोठी त्या मानाने तिच्या तरतुदीची काळजीहि मोठी. व संस्थेचे चालक खाजगी व्यक्तीपेक्षा अधिक दूरदर्शी असावे सागतात ते याचकरिता. तात्पर्य,

या दृष्टीने भविष्याच्या तोंडावरचा पडदा दूर सारून आत नजर फेकणे हे सर्वथा समर्थनीय आहे एवढेच नव्हे, तर ते एक कर्तव्यहि आहे.

**भविष्याचा विचार समाजहितदृष्टीने आवश्यक आहे.**

भविष्यकथनाचा दुसराहि एक समर्थनीय प्रकार आहे; व तो असा की, पोटापाण्याचा सांसारिक प्रश्न काही एक नसता, समाजाच्या भावी स्थितीविषयी शक्याशक्य निर्णय करून अनुमान ठरविणे, कोणची गोष्ट अधिक संभवनीय आहे व कोणची कमी संभवनीय आहे याचा तपास करणे. अशी अनुमाने करीत बसणे हा रिकामा खेळसा वाटला तरी त्यापासून बुद्धीला जे एक प्रकारचे वळण किंवा शिक्षण मिळते, ते फारच उपयोगी असते. कारण जगांत दोन शक्ति नेहमी वावरत असतात. एक स्वेच्छाशक्ति व दुसरी परेच्छा-शक्ति. या दोहोंच्या खेचाखेचीत जो मध्यम मार्ग निघतो तोच नियतिमार्ग—तीच परात्परेच्छा. या मध्यम मार्गाचे वळण कसकसे जाण्याचा संभव आहे, याचा अंदाज करण्यास समाजधुरीण अशा मनुष्याने शिकले पाहिजे. आकाशात दिसणाऱ्या तेजोराशीवर कोणाला चिमुटभर तांदूळ शिजवून भात करून खाता येत नाही, किंवा चहाला लागणारे पेलाभर पाणीहि तापविता येत नाही; तथापि समुद्रावर सफर करणाऱ्या नावाड्याला लक्षावधि कोसांवरून दिसणाऱ्या तारकांचा उपयोग मार्ग बिनचूक दाखविण्याला होतो व तो त्याने करून घेतलाच पाहिजे. याच न्यायाने समाजाला काही तरी विवक्षित ध्येय योजून तिकडे जावयाचे असते, व त्याकरिता भविष्यकाळची उठाठेव केल्याशिवाय त्याला गत्यंतरच नाही. म्हणून सामाजिक व राष्ट्रीय स्थितीविषयी भविष्यकथन करण्याचा प्रयत्न करणे हे अत्यंत हितावह होय.

**व्यक्तीहितदृष्टीनेहि हितकारक ठरण्यासारखा आहे.**

कारण, आपल्या मनची गोष्ट खरी पण ती कितपत साधेल हे पाहाणे अगदी जरूर असते. मला मनातून राजा व्हावेसे वाटत असेल. पण खरोखर मी राजा न होता पाणक्याच होणार नाही कशावरून? किंवा राज्यपदाची महत्त्वाकांक्षा धरून मी इच्छाशक्ति खूप प्रबळ केली तर माझा पाणकेपणा तरी चुकेल, आणि राज्यपद न मिळालेच, तर निदान प्रधानपद तरी मला का मिळणार नाही? अर्थात् माझ्या इच्छाशक्तीचा मार्ग तोच काही

नियतिमार्ग नव्हे. म्हणून मनात इच्छा धरायची ती धरून जर मला माझे वास्तविक भविष्य ठरविता आले तर ते इष्टच आहे. पत्ते खेळावयास बसलेल्या प्रत्येक मुलाला प्रत्येक डावात आपला कोट व्हावा अशी इच्छा असते; पण त्याच्या इच्छेप्रमाणे दर डावी निकाल कसा लागणार? कारण पत्त्यांची पाने चौघा गड्यांमध्ये सरसनिरस अशी वाटून जातात, व यामुळे एकाचेच सर्व हात होणे अशक्य असते. अशा स्थितीत स्वतःची इच्छा कितीहि असली तरी पानांची वाटणी लक्षात घेऊन ज्यास्तीत जास्त किती हात आपणाला करिता येतील, याचा अंदाज करून जो 'सवाल' टाकील, व तितके हात करून दाखवील—हात कमी भरून बाजू अंगावर येणार नाही—त्याचेच भविष्यकथन खरे ठरेल. तसाच कोणताहि समाज घ्या. त्यामध्ये मतवैचित्र्य किती तरी असते! अर्थात् त्यातील सर्व घटकांच्या मतांप्रमाणेच समाजाचे भविष्य कसे सिद्ध होणार?

**प्रत्येकाच्या इच्छेप्रमाणे समाजस्थिति राहिली तर?**

प्रत्येकाच्या इच्छेप्रमाणे समाजस्थिति एकेक दिवस तरी राहावी असे समजा जर ईश्वराकडून ठरविण्यात आले, तर वर्षभर रोज एक एक नवाच रंग कसा होईल तो पहा! एक दिवस, पाळण्यातल्या पोरांना बाशिंगे बांधता येत नाहीत म्हणून पाळण्यालाच बाशिंगे बांधून झालेले बालविवाह दृष्टीस पडतील, तर दुसरे दिवशी, 'म्हातारपणी झाले तरी तांब्याभर पाणी द्यायला कोणी सत्तेचे मनुष्य नको काय?' अशी सबब सांगून नववधू संपादनाची लालसा धरणारे थेरडे, अंगावर लपवलेली सुपारी हुडकून काढण्याचा खेळ आपल्या नवोढांशी खेळताहेत असे दिसेल! आपल्या मृतपतीची धडधड पेटणारी चिता हाच आपला खरा मोक्षमार्ग असे मानून तिजमध्ये आनंदाने प्रवेश करणाऱ्या साध्वी, किंवा जिवंतपणी अनेक सुखोपचारसहित आपला हात ज्यावर फिरला तो प्रियपतीचा मृदुदेह निष्ठुर अग्नि भाजीत आहे, असे पाहून त्याजवर आपली कोमल देहलता पसरून ज्वाळा शमवू पाहणाऱ्या प्रेमशूर सतीच जिकडे तिकडे देहसार्थक करीत आहेत, असे आज दिसेल; आणि उद्या पाहावे तो, साठीच्या जवळ आल्याने नाठी बुद्धि झालेल्या प्रौढ कामिनी, स्वैर पुनर्विवाहप्रसंगी विड्या तोडण्याकरिता नव्या करकरीत अशा दातांच्या कवळ्या जबड्यात बसवू पाहात आहेत, किंवा आपल्या कोमल-तरुण पतिमुखाच्या

लावण्यश्रीची छटा नीट दिसावी म्हणून, सावधान म्हणण्याच्या वेळी नाकावर चष्मा चढविण्याची सावधगिरी ठेवीत आहेत, असे दिसेल ! आज पाहावे तो, मृगचर्मावर बसून पवित्र चमसाने वेदिमुखात गोरस ओतून श्रौताग्नि किंवा स्मार्ताग्नि प्रदीप्त करणाऱ्या अग्निहोत्र्यांच्या वषट्काराचा किंवा स्वाहाकाराचा गंभीर ध्वनि जिकडे तिकडे ऐकू येईल, तर उद्या मृगचर्माचे बूट पायात चढवून, वेत्रासनाधिष्ठित होऊन, आधी स्फटिक चमसातून आधुनिक सोमरसाचे पान झाल्यामुळे प्रदीप्त झालेला जठराग्नि पुढे लागलीच दुसऱ्या एका प्रकारच्या गोरसाचा स्वाहाकार करून शमवीत आहेत, आणि त्या प्रमाद-प्रमोदाच्या भरात नोकर लोकांवर शेलक्या अपशब्दांचा किंवा स्वतः एकमेकांवर लाडक्या उपनामांचा वर्षाव करीत असल्याचा गोंगाट ऐकू येईल ! आज पाहावे तो पहिल्या तारखेस झडणाऱ्या चांदरातीने स्वर्ग लाभल्याचे सुख मानणाऱ्या खर्डेघाशांच्या आनंदाच्या खाकी रंगात सर्व हिंदुस्थानचा नकाशा रंगलेला दिसेल; तर उद्या अर्धोज्वल स्वराज्यवाद्यांच्या हेतूप्रमाणे युनियन जॅक आणि जरीपटका यांच्या चिन्हांनी त्याच नकाशाचा सर्व भूमिकापट निर्मित केला आहे, व त्यावर सर्वत्र भगव्या रंगाची छटा पसरली आहे असे आढळून येईल. आज निर्जन वनात गाईच्या शेणाने सारविलेल्या साध्या गवताच्या झोपडीत आसनावर बसून व मांडीवर भूर्ज किंवा तमालपत्र घेऊन शिंपल्यातील लाख्या शाईने धर्मसिंधूच्या पोथ्या लिहिणारे विद्वान चहूकडे दिसतील तर उद्या गजबजलेल्या शहरात लोहप्रासादाच्या दहाव्या मजल्यावर बसून शेकडो मैल दूर असणाऱ्या आपल्या कारखान्याच्या सुपरिंटेंडटला टेलिफोनने दैनंदिन आज्ञा सोडणारे लाखोपति, किंवा हजारो मैलांवर परदेशातील आपल्या मुनिमाला सोन्याचांदीचा बाजारचा बाजार खरेदी करण्याची इशारत बिनतारी तारायंत्राने देणारे नवकोट नारायण चहूकडे डोळयाला दिसू लागतील ! पण या सर्व कल्पना झाल्या. यातील एकहि सर्वस्वी खरी ठरण्याचा संभव नाही.

**ध्येयरूप अग्निहोत्र पेटते ठेवावे, पण त्यावर बटाटे भाजू नयेत !**

आपल्या मनात असते एक आणि होत असते भलतेच, असा सगळ्या जगाचा सर्वकाळचा अनुभव असतो. आता असे आहे म्हणून मनुष्यमात्राने इच्छा करण्याचे किंवा मनोरथ बांधण्याचे सोडावे असे नाही. भवितव्यतेच्या बाजारात आपण उभे असता सर्वांत अधिक उंची माल सर्वांत कमी किंमतीत मागण्याला

आपणास हरकत नाही; किंबहुना तसा तो मागण्याचा आपणाला हक्कच असतो. तथापि, भारी पदार्थ हलक्या किंमतीस मागण्याचा हक्क जरी आपणास असला तरी दुकानदार कोणता पदार्थ अखेर किती किंमतीपर्यंत सोडील याचाहि संभव आपणास अजमावता यावयास पाहिजे. नाहीतर एकहि सौदा न पटता चिकार भरलेल्या बाजारातून रिकाम्या हाताने, पण निष्फळ इच्छेचे जड ओझे मात्र मनात बांधून, आपणास घरी परत यावे लागेल! शक्याशक्यतेचा व संभवासंभवाचा विचार हाच जगाच्या व्यवहारात खरा उपयोगी असतो. उज्ज्वल इच्छा आपण मनात बाळगू नये असे नाही. हिंदुस्थानात शेकडो वर्षांपूर्वी आलेल्या पारशांनी इराणातून आणलेला आपला पवित्र अग्नि जसा आग्यारीतून अद्यापि एकसारखा कधीहि विझू न देता प्रज्वलित ठेवलेला आहे, तसेच मनुष्यमात्राने आपल्या ध्येयरूप आकांक्षेचे अग्निहोत्र कधीहि विझू देऊ नये. तथापि, रोजच्या भाजीचे बटाटे आग्यारीतल्या किंवा अग्निहोत्राच्या विस्तवावरच भाजून घेण्याच्या आग्रहाला मूर्खपणाचे स्वरूप येते हेहि विसरता कामा नये. समुद्रावर होकायंत्र जवळ नसता नावेतून प्रवास करणाऱ्या खलाशाला रात्री दर्शन देणाऱ्या दिव्य तेजोराशीचा उपयोग मार्गदर्शनापुरता झाला तरी तो काही थोडा नाही. त्याला भातपिठले करून सकाळ–संध्याकाळची भूक भागवावयाची असेल तर नावेवर फाट्या किंवा कोळसे यांचा परसा पेटवूनच त्याने आपले काम भागवून घेतले पाहिजे.

तात्पर्य, मनुष्याने भविष्यकथनाच्या उद्योगात पडावे, पण ते बालिश आनंदाने पडू नये. म्हणजे, कोणत्याहि भावी गोष्टीचे ज्ञान अनुमानपरंपरेनेच सिद्ध करता येईल असे समजावे व तसे करण्यास शिकावे. दिव्य किंवा अद्भुत चमत्कारांच्या भानगडीत न पडता, केवळ मनुष्यासहि लोकोत्तर असे बरेच करण्याची शक्ति असते; आणि केवळ मनुष्यपणाचा अभिमान धरला तरीहि मनुष्यास तो पुरेसा आहे; ईश्वराच्या सिंहासनाच्या खुरालाच त्याला हात घालावयाला पाहिजे असे नाही. असला विचार भविष्यकथनांचे कल्पनारम्यत्व कदाचित् नाहीसे करील, पण भविष्यकथनाचा कस तरी त्यामुळे सत्याच्या कसोटीवर अधिक लागेल!

× × ×

# ११. सृष्टयवलोकन

## गोपाळ गणेश आगरकर

सृष्टयवलोकन हे जसे सौंदर्यपिपासा शमविणारे आहे तसेच ते सुसंस्कारकारीहि आहे, उदात्त विचारांचे प्रवर्तन करण्याचे त्यात सामर्थ्य आहे, ही गोष्ट प्रस्तुत लेखात श्री. गो. ग. आगरकर यांनी अतिशय आत्मीयतेने व रसपूर्ण रीतीने पटवून दिलेली आहे. बुद्धिवादाचे प्रभावी समर्थक असा श्री. आगरकर (जन्म १८५६, मृत्यु १८९५) यांचा लौकिक आहे. तेवढ्यावरून आगरकरांची प्रकृति केवळ विचारप्रधान होती असे जर कोणी अनुमान काढले तर ते, प्रस्तुत लेख वाचून, निश्चित खोटे ठरणार आहे. विचारस्रष्टे आगरकर कविहृदयहि होते. त्यांच्या बुद्धीप्रमाणे त्यांची भावनाशक्तीहि जागृत होती. त्यामुळे सृष्टिप्रेमाशिवाय शिक्षणाला पूर्णता येऊ शकत नाही अशी त्यांची श्रद्धा होती. आपल्या समाजाच्या उन्नतीचा आणि उत्कर्षाचा विचार आगरकर सर्वांगीण रीतीने करीत असत याचाहि प्रत्यय प्रस्तुत लेख वाचून येण्यासारखा आहे. आगरकरांना खरी पोट-तिडिक फक्त सामाजिक प्रश्नांबद्दलच होती, असा जो गैरसमज प्रचलित आहे तो दूर होणे फार आवश्यक आहे. देशाच्या सामाजिक प्रश्नांप्रमाणे त्यांनी राजकीय आणि आर्थिक प्रश्नांबद्दलहि जातिवंत जिव्हाळ्याने लिहिलेले आहे. समाजाच्या सौंदर्यदृष्टीच्या विकासाबद्दलहि त्यांना केवढी कळकळीची आस्था होती हे प्रस्तुत लेख वाचून सहज पटण्यासारखे आहे. प्रस्तुत लेखातील प्रति-पादनाला त्यांच्या अंगच्या रसिकतेचा जो मधुर स्पर्श झालेला आहे त्यामुळे त्यातील गोडी अधिकच वाढलेली आहे.

**आपल्या शिक्षणपद्धतीत सृष्टिप्रेमसंवर्धन नाही.**

वरील विषयाकडे सांप्रतच्या एकंदर शिक्षणपद्धतीत जे दुर्लक्ष दिसून येते, त्या योगाने आपल्या देशाचे बरेच नुकसान होत आहे असे सर्वांस विचारा-अंती दिसून येईल. लहान मुले मराठी शाळेत जाऊ लागली की त्यांच्या मागे, हल्लीच्या शिक्षणक्रमाच्या योगाने, घोकीव विद्येचा इतका जाच लागतो की

त्यास घर सोडून गावातल्या गावातहि बाहेर हिंडण्याफिरण्यास फारसा वेळ सापडत नाही. ह्या अत्यंत शोचनीय स्थितीचे मुख्य कारण म्हटले म्हणजे साधारण लोकांस सृष्ट्यवलोकनाचे महत्त्व कळत नाही. हल्लीच्या स्थितीप्रमाणे शिक्षक लोकांची नजर आपल्या फायद्यावर जशी असते त्याप्रमाणे मुलांच्या किंवा स्वदेशाच्या फायद्यावर बहुधा नसते. पहा की, आजपर्यंत मराठी शाळा-मास्तरांनी जी पुस्तके छापून प्रसिद्ध केली आहेत, त्यातील बहुतेक पाहिली तर घोकीव काम उत्कृष्ट होऊन आपला शिक्षणक्रम सुलभ कसा होईल व वार्षिक परीक्षेत मुलांची बाह्यात्कारी हुशारी दाखवून परीक्षक इन्स्पेक्टरांची मर्जी खुष कशी राखिता येईल, या मुख्य हेतूस अनुसरून लिहिलेली आहेत. उदाहरणार्थ, हल्ली पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या वगैरे मराठी क्रमिक पुस्तकातील कवितांचे अर्थान्वय व कठीण शब्दांच्या परिभाषा मुलांस सुलभ रीतीने पाठ करिता याव्या या हेतूने प्रसिद्ध केलेली अनेक पुस्तके शाळांतून सुरू आहेत, परंतु मुलांस बाह्यसृष्टि पाहण्याची हौस वाटावी आणि सृष्टिचमत्कार पाहून त्यांच्या भिन्न भिन्न मनोवृत्ति जाग्रत व्हाव्या अशा उद्देशाने लिहिलेली पुस्तके अद्याप कोठेहि दृष्टीस पडत नाहीत, व कोणी मास्तराने आपल्या शाळेत अशा प्रकारचे परिश्रम केल्याचेहि आमच्या ऐकिवात नाही. त्याप्रमाणे मास्तरांची स्थिति; आणि मातापितरांचीहि स्थिति त्यांस अनुकूल अशीच आहे. आपला मुलगा, पहिल्या यत्तेतून दुसरीत, दुसरीतून तिसरीत, तिसरीतून चौथीत, चौथीतून इंग्रजी शाळेत केव्हा जाईल, अशा प्रकारची अतिशय घाई त्यांस सुटलेली असते; परंतु त्या घाईने मुलांचे सर्व बाबतीत वास्तविक किती नुकसान होते हे त्यांच्या बिलकूल नजरेस येत नाही; परंतु ते नुकसान होण्याचे प्रधान कारण काय म्हटले तर या त्यांच्या घाईमुळे मुलांस सृष्टिचमत्कार पाहाण्यास मुळींच सवड सापडत नाही; आणि त्या चमत्काराविषयी ती बहुधा शेवटपर्यंत अज्ञानी राहातात.

**पाश्चिमात्य सृष्टिप्रेमी आहेत.**

या विषयाचे पूर्ण विवेचन करण्यापूर्वी सुधारलेल्या पाश्चिमात्य राष्ट्रात या विषयाचे संबंधाने कशी स्थिति आहे हे पाहिले असता बरे पडेल; व आपण उदाहरणार्थ इंग्लंड देश घेऊ. हा देश फार लहान असल्याकारणाने आणि प्रवास करणारास इकडच्यापेक्षा तिकडे अधिक सोयी असल्याकारणाने देशातील

देशात या भागातून त्या भागात जाण्यास मुळीच प्रयास पडत नाहीत, असे म्हटल्यास चालेल. शिवाय हा देश सर्व बाजूंनी समुद्रवेष्टित आहे, त्यात म्हणण्यासारखे मोठे पर्वत किंवा नद्या नाहीत; आणि हिवाळ्याखेरीज बाकी सर्व ऋतु तेथे सौम्य असतात. या सर्व कारणांमुळे सृष्टीतील मुख्य मुख्य चमत्कार तेथे थोड्याबहुत अंशाने दृष्टीस पडण्यास हरकत नाही व त्या देशात हे चमत्कार पाहाण्यास आबालवृद्धांस जी हौस वाटते ती येथे वर्णनहि करता येत नाही. तिकडील कोणतेहि लहान मोठे काव्य घेतले तर त्यात सृष्टिवैभवाचे हृदयंगम वर्णन नाही असे होत नाही. तिकडील कल्पित कथा पहा; तिकडील शाळांतून चालणारी पुस्तके पाहा; तिकडील लहानमोठ्या पुरुषांची चरित्रे वाचा; सर्वत्र सृष्टीबद्दल पूज्यबुद्धि आपणास दृष्टीस पडते आणि सृष्टिचमत्काराबद्दल दिदृक्षा नसणे म्हणजे एक प्रकारचे पापच त्यांच्या लोकात गणिले आहे.

**तिकडील स्त्रियांचे संस्कार मुलांना सृष्टिप्रेमी बनवितात.**

सृष्टिसंबंधाने ही पूज्यता त्या देशात उत्पन्न होण्यास अनेक कारणे आहेत; ती येथे सर्व सांगता येत नाहीत; तथापि सांप्रतच्या काळात लहान मुलांस ती बाल्यापासून प्राप्त होण्यास काही अंशी तिकडील स्त्रिया कारण आहेत. तिकडे स्त्रियांस विद्या शिकविण्याचा जरी फार दिवस प्रघात आहे, तथापि स्त्रियांस जी आजकाल विद्या शिकवितात ती पुरुषांच्या विद्येपासून बरीच भिन्न असते. स्त्रियांच्या अंगी अवश्य असावे असे मानिलेले गुण म्हटले म्हणजे पुढे सांगितलेले होत. नाटके, कविता व कादंबऱ्या, इंग्रजी किंवा फ्रेंच उत्तम वाचता येऊन आपले व दुसऱ्याचे मनोरंजन करता येणे; समोर ठेवलेल्या पदार्थांचे, अथवा देखाव्याचे अथवा मनुष्याचे हुबेहुब चित्र काढणे, गाणे–बजावणे आणि शिवणकाम जाणणे, बागेतील मोठ्या झाडांची, फुलझाडांची, फुलांची, फळांची व पशुपक्ष्यादिकांची नावे व काही गुण माहित असणे, आणि अशाच प्रकारचे दुसऱ्या काही सर्वांस आवडणाऱ्या विषयांची माहिती. हे गुण आपल्या मुलींच्या अंगी येण्याविषयी बहुधा सर्व सभ्य गृहस्थ तिकडे काळजी घेतात. हे गुण स्त्रियांच्या साहजिक मनोहारित्वाचे किती साहाय्य करितात, आणि त्यांस किती श्रेष्ठत्व आणतात ह्याची वाचकांनी कल्पना केली असता स्त्री म्हणजे काही अंशी अधिदेवताच तिकडे होऊन गेली आहे यात त्यांस फारसे

नवल वाटणार नाही. असो, ह्याचा प्रस्तुत विचार करणे नाही; तथापि वरती सांगितलेल्या गुणांचा साक्षात् सृष्टीशी किती संबंध आहे व ते संपादन करणारास सृष्टीचे मन लावून कसे अवलोकन केले पाहिजे, हे वाचकांस सांगावयाला नको. मग पुढे अशा स्त्रियांस संतति झाली व ती बाल्यावस्थेत असता तिची सर्व काळजी त्यांच्यावर पडली म्हणजे त्या या पूर्वसंपादित गुणांचा आपल्या बालकांस, सुखात व आनंदात ठेवण्याकडे उपयोग करितात, हे साहजिकच आहे. व त्यांच्या या वर्तनामुळे सृष्टिचमत्कार पाहण्याची, ते पाहून आपले मनोविकार मातापितरांजवळ प्रगट करण्याची व ते पुन्हा केव्हा घडतील, ते कोण घडवितो, इत्यादि प्रश्न त्यांस विचारण्याची, मोठी उमेद व हौस अल्पवयातच बालकांस वाटू लागते. बालकांच्या अंगी अशा कारणांनी तिकडे किती अमोलिक गुण उत्पन्न होतात. त्यांचा धार्मिक, लौकिक व प्रापंचिक सुखसंपादनास आणि आयुष्यात किती उपयोग होतो; व अखेरीस समाजाचे उत्कर्ष व हित त्याच गुणांनी कसे होते हे या विषयाचे विवेचनात पूर्णपणे दाखविले जाईल.

**सृष्टिसौंदर्याची अभिरुचि मुळात निर्माण केली पाहिजे.**

उंच उंच पर्वत व त्यातील दऱ्या, मोठमोठ्या नद्या व विस्तीर्ण सरोवरे, ज्यामध्ये अनेक वृक्ष व वेली निबिड उगवलेल्या आहेत, आणि असंख्य वनपशु व पक्षी वास करीत आहेत अशी अफाट अरण्ये, आणि निरनिराळ्या ऋतूत व निरनिराळ्या ठिकाणी भिन्नभिन्न स्वरूप धारण करणारे असे आकाश व त्याप्रमाणे समुद्र, हेच वास्तविकपणे सृष्टिसौंदर्य अवलोकन करण्याचे मुख्य प्रदेश होत. अशा प्रदेशात प्रेक्षकांस जणू काय मोहून टाकावे म्हणून सृष्टि आपला आवरणपट निर्भीडपणे एकीकडे करून आपल्या सर्वांगाचे सौंदर्य व सर्व आसमंतात चकाकणाऱ्या पदार्थरत्नांची शोभा प्रेक्षकांच्या दृष्टीस पाडते. परंतु असे सौंदर्य बहुधा मनुष्यांची जेथे दाट वस्ती असते, तेथे आविष्कृत केलेले नसते. ते पहाण्यास शहरापासून बहुधा दूर जावे लागते. परंतु हे सौंदर्य पाहाण्याची प्रथम अभिरुचि आणि इच्छा उत्पन्न होण्यास, सृष्टीने आपल्या अव्याहत केलिक्रमात सर्वत्र इतस्ततः विखरलेली लहान मोठी रत्ने मनुष्याने लहानपणापासून वेचिली पाहिजे; आणि ती वेचण्यास शहरापासून फारसे लांब जावयास नको.

मनुष्यास सृष्टीतील नानाविध चमत्कार पाहाण्याची गोडी लहानपणी बहुधा

साहजिकपणे लागत नाही; ती लावण्याचा प्रयत्न मातापितरांनी केला पाहिजे; परंतु त्या विषयासंबंधाने सांप्रत मातापितरांसच खुद्द अज्ञान असल्याने आपल्या संततीचे अंगी वरील गुण आणणे त्यांच्याने होत नाही, आणि आपले अन्य व्यवसाय टाकून आपली कोमल बुद्धीची बालके बरोबर घेऊन हिंडावयास जाणे हेहि बहुतेकांस आवडत नाही. अशा स्थितीत साधारण स्वतंत्रपणे शहराचे आसपास फिरावयास जाण्याइतपत ज्यांचे वय झाले आहे, अशा लहान मुलांवरच वरील गुण संपादन करण्याचे काम पडावयाचे, आणि त्यांचे हातून ते सिद्धीस जाण्यास त्यांस अभ्यासाच्या काचातून थोडे सोडवून काही स्वतंत्रताहि त्यांस दिली पाहिजे.

**शहरापासून दूर सृष्टीच्या सान्निध्यात राहिल्याने अनेक फायदे होतात.**

सृष्टीतील चमत्कार पाहाण्यास शहरापासून निदान मैल अर्धमैल तरी गेले पाहिजे. कधी एखाद्या सपाट मैदानात, कधी शेतात किंवा बागेत, कधी एखाद्या उंच टेकडीवर व कधी नदीचे कांठी अशा ठिकाणी जाण्याचा नेहमी प्रघात ठेविल्याने होणारांपैकी पहिला फायदा म्हटला म्हणजे आरोग्यरक्षण हा होय; आणि या फायद्याकडे आजकाल बहुतेकांचे लक्ष लागत चालले आहे आणि ह्याचा अनुभवहि बरेच लोक घेऊ लागले आहेत. शरिरातील सर्व व्यापार उत्कृष्ट चालण्यास स्वच्छ हवेत वागणे आणि शरिरास योग्य व्यायाम देणे अवश्य आहे. सृष्ट्यवलोकन करण्याची ज्यांस एकवार गोडी लागली त्यांस या दोन्ही गोष्टी साहजिकपणेच प्राप्त होतात. शहरात राहून कालक्रमण करणारा जो मोठा प्राणिसमुदाय, त्याच्या निरंतर श्वासोच्छ्वासाने उच्छिष्ट झालेली, सर्वत्र घरभर पसरून त्याच्या प्रतिबंधाने चालना न पावणारी, आणि दुसऱ्या अनेक मनुष्यसंबंधी दुर्गंधांनी दूषित झालेली हवा अनेक उपायांनी शुद्ध करण्याचा सृष्टीचा थोरला कारखाना वरती सांगितल्या ठिकाणी सदोदित सुरू आहे, हे बहुतेकांस माहित आहेच. अशा ठिकाणी मनुष्य गेला असता त्यास बराच व्यायाम होऊन दिवसाच्या दगदगीने कंटाळलेले मन पुन्हा उल्हास पावते हे सर्वांच्या अनुभवास आले आहे. जेथे फारशी मनुष्यांची वस्ती नाही व जेथे मनुष्यास हरवक्त शेतात, कुरणात किंवा नदीवर जावे लागते अशा खेड्यापाडयातील लोकांची प्रकृति बहुधा आरोगी व सुदृढ असते, ह्याचे कारण त्यांचा उघड्या हवेतील व्यायाम हे स्पष्ट आहे. अशा लोकांत जे

कधी कधी रोग किंवा वाखे उत्पन्न होतात ह्याची मुख्य कारणे ह्या लोकांचे अज्ञान व तज्जनित वेडेविद्रे आचार व घरातील अस्वच्छता, ही होत. त्यांच्या अंगचे हे अज्ञान जर काही अंशी दूर झाले व आरोग्यशास्त्राची व चांगल्या आचारांची जर थोडी तत्त्वे त्यांस कळू लागली तर ह्या बाबतीत त्यांच्यासारखे सुखी लोक कोणीच असणार नाहीत. वर्षांतून एखादे वेळी सवड करून खेडेगावात जाऊन राहाण्याची, व शहरातील अनेक व्यापारांनी होणारी सर्व कटकट एकीकडे ठेवून, तेथील शांतता, साधेपणा वगैरे सौम्य सुखाचा अनुभव घेण्याची गोडी अद्याप युरोपियन लोकांप्रमाणे आम्हास लागली नाही. तथापि अशी गोडी असणे सर्वांशी इष्ट आहे. कारण तिच्या योगाने अज्ञान आणि सज्ञान लोकांचे थोडेबहुत संघटन होऊन परस्परांचेहि हित होते. असो, या वर सांगितलेल्या फायद्यांविषयी अधिक लिहिण्याचे प्रयोजन नाही.

वरच्या सारख्या ठिकाणी गेल्यावर सृष्टीतील लहानसहानहि गोष्टी कशा पाहाव्या, त्यांचे पहिल्याने मनोवृत्तीवर काय परिणाम होतात, आपली जिज्ञासा व कल्पनाशक्ति कशी जागृत होते वगैरे अनेक गोष्टींचा विचार करण्यास ह्या निबंधात जागा नाही. त्यांचा विचार पुढे करू.

**सृष्टिदर्शनाचा अभ्यास मनाला उदात्त विचारांचे वळण लावतो.**

सृष्टीतील जी जी वस्तु पाहावी, तिच्या तिच्यामध्ये एक प्रकारची मनोहरता असतेच. अशा सर्व वस्तूंचे वर्णन करण्याचा आमचा उद्देश नाही. सृष्टीतील काही मनोरम वस्तु उदाहरणार्थ घेऊन त्यांच्या अवलोकनाने अंतःकरणाचे स्वास्थ्य व समाधान कसे करून घ्यावे, व त्यांवर विचारशक्ति व कल्पना यांचा कसा उपयोग करावा याचा थोडक्यात मासला दाखवून, विचारी लोकांची तिकडे प्रवृत्ति करावी इतकेच आम्ही आपले कर्तव्य समजतो.

एखाद्या उंच टेकडीवर बसून, प्रातःकाळचे किंवा सायंकाळचे वेळी आकाशाकडे नजर फिरविली असता, क्षणोक्षणी भिन्न भिन्न आकृति धारण करणाऱ्या अशा ढगांची पटले सूर्याचे आसपास व क्षितिजाचे दुसरे काही भागांवर आपणास बहुधा दिसतात. अस्तोदय समयींच्या रक्त सूर्यकिरणातहि मेघपटलांचा वर्ण नेहमी तांबडाच असतो असे नाही. कोठे पिवळा, कोठे पारवा, कोठे निळा, कोठे काळा याप्रमाणे आकाशाच्या अल्प भागांतहि एकात एक मिसळून जाणाऱ्या व मानवी भाषेने ज्यांचे वर्णन करणे अत्यंत दुर्घट व

मानवी कृतीने ज्यांचे यथावत् अनुकरण करणे अत्यंत अशक्य, अशा असंख्य रंगांची प्रभा एकदम डोळ्यांवर पडून, मनुष्याचे अंतःकरण अगदी मोहून जाते. हे सृष्टीचे नैसर्गिक लावण्य पाहाण्यासाठी संसारिक सर्व विवंचना विसरून घटकाभर तिकडेच टक लावणारा कोण विचारी मनुष्य आपल्या नेत्रांचे सार्थक्यच झाले असे मानणार नाही ? ज्यास थोडीबहुत शक्ति असेल, त्यास असा देखावा पाहून, तो वर्णन करण्याची स्फूर्ति खरोखरच होईल. ज्यास चित्रकर्माचा व्यासंग असेल, त्यास अशा देखाव्याचे होईल तितके करून हुबेहुब चित्र आपल्या संग्रहास ठेवण्याची मनीषा उत्पन्न होईल. ज्याने सृष्टिशास्त्राचा अभ्यास केला आहे, त्याचीहि बुद्धि हे वर्णवैचित्र्य पाहून चकित झाल्यावाचून राहाणार नाही. याप्रमाणे, ज्यास ज्या गोष्टींचे परिशीलन, त्याचे मनात त्या त्या गोष्टींच्या कल्पना एकदम उभ्या राहून सर्वांचेच एकदम समाधान झाल्यावाचून रहाणार नाही. असे देखावे कदाचित् वारंवार पाहिल्याने कोणाच्या मनातील त्याविषयीची आश्चर्यबुद्धि नाहीशी होण्याचा संभव आहे. तथापि एक ढगच पाहाण्याचा जर कोणी निश्चय केला तर त्यास किती विचार करण्यास जागा आहे ! त्यांची बाष्परूपाने उत्पत्ति कोठे अफाट समुद्रात; तेथून त्यांचे आकाशात हिमालयाच्या अत्युच्च शिखराहूनहि उंच आरोहण; त्यांचे वायुसाहाय्याने सर्वतोगामित्व; व अखेरीस जलरूपाने सर्व भूमंडळावर कालभेदाने त्याची वृष्टि या सर्व गोष्टींचा मनुष्याने विचार केला असता सृष्टिव्यापाराची अनुपम विशालता त्याचे मनावर पूर्णपणे बिंबल्यावाचून राहाणार नाही. मग भूगर्भशास्त्राचे प्रमाणावरून जेव्हा त्याचे लक्षात येईल की असा क्रम मानवोत्पत्तीच्याहि पूर्वीच्या अगणित कालापासून सृष्टीने अव्याहत चालविला आहे, त्या वेळी सृष्टीच्या भव्यपणाने त्याचे मन थक्क होईल यात नवल काय ? परंतु जर अशा मनुष्याचा ईश्वराच्या अस्तित्वावर पूर्ण भरंवसा असेल तर त्यात या केवळ मेघावलोकनानेहि ईश्वराच्या अगाध चातुर्याची व कृपेची कल्पना झाल्यावाचून राहाणार नाही. पहा की, सूर्याच्या कोट्यवधि कोसांवरून येणाऱ्या उष्णतेचा समुद्रावर बाष्पीकरणाकडे विनियोग झाल्यामुळे, आज आम्हा प्राणिसमुदायांकरिता शेकडोशे कोस जमीन सुपीक होत आहे, सहस्रावधि वृक्षांचे योग्य प्रतिपालन होत आहे, लक्षावधि जलचर प्राण्यांस आश्रयभूत असे नद, नद्या, सरोवरे, तलाव व झरे प्रतिवर्षी भरत आहेत, व याप्रमाणे यच्चयावत् भूमंडळावर सुख, समाधान, व सौंदर्य यांची

समृद्धि होत आहे. या अद्भुत निसर्गचातुर्याचा जर त्याने विचार केला, तर या एका उदाहरणावरूनहि ईश्वराचे सर्वज्ञतेबद्दल व कृपाळुपणाबद्दल त्याला जितकी पूज्यबुद्धि व कृतज्ञता उत्पन्न होईल तितकी व्यवहारातील राज्यप्राप्ती-सारख्या महान् लाभांनीहि कदापि होणार नाही.

**सृष्ट्यवलोकनाने मनास शांतता मिळते.**

याप्रमाणे या उदाहरणांवरून वाचकांच्या लक्षात येईल की, जर विचारी पुरुषाने सृष्टीतील साधारण पदार्थहि प्रसंगविशेष पाहिला आणि त्याच्या उत्पत्तीचा, स्थितीचा व विनियोगाचा शक्त्यनुसार विचार केला, तर प्रथम इंद्रियसुख, नंतर आश्चर्यवृत्ति, नंतर कल्पना व जिज्ञासा ह्यांचा हृदयात प्रादुर्भाव होतो; व शेवटी सृष्टीच्या प्रचंड व्यापारापासून होणारा चकितपणा अथवा ईश्वराच्या अनुपम चातुर्यापासून होणारी दृढ भक्ति, कृतज्ञता, व समाधान, इतक्या मनोवृत्तींचा क्रमाने उदय होऊन त्याचे अंतःकरणास प्रसन्नता व उत्साह येतो; त्याची संसारविवंचनेतून सुटका होऊन त्यास शांतता मिळते; आणि विचारशक्ति प्रगल्भ दशेस येऊन मनाची क्षुद्रता व आत्मपरता नाहीशी होते.

प्रत्येकाने वरील गोष्टींचा स्वतः प्रत्यय घेणें अवश्य आहे. सृष्टिशास्त्राच्या साधारण अज्ञानामुळे कित्येकांच्या सर्वच गोष्टी अनुभवास येतील असे नाही; तथापि अवलोकनात आलेल्या गोष्टी समजून घेण्याचा जर प्रयत्न केला तर तसे होण्यास हरकत दिसत नाही. जी गोष्ट आपणास समजून आनंद झाला, ती इष्टमित्रांस व विशेषतः लहान मुलांस समजावून देऊन, त्यांस सृष्ट्यवलोकनाची व शास्त्राभ्यासाची जर आपण अभिरुचि लावून दिली, तर आपले त्यावर व देशावर खरोखर उपकार होतील. केवळ आळस व निरुद्योग हीच ज्यांची सुखप्राप्तीची स्थाने, त्यांस वरील गोष्टी खऱ्या वाटणार नाहीत. परंतु त्यांनी आपल्या संततीस तरी आत्मानुरूपता न द्यावी व त्यांची बालजिज्ञासा वरील उपायाने वाढत असता तिला विघ्न करू नये.

**अंतरिक्षदर्शन हा मानवाचा सगळ्यात जुना आनंद**

ज्या वेळी मनुष्यजाती आपल्या अत्यंत बाल्यावस्थेत होती, व ज्या वेळचा इतिहास आता परम दुरुपलब्ध झाला आहे, अशा अतिप्राचीन कालापासून अंतरिक्षातील तारांगणाकडे पाहून मानवी प्राण्यांचे अंतःकरण आश्चर्याने थक्क

होऊन एक प्रकारच्या आनंदाने भारून गेले असावे, असे अनेक प्रमाणांवरून सिद्ध होते. ज्या वेळीं भूमितीच्या अगदी स्वल्प सिद्धांताचेहि मनुष्यांस ज्ञान नव्हते, जेव्हा यंत्रादि कृत्रिम साधनांचा पूर्ण अभाव होता, आणि जेव्हा उपजीविका मिळविण्याच्या व क्रूर श्वापदांपासून आपले संरक्षण करण्याच्या विवंचनेतच आयुष्याचा बहुतेक भाग मनुष्यास खर्चावा लागे, अशा काळीहि वर्षेची वर्षे गगनतलाचे सारखे अवलोकन करून सूर्यचंद्राची आकाशातील बाह्य गति व त्याचा मार्ग प्राचीन लोकांनी ठरविला. त्या मार्गातील तारकापुंज निश्चित करून त्यावर आपल्या कल्पनेने चित्रे काढली व तदनुसार त्यास संज्ञा दिल्या व अशा प्रकारे त्यांनी एक चित्रमय राशीचक्र निर्माण केले. आकाशाकडे नजर फेकताच तेथे एकसारखे झळकणारे अगणित तारे पाहून जर त्यांचे अंतःकरण आश्चर्याने चकित झाले नसते, व त्यांच्या पुनः पुन्हा अवलोकनाने जर त्यांचे हृदय आनंद पावले नसते, तर अशा प्रकारचा महान प्रयास त्यांनी कदापि केला नसता; इतर सर्व शास्त्रांच्या पूर्वी ज्योतिःशास्त्राचा जगात प्रादुर्भाव झाला. तो होण्यास वरती सांगितलेला आनंदच कारणीभूत होय.

**या आनंदास आजच्या समाजात कशामुळे प्रतिबंध होतो ?**

सृष्टयवलोकनापासून चित्तास समाधान व आनंद करून घेण्याचे जे अनेक मार्ग आहेत, त्यातीलच अंतरिक्षाचे अवलोकन हा होय, हे वरील गोष्टीवरून सिद्ध होईल; आता तो कोणत्या प्रकारचा आहे व तो कसा प्राप्त होतो, ह्याचा थोडा विचार करू. आकाशाच्या अवलोकनास आमची सध्यांची स्थिति अनुकूल आहे तितकीच प्रतिकूल आहे, असे म्हणण्यास चिंता नाही. सुधारणेचा जो जो अधिक अधिक उत्कर्ष होत चालला आहे, तो तो आमच्या आवश्यकताहि साहजिकच वाढत आहेत. जेथे पूर्वी मृगयेने किंवा कंदमुळांनी किंवा थोड्या शेतकीने लोकांचा निर्वाह होत असे, आणि वृक्षांच्या मृदु त्वचांपासून केलेल्या अथवा चर्ममय वस्त्रांनी आणि लहानशा पर्णकुटिकेने त्यांचे शीतोष्णनिवारण होत असे, तेथे आता अनेक प्रकारची धान्ये, फळे व शाका उत्पन्न करून, नानातऱ्हेची पेये तयार करून व वस्त्रे विणूनहि मनुष्याचे समाधान होत नाही. ह्याप्रमाणे इकडे जो जो आवश्यकता वाढत आहेत तो तो कलाकौशल्ये वाढून श्रमविभागामुळे प्रत्येकाच्या हाती एखादी दुसरी कला लागते, व तीवर त्यास आपल्या सर्व आवश्यकता भागवाव्या लागतात. अशा स्थितीत करावे तितके

श्रम थोडेच; मग अन्य व्यवसायात घालविण्यास मनुष्यास वेळ कोठून मिळणार? तसेच सुधारणेमुळे सर्वत्र ज्ञानवृद्धि होऊन मनुष्यांत परस्परांबद्दल विशेष बंधुत्व व कळकळ वाटू लागली आहे; व नित्य श्रमाव्यतिरिक्त काही काल उरलाच तर तो आप्तवर्गात किंवा स्नेहीवर्गात बसून तत्संबंधी, किंवा ग्रामसंबंधी, अथवा देशसंबंधी किंवा जगासंबंधी सुखदुःखाच्या किंवा घडामोडीच्या गोष्टी सांगण्यात व माहिती मिळवण्यात जाणार. अशाच प्रकारच्या अनेक विघ्नांनी सुधारणे-पासून सृष्ट्यवलोकनासारख्या एकांतातील आणि मनोवृत्ति सदोदित प्रफुल्लित राखणाऱ्या सुखाच्या संपादनास प्रतिबंध होतो.

आता आमची स्थिति सृष्ट्यवलोकनास व मुख्यत्वेकरून आकाशाच्या अवलोकनास अनुकूल कोणत्या प्रकारे आहे हे पुढील गोष्टींवरून ध्यानात येईल. दुर्बिण वगैरे अनेक यंत्रे निघून सूर्य, ग्रह, तारे वगैरे सर्व मोठे करून आपणास पाहाता येतात. इतकेच नव्हे, तर कोट्यवधि नवीन तारे आपल्या दृष्टिगोचर होतात. दुसरे, ज्योतिषशास्त्राची ज्यांस विशेष गोडी, अशा लोकांनी परिश्रम करून काढिलेले आकाशाचे नकाशेहि सध्या सुलभ झाले आहेत; व त्यांनी लाविलेले शोधहि एकसारखे प्रसिद्धीस येत आहेत. ह्या सर्व साधनांमुळे आकाशाची माहिती होण्यास पूर्वीइतके आता प्रयास पडत नाहीत.

**अंतरिक्षदर्शन हे सुसंस्कारकारी आहे.**

अंतरिक्षाचे ज्यास अवलोकन करण्याचे असेल त्याने रात्रीच्या शांत वेळी उंच गच्चीवर किंवा सपाट मैदानात गेले पाहिजे हे उघड आहे. अशा ठिकाणी बसले असता सर्व आकाश ताऱ्यांनी खचलेले दिसते. अत्यंत नील अशा आकाशावर विखरलेली ही तारकारत्ने व त्यांचा अस्खलित प्रकाश पाहून मनुष्याच्या नेत्रांस खचित आनंद होईल. जसा एखादा मोठा हिरा फुटून त्याची लक्षावधि शकले व्हावीत व ती उंच अधांतरी लोंबत राहावीत, त्याप्रमाणे हे तारे कोणास भासतील; परंतु त्यांचा स्वयंप्रकाश व त्यांच्या प्रकाशाचे सदोदित भ्रमण ही पाहून हिऱ्याची उपमा त्यांस शोभत नाही असे त्यास वाटेल व वास्तविकच ते अनुपमेय आहेत, ते किती दूर असतील याची तर त्यास कल्पनाच करिता येणार नाही. घटकोघटकी पूर्वेस नवे तारे दिसू लागतात, कित्येकांचा पश्चिमेकडे अस्त होतो व सर्वांची पश्चिमेकडे गति दिसते. असे दिसण्याचे कारण काही असो, परंतु ह्या गतीपासून आश्चर्य वाटेल. अशी

गति ह्या पृथ्वीवर त्यांस कोठेहि आढळणार नाही. साधारण पदार्थांची गति पाहिली असता तीपासून घरघर वगैरे शब्द निघतात; शांत आकाशात तुरळक ढग आपणास निःशब्द हालताना दिसतात, परंतु त्यांची आकृति स्थिर राहात नाही. तसेच आकाशात लक्षावधि तारे निरंतर पश्चिमेकडे धाव घेत असून लेशमात्र शब्द नाही, इतकेच नव्हे तर त्यांच्या परस्परांमधील अंतर कधीहि बदललेले दिसत नाही. जो कवि असेल त्यास तर ही गति पाहून फारच आनंद वाटेल. अशा प्रकारची गति लोकांच्या समजास केव्हा येईल असे त्यास वाटेल. प्रत्येक आपापल्या क्षितीच्या भागात जन्म घेतो, पुढे अधिकाधिक प्रकाश पाडीत आपल्या अत्युच्च पदावर आरूढ होतो; परंतु इतरांस त्यापासून कधीहि धक्का नाही, व त्याच्या प्रकाशास यांचेपासून कधीहि न्यूनता नाही. कित्येक क्षितिजावर फार वेळ राहून आपला प्रकाश पृथ्वीस फार वेळ पुरवितात; कित्येक अल्पकाळपर्यंतच क्षितिजावर असतात, परंतु प्रत्येकाचा प्रकाश त्याच्या मोठेपणावर अवलंबून राहातो, क्षितिजात कोठे जन्मला व किती वेळ वर राहिला, ह्यावर नसतो. अखेरीस सर्व आपले नियत मार्गक्रमण करून क्षितिजाखाली अंतर्धान पावतात. लक्षावधींचा ह्याप्रमाणे क्रम, तथापि त्यांच्या सर्व अस्तित्वात परस्परांशी घर्षण किंवा बेबनाव किंवा अंतरभंग कोणाच्याहि लक्षात येत नाही. अशा प्रकारचे अनेक विचार आकाशातील सृष्टीचे सौंदर्य पाहून त्यांचे मनन करणाराचे मनात येतील व त्यास शेवटी अत्यंत हर्ष वाटेल. या प्रकारच्या सुखास विशेष महत्त्व दिले पाहिजे. कारण नानाविध मनोवृत्ति त्या पासून जागृत होतात, मनात शांतता व समाधान राहाते, आणि इतरांस त्यापासून कधीहि त्रास होत नाही, व त्यांच्या हृदयात आपणाविषयी मत्सरादि दुष्टवृत्ति उत्पन्न होत नाहीत. ह्या सुखाचा अनुभव दरिद्र्यास व श्रीमंतास सारखाच मिळू शकतो.

× × ×

# १२. कर्तव्याकर्तव्याचा विचार

**बाळ गंगाधर टिळक**

कर्तव्य कोणते ? आणि अकर्तव्य कोणते ? ह्या प्रश्नांमुळे ज्याचे मन कधीच संभ्रमात पडले नाही असा माणूस विरळा. मानवी मनास सदैव संत्रस्त करणारा हा एक सनातन प्रश्न आहे. हा प्रश्न आपल्या जीवनात उपस्थित झाला असता त्यावर निर्णय कसा घ्यावा यासंबंधी प्रस्तुत लेखात लो. बाळ गंगाधर टिळक यांनी मार्गदर्शन केलेले आहे. हे मार्गदर्शन त्यांनी पाश्चिमात्य आणि पौरस्त्य धर्मशास्त्रकारांच्या विचारांच्या आधारे केलेले आहे. उपरोक्त प्रश्नाचे सर्वांगीण विवेचन करणारा असा जो त्यांचा सुप्रसिद्ध 'गीतारहस्य' नावाचा ग्रंथ, त्यातून प्रस्तुत लेख निवडून घेतला आहे. लो. टिळक (जन्म इ. स. १८५६, मृत्यु इ. स. १९२०) हे समग्र महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. भारताचे झुंजार व तेजस्वी वृत्तीचे राजकीय नेते आणि त्रिखंडकीर्ति पावलेले, अलौकिक बुद्धिमत्तेचे संशोधक पंडित, ही त्यांची ख्याति सर्वश्रुतच आहे.

**किंकर्तव्यमूढ होण्याचा प्रसंग आजवर अनेकांवर आला आहे.**

किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः। —गीता ४·१६

भगवद्गीतेच्या आरंभी दोन परस्परविरुद्ध धर्मांच्या कैचीत सापडल्यामुळे कर्तव्यमूढ होऊन अर्जुनावर जो प्रसंग आला होता तो काही अपूर्व नाही. संन्यास घेऊन व जग सोडून रानात रहाणारांची किंवा दुबळेपणाने जगातील अनेक अन्याय मुकाट्याने सोसून घेणाऱ्या अशक्त व उदरंभरू लोकांची गोष्ट निराळी. पण समाजात राहूनच ज्या थोर व कर्त्या पुरुषांस संसारातील आपले कर्तव्य धर्माने व नीतीने बजावावयाचे आहे, त्यांवर अशा प्रकारचे प्रसंग अनेक वेळा गुदरत असतात. अर्जुनाला कर्तव्यजिज्ञासा व मोह युद्धारंभी झाला तर तोच मोह पुढे युद्धात मेलेल्या अनेक आत्म्यांची श्राद्धे करण्याची वेळ आल्यावर युधिष्ठिरास होऊन तो शांत करण्यासाठी 'शांतिपर्व' सांगितले आहे.

किंबहुना कर्माकर्मसंशयाचे असले प्रसंग हुडकून काढून किंवा कल्पून त्यांवर मोठमोठ्या कवींनी सुरस काव्ये अगर उत्तम नाटके रचिली आहेत. उदाहरणार्थ, प्रसिद्ध इंग्रज नाटककार शेक्सपियर याचे 'हॅमूलेट' नावाचे नाटक घ्या. डेन्मार्क देशाचा प्राचीन राजपुत्र हॅमूलेट याच्या चुलत्याने राज्यकर्त्या आपल्या भावाचा—म्हणजे हॅमूलेटच्या बापाचा—खून करून व हॅमूलेटच्या आईशी मोतूर लावून गादीहि बळकाविली होती. तेव्हा असल्या पापी चुलत्याचा वध करून बापाच्या ऋणातून पुत्रधर्माप्रमाणे मुक्त व्हावे किंवा सख्खा चुलता, पाटाचा बाप आणि तक्तनशीन राजा म्हणून त्याची गय करावी, या मोहात पडून कोवळ्या मनाच्या तरुण हॅम्लेटची काय अवस्था झाली, आणि श्रीकृष्णासारखा योग्य मार्गदर्शक कोणी पाठराखा नसल्यामुळे वेड लागून अखेरीस 'जगावे का मरावे' याची विवंचना करण्यात बिचाऱ्याचा कसा अंत झाला, याचे चित्र या नाटकात उत्कृष्ट रीतीने रंगविले आहे. 'करॉयलेनस' नावाच्या दुसऱ्या नाटकातहि अशाच तऱ्हेचा आणखी एक प्रसंग शेक्सपियरने वर्णिला आहे. करॉयलेनस नामक एका शूर रोमन सरदारास रोम शहराच्या लोकांनी शहराबाहेर घालविल्यामुळे तो रोमन लोकांच्या शत्रूंकडे जाऊन त्यांस मिळाला व "तुम्हास मी कधीहि अंतर देणार नाही" असे त्याने त्यांस अभिवचन दिले. नंतर काही काळाने या शत्रूंच्या मदतीने रोमन लोकांवर चाल करून मुलूख जिंकीत खुद्द रोम शहराच्या दरवाजापुढे त्याच्या सैन्याची छावणी येऊन पडली. तेव्हा रोम शहराच्या स्त्रियांनी करॉयलेनसची बायको व आई यांस पुढे करून मातृभूमी-संबंधाने त्याचे कर्तव्य काय याचा त्यास उपदेश केला व रोमन लोकांच्या शत्रूंस त्याने दिलेले अभिवचन त्यास मोडावयास लाविले! कर्तव्याकर्तव्याच्या मोहात पडल्याची अशा प्रकारची दुसरीहि उदाहरणे जगाच्या प्राचीन किंवा अर्वाचीन इतिहासात पुष्कळ आहेत. पण इतक्या दूरवर जाण्याचे आपणास कारण नाही. आपला महाभारत हा ग्रंथ अशा प्रकारच्या प्रसंगांची एक खाणच आहे म्हटले तरी चालेल. ग्रंथारंभी (आ. २) भारताचे वर्णन करिताना खुद्द व्यासांनी "सूक्ष्मार्थन्याययुक्त", "अनेकसमयान्वितं", अशी त्यास विशेषणे देऊन, त्यात सर्व धर्मशास्त्र, अर्थशास्त्र व मोक्षशास्त्र ही आली आहेत; इतकेच नव्हे, तर या बाबतीत "यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित्"—यात आहे तेच इतर ठिकाणी आहे, आणि यात नाही ते कोठेहि नाही (आ. ६२·५३)—असे त्याचे महत्त्व गाइले आहे. किंबहुना, संसारातील अनेक अडचणींच्या

प्रसंगी थोरथोर प्राचीन पुरुषांनी कसे वर्तन केले याचा कथानकाच्या सुलभ रूपाने सामान्य जनांस बोध करण्यासाठीच भारताचे 'महाभारत' झालेले आहे. एरवी नुसत्या भारती युद्धाचे किंवा 'जय' नामक इतिहासाचे वर्णन करण्यास अठरा पर्वे सांगण्याची काही जरुरी नव्हती.

**अहिंसाधर्मपालनातहि कर्तव्याकर्तव्याचा विचार करावा लागतो.**

कोणी असा प्रश्न करील की, श्रीकृष्णार्जुनांची गोष्ट सोडा; पण तुम्हाआम्हांस इतक्या खोल पाण्यात शिरण्याची जरूर काय ? मन्वादिक स्मृतिकारांनी आपआपल्या ग्रंथातून मनुष्याने संसारात कसे वागावे याबद्दल स्पष्ट नियम घालून दिले नाहीत काय ? कोणाची हिंसा अगर घातपात करू नका, नीतीने वागा, खरे बोला, वडील व गुरु यांचा मान ठेवा, चोरी किंवा व्यभिचार करू नका, वगैरे सर्व धर्मातून सर्वांस घालून दिलेल्या सामान्य मर्यादा जर पाळिल्या तर मग तुमच्या या भानगडीत पडण्याचे कारण काय ? पण उलट असेहि विचारता येईल की, जगातील यच्चयावत् लोक जोंपर्यंत या मर्यादेने वागू लागले नाहीत तोपर्यंत या लुच्च्या लोकांच्या जाळ्यात आपल्या सद्वर्तनाने सज्जनानी आपणास गुंतवून घ्यावे, किंवा त्यांच्या प्रतिकारार्थ जशास तसे होऊन आपला बचाव करावा ? शिवाय हे सामान्य नियम जरी नित्य व प्रमाण मानिले तरी कर्त्या पुरुषांवर पुष्कळदा असे प्रसंग येतात की, ज्या ठिकाणी या सामान्य नियमांपैकी दोन किंवा अधिक नियमांची एकसमयावच्छेदेकरून प्राप्ति होत्ये; आणि मग "हे करू का ते करू" अशा विवंचनेत पडून मनुष्य वेडा होऊन जातो. उदाहरणार्थ, मनूने सर्व वर्णांस सामान्य म्हणून सांगितलेल्या "अहिंसा सत्यमस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः"—अहिंसा, सत्य, अस्तेय, कायावाचामनाची शुद्धता, आणि इंद्रियनिग्रह (मनु. १०.६३)—या सर्व वर्णांस सामान्य म्हणून सांगितलेल्या पाच सनातन नीतिधर्मांपैकी अहिंसेचीच गोष्ट आपण घेऊ. "अहिंसा परमो धर्मः" (मभा. आ. ११.१३) हे तत्त्व आपल्या वैदिक धर्मातच नव्हे, तर इतर सर्व धर्मातहि मुख्य गणिले आहे. बौद्ध व ख्रिस्ती लोकांच्या धर्मग्रंथात ज्या आज्ञा आहेत त्यात "हिंसा करू नको" या आज्ञेस मनूप्रमाणेच पहिले स्थान दिलेले आहे. हिंसा म्हणजे नुसता जीव घेणेच नव्हे, तर दुसऱ्या प्राण्याचे मन किंवा शरीर यांस इजा करणे याचाहि यात समावेश होतो. अर्थात् अहिंसा म्हणजे कोणाहि सचेतन प्राण्यास

कोणत्याहि प्रकारे न दुखविणे होय. पितृवध, मातृवध, मनुष्यवध हे हिंसेचे घोर प्रकार असून जगांतील सर्व लोकांच्या मते हा अहिंसाधर्म सर्व धर्मांत श्रेष्ठ मानिला जातो. पण आता असे समजा की, आपला जीव घेण्यास, किंवा आपल्या पत्नीवर अगर कन्येवर बलात्कार करण्यास, अथवा आपल्या घरास आग लावण्यास, अगर आपली सर्व दौलत व स्थिरस्थावर हरण करण्यास एखादा दुष्ट मनुष्य हातात शस्त्र घेऊन सज्ज झाला व दुसरा जवळ कोणीहि त्राता नाही, तर असल्या 'आततायी' मनुष्याची आपण "अहिंसा परमो धर्मः" म्हणून डोळे मिटून उपेक्षा करावी, किंवा या दुष्टास—तो सामोपचाराने ऐकत नसल्यास—यथाशक्ति शासन करावे? मनु म्हणतो—

गुरुं वा बालवृद्धौ वा ब्राह्मणं वा बहुश्रुतम्।
आततायिनमायान्तं हन्यादेवाविचारयन्॥

"असला आततायी म्हणजे दुष्ट मनुष्य—तो गुरु आहे, म्हातारा अगर पोर आहे, का विद्वान ब्राह्मण आहे, इकडे न पाहता—बेशक ठार करावा!" कारण, अशा वेळीं हत्येचे पाप हत्या करणाराला लागत नसून, आततायी आपल्या अधर्मानेच मारिला जातो, असे शास्त्रकर्ते म्हणतात (मनु. ८·३५०). मनूनेच नव्हे तर अर्वाचीन फौजदारी कायद्यानेहि आत्मसंरक्षणाचा हा हक्क काही मर्यादा ठेवून कबूल केला आहे. अशा प्रसंगी अहिंसेपेक्षा आत्मसंरक्षणाची योग्यता अधिक समजतात. भ्रूणहत्या म्हणजे कोवळ्या पोराची हत्या सर्वात अति गर्ह्य मानिली आहे; पण आडवे आले म्हणजे कापून काढावयास नको काय? यज्ञातील पशुवध वेदानेहि प्रशस्त मानिला आहे (मनु ५·३१); परंतु पिष्टपशु करून तोहि एक वेळ टाळता येईल (मभा. शां. ३३७; अनु. ११५· ५६). परंतु हवेत, पाण्यात, फळात वगैरे सर्व ठिकाणी जे शेकडो अत्यल्प जीव भरलेले आहेत त्यांची हत्या कशी बंद होणार? महाभारतात (शां. १५·२६) अर्जुन म्हणतो की—

सूक्ष्मयोनीनि भूतानि तर्कगम्यानि कानिचित्।
पक्ष्मणोऽपि निपातेन येषां स्यात्स्कन्धपर्ययः॥

"डोळ्यांनी न दिसले तरी तर्काने ज्यांचे अस्तित्व समजते असे सूक्ष्म जंतु जगात इतके भरले आहेत की, आपण आपल्या डोळ्यांच्या पापण्या हालविल्या

तर तेवढ्यानेच या जीवांचे हातपाय मोडून पडतील!" मग हिंसा करू नका, हिंसा करू नका, असे तोंडाने म्हणण्यात काय हशील? हाच सारासार-विचार करून मृगयेचे अनुशासनपर्वात (अनु. ११६) समर्थन केले आहे. वनपर्वात अशी कथा आहे की, क्रोधाने एका पतिव्रता स्त्रीचे भस्म करण्यास उद्युक्त झालेल्या ब्राह्मणाचा प्रयत्न जेव्हा सफल झाला नाही तेव्हा तो त्या स्त्रीस शरण गेला; आणि मग धर्माचे खरे रहस्य समजून घेण्यासाठी त्या स्त्रीने सदर ब्राह्मणास एका व्याधाकडे पाठविले. हा व्याध मांसविक्रय करणारा असून परम मातृपितृभक्त होता. व्याधाचा हा धंदा पाहून ब्राह्मणास अत्यंत विस्मय व खेद झाला. तेव्हा व्याधाने अहिंसेचे खरे तत्त्व त्यास सांगून त्याची नीट कान-उघाडणी केली! जगामध्ये कोण कोणाला खात नाही? "जीवो जीवस्य जीवनम्" (भाग. १. १३. ४६) हा व्यवहार नित्य चालू असून आपत्काली तर "प्राणस्यान्नमिदं सर्वम्" असे स्मृतिकारांनीच नव्हे (मनु. ५. ५८; मभा. शां. १५·२१), तर उपनिषदातूनहि स्पष्ट सांगितले आहे (वेसू. ३·४·२८; छां. ५·२·१; बृ. ६·१·१४). सर्वांनी हिंसा सोडून दिल्यावर मग क्षात्रधर्म तरी कसा राहणार? आणि क्षात्रधर्म गेला म्हणजे प्रजेस त्राता नाहीसा होऊन, वाटेल त्याने वाटेल त्यास खाऊन टाकावे असा प्रसंग येणार. सारांश, नीतीच्या सामान्य नियमाने नेहमीच काम भागत नसून नीतिशास्त्रातील मुख्य म्हणजे अहिंसेच्या नियमातहि कर्तव्याकर्तव्याचा तारतम्य विचार सुटत नाही.

अहिंसाधर्माला धरूनच क्षमा, शांति व दया हे गुण शास्त्रात सांगितले आहेत. पण सर्व ठिकाणी ही शांति कशी चालणार! नेहमी शांत राहणाऱ्या मनुष्याची बायकापोरे देखील इतर लोक उघड हरण केल्याखेरीज रहाणार नाहीत असे कारण प्रथम दाखवून, पुढे महाभारतात प्रल्हाद आपल्या नातवास म्हणजे बलीस असे सांगतो की—

**न श्रेयः सततं तेजो न नित्यं श्रेयसी क्षमा।**

**. . . . . . . . . . . . . . . . .**

**तस्मान्नित्यं क्षमा तात पण्डितैरपवादिता॥**

"नेहमीच क्षमा किंवा नेहमीच तापटपणा श्रेयस्कर होत नाही. यासाठीच बाबा! ज्ञात्यांनीच क्षमेस अपवाद सांगितले आहेत" (वन २८·६,८). नंतर क्षमेस योग्य अशा प्रसंगांपैकी काही प्रसंग प्रल्हादाने वर्णिले आहेत. तथापि हे प्रसंग

कसे ओळखावे याचे तत्त्व प्रल्हाद सांगत नाही. पण प्रसंग न ओळखिता या अपवादांचा जर कोणी उपयोग करील तर ते दुर्वर्तन होते. म्हणून, हे प्रसंग कसे ओळखावे यातील तत्त्व समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**'सत्यापरता नाही धर्म । सत्य तेचि परब्रह्म ॥'**

जगातील सर्व देशात व सर्व धर्मात आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस सर्वतोपरी मान्य व प्रमाणभूत झालेले दुसरे तत्त्व 'सत्य' होय. सत्याची महती काय वर्णावी? सर्व सृष्टि उत्पन्न होण्यापूर्वी 'ऋतं' व 'सत्यं' उत्पन्न झाली असून त्या सत्यानेच आकाश, पृथ्वी, वायु वगैरे पंचमहाभूतेहि आवरून धरिलेली आहेत, असा वेदातून सत्याचा महिमा गाइला आहे. "ऋतं च सत्यंचाभीद्धात्तपसोऽध्यजायत" (ऋ. १०·१९०·१) "सत्येनोत्तभिता भूमिः" (ऋ. १०·८५·१) इत्यादि मंत्र पहा. 'सत्य' या शब्दाचा धात्वर्थच 'असणारे' म्हणजे "कधीहि नाहीसे न होणारे" अथवा "त्रिकाल अबाधित रहाणारे" असा आहे; आणि म्हणूनच "सत्यापरता नाही धर्म। सत्य तेचि परब्रह्म।" (शां. १६२, २४), हे वचन महाभारतात अनेक ठिकाणी आलेले असून आणखी असेहि सांगितले आहे की—

**अश्वमेधसहस्रं च सत्यं च तुलया धृतम् ।**
**अश्वमेधसहस्राद्धि सत्यमेव विशिष्यते ॥**

"हजार अश्वमेध आणि सत्य यांची तागडीत घालून परीक्षा केली, तेव्हा सत्यच अधिक भरले!" (आ. ७४.१०२). सामान्य सत्यासंबंधी हे वर्णन झाले. सत्य बोलण्यासंबंधी मनु (४.२५६) आणखी विशेष असे म्हणतो की—

**वाच्यर्था नियताः सर्वे वाङ्मूला वाग्विनिसृताः ।**
**तां तु यः स्तेनयेद्वाचं स सर्वस्तेयकृन्नरः ॥**

"मनुष्यमात्राचे सर्व व्यवहार वाणीने चालले आहेत. एकमेकांचे विचार एकमेकांस कळविण्यास शब्दासारखे दुसरे साधन नाही. मग या सर्व व्यवहाराला आश्रयीभूत असा जो हा वाणीचा मूळ झरा तोच जो गढूळ करतो, अर्थात् वाणीशी जो प्रतारणा करितो, तो मनुष्य सर्व मुद्दलाचीच एकदम चोरी करणारा होय." म्हणून 'सत्यपूतां वदेद्वाचं' (मनु ६·४६)—जे काही बोलावयाचे ते

सत्याने पवित्र झालेले असेच बोलत जा,—असे मनूने सांगितले आहे. उपनिषदातहि 'सत्यं वद। धर्मं चर।' (तै.१·११·१) असे इतर धर्मांपेक्षा सत्यालाच पहिले स्थान दिले असून, शरपंजरी पडलेल्या भीष्मांनी शांति व अनुशासन पर्वात युधिष्ठिरास सर्व धर्मांचा उपदेश केल्यावर प्राण सोडण्यापूर्वी "सत्येषु यतितव्यं वः सत्यं हि परमं बलम्" असे सकल धर्मांचे सारभूत म्हणून सर्वांस शेवटी एक सत्यच पाळण्यास सांगितले आहे. (मभा. अनु. १६७·५०). बौद्ध व ख्रिस्ती धर्मांतहि याच नियमांचा अनुवाद केलेला आढळून येतो.

**—पण ह्या सत्यधर्मपालनालाहि अपवाद आहेत.**

अशा रीतीने सर्वतोपरी सिद्ध आणि चिरकाल टिकणाऱ्या सत्यास काही अपवाद असतील असे कोणाच्या स्वप्नात तरी येईल काय? पण दुष्ट लोकांनी भरलेल्या या जगातील व्यवहार कठिण आहे! समजा की, काही मनुष्ये दरवडे-खोरांच्या हातातून निसटून तुमच्या देखत दाट रानात दडून राहिली आणि मागाहून हातात तरवार घेतलेले दरवडेखोर येऊन ती मनुष्ये कोठे गेली म्हणून तुम्हास विचारू लागले; तर तुम्ही काय उत्तर द्याल? सत्य बोलाल, का गरीब निरपराधी प्राण्यांचे जीव बचावाल? कारण, निरपराधी प्राण्यांची हिंसा बंद करणे हा शास्त्राप्रमाणे सत्याइतकाच महत्त्वाचा धर्म आहे. मनु म्हणतो, "नापृष्टः कस्यचिद् ब्रूयान्नचान्यायेन पृच्छतः" (मनु. २·११०; मभा. शां. २८७·३४)—विचारिल्याखेरीज कोणाशी बोलू नये, अन्यायाने जर कोणी प्रश्न करीत असेल तर विचारिल्यावरहि उत्तर देऊ नये; माहीत असले तरी वेड्या-सारखे हूं हूं करून वेळ मारून न्यावी,—"जानन्नपि हि मेधावी जडवल्लोक आचरेत्।" ठीक आहे; पण हूं हूं करणे हे तरी पर्यायाने खोटे बोलणेच नव्हे काय? "न व्याजेन चरेद्धर्मम्"—धर्माशी प्रतारणा करून मनाची समजूत घालून घेऊ नका; धर्म फसत नाही, तुम्ही मात्र फसाल;—असे भारतातच अनेक ठिकाणी सांगितले आहे (मभा. आ. २१५·३४). पण हूं हूं करूनहि वेळ मारून नेण्यासारखी नसली तर? चोर हातात तरवार घेऊन आणि छातीवर बसून द्रव्य कोठे आहे म्हणून विचारीत आहे; आणि उत्तर न दिले तर प्राण जाणार, अशी वेळ बेतल्यावर काय बोलणार? सकल धर्मांचे रहस्य जाणणारे भगवान श्रीकृष्ण वरील दरवडेखोराच्या गोष्टीचा दाखला देऊन कर्णपर्वात

अर्जुनास (क. ६९·६१), आणि पुढे शांतिपर्वात सत्यानृताध्यायी (शां. १०९·१५,१६) भीष्म युधिष्ठिरास असे सांगतात की—

> **अकूजनेन चेन्मोक्षो नावकूजेत्कथञ्चन ।**
> **अवश्यं कूजितव्ये वा शंकेरन्वाप्यकूजनात् ।**
> **श्रेयस्तत्रानृतं वक्तुं सत्यादिति विचारितम् ॥**

"न बोलता मोक्ष म्हणजे सुटका होण्यासारखी असेल तर काही झाले तरी बोलू नये; आणि बोलणे अवश्य असेल तर, किंवा न बोलल्यामुळे (दुसऱ्यांस) शंका येण्याचा संभव असेल तर, त्या वेळी सत्यापेक्षा खोटे बोलणे अधिक प्रशस्त, असे विचारांती ठरलेले आहे!" कारण, सत्यधर्म केवळ शब्दोच्चारणापुरताच निघालेला नसून ज्या वागणुकीने सर्वांचे कल्याण होते ती वागणूक, केवळ शब्दोच्चारण अयथार्थ आहे एवढ्याचमुळे, गर्ह्य मानिता येत नाही. ज्याने सर्वांचेच नुकसान होते ते सत्य नव्हे व अहिंसाहि नव्हे—

> **सत्यस्य वचनं श्रेयः सत्यादपि हितं वदेत् ।**
> **यद्भूतहितमत्यन्तं एतत्सत्यं मतं मम ।**

"सत्य बोलणे हे प्रशस्त होय; पण सत्यापेक्षाहि सर्व भूतांचे ज्यात हित असेल ते बोलावे. कारण, सर्व भूतांचे ज्यात अत्यंत हित तेच माझ्या मते खरे सत्य होय"—असे शांतिपर्वात (शां. ३२९·१३; २८७·१९) सनत्कुमाराच्या आधाराने नारद शुकास सांगत आहेत. 'यद्भूतहितं' हे पद पाहून आधुनिक इंग्रजी उपयुक्ततावाद्यांची आठवण येऊन कोणास हे वचन प्रक्षिप्त वाटेल म्हणून सांगतो की, हे वचन महाभारतात वनपर्वात ब्राह्मणव्याध संवादात दोनतीनदा आले असून त्यापैकी एका स्थळी "अहिंसा सत्यवचनं सर्वभूतहितं परम्" (वन. २०६·७३) व दुसऱ्या स्थळी "यद्भूतहितमत्यन्तं तत्सत्यमिति धारणा" (वन. २०८·४). असाहि थोडा पाठभेद केलेला आहे! सत्यप्रतिज्ञ युधिष्ठिराने द्रोणास "नरो वा कुंजरो वा" असे उत्तर देऊन व्यामोह पाडिला याला दुसरे काही कारण नसून, तत्सदृश इतर बाबतीतहि हाच न्याय लागू पडतो. खून करणाऱ्या मनुष्याचा जीव खोटे बोलून बचावावा असे आमचे शास्त्र सांगत नाही. कारण, शास्त्रातच खुनी मनुष्यास देहान्त प्रायश्चित्त किंवा वधदंड सांगितला असल्यामुळे सदर मनुष्य शिक्षार्ह किंवा वध्य होय. या किंवा यासारख्या इतर प्रसंगी

खोटी साक्ष देणाऱ्या मनुष्याचे सात अथवा अधिकहि पूर्वज व तो स्वतःहि नरकांत जातो असे सर्व शास्त्रकारांनी सांगितले आहे (मनु. ८·८९–९९; मभा. आ. ७·३). परंतु कर्णपर्वातील वर दिलेल्या दरवडेखोरांच्या गोष्टीप्रमाणे आपण खरे बोलल्याने निरपराधी माणसांचा विनाकारण जीव जाणार, अशी वेळ आल्यावर काय करणार ? ग्रीन नामक एका इंग्रज ग्रंथकाराने आपल्या 'नीतिशास्त्राचा उपोद्घात' या नावाच्या ग्रंथात असल्या प्रसंगी नीतिशास्त्रे मूग गिळून बसतात असे लिहिले आहे. मनु व याज्ञवल्क्य असल्या प्रसंगांची सत्यापवादात गणना करितात हे खरे; पण तसे करणेहि त्यांच्या मते सामान्यतः गौणच असल्यामुळे त्यांनी—

**तत्पावनाय निर्वाप्यश्चरुः सारस्वतो द्विजैः ॥**

असे शेवटी त्यांस प्रायश्चित्त सांगितले आहे. (याज्ञ. २·८३; मनु. ८·१०४-१०६).

**पाश्चिमात्य धर्मशास्त्रकारांनीहि सत्यधर्माला मर्यादा घातल्या आहेत**

अहिंसेच्या अपवादाचे ज्यांस आश्चर्य वाटत नाही अशा कांही बड्या इंग्रजांनी सत्याच्या बाबतीत आमच्या धर्मशास्त्रकारांस नावे ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून प्रमाणभूत खिस्ती धर्मोपदेशक व नीतिशास्त्रावरील इंग्रजी ग्रंथकार यासंबंधी काय म्हणतात ते येथे सांगतो. "मी खोटे बोलल्याने प्रभूच्या सत्याचा महिमा जर अधिक वाढतो (म्हणजे खिस्ती धर्माचा अधिक प्रसार होतो) तर त्यामुळे मी पापी कसा ठरणार ?" (रोम. ३·७) असे खिस्ताचा शिष्य पॉल याच्या तोंडचे उद्गार बायबलाच्या नव्या करारात दाखल असून, प्राचीन खिस्ती धर्मोपदेशक कित्येकदा याचप्रमाणे आचरण करीत, असे खिस्ती धर्माचा इतिहासकार मिल्मन याने म्हटले आहे. कोणालाहि थापा देऊन किंवा फसवून बाटविणे हे वर्तमानकालीन पाश्चिमात्य नीतिशास्त्रज्ञ प्रायः न्याय्य मानणार नाहीत. तथापि सत्यधर्म निरपवाद आहे असे तेहि म्हणत नाहीत. उदाहरणार्थ, ज्या सिज्विक नामक पंडिताचा नीतिशास्त्रावरील ग्रंथ हल्ली आमच्या पाठशाळातून पढविला जातो त्याचीच गोष्ट घ्या. सिज्विक हा कर्माकर्म संशयाच्या स्थली 'पुष्कळांचे पुष्कळ सुख' या सत्याच्या आधारे नीतिनिर्णय करीत असतो, व तीच कसोटी लावून त्याने अखेरीस असे ठरविले आहे की, असल्या प्रसंगी "लहान मुलांस, वेड्यांस, आजारी माणसांस (खरे सांगितल्याने

त्यांच्या प्रकृतीस अपाय होणार असल्यास), आपल्या शत्रूंस, चोरांस आणि (न बोलता वेळ निभत नसल्यास) आपल्याला अन्यायाने जो प्रश्न करितो त्यास उत्तर देताना किंवा वकिलांनी आपल्या धंद्यात, खोटे बोलणे गैर नाही." मिल्ल याच्या नीतिशास्त्रावरील ग्रंथात याच अपवादांचा समावेश केलेला आहे. या अपवादांखेरीज सिज्विक आपल्या ग्रंथात आणखी असेहि लिहितो की, "सर्वांनी सत्याने वागावे असे जरी आपण म्हणतो तरी ज्या राजकीय पुरुषांस आपले कारस्थान गुप्त ठेवावयाचे असते त्यांनी इतरांस किंवा व्यापाऱ्यांनी गिऱ्हाइकांस नेहमी खरेच सांगावे, असे आम्ही म्हणत नाही." तिसऱ्या ठिकाणी, अशाच प्रकारची सवलत पाद्री भटांस आणि शिपायांस असते असे त्याचे म्हणणे आहे. आधिभौतिक दृष्टीने नीतिशास्त्राचा ऊहापोह करणारा लेस्ले स्टीफन नावाचा आणखी एक इंग्रज ग्रंथकार अशाच प्रकारची दुसरी उदाहरणे देऊन अखेरीस असे लिहितो की, "माझ्या मते कोणत्याहि कृत्याचा परिणाम काय होतो इकडे लक्ष पुरवूनच त्याची नीतिमत्ता ठरविली पाहिजे. खोटे बोलण्यानेच एकंदरीत अधिक कल्याण आहे अशी जर माझी खातरी असेल तर सत्य बोलण्यास मी धजणार नाही; आणि ही खातरी अशा प्रकारची असू शकेल की, ह्या वेळी खोटे बोलणे हेच माझे कर्तव्य आहे असे मी समजेन." नीतिशास्त्राचा अध्यात्मदृष्टीने विचार करणारे ग्रीनसाहेब अशा प्रसंगाचा उपन्यास करून या वेळी नीतिशास्त्र मनुष्याच्या संशयाची निवृत्ति करू शकत नाही, असे स्वच्छ सांगतात; आणि अखेरीस असा सिद्धांत करितात की, कोणताहि सामान्य नियम केवळ नियम म्हणूनच सदैव पाळण्यामध्ये काही महत्त्व आहे असे न म्हणता, 'सामान्यतः' तो पाळण्यात आपले श्रेय आहे, एवढेच नीतिशास्त्राचे सांगणे आहे. कारण अशा वेळी आपण केवळ नीतीसाठी आपल्या लोभमूलक हलक्या मनोवृत्तींचा त्याग करण्यास शिकत असतो. नीतिशास्त्रावर ग्रंथ लिहिणाऱ्या बेन, व्हेवेल वगैरे दुसऱ्या इंग्रजी पंडितांचे मतहि असेच आहे.

**आमच्या शास्त्रकारांची सत्यनिष्ठा अधिक प्रखर आहे**

वरील इंग्रज ग्रंथकारांच्या मतांची आमच्या धर्मशास्त्रकारांनी घालून दिलेल्या नियमांशी तुलना केल्यास, सत्याबद्दल अधिक अभिमानी कोण हे सहज लक्षात येईल—

**न नर्मयुक्तं वचनं हिनस्ति न स्त्रीषु राजन्न विवाहकाले।**
**प्राणात्यये सर्वधनापहारे पञ्चानृतान्याहुरपातकानि ॥**

"थट्टेत, बायकांजवळ, विवाहकाली, प्राणावर संकट आले असता आणि मिळकत बचावण्यासाठी, मिळून पाच ठिकाणी अनृत बोलणे पातक नाही" (मभा. आ. ८२·१६; त्याप्रमाणेच शां. १०९ व मनु. ८·११० पहा), असे आमच्या शास्त्रात म्हटले आहे खरे. पण त्याचा अर्थ स्त्रियांशी नेहमीच खोटे बोलावे असा नसून सिज्विक साहेबाने ज्या अर्थाने "लहान मुले, वेडे किंवा आजारी," यांबद्दल अपवाद सांगितला आहे तोच अर्थ महाभारतातहि अभिप्रेत आहे. परंतु पारलौकिक व आध्यात्मिक दृष्टि गुंडाळून ठेवणाऱ्या इंग्रज ग्रंथकारांनी याहि पलीकडे जाऊन व्यापाऱ्यांनी देखील आपल्या फायद्यासाठी खोटे बोलले तर चालेल असे जे उजळ माथ्याने प्रतिपादन केले आहे, ते मात्र आमच्या शास्त्रकारांनी कधीच मान्य केलेले नाही. केवळ सत्यशब्दोच्चारण म्हणजे नुसते वाचिक सत्य आणि सर्वभूतहित म्हणजे वास्तविक सत्य, या दोहोंमध्ये जेथे विरोध येतो तेथे व्यवहारदृष्ट्या अपरिहार्य म्हणून असत्य बोलून निर्वाह करून घेण्यास काही ठिकाणी त्यांनी परवानगी दिली आहे खरी; तथापि सत्यादि नीतिधर्म त्यांच्या मते नित्य म्हणजे सर्वकाली एकसारखेच अबाधित असल्यामुळे पारलौकिक दृष्ट्या सामान्यतः हे थोडे तरी पापच होय, असे ठरवून त्यासाठी त्यांनी प्रायश्चित्ते सांगितली आहेत. ही प्रायश्चित्ते म्हणजे निरर्थक बाऊ होय, असे शुद्ध आधिभौतिक शास्त्र्यांचे म्हणणे पडेल. पण ज्यांनी ही प्रायश्चित्ते सांगितली आहेत त्यांची, किंवा ज्यांच्यासाठी ती सांगितली त्यांचीहि समजूत तशी नसल्यामुळे हे दोघेहि वरील सत्यापवाद गौणच मानितात असा सिद्धांत करावा लागतो; आणि हाच अर्थ यासंबंधाच्या कथानकातूनहि प्रतिपादिला आहे. उदाहरणार्थ, युधिष्ठिर "नरो वा कुंजरो वा" असे अडचणीच्या प्रसंगी एकदाच चाचपडत बोलला; पण त्यामुळे पूर्वी त्याचा रथ जमिनीस सोडून चार अंगुळे वर अंतरिक्षात चालत असे तो पुढे इतर लोकांच्या रथांप्रमाणेच जमिनीवरून चालू लागला व अखेर त्यामुळेच घटकाभर तरी नरकलोकी त्यास वास करावा लागला, असे खुद्द महाभारतातच सांगितले आहे (द्रोण. १९१·५७, ५८ व स्वर्गा. ३·१५). तसेच भीष्माचा वध क्षात्रधर्माप्रमाणे, पण शिखंडीला पुढे करून, केल्यामुळे अर्जुनास आपला

मुलगा बभ्रुवाहन याच्या हाताने पुढे पराभव सहन करणे प्राप्त झाले, असे अश्वमेधपर्वात वर्णन आहे (मभा. अश्व. ८१·१०). यावरून प्रसंगविशेषी सांगितलेले वरील अपवाद मुख्य व प्रमाण नसून महादेवांनी पार्वतीस सांगितल्याप्रमाणे—

**आत्महेतोः परार्थे वा नर्महास्याश्रयात्तथा ।**
**ये मृषा न वदन्तीह ते नराः स्वर्गगामिनः ॥**

"स्वार्थाकरिता, परहितार्थ, किंवा थट्टेनेहि जे पुरुष या जगी कधी देखील खोटे बोलत नाहीत त्यांसच स्वर्गप्राप्ति होत्ये" (मभा. अनु १४४·१९)—असा आमच्या शास्त्रकारांचा अखेरचा तात्त्विक सिद्धान्त आहे हे व्यक्त होते.

# १३. विद्वत्त्व आणि कवित्व

## विष्णु कृष्ण चिपळूणकर

भौतिक शास्त्रांच्या ज्ञानाची वाढ ही कवित्वशक्तीच्या विकासाला मारक ठरते अशा आशयाचा मेकॉलेने एक सिद्धान्त मांडला. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी आपल्या 'निबंधमाले'तील 'विद्वत्त्व आणि कवित्व' या निबंधात या सिद्धान्ताचा पाठपुरावा केला. महाराष्ट्रातल्या काहीं नामवंत वाङ्मय धुरीणांनी उगीचच या सिद्धान्ताविरुद्ध हाकाटी सुरू केली. वस्तुतः चिपळूणकरांनी जे लिहिले तेच खरे आहे. विद्वत्त्व आणि कवित्व या दोन भिन्न शक्ति आहेत; त्यांचे गुणधर्म निराळे आहेत; त्यांच्या प्रकृतीच परस्परविरुद्ध आहेत. चिपळूणकरांनी 'विद्वत्त्व आणि कवित्व' या निबंधात या मुद्द्याचे साधार, सुबोध व स्पष्ट विवेचन केले आहे. प्रस्तुत लेख हा या निबंधाचा उत्तरार्ध आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकर (जन्म इ. स. १८५० मृत्यु इ. स. १८८२) हे निबंधमालाकार म्हणून महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. त्यांच्या 'निबंधमाले'ने आधुनिक मराठी निबंध, चरित्र, टीका या वाङ्मयप्रकारांची उत्कृष्ट जोपासना केली आहे; त्याहिपेक्षा महत्त्वाची गोष्ट ही की मालेने महाराष्ट्रीयांच्या अंतःकरणातील स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा यांच्याविषयीची न्यूनगंडाची भावना नष्ट करून त्याच्या संबंधी प्रखर अभिमान उत्पन्न केला आहे. त्याचप्रमाणे पाश्चिमात्यांपासून महाराष्ट्राला शिकण्यासारखे काय आहे यासंबंधीहि मालेने यशस्वी मार्गदर्शन केले आहे. आधुनिक महाराष्ट्राचे निर्माते, या शब्दात मालाकारांचा गौरव करणे आवश्यक आहे.

> हठादाकृष्टानां कतिपयपदानां रचयिता
> जनः स्पर्धालुश्चेदहह कविना वश्यवचसा ।
> भवेदद्य श्वो वा किमिह बहुना पापिनि कलौ
> घटानां निर्मातुस्त्रिभुवनविधातुश्च कलहः ॥

**विद्वत्त्व आणि कवित्व यांत अभेद कल्पिणे हा भ्रम आहे.**

या विषयाच्या संबंधाने आपल्या लोकात पुष्कळ दिवसांपासून एक मोठाच भ्रम माजला आहे. तो अर्थात् विद्वत्त्व आणि कवित्व यांचा परस्पर अभेद.

फार तर काय, पण 'कवि' या शब्दाचा अर्थ 'शहाणा' असाहि पुढे होऊन गेला. आता असे होण्याचे कारण काय असे जर कोणी विचारील तर तेहि सांगणे कठिण आहे असे नाही. विद्यासंपादनाचा मार्ग पूर्वीचा असा काही चमत्कारिक होता की, मनुष्याने एक अगदीच विद्येशिवाय राहावे किंवा तिच्या सर्व शाखांचे पूर्ण अध्ययन तरी करावे; मध्यंतरी म्हणून मुळीच मार्ग नव्हता. तेव्हा जे नामांकित कवि होत ते अर्थातच या दुसऱ्या वर्गातलेच असत. पण गुरुच्या घरी बारा किंवा याहूनहि अधिक वर्षे राहून त्यांनी नुसती काव्येच पढून न राहता व्याकरण, न्याय, मीमांसा इत्यादि शास्त्रांत–की जी कवीस काही उपयोगाची नाहीत, किंबहुना कवित्वास अपायकारकहि होत, त्यातहि त्यांस पारंगत व्हावे लागे. यास्तव जे कवि निपजत ते अर्थात् अशा विद्वानांतूनच. तेव्हा सहजच कवि असला की तो विद्वान् असायचाच असे लोकांच्या नेहमी दृष्टीस पडे. पण याच शब्दांचा जर व्यत्यास केला म्हणजे विद्वान कवि असतात असे म्हटले–तर नेहमी चालेलच असे नाही या गोष्टीचा त्यांनी नीट विचार केला नाही! पुढे पुढे तर म्हणजे माघ, श्रीहर्ष ह्यांच्या वेळी, कवित्वास शास्त्राध्ययन अवश्यच झाले. या कवींच्या ग्रंथातून व्याकरण, न्याय, मीमांसा, किंबहुना वैद्यक, ज्योतिष इत्यादि शास्त्रांचाहि संबंध आणलेला असतो. असे होता होता अलीकडे तर 'रंडागीतानि काव्यानि' येथपर्यंत येऊन मजल टेकली! असो; हा एक प्रकार झाला. दुसरा प्रकार अलीकडे सुरू झालेल्या इंग्रजी विद्येचा. ही विद्याहि मागील संस्कृत विद्येप्रमाणेच कवित्वास अत्यंत अनुकूल आहे, किंबहुना तीशिवाय चांगली कविता करिता येणे आशक्य होय, असा एकंदर लोकांचा समज झाला आहेसा दिसतो. अथवा हेचसे काय; एकंदर सर्व गुणांचे अधिष्ठान इंग्रेजी विद्वत्ता होय असा या अप्रबुद्ध लोकांनी सिद्धांत केला आहेसा वाटतो! ह्यांच्या मते ही नवी विद्वत्ता म्हणजे काही मोठी अजब चीज होय! ही जवळ असली की, त्या मनुष्याने सभाग्रभागी उभे राहून बृहस्पतीप्रमाणे श्रोत्यास आपल्या वक्तृत्वाने थक्क करून टाकावे, कालिदासाप्रमाणे जगास चिरकाल मोहणारी कविता करावी, शाक्यमुनीप्रमाणे मानसिक व्यापारांची उपपत्ति काढावी, इत्यादि अनेक परस्परविरुद्ध शक्ति अशांच्या ठायी अवश्यमेव आल्याच असे हे समजतात. फार तर काय, पण चारपाच वर्षे विद्यालयात घालविली की, पृथ्वीवरील व्यापाराची घडामोड, राज्यव्यवस्था इत्यादि गोष्टीत किंबहुना युद्धकलादिकातहि निपुणता प्राप्त होते

असा सुद्धा कित्येकांचा समज असेल. उद्या जर गायनविद्येचा अभ्यास करावयाचे कोणाच्या मनात आले, की उत्कृष्ट पाकसिद्धि करायाची असली, तर तो एखाद्या विद्वानाची गाठ घेईल! सारांश,

**प्रायेण सामग्र्यविधौ गुणानां**
**पराङ्मुखी विश्वसृजः प्रवृत्तिः ॥**

"सर्व गुण एके ठिकाणी ठेवण्याविषयी विधात्याची इच्छा दिसत नाही—तर याच्या उलट दिसते." असे सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी जे कालिदासास वाटले व अगदी अलीकडेपर्यंत लोकास वाटत असे, ते सध्याच्या काळीं एकाएकी खोटे ठरत चालले की काय कोण जाणे असे एखाद्यास वाटेल! मागील काळी होमर, थुसिडिडीस, आरिस्टॉटल, आलेक्झांडर, असे नामांकित पुरुष निपजायास फार दीर्घ काळ लागे, व शिवाय एकेकाच्या ठायी एकेकच गुण मोठ्या प्रयासाने वास करी; पण इंग्रेजांची सत्ता येथे होऊन त्यांची विद्या इकडे नुकतीच संचार करू लागली तो सगळेच मान एकदम फिरले! शिल्पशास्त्र मोठ्या उत्कृष्ट दशेस येऊन अलीकडे जसे अद्भुत चमत्कार चोहोकडे दृष्टीस पडतात, त्याहिपेक्षा बुद्धीचे चमत्कार फारच मोठाले दिसू लागले आहेत. मनुष्याच्या मनास फार थोड्या काळात पूर्णत्व येऊन त्यात हरएक गुणाचा सहज समावेश व्हावा असे झाले आहे. असो; ईश्वरकृपेकरून एवढा प्रकाशाचा लोट आमच्या देशास सहन होवो म्हणजे झाले!

**कवीचे मन व तत्त्वज्ञाचे मन ही स्वभावतःच परस्परविरोधी आहेत.**

वरील लेखावर पुष्कळांचे पुष्कळ आक्षेप निघतील हे आम्ही जाणतो. तरी त्या सर्वांचे निराकरण करण्यास पुष्कळ जागा लागून ते या प्रसंगासहि उचित नाही असे समजून त्यासंबंधी येथे काही लिहीत नाही. वरच्या लिहिण्यातील मुख्य मुद्दा हा आहे की, कवित्वास विद्वत्तेची अगदी गरज नाही. निरनिराळ्या शास्त्रात पुरतेपणी गति होणे हे कवित्वास अनुकूल होणार नाही हे तर काय, पण अगदी साक्षात् प्रतिकूलच बहुधा होणार आहे. तर्कशास्त्रासारखे तर कवित्वास अपाय करणारे काहीच नाही!

हे वाचून आमच्या वाचकांपैकी पुष्कळास मोठे आश्चर्य वाटेल; व काही तरी विलक्षण मत स्थापण्याच्या बुद्धीने आम्ही हे लिहिले आहे असेहि

कित्येकास वाटल्यावाचून राहाणार नाही. यास्तव एका अनुभविक ग्रंथकाराचे प्रमाण येथे त्यास दाखविणे अवश्य वाटते—

नट—नन्वयं (कविः) प्रमाणप्रवीणोऽपि श्रूयते। तदिह चंद्रिकाचंडातपयोरिव कवितातार्किकत्वयोरेकाधिकरणतामालोक्य विस्मितोऽस्मि।

सूत्रधार—क इह विस्मयः।

**येषां कोमलकाव्यकौशलकलालीलावती भारती**
**तेषां कर्कशतर्कवक्रवचनोद्गारेऽपि किं हीयते।**

**यैः कांताकुचमंडले कररुहाः सानंदमारोपिता—**
**स्तैः किं मत्तकरींद्रकुंभशिखरे नारोपणीयाः शराः॥** प्रसन्नराघव नाटक

"नट—हा कवि तर्कशास्त्रातहि मोठा प्रवीण आहे म्हणून ऐकतो. तर चांदणे व कडक ऊन ही जशी एकत्र असावी त्याप्रमाणे याचे कवित्व व तर्कशक्ति एके ठिकाणी पाहून मला मोठा चमत्कार वाटतो!"

"सूत्रधार—यात कसचा चमत्कार! अरे, ज्यांची वाणी कोमल काव्यरचना प्रसवते, तीतूनच तर्कशास्त्राची तीक्ष्ण वचनेहि निघाली असता कोणती हानि झाली? ज्यांनी कांताकुचमंडली आनंदेकरून नखे रोविली, त्यांसच मदोन्मत्त झालेल्या हत्तीच्या गंडस्थळावरहि बाण हाणण्यास काही कठिण आहे काय?"

याप्रमाणे सुमारे सात–आठशे वर्षांपूर्वीच जयदेवासहि 'कवितेचा व तार्किकत्वाचा' विरोध भासला. तेव्हा हे मत आम्ही बळेच स्वकपोलकल्पित काढले आहे असे नाही अशी आमच्या सुज्ञ वाचकांची खचित खात्री होईल. आणि या विषयाचा जो अमळ बारकाईने विचार करील त्यास खचित कळून येईल की, कवीचे मन व तत्त्वज्ञाचे मन स्वभावतःच परस्परविरुद्ध होय. कवीच्या मनात पदार्थमात्राच्या दर्शनाने कल्पनेचे नानाविध तरंग उठत असतात. ते अर्थातच बहुधा भासमय असतात. तत्त्वज्ञाचे मन पदार्थमात्राच्या वास्तविक स्वरूपाच्या शोधाकडे लागलेले असते; यास्तव सर्व भासमय कल्पनांचा निरास करून ते निवळ सत्याकडेच जाते. कवीचे काम ब्रह्मदेवाप्रमाणे चित्रविचित्र कल्पनासृष्टि बनविण्याचे असते. तत्त्वज्ञाचे रसायनवेत्त्याप्रमाणे पदार्थमात्राचे पृथक्करण करण्याचे असते. सारांश, पहिल्याचा विषय कल्पना व दुसऱ्याचा विषय सत्यासत्यविवेचन. ही भिन्नता विशेष स्पष्ट करण्याकरिता एक थोडेसे उदाहरण येथे घेतो. साऱ्या सृष्टीत चंद्राहून रमणीय पदार्थ नाही. आता याकडे कवीची व तत्त्वज्ञाची

मनःप्रवृत्ति कशी होते ती बघा ! ग्रीक व रोमन लोकांनी चंद्राच्या सौंदर्यावरून व सौम्यत्वावरून त्यास स्त्री कल्पिले. त्यांच्या कथासमूहात ही स्त्री पारधीण असून धनुष्य व भाता घेऊन ही वनात पशूंमागे धावते आहे असे वर्णन आढळते. आपल्या कथासमूहात तर अशा कल्पनांची गर्दीच आहे. समुद्रातून उगवलासा दिसतो म्हणून त्यातून निघालेले एक रत्न; तो उगवताच कुमुदिनी (जणो काय हर्षाने) विकसतात म्हणून त्यांचा पति; रात्रीच त्याचे किरण प्रकाशमान होतात म्हणून तिचा नवरा; त्याच्या बिंबावर हरणाची आकृति दिसते म्हणून मृगांक; त्यास पाहाताच समुद्रास (जसे काय आनंदाचे) भरते येते, म्हणून (दुसऱ्या कल्पनेने) त्याचा मित्र; याचप्रमाणे अंधकाराचा शत्रु, राहूचा द्वेष्य, इत्यादि संबंधहि त्याजवर आले. त्याचे किरण नेत्रांस व शरीरास सुखद होत म्हणून शीतकर, चंद्रकांतास द्रवविणारा, इत्यादि कल्पनाहि त्यावर बसल्या. आता या मनोरम भ्रमांचे तत्त्वज्ञ कसे निरसन करून टाकतो पहा ! चंद्र समुद्रापासून लाखो कोस दूर आहे हे जाणून तो समुद्रोत्थ रत्न नव्हे असा तो निश्चय करतो; समुद्राची भरती, कमलांचा विकास, ही आकर्षणादि सृष्टिव्यापारांची फले होत; हरण दिसते ती चंद्रावरील पर्वतांची छाया; राहु म्हणतात ती पृथ्वीची छाया; अशा उपपत्ति तो करीत जातो. शेवटी चंद्राचे किरण थंडगार आहेत हा लोकानुभवहि त्यास सहन न होऊन उष्णतामापक यंत्राने तो चंद्रकिरणांची उष्णता काढतो ! !—झाले ! याप्रमाणे कविपरंपरेने उभारलेल्या सुंदर मंदिराचा हा कविप्रतिपक्षी आपल्या दुर्बिणीने व उष्णतामापक यंत्राने समूळ विध्वंस करून सर्व सृष्टि उजाड करून सोडतो. वरील उताऱ्यात कवितेस चांदण्याची व विचारशक्तीस कडक उनाची जी उपमा जयदेवाने दिली आहे तीहि मोठी सरस व समर्पक होय. एक तर चांदणे शांत व रमणीय असते; आणि ऊन उपयोगाचे खरे पण त्याची झळई कोणास आवडत नाही. तसेच कविता समजण्यास सोपी असते, मनाचे रंजन करते, आणि मनास शांति देते; पण शास्त्रावरील ग्रंथ अगोदर दुर्बोध व समजल्यावरहि त्यापासून मनास प्रगल्भता येते, त्याचे रंजन होत नाही; आणि वादाचे ग्रंथ असले तर त्यांपासून चित्तवृत्ति शांत न होता उलटी क्षुब्धच होते. हे एक सादृश्य. दुसरे सादृश्य हे की, चांदण्यात पदार्थ स्पष्ट न दिसल्यामुळे कल्पनाशक्तीस अवकाश सापडून अवास्तव भासात रंगण्यास मनास सापडते; पण कडकडीत उनात पदार्थ अगदीच स्पष्ट दिसल्यामुळे कल्पनेस सवडच न सापडून त्यांचे वास्तविक स्वरूप सहज दृष्टिगोचर

होण्यासारखे असते. हीच गोष्ट कल्पनेच्या द्वारे झालेल्या ज्ञानास व बुद्धीच्या द्वारे झालेल्या ज्ञानास यथानुक्रम लागते.

**आधी कल्पनाविकास, मग बुद्धीची प्रगल्भता.**

वरील उपपादनावरून दुसरी अशीहि गोष्ट आमच्या सुज्ञ वाचकांच्या लक्षात येईल की बुद्धीची प्रगल्भता ही कल्पनाविकासाच्या पुढली मनाची दशा होय;—म्हणजे आरंभी कल्पनेचा विकास होऊ लागून त्यापुढे बुद्धि विकास पावू लागते. या गोष्टीचा अनुभव फार थोडक्यात आहे. लहानपणी मुलांस खुळखुळ्याची, दिव्याच्या ज्योतीची, चांदोबाची जी मौज वाटत असते, तिचे बीज हेच होय की, त्यावेळेस त्यांची कल्पनाशक्ति हळूहळू विकास पावू लागत असते. त्यांस भुताखेतांच्या, राक्षसांच्या गोष्टींची फार मजा वाटते, काळोखात जाण्यास ती फार भितात, याचे तरी कारण हेच—की त्यांची कल्पना मोठी जागृत असून विचारशक्ति बहुधा निद्रिस्त असते. पण पुढे जसजसे त्यांस कळू लागते तसतसा हा गोष्टवेल्हाळपणा कमी कमी होत जाऊन सारासारविचार म्हणजे तथ्य कशात आहे कशात नाही वगैरे विवेचन ती करू लागतात. पुष्कळास स्वतःच्या अनुभवावरून आठवत असेल की, लहानपणी इसापनीतीतील गोष्टींची फारच मौज वाटून तात्पर्य वाचताना डोके उठे; पण तो कल्पनेचा काळ जाऊन त्यापुढील दशा मनावर येऊ लागल्यामुळे हल्ली वरच्या विरुद्ध अनुभव येतो—म्हणजे गोष्टीपेक्षा तात्पर्यावर विशेष नजर असते! असो; आता हा प्रकार प्रत्येक व्यक्तिभूत मनुष्यात जसा आढळतो, तसाच पण एकंदर राष्ट्रातहि आढळतो. पहा, सर्व लोकात अगदी पहिले ग्रंथ म्हटले म्हणजे कवितेचे असतात; आणि हे केवळ अनुक्रमानेच पहिले असतात असे नव्हे, तर योग्यतेनेहि अग्रगण्य असतात. या दोन्ही गोष्टींचे कारण अर्थात् हेच की, त्या अप्रबुद्धतेच्या काळी कल्पनाशक्ति जशी उद्दाम आणि अनावर असते, तशी पुढे कधीहि असत नाही. विद्वत्ता म्हणजे सर्व गुणांचे निधान मानणाऱ्या लोकांस होमर किंवा वाल्मिकि, व्यास यांसारखे पुढे कवि झाले नाहीत या गोष्टींचे मोठे आश्चर्य वाटत असेल! पण असे होण्याचे कारण वर जे सांगितले आहे ते लक्षात आणले असता विस्मयास मुळीच जागा राहाणार नाही. ते मन्वंतर निराळे होते आणि आताचे निराळे आहे. त्या काळी कल्पनेचेच बहुधा प्राबल्य असल्यामुळे तसले जगद्वंद्य काव्यग्रंथ त्या वेळी निर्माण झाले.

पण आता कल्पना जाऊन तिच्या जागी विवेचनशक्तीचा जोर दिवसांदिवस होत चालल्यामुळे ते सामर्थ्य गेले, आणि नानाविध शास्त्रांचा प्रादुर्भाव झाला. अंतरालात काय काय चमत्कार आहेत, पृथ्वीच्या पोटातील रचना कसकशी आहे, मनोवृत्तीचे व्यापार कोणकोणत्या नियमांनी चालतात, वगैरे गोष्टींच्या शोधाकडे अलीकडे लोकांच्या मनाची प्रवृत्ति झाली. पहिला काळ वसंतमासाप्रमाणे पालवींचा, मोहोरांचा व फुलांचा होय; आणि हा पुढील शरन्मासाप्रमाणे फलधान्यसमृद्धीचा होय. तेव्हा दोहोंचे एकाधिकरणत्व म्हणजे एके ठिकाणी असणे वस्तुगत्याच शक्य नव्हे!

या सर्व गोष्टींचा यथास्थित विचार केला असता, 'सुधारणा कवितेस प्रतिकूल होय,' 'तिची वाढ सज्ञानतेच्या काळी खुंटते' वगैरे सकृद्दर्शनी विलक्षण दिसणाऱ्या वाक्यांचा अर्थ आमच्या वाचकांच्या नीट लक्षात येऊन त्यांची सत्यता त्यांच्या मनावर चांगली ठसेल. असो; आता कवीचे लक्षण काय, त्याच्या अंगी कोणते गुण प्राधान्येकरून पाहिजेत, कोणते गौणत्वेकरून हवेत याविषयी विचार करू. तेणेकरून प्रस्तुत विषयाची विशेष फोड होईल.

**'कवि' मूळचा 'गाणारा', तिकडे 'पद्ये जुळविणारा'**

'कवि' शब्दाचा धात्वर्थ पाहिला तर 'गाणारा' असा आहे. हा अलीकडच्या काळी अर्थातच नेहमी लागू पडेल असे नाही; कारण गाणे हे निराळे कसबच होऊन बसले आहे. पण प्राचीन काळी सर्व देशात, व अजूनहि तशी स्थिति जेथे असेल तेथे कवि हेच गाणारे व वाजवणारे असत. संस्कृत नाटकातून हा पूर्वीचा प्रकार दाखविलेला असतो. राजांपाशी स्तुतिपाठक असत, त्यांस नाटकाच्या परिभाषेत 'वैतालिक' म्हणत, आणि एरवी 'बंदिजन'हि म्हणत. दैत्यगुरु शुक्राचार्यास याच कारणास्तव 'कवि' 'काव्य' ही नावे होती. ग्रीक लोकात 'ऱ्हापसोडिस्टस्' (Rhapsodists) नावाचे लोक असत, त्यांचा धंदा होमर वगैरे प्राचीन सर्वमान्य कवींची काव्ये गाऊन व वाद्यांवर वाजवून तोंडपाठ म्हणावी हा असे. हे काव्यपठक कोणी कोणी स्वतःहि काव्ये रचीत. असो; याप्रमाणे लेखनकला त्या वेळी नसताहि आपल्या वेदांप्रमाणे ती काव्ये पठकपरंपरेने त्या लोकात राहिली. असो; ही गोष्ट प्राचीन काळची झाली. पण इतकेहि लांब जाण्याची गरज नाही. हा प्रकार सध्याहि इकडच्या प्रांती नुकता दृष्टीस पडत असे. पेशव्यांच्या वेळेस लावण्या, पवाडे या छंदांवर शाईर कवने

रचून आपणच गात; व त्यांच्या योग्यतेप्रमाणे त्यावेळी त्यांची संभावना होत असे. ही कविता अजूनहि पठकपरंपरेने आपणात राहिली आहे. ही छापून ठार बुड्ड न देणे हे देशाभिमानी लोकांस मोठे भूषणास्पद होईल आणि असे केल्याने भाषाभिज्ञांवर व रसिकांवरहि लहान उपकार होईलसे नाही. असो; तेव्हा या रीतीने 'कवि' शब्दाची आपल्या देशात रूढि झाली. इंग्रेजी भाषेत एतदर्थवाचक जो शब्द आहे त्याचा अर्थ 'करणारा' असा होतो. यास्तव कवि म्हणजे कल्पनासृष्टि बनवणारा असा त्या भाषेतला मूळचा अर्थ होय असे सामान्यतः लोक समजतात. पण येवढा खोल अर्थ त्या अडाणी लोकांच्या मनात प्रथमतः आला असेल असे आम्हास वाटत नाही. तर आपल्या 'कवि' शब्दाप्रमाणेच 'करणारा' म्हणजे 'पद्ये जुळणारा' इतकाच अर्थ त्यावेळीं मूळचा असेल हे मानणे आमच्या मते अधिक सयुक्तिक होय. असो; येथवर नुसत्या शब्दाची व्याख्या झाली. आता कवीस अवश्य गुण कोणते पाहिजेत वगैरे गोष्टींविषयी विचार करू.

**कवीच्या अंगी उत्कट सहृदयता पाहिजे.**

कवीच्या अंगी मुख्य गुण सहृदयता पाहिजे—म्हणजे हृदयाच्या शृंगारवीरकरुणादि ज्या नानाविध वृत्ति त्या त्यास अत्यंत सूक्ष्मत्वाने व स्पष्टत्वाने भासल्या पाहिजेत. वरील निरनिराळ्या वृत्तींचा विषय इंद्रियगोचर होताच कवीचे मन क्षुब्ध होऊन जाते, आणि त्या खळाळीसरसे जे उद्गार आपोआप निघून जातात तेच खरी व अस्सल कविता होत. याचे अत्युत्कृष्ट उदाहरण आपल्या आद्यकवीचा क्रौंचवधनिमित्तक करुणोद्गार होय हे आमच्या वाचकांस मागील अंकावरून आठवेलच! तसेच मराठी कवितेत पहाता असे उत्कृष्ट मासले विशेषेकरून तुकारामाचेच अभंग होत हेहि सर्वांच्या ध्यानात येईल. हा कवि मनाचा मोठा प्रेमळ, साधा, मोकळा व थोर असल्यामुळे कोणत्याहि प्रसंगाचे त्याचे अभंग असोत, त्यात तो तो रस जसा काय भरपूर भरलेला असतो, व म्हणूनच ते आपल्या लोकांस आज दोन अडीचशे वर्षे येवढे प्रिय होऊन राहिले आहेत; आणि जोपर्यंत त्यांचा आधार जी मराठी भाषा ती या जगात राहील तोपर्यंत आपल्या नावाप्रमाणे ते खरोखरच 'अभंग' राहाणारे आहेत. असो; तेव्हा निरनिराळ्या वृत्ति पूर्णपणे ज्यात प्रतिबिंबित होतील असे अंतःकरण कवीचे असायास पाहिजे; म्हणजे सहृदयता हे

कवित्वाचे मुख्य लक्षण होय. हे ज्याच्या ठायी वसत नाही त्याची बुद्धि कितीहि प्रचंड असली तरी ती त्यास या ठिकाणी अगदी कामास पडायची नाही. अशा विषयांची उदाहरणे आपल्या देशातली देणे अशक्य होय; का की, आपल्या प्राचीन किंवा अर्वाचीन ग्रंथकारांची माहितीच आपणापाशी मुळीच नाही म्हटले असता चालेल. यास्तव दुसऱ्या देशातीलच उदाहरणे सांगणे अवश्य आहे. प्राचीन रोमन लोकात सिसरो म्हणून एक महावक्ता होऊन गेला हे आमच्या मराठी वाचकांनाहि बहुधा विदित असेलच. हा सिसरो सांस्थानिक कामातहि मोठा हुशार असून शिवाय महाविद्वानहि होता. याने क्याटिलैनच्या बंडाचा मोड करून रोम शहर बचावले, व एकंदर राज्यहि त्याने त्या संकटसमयी वाचविले म्हणण्यास हरकत नाही. तसेच याने ल्याटिन भाषेत शेकडो मोठमोठे ग्रंथ रचून ठेवले होते; पण त्यांचा एकविसांश मात्र आता उरला आहे. असो; पण सांगायाचे काय की हा येवढा नामांकित विद्वान व शिवाय वक्ता असताहि, याची कविता इतकी भिकार आहे की तिला ते नावसुद्धा शोभत नाही! त्याला मात्र स्वाभिमानास्तव तिची योग्यता मोठी वाटे. पण बाकी सर्वांस ती आजपर्यंत अगदी नादान वाटत आली आहे! हे उदाहरण मोठे म्हणून आम्ही येथे एकच घेतले, दुसरीहि अशी पुष्कळ आहेत; पण ती सर्व येथे लिहिण्याचे प्रयोजन नाही. आता दुसऱ्या देशातील काही थोडी सांगतो. जॉनसन्, पोप, ड्रायडन् हे ग्रंथकार केवढे थोर होऊन गेले हे येथे सांगितले पाहिजे असे नाही. यांपैकी शेवटच्या दोघांनी तर आपआपला सारा जन्म कविता लिहिण्यातच घालविला; व तिघेहि आपआपल्या काळीं बाकीच्या कवीत अग्रगण्य होते. पण आता यांस फारसा मान नाही; कोणी कोणी तर हे मुळीच कवि नव्हेत असे सुद्धा म्हणावयास भीत नाहीत! बरे तर, ही सर्व उदाहरणे महाविद्वान् असून मुळीच कवि नसणारांची—किंवा निदान महाकवि नसणारांची—झाली. पण इतकेच नव्हे. याहूनहि चमत्काराची एक गोष्ट वारंवार आढळण्यात येते, ती ही की, समयविशेषेकरून खऱ्या कवीचेसुद्धा कवित्व कमी जास्त होते;—म्हणजे एखादे काव्य एखाद्या वेळीं उत्कृष्ट साधून जाते, पण दुसऱ्या वेळीं काही केल्या तसे उतरत नाही. मिल्टन कवीने आपणाविषयी असे लिहिले आहे की, माझी प्रतिभा वर्षाच्या काही महिन्यात विशेष उज्ज्वल असे, व या धोरणावर तो काव्यरचना करीत असे. पोपविषयी जॉन्सन् याने असे लिहिले आहे की, याने वीस वर्षांचा असता जितकी उत्कृष्ट कविता केली

त्याहून वरचढ अशी पुढे त्यास साधलीच नाही. त्याप्रमाणेच बैरन् यानेहि पंचवीस तीस वर्षांच्या वयात जी कविता रचिली ती फारच उत्कृष्ट उतरली; तशी त्यास पुढे साधली नाही इतके नव्हे, तर ती पहिलीच्या मानाने पुष्कळच हलकी ठरली. असो; तेव्हा या सर्व गोष्टींवरून काय बरे स्पष्ट दिसते ? अर्थात हेच की, कवित्वाचे तत्त्व सहृयता होय. ही ग्रंथात जशी कमीजास्त असते त्याप्रमाणे त्या ग्रंथास काव्यत्व येते. आणि ही आपल्या अंगी बळेच आणू जाता येणारी नव्हे हे तर काय, पण ती आपले ठायी असताहि नेहमी आटोक्यात राहाणारी नव्हे !

**सहृदयता मावळू लागली म्हणजे काव्यात कृत्रिमता येते.**

तेव्हा इतर मनुष्यात व कवीत मुख्य विशेष म्हणून हाच की, कवीच्या ठायी सहृदयता अत्यंत असते. ही येवढी मुद्याची गोष्ट नीट ध्यानात धरली असता हा विषय सर्वांस अगदी उघड होईल. पहा की, ही सहृदयता म्हणजे अंतःकरणाचा कोमळपणा तरुणवयात मनुष्यास फार असतो, व तसाच अर्थात् अज्ञानावस्थेत असणाऱ्या राष्ट्रातहि फार असतो. म्हणूनच लहान वयात अंतःकरणवृत्ति सुक्षोभ असून नाटके, कादंबऱ्या, काव्ये अशा ग्रंथांचा अतोनात नाद लागतो; आणि राष्ट्राच्या आद्यावस्थेत उत्कृष्ट कविता उदयास पावते. पण या सौम्य वृत्ति मनुष्यात व राष्ट्रात प्रौढ वयाच्या सुमारास मावळू लागून शेवटी बहुधा अगदीच नाहीशा होतात; व त्या त्या प्रमाणे विचारशक्तीचे प्राबल्य होत जाऊन कवित्वाचा ऱ्हास होतो. त्या मूळच्या साध्या काळात झालेल्या कवीस दुसरी सोयहि ही होती की, सृष्टीच्या व मानवी स्वभावाच्या केवळ मूळच्या स्वरूपाशी त्यांचा नेहमी परिचय असे. आताप्रमाणे दोहोंवर त्या काळी कृत्रिमता आली नव्हती. यास्तव दोहोंची प्रतिमा त्यांच्या विशद मनावर जशी काय सहज ठसून जाऊन वर्णनद्वारा त्यांच्या ग्रंथात प्रकट झाली. पण पुढील कवींच्या मनावर ती अर्थातच पहिल्यांच्याप्रमाणे यथास्थित न उठल्यामुळे स्वभाववर्णन त्यांस पहिल्यांसारखे साधले नाही. असे होता होता शेवटी तर स्वभाववर्णन अगदीच सुटून कविता केवळ सामान्य व्यावहारिक कलेप्रमाणे गणमात्र जुळण्याचेच काम होऊन बसली. पहिले कवि स्वानुभूत गोष्टींचे व मनोवृत्तींचे वर्णन करीत; पण पुढील काळी कीर्तीच्या किंवा पैशाच्या लोभास्तव जेव्हा काव्ये रचण्याचा प्रघात पडला, व कविता करणे हा एक धंदाच

झाला, तेव्हा स्वानुभव हा कवीस नकोसाच झाला. कवितेस सहृदयत्वापेक्षा बुद्धीची व मेहनतीचीच विशेष गरज लागू लागली. म्हणजे आधीच्या कवितेचे जे साधे अर्थसौंदर्य ते जाऊन त्याच्या जागी मोठमोठी मजेदार वृत्ते, पदांचे लालित्य व माधुर्य, अर्थालंकार, शब्दालंकार, असा थाटमाट हळूहळू आला. जे पदार्थ, जे सृष्टिचमत्कार कधी यावज्जन्म पाहिले नाहीत, ज्या मनाच्या वृत्ति किंवा जे अंतःकरणाचे विकार कधीहि साक्षात् अनुभवास आले नाहीत, किंबहुना येण्याची योग्यताहि नाही, त्यांवरहि या पुढील कवींनी धाड घालून त्यांचे वर्णन आपल्या ग्रंथातून आणले आहे. हे एक असो. पण याहून उपहासास्पद गोष्ट काय की, जे सृष्टीतील पदार्थ सहज पाहाण्यासारखे असतात त्यांचेहि वर्णन यांनी यथावत् केलेले नसते. होमरच्या 'इलियड' नामक जगन्मान्य काव्याचे पोप कवीने इंग्रजीत भाषांतर केले. त्यातील आठव्या सर्गाच्या शेवटी चांदण्या रात्रीचे वर्णन आहे. ते इंग्रजीत इतके चुकलेले आहे की, मेकॉलेच्या मते, 'त्यात जितक्या चुका आहेत तितक्या साऱ्या 'इलियडा'त सापडायाच्या नाहीत.' तसेच ड्रायडन याने एका नाटकात एके प्रसंगी रात्रीचे वर्णन केले आहे; त्याची मागे मोठी वाहवा होती, व तसे वर्णन कोणत्याहि कवीस साधले नाही असे जॉनसन्सारख्या महारसिकांचे मत होते. पण तेच आता 'अप्रयोजक, व आत शब्दगौरव मात्र मोठे असून अर्थशून्य' असे ठरले आहे. पुढील पुढील संस्कृत कवींची वर्णनेहि जी इतकी नीरस उतरली आहेत त्याचे तरी कारण हेच. एकदा अनादिसिद्ध ज्या उपमा ठरून गेल्या, जे कविसंकेत एकदाचे कायम बसून गेले, त्यांचीच पुनरुक्ति किंवा स्वतःच्या वेड्यावाकड्या अत्युक्तिरूप विलक्षण कल्पना यांनी त्यांच्या कृति भरलेल्या असतात. बाह्य सृष्टीचे किंवा अंतःसृष्टीचे अवलोकन म्हणजे काय हे या बिचाऱ्यांच्या कधी स्वप्नीहि आले नसेल! जुन्या कवींनी केलेल्या वर्णनावरून सरासरी आपली वर्णने बनवायाची, मग ती कशी चांगली उतरावी? अगोदर मोठमोठ्या कवींनी केलेली वर्णनेहि हुबेहूब उतरत नाहीत,--म्हणजे ते ते पदार्थ प्रत्यक्ष पाहून जी कल्पना मनात भरते ती नुसत्या वर्णनांवरून कधीहि भरत नाही. मग या वर्णनावरून जी प्रतिवर्णने उतरावयाची त्यांच्यात तथ्य व रस कितपत राहील! अर्थात् छायेच्या प्रतिच्छायेत व मूळच्या रूपात जितपत अंतर तितपतच त्या दोहोत! अशा प्रतिकवींची वर्णने म्हणजे जन्मांधाने जसे वनश्रीचे वर्णन करावे, त्याप्रमाणेच सर्वथा हास्यास्पद होत.

### जुन्या काळच्या कवींची काव्ये उत्कृष्ट कां ?

तेव्हा जुन्या कवींची काव्ये येवढी उत्कृष्ट उतरण्याची ही कारणे होत. एक तर त्या काळी कल्पनेचे मोठे प्राबल्य असल्यामुळे ते त्यांच्या कवित्वास अत्यंत पोषक झाले; दुसरे बाह्यसृष्टीचे व अंतःसृष्टीचे मूळचे शुद्ध स्वरूप त्यांच्या नेहमी दृष्टीस पडल्यामुळे त्यांच्या कृत्रिमसंस्काररहित शुद्ध मनावर 'रंगःशुक्लपटे यथा' (जसा पांढऱ्या स्वच्छ कपडयावर रंग) या न्यायाने त्यांचा ठसा सहजपणे पूर्ण उमटला; तसेच तिसरेहि कारण अर्थात् हे की, त्या कवींच्या मनोवृत्ति व हृदय-वृत्ति केवळ स्वानुभूत असल्यामुळे त्यांचा अविर्भाव तसाच यथास्थित व स्पष्ट त्यांच्या ग्रंथांत झाला. पदार्थविज्ञानात सांगितलेला पाण्याचा धर्म सर्वांस माहीतच असेल की, ते जितक्या उंचीवर मूळचे असते तेथपर्यंतच ते चढते. हाच नियम अंतःकरण-वृत्तीसहि लागतो. ज्या वृत्ति हृदयासच अगोदर भासल्या नाहीत त्यांचे वाग्द्वारा वर्णनहि अगदी रसशून्य उतरल्यास काय नवल? ज्याने वियोगदुःख कधी अनुभविले नाही त्याने पुत्रशोकादिकांचे वर्णन केल्यास, ज्याचा काळ नेहमी ऐषआरामात जाणार त्याने युद्धादि प्रसंग वर्णिल्यास, वसंतातली झुळूक घेणाराने समुद्रावरील तुफानाचे वर्णन करू गेल्यास, ते किती उत्कृष्ट उतरेल हे कोणी सांगेल! ज्याने पर्वतीहून मोठा डोंगर पाहिला नाही, त्याने हिमालयाचे वर्णन करू जाणे, ज्याने मुळामुठाच काय त्या मोठ्या नद्या पाहिल्या त्याने गंगायमुनांसारख्या महानद्यांच्या वर्णनास हात घालणे, म्हणजे भांबुरडयावरून लंडन शहराची कल्पना बांधणे होय! असो; तेव्हा वर्णावयाच्या गोष्टींचा साक्षात् अनुभव कवीस अगदी अवश्य पाहिजे.

### पदलालित्यादि गुण म्हणजे काव्याचे सर्वस्व नव्हे.

कवीस प्राधान्येकरून ज्या गोष्टी पाहिजेत त्या त्या वर सांगितल्या. यांखेरीज ज्या राहिल्या—म्हणजे पदलालित्य, मृदुत्व, माधुर्य, सरळ अन्वय, व्याकरणशुद्धता, छंदांची निर्दोष व्यवस्था, इत्यादि–त्या एक रीतीने गौणच होत. या नसल्याने काव्याची शोभा कमी होते खरी, पण याच नुसत्या असल्याकारणाने ती येते असेहि नाही. दुसरे असे की, अगदी सुमारबट बुद्धीच्या मनुष्यासहि हे गौण काव्यगुण साधण्यासारखे आहेत; पण वरील तसे नव्हेत. ते पुष्कळ अंशी मूळचेच अंगी वसले पाहिजेत, व काही अंशी

स्थितिविशेष व प्रसंगविशेष यांच्या योगाने त्यांचा उत्कर्ष व्हावयास पाहिजे. आरंभीच्या मोठमोठ्या कवींची काव्ये पाहिली तर त्यात वरील पदलालित्यादि गुण फारसे सापडणार नाहीत. 'रामायणा'चा छंद येथून तेथून एक अनुष्टुप् आहे, व शब्दांच्या रचनेकडे वगैरे त्यात विशेष लक्ष अगदीच दिलेले आढळत नाही. 'महाभारता'तहि तोच प्रकार. त्यात छंदभंगादि दोष हवे तितके आहेत. तिसरे प्रसिद्ध पुराण जे 'भागवत' त्यात मात्र मोठाले छंद, अलंकार वगैरे सापडतात; व यास्तव ते अर्वाचीन आहे असे पंडितांचे मत आहे. इंग्लिश लोकांच्या अभिमानाचे परम स्थान होऊन बसलेला जो शेक्सपीयर—की जो इंग्लंडचा कवि नव्हे, तर साऱ्या मनुष्यजातीचा होय, असे युरोपातील पंडित म्हणतात—त्याचे ग्रंथहि याच सदराखाली मोडतात. या बोवांनी तर कोणत्या दोषास म्हणजे आपल्या अजरामर कृतीत थारा दिला नाही असे प्रायः आढळणार नाही!—एकवचनी क्रियापद बहुवचनान्त कर्त्याशी जोडले तर आहे; बोहेमिया देशास बेट करून त्याच्या किनाऱ्यावर जहाज तर उतरविले आहे; ट्रोजन लोकांच्या हेक्टर नामक वीराकडून शेकडो वर्षे पुढे झालेल्या आरिस्टॉटलचे एके प्रसंगी वचन तर म्हणविले आहे—याप्रमाणे या वाग्देवतेच्या लालाचीहि थोडीशी लीला वर्णन केली! बरे, माधुर्य, मार्दव, प्रसाद वगैरे इतर गुण जर कोणी पाहू लागेल, तर या संबंधेहि शेक्सपीयरच्या ग्रंथात त्याचे समाधान होईलसे आम्हास वाटत नाही. या कवीच्या पुढल्या काळी म्हणजे ड्रायडन, पोप, जॉनसन् यांच्या वेळी—तर वरच्या उलट गुण, म्हणजे कार्कश्य, क्लिष्टत्व, यास्तव यास कोणीच विचारीत नसे; व आता जरी हा कवि येवढा लोकप्रिय होऊन गेला आहे तरी दुर्बोध अर्थाची याच्या नाटकात पुष्कळ स्थळे आहेत हे हवे त्यास सहज दिसून येईल. पण येवढ्यानेच झाले नाही. आणखीहि दोन मोठाले दोष या कविशिरोमणीच्या माथी मारले पाहिजेत. एक श्लेषयोजनेची अतोनात हौस; आणि दुसरा दोष अश्लीलत्व. जॉनसन् याने एके ठिकाणी म्हटले आहे की, 'श्लेषाची संधि सापडली असता ती आपल्या कवीस कधी फुकट दवडवत नाही.' तसेच अश्लीलत्व म्हणजे चावटपणा. हा शेक्सपीयरच्या मोठमोठ्या नाटकातूनहि खुशाल उघडपणे मोठमोठ्या पात्रांनी सुद्धा केलेला असतो. याचा प्रत्यय आमच्या मराठी वाचकांस घेणे असेल तर त्यांनी कैलासवासी महादेवशास्त्री कोल्हटकर यांनी केलेले 'अथेल्लो'चे भाषांतर पाहावे. ते पाहिले असता आमच्या काही संस्कृत कवींच्या शृंगार-वर्णनाच्या

योगाने अंगावर शहारा आणणाऱ्या डॉक्टर हाल् प्रभृति सोवळ्या साहेबांच्या ढोंगाचा आमच्या लोकांस चमत्कार वाटल्यावाचून राहाणार नाही! असो; या वादाच्या संबंधाने एका थोर निष्पक्षपात इंग्रेज ग्रंथकाराचा अभिप्राय येथे दाखवून हे प्रकरण संपवितो. शेक्सपीयर कवीने काही लहान काव्येहि लिहिली आहेत; त्यांस उद्देशून हालम्साहेबांनी म्हटले आहे की, हे ग्रंथ या कवीच्या विशाल कीर्तीस कलंकरूप होत; हे याने लिहिले नसते तर बरे होते. असो; पण या सर्वांपेक्षाहि अधिक सदोष कविता पाहाणे असल्यास आमची मराठी होय; तींतील बहुतेक कवींस व्याकरणाची, छंदांची वगैरे ओळख सुद्धा नव्हती असे म्हणण्यास हरकत नाही; मग पदलालित्य, अर्थगांभीर्य, वगैरे काव्यगुणांची तर गोष्टच नको! प्रसाद हा गुणहि त्यांच्या कवितेत सर्वत्र आढळतोच असाहि नेम नाही. या सर्व कवीत वामनपंडित मोठा विद्वान् होता म्हणून लौकिक आहे; पण या कवीचेहि पांडित्य त्याच्या काव्यात चांगलेसे दिसत नाही. अर्थ पुष्कळ ठिकाणी क्लिष्ट असून शिवाय पदरचनेविषयीहि पंडितांनी मोठीशी खटपट केलेली कोठेहि नजरेस येत नाही. असो; तेव्हा एकंदर सिद्ध काय करायचे की, हे पदलालित्यादि गुण काव्यास शोभादायक खरे, पण ते काव्याचे सर्वस्व नव्हेत. त्यांचा बहुधा अभावच असताहि जगास ज्यांचे ग्रंथ चिरकाल मान्य होऊन राहिले आहेत अशा महाकवींची वर उदाहरणे सांगितली. त्यांवरून पूर्वोक्त गुण केवळ गौण होत हे आमच्या वाचकांच्या सहज ध्यानात येईल.

पण ते गौण आहेत म्हणून त्यांची गरज नाही असा अर्थ समजावयाचा नाही. केवळ त्यांच्याच योगाने ग्रंथास काव्यत्व येणार नाही हे खरे, पण सत्काव्याशी जर त्यांचा योग झाला तर ते त्याचे रमणीयत्व फारच वाढवितील यात तिळमात्रहि संदेह नाही. याशिवायहि काव्याचे सौंदर्य भासणे, किंबहुना एतद्विरुद्ध दोषांनी ग्रस्त झालेल्या ग्रंथातहि कवित्वाची लकेर उमगणे, हे महारसिकाशिवाय दुसऱ्याचे सामर्थ्य नव्हे; पण सामान्य जनांस जर रमविणे असेल तर रत्न जसे कोंदणात बसवायाचे तसेच काव्यास वर सांगितलेल्या साधनांचा अवश्य उपयोग करून घेतला पाहिजे. हाच प्रकार व्हर्जिल वगैरे ल्याटिन् व कालिदासादि संस्कृत कवींच्या ग्रंथातून आहे; व म्हणूनच त्यांची काव्ये मोठ्या मार्मिक रसिकांस जशी रिझवितात तशीच सामान्य जनांसहि आजपर्यंत आनंद देत आली आहेत.

**विद्वत्ता वाढली म्हणजे कवित्व वाढते असे समजणे चूक आहे.**

याप्रमाणे कवीस प्राधान्येकरून कोणते व गौणत्वेकरून कोणते गुण अवश्य हवेत याविषयी बरेच लांब विवरण झाले. हे यथास्थित ज्यांच्या मनात भरले असेल त्यांस प्रस्तुत विषयाचा तेव्हाच उलगडा पाडता येईल. तो असा की, प्रधान जे गुण आहेत—म्हणजे सहृदयता व तज्जन्य स्वभाववर्णन करण्याची शक्ति—ही शेकडो ग्रंथांचे अध्ययन करून त्यांचे ज्याने पीठ करून सोडले व मोठा वादचंचु किंवा महान् ग्रंथकार झाला त्यास सुद्धा त्याच्या विद्वत्तेच्या योगाने लेशमात्रहि येणार नाहीत. मोठा मोठा विद्वान् झाला तरी जसा मनुष्य चित्रकलेत किंवा गायन अथवा वादनकलेत निपुण झालाच असे होत नाही, तशीच गोष्ट कवित्वाची होय. रत्नपारख्याची जशी एक प्रकारची नजर असते, ती शिकवून येणारी नव्हे; व तशीच चित्रकलेचे किंवा वादनकलेचे मर्म समजण्याची शक्ति जशी एखाद्याचेच ठायी ईश्वराने ठेविली असते, तशीच कवितेची गोष्ट आहे. पण इतकेच नव्हे; अशा प्रचंड पंडितांस जातीने कविता करता येणार नाही हे तर आहेच. पण शिवाय तिची परीक्षा किंवा आस्वादन हेहि त्यास नियमाने शक्य असेलच असेहि म्हणवणार नाही. याची उदाहरणे, इंग्लंडात मागल्या शतकात होऊन गेलेला जॉनसन् हा काही अंशी होय; व इकडे अलीकडील आपले जुने शास्त्री प्रायः सर्वथा होत. बाह्य सृष्टीचे वर्णन कर्तव्य असता तो प्रदेश घटकाभर प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पाहिला असता जी त्या विषयी मनांत कल्पना भरेल ती जशी नकाशांवरून किंवा वर्णनांवरून पुष्कळ दिवस अभ्यास केल्यानेहि येणारी नव्हे; त्याप्रमाणेच अंतःसृष्टीचीहि गोष्ट हो र त्या त्या रसाच्या विषयाच्या साक्षात् अनुभवाने जे स्वरूप लक्षात येईल ते नुसत्या कोरड्या वर्णनांच्या वारंवार वाचनानेहि आलेच जर अगदी अस्पष्ट होईल. सारांश, कवित्वास किंबहुना रसिकतेसहि विद्वत्ता अगदी कारण नाही. उलटी ती मागे सांगितल्याप्रमाणे दोहोंस स्वभावतः विरुद्धच होय असेहि म्हटले पाहिजे. तिचा उपयोग झालाच तर कवितेचे वर सांगितलेले बाह्य व अप्रधान गुण तिच्या योगाने कदाचित् मोठ्या श्रमाने साधता येतील, इतकाच. पण तिच्या तत्त्वापर्यंत तिची गति कदापिहि पोचणार नाही!

तेव्हा एकंदर सिद्धांत हा.—जो जात्या कवि आहे तो कदाचित् विद्वानहि असेल—जसे कालिदास, जगन्नाथराय, मिल्टन्, बायरन् इत्यादि; किंवा

नसेलहि—जसे शेक्सपीयर, बर्न्स, तुकाराम इत्यादि, पण जितकी जितकी विद्वत्ता अधिक तितके तितके कवित्व अधिक ही मात्र मोठी चूक. या पक्षाची काही उदाहरणे मागे सांगितली आहेतच—सिसरो, जॉनसन्, आपले जुने शास्त्री. पण ही फार का देता येत नाहीत याचे कारण अमळ विचार करील त्यास तेव्हाच उमगेल—ते विद्वत्तेस सर्वगुणाधिष्ठित मानणाऱ्या भोळ्या भाविकास मोठे जाचेल यात संशय नाही. ते आम्ही येथे उघड लिहीत नाही; ते एवढ्यानेच सुचवितो की, असे होणे हे त्या विद्वानांच्या गर्वास किंवा मूर्खपणास योग्य शासन झाले; व या योगाने त्यांनी पुढील लोकांस चांगला शहाणपणाचा मार्ग दाखवून ठेवला !

समाप्त

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्र. क्र. 92390

REFBK-0012310

## प्रमेयांची उद्याने ♣ ♣ ♣ ♣

डॉ. अच्युत नारायण देशपांडे यांनी संग्रहित व संपादित केलेली ही ‘ प्रमेयांची उद्याने ’ मराठी गद्य-साहित्यातील विचारांची गंभीरता, युक्तिवादाची प्रौढता व शैलीची हृद्यता यांचा वाचकांना पुरेपूर प्रत्यय घडवितील. वाग्देवीच्या वनसृष्टीतील विचक्षण व रसिक निर्वाचक असा डॉ. देशपांडे यांचा यथार्थ लौकिक आहे. मराठी शारदेच्या विशाल वनराजीतील अत्यंत मनोहर, सौंदर्यपूर्ण तितकेच सकस व कधीहि न कोमेजणारे असे प्रमेयपुष्पांचे ताटवे निवडून डॉ. देशपांडे यांनी हे उद्यान सजविले आहे, याविषयी दुमत होणार नाही. ‘ मराठी साहित्याचा इतिहास ’ लिहिताना आरंभापासून तो आतापर्यंतच्या सर्व मराठी साहित्यात सखोल अवगाहन केल्यामुळे डॉ. देशपांडे यांना या निवडीच्या बाबतीत निर्विवाद अधिकार प्राप्त झाला आहे असे म्हणण्यास हरकत नाही. विचारप्रवर्तन आणि विश्लेषण, सोज्वळता आणि सुश्लिष्टता, आवेश आणि अनुनय इत्यादि मराठी गद्यपरंपरेची जी विलोभनीय वैशिष्ट्ये त्यांचे दर्शन साहित्याच्या अभ्यासकाला घडविण्यास डॉ. देशपांडे यांनी संकलित केलेली ही ‘ प्रमेयांची उद्याने ’ समर्थ ठरतील यात शंका नाही.

सुविचार प्रकाशन मंडळ
सत्यम् शिवम् सुंदरम्